[2024] 3 एससीआर 462 : 2024 आयएनएससी 161

सीता सोरेन

v.

भारत संघ

(फौजदारी अपील क्रमांक 451 ऑफ 2019)

04 मार्च 2024

[डॉ. धनंजय वाय चंद्रचूड,* सरन्यायाधीश, ए. एस. बोपण्णा,

एम. एम. सुंदरेश, पामिदीघंटम श्री नरसिंह,

जे.बी. पारडीवाला, संजय कुमार आणि मनोज मिश्रा, जे.जे.]

विचारकरण्याजोगा मुद्दा

तात्कालिक संदर्भ *पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्यातील बहुमताच्या निर्णयाच्या योग्यतेचा पुनर्विचार करण्याशी संबंधित आहे ज्यामुळे विधान मंडळाच्या सदस्यास खटल्यापासून सूट देण्यात आली आहे ज्याने बोलण्यासाठी

किंवा मतदान करण्यासाठी लाच घेतल्याचा आरोप आहे.

हेडनोट्स

भारतीय राज्यघटना – कलम १०५ आणि १९६ - संसदे1 च्या किंवा विधिमंडळाच्या सभागृहांचे आणि सदस्य व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार व सवलती, जे वादात असतील त्याप्रमाणे -फौजदारी न्यायालयात लाचखोरीच्या आरोपाखाली संसदेचे सदस्य किंवा विधानसभेचे सदस्य खटल्यातून सूट मिळवू शकल्यास - पीव्ही नरसिंह राव यांच्या केस मधील बहुमताच्या मताच्या अचूकतेचा पुनर्विचार ज्यायोगे मतदान करण्यासाठी किंवा बोलण्यासाठी लाचखोरीत गुंतलेल्या विधिमंडळाच्या सदस्याला खटल्यापासून सूट देता येते :

असा निर्णय दिला :*पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्यातील बहुमताच्या निकालाचा जनहित, सार्वजनिक जीवनातील

प्रामाणिकपणा आणि संसदीय लोकशाहीवर व्यापक परिणाम होतो - निर्णयाचा पुनर्विचार न केल्यास या न्यायालयाने चूक कायम करण्याचा गंभीर धोका आहे - अशा प्रकारे, या प्रकरणाशी सहमत नाही आणि रद्द केले गेले. [परिच्छेद १८८]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ व १९६ - संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सभागृहांचे व सदस्य व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार व सवलती - राज्यसभेच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवाराच्या बाजूने मतदान करण्यासाठी लाच स्वीकारल्याचा विधानसभा सदस्यावर आरोप, मात्र खुल्या मतदानात त्यांनी कथित लाच देणाऱ्याच्या बाजूने नव्हे तर आपल्याच पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूने मतदान केले - सदस्याच्या विरुद्ध आरोपपत्र –

फौजदारी आरोप रद्द करण्यासाठी याचिका, कलम १९४ (२) च्या संरक्षणाचा दावा, *पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्याचा आधार घेऊन की संसदेत बोलण्यासाठी किंवा मतदान करण्यासाठी लाच स्वीकारल्याबद्दलच्या खटल्यापासून सदस्याला सूट मिळेल - उच्च न्यायालयाने फेटाळली - सर्वोच्च न्यायालयासमोर प्रकरण, जिथे दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवले, ज्यांनी पुढे पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवले - पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने * पी व्ही नरसिंह राव या केसच्या अचूकतेबद्दल शंका व्यक्त केली,ज्यांत बहुमताच्या निकालात असे म्हटले होते की संसदेत बोलण्यासाठी किंवा मतदान करण्यासाठी लाच स्वीकारल्यास आमदाराला सूट दिली जाते, तर अल्पसंख्याकांनी निकालात असे म्हटले आहे की

आमदाराला संसदेत मतदान करण्यासाठी किंवा बोलण्यासाठी प्रभावित करण्यासाठी लाच देणे, कलम **105 (2)** आणि **194 (2)** द्वारे संरक्षित नाही आणि हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवले:

असा निर्णय दिला की : *पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्यातील बहुमताच्या निकालात प्रश्नार्थक मुद्द्यावर मांडण्यात आलेल्या विवेचनामुळे विरोधाभासी निकाल निघतो - असे विवेचन कलम १०५ व १९४ च्या मजकुराच्या व उद्देशाच्या विरुद्ध आहे - *पीव्ही नरसिंह राव यांच्या प्रकरणाचा पुनर्विचार केल्याने डोळस पणाच्या (स्टेअर डिसिसिस)तत्त्वाचे उल्लंघन होत नाही - सभागृहाचे सदस्य किंवा प्रत्यक्ष सभागृह स्वत: त्यांच्या कामकाजाशी आवश्यक व संबंधित नसलेल्या विशेषाधिकारांचा दावा करू शकत नाही - राज्यघटना सार्वजनिक जीवनातील शुचितेची कल्पना करते - विधिमंडळाच्या सदस्यांचा भ्रष्टाचार आणि

लाचखोरी संसदीय लोकशाहीचा पाया नष्ट करते - लाचखोरीला संसदीय विशेषाधिकाराने संरक्षण दिले जात नाही - अपेक्षित निकाल देणे लाचखोरीच्या गुन्ह्याशी संबंधित नाही - राज्यसभेच्या निवडणुकीसाठी मतदान, कलम १९४ (२) च्या कक्षेत येते - अशा प्रकारे, या प्रकरणाशी सहमत नाही आणि म्हणून फेटाळले गेले. [परिच्छेद डी, जी, आय, १८८]

न्यायालयीन मागील दाखला - *पीव्ही नरसिंह राव यांच्या प्रकरणात दीर्घकाळ स्थिरावलेला कायदा रद्द करणे, गरज पडल्यास:

असे म्हटले आहे : खटल्याने ज्या कालावधीत हे क्षेत्र धारण केले आहे ते प्राथमिक परिणामाचे नाही - या न्यायालयाने स्वतःला डोळस पणाच्या(स्टेअर डिसिसिस)सिद्धांताच्या कठोर आकलनापुरते मर्यादित ठेवणे योग्य नाही -

कायद्याच्या मार्मिक विकासासाठी आणि न्यायाच्या प्रगतीसाठी या न्यायालयासाठी आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याचे सामर्थ्य आवश्यक आहे - जर या न्यायालयाचा आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला तर, घटनात्मक न्यायशास्त्राचा विकास अक्षरशः ठप्प होईल - अशा प्रकारे *पीव्ही नरसिंह राव यांच्या प्रकरणाचा पुनर्विचार केल्याने डोळस पणाच्या (स्टेअर डिसिसिस)तत्त्वाचे उल्लंघन होत नाही - पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्याचा जनहित, सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा आणि संसदीय लोकशाहीच्या कार्यपद्धतीवर व्यापक परिणाम होतो आहे - यात अनेक स्पष्ट त्रुटी आहेत, कलम १०५ च्या मजकुराचे त्याचे विवेचन; व्याप्तीची संकल्पना आणि संसदीय विशेषाधिकाराचा हेतू आणि आंतरराष्ट्रीय न्यायशास्त्राकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन या सर्वांचा विरोधाभासी परिणाम

झाला - *पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्यातील निर्णयाचा पुनर्विचार न केल्यास चूक कायम राहण्याला परवानगी दिल्याचा धोका आहे - राज्यघटनेचा चुकीचा अर्थ, केवळ या न्यायालयातील पाच न्यायाधीशांच्या आधीच्या मताशी दृढ निष्ठा ठेवल्यामुळे कायम ठेवता कामा नये. [परिच्छेद ३१, ३३, ४०, ४४, १८८.१]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ आणि १९४ – संसदीय विशेषाधिकार, सभागृहाचा सामूहिक अधिकार असल्यास – विशेषाधिकारांचे दोन घटक :

असे म्हटले आहे की : पहिले म्हणजे संसदेच्या सभागृहाला सामूहिकरित्या मिळणाऱ्या अधिकारांची बेरीज आणि दुसरे म्हणजे सभागृहाच्या सदस्यांना वैयक्तिकरित्या मिळालेले अधिकार - अधिकार व सूट जसे की, स्वत:च्या कार्यपद्धतीचे नियमन करण्याचा अधिकार, सभागृहाचा अवमान

केल्याबद्दल शिक्षा करण्याचा किंवा एखाद्या सदस्याची हकालपट्टी करण्याचा अधिकार यासारखे अधिकार आणि सवलती सभागृहाला त्याच्या योग्य कामकाजासाठी व सदस्यांचे संरक्षण आणि स्वतःच्या अधिकाराची व प्रतिष्ठेची पुष्टी यासाठी,सामूहिक संस्था म्हणून असलेल्या विशेषाधिकारांच्या पहिल्या घटकाशी संबंधित आहेत, - सभागृहातील सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरलेल्या अधिकारांचा दुसरा घटक म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि अटकेपासून मुक्तता यांचा इतर गोष्टी व्यतिरिक्त समावेश आहे - सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरलेला विशेषाधिकार त्याच्या गरजेनुसार पात्र आहे, ज्यामध्ये विशेषाधिकार असा असावा की "ज्याशिवाय ते आपली कार्ये पार पाडू शकणार नाहीत" - सभागृहाच्या सदस्यांना वैयक्तिकरित्या मिळालेले हे विशेषाधिकार,सभागृहाचे सामूहिक कार्य प्रभावीपणे पार पाडणे सुलभ व्हावे, हे

सुनिश्चित करण्याचे साधन आहेत -सभागृहाच्या सदस्यांना मिळणारे विशेषाधिकार जे इतर संस्था किंवा व्यक्तींकडे असलेल्या विशेषाधिकारांपेक्षा जास्त आहेत, ते अनिर्बंध किंवा विनाअटीचे नाहीत - अशा प्रकारे, कलम १०५ आणि १९४ मध्ये दिलेले विशेषाधिकार आणि सवलती एकत्रितपणे सभागृहाचे आहेत - सदस्यांनी वैयक्तिकरित्या विशेषाधिकारांचा वापर करणे हे सभागृहाच्या निरोगी आणि आवश्यक कामकाजाशी निगडित आहे की नाही, या आधारावर तपासले पाहिजे. [परिच्छेद ७६, ७७, ८४]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ आणि १९४ – संसदीय विशेषाधिकार – विशेषाधिकाराचा दावा करण्यासाठी आणि वापरण्यासाठी आवश्यक चाचणी:

असे म्हटले आहे की :सभागृहाचे सदस्य किंवा खरोखरच सभागृह स्वत: त्यांच्या कामकाजाशी संबंधित व आवश्यक

नसलेल्या विशेषाधिकारांचा दावा करू शकत नाही - संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सदस्याने वैयक्तिकरित्या विशेषाधिकाराचा दावा करणे दुहेरी चाचणीद्वारे नियंत्रित केले जाईल, प्रथम, दावा केलेल्या विशेषाधिकाराला सभागृहाच्या सामूहिक कामकाजाशी जोडता आले पाहिजे आणि दुसरे, त्याच्या गरजेचा आमदाराच्या आवश्यक कर्तव्यांच्या पूर्ततेशी कार्यात्मक संबंध असणे आवश्यक आहे - विशेषाधिकार अस्तित्वात आहे आणि सभागृहाने आपले कार्य एकत्रितपणे पार पाडण्यासाठी आवश्यक आहे याची खात्री करण्याचे ओझे विशेषाधिकाराचा दावा करणाऱ्या व्यक्तीवर किंवा संस्थेवर आहे - संसदेची किंवा विधिमंडळांची सभागृहे, आणि समित्या ही बेटे नाहीत जी सामान्य कायद्यांच्या अंमलबजावणीपासून आतील लोकांना संरक्षण देणारी वसाहत म्हणून कार्य करतात - कायदा बनवणारे त्याच कायद्याच्या अधीन असतात,जो कायदा

बनवणारी संस्था, लोकांकरिता बनवते म्हणजे ज्या लोकांवर ती शासन करते आणि त्यांचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करते.[परिच्छेद ८७, ९०, ९१]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ आणि १९४ – संसदीय विशेषाधिकार – विशेषाधिकार, जर एखादा संसद सदस्य किंवा विधिमंडळाचा सदस्य यांनी त्यांच्या भाषणाच्या किंवा मतदानाच्या संदर्भात लाच घेतली तर सूट मिळण्याचा विशेषाधिकार मिळेल काय :

असा निर्णय दिला की :लाचखोरीला संसदीय विशेषाधिकाराचे संरक्षण नाही - लाचखोरी ही,सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संदर्भात किंवा दिलेल्या मताच्या संदर्भात नाही - कलम १०५ चा भाग (2) आणि कलम १९४ अन्वये लाचखोरीला सूट नाही कारण लाचखोरीत गुंतलेला सदस्य असा गुन्हा करतो ज्याचा त्यांच्या मतदानाच्या

क्षमतेशी किंवा त्यांच्या मतावर निर्णय घेण्याच्या क्षमतेशी संबंध नसतो - हेच तत्त्व सभागृहात किंवा समितीतील भाषणाच्या संदर्भात लाचखोरीला लागू होते - विधीमंडळातील वैयक्तिक सदस्य विधानसभेतील मतदान किंवा भाषणासंदर्भात लाचखोरीच्या आरोपाखालील खटल्यातून कलम १०५ आणि १९४ अन्वये सूट मिळविण्याचा विशेषाधिकाराचा दावा करू शकत नाही - सूट मिळविण्याचा हा दावा सभागृहाच्या सामूहिक कामकाजाशी निगडित आहे आणि आमदाराची आवश्यक कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक आहे या दुहेरी कसोटीची पूर्तता करण्यास अशा प्रकारचा दावा अपयशी ठरतो. [परिच्छेद जी, 188.4, 188.7]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ आणि १९४ – संसदीय विशेषाधिकार – कलम १०५ च्या भाग (२) मधील 'कोणत्याही गोष्टीसंदर्भात' आणि 'कशाबद्दलही' अभिव्यक्ती

– विवेचन :

असा निर्णय दिला की :कलम १०५ च्या भाग (२) मध्ये "कोणत्याही गोष्टीबद्दल" सांगितलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही मताच्या संदर्भात सूट देण्यात आली आहे - या सूट देण्याची व्याप्ती सभागृहाच्या कामकाजाशी असलेल्या आंतरिक संबंधाच्या चाचणीवर आणि आवश्यकता चाचणीच्या आधारे तपासली जाणे आवश्यक आहे - कलम १०५ च्या भाग (२) अन्वये देण्यात आलेल्या सूट ची व्याप्ती स्पष्ट करण्यासाठी "च्या संदर्भात" हे शब्द महत्वाचे आहे - भाग (२) मधील "च्या संदर्भात" शब्द "कोणत्याही बोललेल्या गोष्टीसंदर्भात किंवा दिलेल्या कोणत्याही मतासंदर्भात " याला लागू होतात आणि उत्तरार्धात सभागृहाने किंवा सभागृहाच्या अधिकाराने प्रकाशित केलेल्या प्रकाशनास लागू होतात - कलम १०५ (२) आणि १९४(२) मधील सोबतच्या अभिव्यक्तींच्या संदर्भात

"काहीही" आणि "कोणतेही" शब्द वाचले पाहिजेत - "काहीही" किंवा "कोणतेही" शब्द ज्या शब्दांसोबत आहेत व लागू होतात ते वाचल्याशिवाय अर्थ लावता येत नाही म्हणजे अनुक्रमे "सांगितलेले" आणि "दिलेले मत" - "काहीही" आणि "कोणतेही" शब्द अनुक्रमे त्यांच्या संबंधित शब्दांसोबत वाचले जातात, तेंव्हा त्या शब्दांचा अर्थ असा आहे की एखादा सदस्य सभागृहासमोरील कोणत्याही विषयावर त्यांना वाटेल तसे बोलण्यास आणि त्यांना हव्या त्या दिशेने मतदान करण्यास सूट घेऊ शकतो - हे पूर्णतया न्यायालयाच्या हस्तक्षेपाच्या कक्षेबाहेर आहेत - "च्या संदर्भात" शब्दांचा अर्थ 'उद्भवलेला' किंवा 'स्पष्ट संबंध असणारा' असा आहे आणि त्याचा अर्थ असा केला जाऊ शकत नाही ज्याचा दिलेल्या भाषणाशी किंवा मताशी दुरान्वयाने ही संबंध असू शकतो. [परिच्छेद ९९, १०२-१०३, १८८.६]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ आणि १९४ – संसदेतील अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण – उद्देश आणि हेतू :

असा निर्णय देण्यात आला की : राज्यघटना सार्वजनिक जीवनातील शुचितेची कल्पना करते - ज्या उद्देशाने आणि हेतूसाठी राज्यघटनेने संसदेतील अधिकार, विशेषाधिकार आणि सूट निश्चित केली आहे ती लक्षात घेतली पाहिजे - विशेषाधिकार हे मूलत: सभागृहाशी (सामूहिक रित्या) संबंधित असतात आणि त्याच्या कामकाजासाठी आवश्यक असतात - म्हणून, कलम १०५ मधील "च्या संदर्भात" या शब्दाचा (वाक्याचा) विशेषाधिकार आणि सवलतीच्या उद्देशाशी सुसंगत अर्थ असणे आवश्यक आहे - कलम १०५ आणि १९४ मध्ये एक निर्भय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे ज्यामध्ये संसदेच्या सभागृहात आणि राज्य विधिमंडळात वादविवाद केला जातो ,विचारविनिमय आणि विचारांची देवाणघेवाण होऊ शकते - एखाद्या

सदस्याला एखाद्या विषयावरील विश्वासामुळे/ भूमिकेमुळे नव्हे तर लाचखोरीच्या कृतीमुळे विशिष्ट पद्धतीने मतदान करण्यास किंवा बोलण्यास प्रवृत्त केले जाते तेव्हा हा हेतू नष्ट होतो - विधिमंडळाच्या सदस्यांचा भ्रष्टाचार आणि लाचखोरी भारतीय संसदीय लोकशाहीचा पाया नष्ट करते - हे संविधानाच्या महत्त्वाकांक्षी आणि विचारशील आदर्शांना विध्वंसक आहे, आणि नागरिकांना जबाबदार, उत्तरदायी आणि प्रातिनिधिक लोकशाहीपासून वंचित ठेवणारी राज्यव्यवस्था निर्माण करते. [परिच्छेद १०४, १८८.५, १८८.८]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ व १९४ – संसदीय विशेषाधिकार – लाचखोरीच्या आरोपांबाबत न्यायालये व सभागृह यांनी समांतर अधिकारक्षेत्र वापरल्यास :

असा निर्णय देण्यात आला की : लाचखोरीचा मुद्दा हा

सभागृहाच्या लाचखोर सदस्यांवरील केवळ सभागृहाच्या अधिकारक्षेत्राचा विषय नाही - लाच घेतल्याबद्दल व सदस्याने अवमान केल्याबद्दल सभागृहाने कारवाई करण्याचा हेतू , फौजदारी खटल्यापेक्षा वेगळा हेतू साध्य करतो - फौजदारी गुन्ह्यासाठी खटला चालविण्यासाठी सक्षम न्यायालयाद्वारे वापरले जाणारे अधिकारक्षेत्र,आणि विधिमंडळाच्या सदस्याकडून घेतल्या गेलेली लाच या संदर्भात शिस्तभंगाची कारवाई करण्याचा सभागृहाचा अधिकार वेगवेगळ्या क्षेत्रांत अस्तित्वात असतो - फौजदारी गुन्ह्यासंदर्भात न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्याची व्याप्ती, उद्देश आणि परिणाम आणि सदस्यांना शिस्त लावण्याचा सभागृहाचा अधिकार वेगवेगळे आहेत - विधिमंडळाचा जो सदस्य लाच घेण्यात गुंतला आहे त्याच्यावर फौजदारी खटला चालवण्याचे न्यायालयाचे अधिकार क्षेत्र मान्य केल्याने विधिमंडळाच्या वैयक्तिक

सदस्यांविरुद्ध गैरवापराची शक्यता वाढवली जात नाही किंवा कमी केली जात नाही . [परिच्छेद १८८.९, १८८.१०]

भारतीय राज्यघटना – कलम १०५ व १९४ – संसदीय विशेषाधिकार – लाचखोरीचा गुन्हा, तो कोणत्या टप्प्यावर स्थिर आकार घेतो :

असा निर्णय दिला की : लोकसेवकाला लाच दिल्याचा गुन्हा म्हणजे अवाजवी लाभ मिळविणे किंवा घेण्यास सहमती दर्शविणे इथे पक्का होतो आणि ज्या कृत्यासाठी अवाजवी लाभ मिळविला जातो त्या कृत्याची प्रत्यक्ष कामगिरी नाही - निकाल देणे हे लाचखोरीच्या गुन्ह्याला अप्रासंगिक आहे - पी व्ही नरसिंह राव यांच्या केसच्या बहुमताच्या निकालात सुचविलेल्या पद्धतीने कलम १०५ (२) आणि १९४ (२) वाचल्यास परिणाम विरोधाभासी निकालात होतो - अशा विवेचनामुळे अशी परिस्थिती उद्भवते की एखाद्या आमदाराने

लाच स्वीकारल्यावर आणि त्यानंतर सहमतीच्या दिशेने मतदान केल्यास त्याला सूट देण्याचे बक्षीस दिल्या जाते - दुसरीकडे, जो आमदार लाच स्वीकारण्यास तयार होतो, परंतु शेवटी स्वतंत्रपणे मतदान करण्याचा निर्णय घेतो त्याच्यावर खटला चालविला जाईल - असे स्पष्टीकरण केवळ कलम १०५ आणि १९४ मधील मजकूरच नाही तर विधिमंडळाच्या सदस्यांना प्रदान करण्यात आलेल्या सांसदीय विशेषाधिकारांच्या हेतुलाही छेद देतो - लाचखोरीचा गुन्हा हा मान्य केलेल्या कृतीच्या कामगिरीवर अज्ञेयवादी आहे आणि बेकायदेशीर लाचेच्या देवाणघेवाणीला स्थिर परिणाम देणारा आहे - मतदान सहमतीच्या दिशेने झाले आहे की नाही हे महत्त्वाचे नाही - आमदार लाच स्वीकारतो त्याच वेळी लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो - भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ - कलम 7.[परिच्छेद ११७, १२६, १८८.११]

डिजिटल सुप्रीम कोर्टाचा अहवाल

भारतीय राज्यघटना – कलम १०५ आणि १९४ – संसदीय विशेषाधिकार – राज्यसभेच्या निवडणुकीत राज्य विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांनी दिलेली मते, जर कलम १९४ (२) द्वारे संरक्षित केल्यास:

असा निर्णय देण्यात आला की :राज्यसभेच्या निवडणुकीचे मतदान कलम १९४(२) च्या कक्षेत येते - कलम १९४ च्या मजकूरात जाणीवपूर्वक संसदीय प्रक्रियांचा समावेश करण्यासाठी 'सभागृह' ऐवजी 'विधिमंडळ' हा शब्द वापरला आहे,जे सभागृहाच्या पटलावर होणे आवश्यक नसते,किंवा त्यात बारकाईने सुद्धा 'कायदा निर्मिती'चा समावेश नसतो - राज्यसभा किंवा राज्यपरिषद लोकशाहीच्या कामकाजात अविभाज्य कार्य करते ,आणि राज्यसभेने बजावलेली भूमिका राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा एक भाग आहे - राज्यसभेचे सदस्य निवडताना राज्य विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांनी बजावलेली भूमिका महत्त्वाची आहे

आणि मतदानाचा वापर मुक्तपणे आणि कायदेशीर अभियोग (खटल्याची)भीती न बाळगता व्हावा यासाठी जास्तीत जास्त संरक्षण आवश्यक आहे - इतर कोणतेही स्पष्टीकरण, कलम १९४ (२) चा मजकूर आणि संसदीय विशेषाधिकाराचा हेतू खोटे ठरवितो - कलम १०५ आणि १९४ यात दिलेले संरक्षण.ज्याला बोलक्या भाषेत "संसदीय विशेषाधिकार" म्हणतात आणि "कायद्यातील विशेषाधिकार" नाही - ते केवळ सभागृहाच्या पटलावर कायदा बनविण्यापुरते मर्यादित करू शकत नाही तर सभागृहाचे कामकाज सुरू नसतानाही विधिमंडळ किंवा संसदेत होणाऱ्या, निवडून आलेल्या सदस्यांच्या इतर अधिकार आणि जबाबदाऱ्यांपर्यंत त्याचा विस्तार करण्यात यावा. [परिच्छेद १८०, १८७]

भारतीय राज्यघटना – कलम १९४ – "विधिमंडळाचे सभागृह" ऐवजी "विधीमंडळ" या शब्दाचा योग्य ठिकाणी

वापर – परिणाम :

असे म्हटले आहे की : तरतुदीच्या मसुद्यावरून हे स्पष्ट होते की या दोन शब्दांचा वापर आलटून पालटून करण्यात आलेला नाही - कलम १९४(२) चा पहिला भाग "विधिमंडळात किंवा त्यातील कोणत्याही समितीमध्ये त्यांनी सांगितलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही मताशी संबंधित आहे" - तथापि, दुसऱ्या भागात, वापरलेले वाक्य "अशा विधिमंडळाच्या सभागृहाद्वारे किंवा त्यांच्या अधिकाराखाली प्रकाशित,कोणताही अहवाल,कागद, मते किंवा कामकाज करण्याच्या संदर्भात आहे " - पहिल्या भागात वापरलेले 'विधीमंडळ' हे शब्द व तरतुदीच्या दुसऱ्या भागात वापरलेले "अशा विधिमंडळाचे सभागृह" हे शब्द त्यामध्ये स्पष्टपणे दूरी दाखवितात. - तरतुदीमुळे दोघांमध्ये फरक निर्माण होतो - "विधिमंडळाचे सभागृह" आणि "विधीमंडळ" या शब्दांचे वेगवेगळे अर्थ आहेत - "विधिमंडळाचे सभागृह" म्हणजे

कायद्याशी संबंधित संस्था, ज्यास कलम 174 नुसार राज्यपालांनी बोलावलेले असते - दुसरीकडे "विधिमंडळ" हा शब्द कलम 168 अंतर्गत राज्यपाल आणि विधिमंडळाच्या सभागृहांचा समावेश असलेल्या व्यापक संकल्पनेचा संदर्भ देतो - "विधिमंडळाचे सभागृह" ऐवजी "विधिमंडळात" या वाक्याचा(शब्दांचा)वापर महत्त्वपूर्ण आहे. [परिच्छेद १७४, १७५.]

भारतीय राज्यघटना – कलम १०५, १९४ – संसदीय विशेषाधिकार खालीलप्रमाणे:

असे म्हटले आहे की :संसदीय शासनपद्धतीचे कामकाज सुलभ करण्यासाठी विचारशील लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे - ज्या आमदारांवर नागरिक विश्वास टाकतात , त्यांना 'भीती किंवा पक्षपातीपणा' न बाळगता सभागृहात आपले विचार आणि मते मांडता येतील याची खात्री देते -

अल्प मताधिक्य असलेल्या राजकीय पक्षाचा आमदार कोणत्याही प्रस्तावावर निर्भयपणे मतदान करू शकतो ; देशाच्या दुर्गम भागातील आमदार आपल्या मतदारसंघावर परिणाम करणारे मुद्दे कायदेशीर खटल्याद्वारे त्रास होण्याची भीती न बाळगता मांडू शकतो ; आणि मानहानीचा आरोप होण्याची भीती न बाळगता आमदार उत्तरदायित्वाची मागणी करू शकतो. [परिच्छेद १]

भारतीय राज्यघटना – कलम १०५, भाग (१), (२), (३), (४) – संसदेच्या सभागृहांचे व त्यातील सदस्य व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार इ. – स्पष्टीकरण :

असे म्हटले आहे की : कलम (१) असे घोषित करते की संसदेमध्ये, राज्यघटनेच्या अधीन राहून, आणि संसदेतील कार्यपद्धतीचे नियमन करणारे नियम आणि स्थायी आदेश यांच्या अधीन राहून, अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल -

खंड(भाग)(२) च्या पहिल्या भागात असे नमूद केले आहे की संसद सदस्याने संसदेत किंवा त्याच्या कोणत्याही समितीमध्ये "काहीही सांगितले किंवा दिलेले कोणतेही मत" कोणत्याही न्यायालयासमोर उत्तरदायी राहणार नाही आणि दुसऱ्या भागात असे नमूद केले आहे की,कोणतीही व्यक्ती संसदेच्या कोणत्याही सभागृहाद्वारे किंवा त्यांच्या अधिकाराखाली कोणताही अहवाल, कागद, मतदान किंवा कार्यवाही प्रकाशित करण्यासंदर्भात कोणत्याही न्यायालयासमोर जबाबदार राहणार नाही - कलम (1) आणि (2) स्पष्टपणे संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देतात - भाग (1) हा एक सकारात्मक सिद्धांत आहे जो अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देतो तर भाग (2) त्याच स्वातंत्र्याचा नकारात्मक विस्तार आहे - भाग (कलम)(3) मध्ये असे म्हटले आहे की कलम 105 च्या भाग (1) आणि (2) अंतर्गत येत नसलेल्या विशेषाधिकारांच्या संदर्भात, अधिकार,

विशेषाधिकार आणि सवलती, संसदेने वेळोवेळी कायद्याने परिभाषित केल्या प्रमाणे असतील - भाग (3) संसदेला वेळोवेळी त्याच्या विशेषाधिकारांबद्दल कायदा करण्याची परवानगी देते - कलम (4) वरील कलमांमधील स्वातंत्र्य सर्व व्यक्तींना प्रदान करते ज्यांना घटनेनुसार संसदेत बोलण्याचा अधिकार आहे - अशा प्रकारे, कलम १०५ आणि १९४ मधील चार भाग एक संमिश्र संपूर्ण तयार करतात जी एकमेकांना रंग देतात आणि एकत्रितपणे संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सभागृहांचे आणि सदस्य आणि समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण यांचा कोश तयार करतात. [परिच्छेद ६३-६६, ७३]

संसदीय विशेषाधिकार – भारतातील विधिमंडळांच्या विशेषाधिकारांचा इतिहास **:**

असे म्हटले आहे की :या इतिहासाचा तपास ब्रिटनमधील

(यू के)हाऊस ऑफ कॉमन्समधील संसदीय विशेषाधिकारांच्या इतिहासापर्यंत लागतो,तसेच वसाहतवादी राजवटीत या विशेषाधिकारांवर दावा करण्यासाठी भारतीय कायदेमंडळांनी केलेला संघर्ष दिसतो - ब्रिटनमधील (यू के)हाऊस ऑफ कॉमन्सप्रमाणे भारताला संसद आणि राजा यांच्यातील संघर्षानंतर मिळालेले 'प्राचीन आणि निःसंशय' विशेषाधिकार नाहीत - राज्यघटनेच्या प्रारंभानंतर वैधानिक विशेषाधिकाराचे घटनात्मक विशेषाधिकारात रूपांतर झाले. [परिच्छेद ४९, १८८.२]

संसदीय विशेषाधिकार - विशेषाधिकारांच्या तुलनेत लाचखोरी - परकीय न्यायक्षेत्रातील न्यायशास्त्र - युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया या इतर न्यायक्षेत्रातील संसद सदस्याला मिळालेल्या लाचेच्या संदर्भात विशेषाधिकारांवरील कायद्याची उत्क्रांती आणि स्थिती - स्पष्ट केली आणि चर्चा

केली. [परिच्छेद १२८-१६७]

लाचलुचपत प्रतिबंधक कायदा , १९८८ - कलम ७ - सरकारी कर्मचाऱ्याला लाच देण्यासंदर्भातील गुन्हा - लाचखोरीचा गुन्हा, केंव्हा पूर्ण होतो - गुन्ह्याचे घटक :

असे म्हटले आहे की : कलम ७ अन्वये एखाद्या विशिष्ट मार्गाने वागण्याच्या हेतूने किंवा तसे न वाकण्याच्या हेतूने केवळ "मिळविणे", "स्वीकारणे" किंवा " मिळविण्याचा प्रयत्न करणे" हे गुन्हा पूर्ण करण्यासाठी पुरेसे आहे - ज्या कृत्यासाठी लाच दिली जाते ती कृती प्रत्यक्षात करणे आवश्यक नाही - तरतुदीचे प्रथम स्पष्टीकरण या विवेचनाला अधिक बळकट करते जेव्हा त्यात असे स्पष्ट पणे सांगते की, एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याने सार्वजनिक कर्तव्य अयोग्य प्रकारे केले नसले तरी अवाजवी लाभ घेणे किंवा मिळवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे “ मिळविणे, स्वीकारणे,

किंवा प्रयत्न करणे " हा स्वतःच गुन्हा ठरेल - अशा प्रकारे, एखाद्या लोकसेवकाला लाच दिल्याच्या गुन्ह्याबाबत अवाजवी लाभ मिळविणे किंवा स्वीकारण्यास सहमती दर्शविणे हीच मेख आहे आणि ज्या कृत्यासाठी अनुचित लाभ मिळविला जातो त्या कृत्याची प्रत्यक्ष कामगिरी नाही. [परिच्छेद ११७]

न्यायिक पुनरावलोकन – उत्तरदायित्व – संसदीय विशेषाधिकाराचा दावा :

असे म्हटले आहे की :संसदीय विशेषाधिकाराचा दावा राज्यघटनेच्या निकषांशी सुसंगत आहे, त्यामुळे न्यायालयीन पुनरावलोकनास उत्तरदायी आहे. [परिच्छेद १८८.३]

न्यायालयीन शिस्त –ची कार्यपद्धती :

असे म्हटले आहे : मोठी संख्या असलेल्या खंडपीठाने दिलेला निर्णय कमी किंवा समान संख्या असलेल्या पुढील

कोणत्याही खंडपीठाला बंधनकारक आहे - कमी संख्या असलेले खंडपीठ मोठ्या संख्येच्या खंडपीठाने घेतलेल्या कायद्याच्या दृष्टिकोनाशी असहमत किंवा विरुद्ध असू शकत नाही - तथापि, तीच संख्या असलेले खंडपीठ समन्वय पीठाने दिलेल्या निर्णयाच्या अचूकतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करू शकते - अशा परिस्थितीत, हे प्रकरण जास्त संख्या असलेल्या खंडपीठासमोर ठेवले जाते - न्यायालयीन शिस्तीच्या अनुषंगाने पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्यातील निर्णयाच्या अचूकतेवर या न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या सह-समान खंडपीठाने सविस्तर आदेशात शंका घेतली आणि त्यानुसार हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या या खंडपीठासमोर ठेवण्यात आले - त्यामुळे *पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्यातील निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी सात न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे वर्गीकरण करण्याच्या संदर्भात कोणतीही त्रुटी नाही.

[परिच्छेद २४, २५, ३०]

सिद्धांत/तत्त्वे – डोळसपणाचा सिद्धांत (स्टेअर डिसिसिस)-

अर्थ:

असे म्हटले आहे की: डोक्ट्रिन ऑफ स्टेअर डिसिसिसमध्ये अशी तरतूद आहे की न्यायालयाने आधीच्या बंधनकारक निकालापासून सहजगत्या असहमत होऊ नये - तथापि, हा सिद्धांत म्हणजे कायद्याचे न वळविता येणारा नियम नाही आणि यामुळे जनतेच्या सामान्य कल्याणास हानी पोहोचेल अशी चूक कायम राहू शकत नाही - या न्यायालयाचे मोठे (जास्त संख्या असलेले)खंडपीठ योग्य प्रकरणांमध्ये या न्यायालयाच्या आधीच्या निकालांमधून तयार केलेल्या चाचण्या लक्षात घेऊन मागील निर्णयाचा पुनर्विचार करू शकते, - जर असा विश्वास असेल की त्यात चूक आहे, किंवा या निर्णयाचा परिणाम जनतेच्या हितांना हानी

पोहोचवेल किंवा तो राज्यघटनेच्या कायदेशीर तत्त्वज्ञानाशी विसंगत असेल तर हे न्यायालय आपल्या आधीच्या निर्णयांचे पुनरावलोकन करू शकते - राज्यघटनेच्या विवेचनाशी संबंधित प्रकरणांमध्ये, हे न्यायालय कायद्याच्या इतर शाखांपेक्षा अधिक सहजतेने हे करेल कारण स्पष्ट दिसत असलेली चूक दुरुस्त न करणे हे सार्वजनिक हित आणि राज्यव्यवस्थेसाठी हानिकारक ठरेल. [परिच्छेद ३३, १८८.१]

राज्यघटनेचा अर्थ - राज्यघटनेतील एका तरतुदीचा अर्थ :

असे म्हटले आहे की : न्यायालयाने या मजकुराचा असा अर्थ लावावा की, ज्यामुळे राज्यघटनेच्या रचनेला धक्का बसणार नाही. [परिच्छेद ९२]

राज्यघटनेचे विवेचन – कलमातील किरकोळ टिपण – याचे महत्त्व :

असे म्हटले आहे की :संविधानातील कलमांच्या संदर्भात कलमाचा अर्थ व हेतू याविषयी काही संकेत देण्यासाठी एक साधन म्हणून किरकोळ टिपणाचा वापर केला जाऊ शकतो - तथापि, कलमाचा खरा अर्थ कलमाच्या केवळ मजकुरावरून घ्यावा लागतो - जेव्हा कलमातील भाषा सरळ आणि अस्पष्ट असते, त्याला जोडलेल्या किरकोळ टिपणाला (मार्जिनल नोटला) अवाजवी महत्त्व देता येत नाही - शिवाय, कायद्यातील एखाद्या कलमाला असलेले किरकोळ टिपण(मार्जिनल नोट) हे त्या कलमात वापरली जाणारी भाषा स्पष्ट असेल तर त्या कलमाच्या मुख्य भागाच्या अर्थावर नियंत्रण ठेवत नाही. [परिच्छेद १७३]

कायद्यांचे विवेचन - वैधानिक विवेचनाची तत्त्वे – भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ मध्ये जोडलेली उदाहरणे – प्रासंगिकता :

असे म्हटले आहे की : वैधानिक तरतुदीच्या मजकुराचा अर्थ लावताना एखाद्या कलमाशी जोडलेली उदाहरणे मोलाची आणि प्रासंगिक असतात, आणि ती कलमाशी विसंगत म्हणून सहजपणे नाकारता कामा नयेत - पीसी कायद्याच्या (भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा)कलम ७ च्या पहिल्या स्पष्टीकरणाचे उदाहरण या तरतुदीचा असा अर्थ लावण्यास मदत करते की लाचखोरीचा गुन्हा लाचेच्या देवाणघेवाणीवर ठरतो आणि त्याकरिता प्रत्यक्ष कामगिरीची आवश्यकता नसते - त्याचप्रमाणे, लाच स्वीकारणाऱ्या आमदाराच्या बाबतीत ती ठरलेल्या दिशेला मतदान करते की मतदान करते हे अजिबात महत्त्वाचे नसते - ज्या क्षणाला लाच स्वीकारली जाते त्या वेळेलाच लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो – लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८. [परिच्छेद ११८]

केस लॉ चा हवाला

*पीव्ही नरसिंह राव विरुद्ध राज्य (सीबीआय/एसपीई), [१९९८] २ एससीआर ८७० : (१९९८) ४ एससीसी ६२६ - रद्द.

कुलदीप नायर विरुद्ध भारत सरकार, [२००६] ५ सप्लिमेंट एस.सी.आर. १ : (२००६) ७ एससीसी १ - स्पष्ट केले.

सीता सोरेन विरुद्ध भारत सरकार, [2023] 12 एससीआर 753; केशव मिल्स कंपनी लिमिटेड विरुद्ध सीआयटी, [1965] 2 एससीआर 908 : एआयआर 1965 सुप्रीम कोर्ट 1636; कृष्ण कुमार विरुद्ध भारत सरकार, [१९९०] ३ एससीआर ३५२ : (१९९०) ४ एससीसी २०७; शंकर राजू विरुद्ध भारत सरकार, [२०११] २

एससीआर १ : (२०११) २ एससीसी १३२; शाह फैसल आणि इतर विरुद्ध भारत सरकार (यूओआय), [2020] 3 एससीआर 1115 : (2020) 4 एससीसी 1; राजा राम पाल विरुद्ध माननीय विधानसभा अध्यक्ष, [2007] 1 एससीआर 317 : (2007) 3 एससीसी 184; लोकायुक्त, न्यायमूर्ती रिपुसूदन दयाळ विरुद्ध मध्य प्रदेश राज्य, [२०१४] ३ एससीआर २४२ : (२०१४) ४ एससीसी ४७३; केरळ राज्य विरुद्ध के . अजित, [२०२१] ६ एससीआर ७७४; सेंट्रल बोर्ड ऑफ दाऊदी बोहरा समाज विरुद्ध महाराष्ट्र राज्य, [२००४] सप्लिमेंट ६ एससीआर १०५४ : (२००५) २ एससीसी ६७३; कल्पना मेहता विरुद्ध भारत सरकार, [२०१८] ४ एससीआर १ : (२०१८) ७ एससीसी १; अमरिंदर सिंग विरुद्ध पंजाब विधानसभा , [२०१०] ४

एससीआर ११०५ : (२०१०) ६ एससीसी ११३; मगनलाल छगनलाल (प्रा.) लिमिटेड विरुद्ध ग्रेटर बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन, [१९७५] १ एससीआर १ : (१९७४) २ एससीसी ४०२; बंगाल इम्युनिटी कंपनी लिमिटेड विरुद्ध बिहार राज्य आणि इतर, [1955] 2 एससीआर 603; शंभू नाथ सरकार विरुद्ध वेस्ट बेंगाल .राज्य,[१९७४] १ एससीआर १ : (१९७३) १ एससीसी ८५६; लेफ्टनंट कर्नल खजूर सिंग विरुद्ध भारत सरकार, [1961] 2 एससीआर 828; भारत सरकार विरुद्ध रघुबीर सिंह, [१९८९] ३ एससीआर ३१६ : (१९८९) २ एससीसी ७५४; प्रदीप कुमार बिस्वास विरुद्ध इंडियन इंस्टीट्यूट ऑफ केमिकल बायोलॉजी, [2002] 3 एससीआर 100 : (2002) 5 एससीसी 111; सुप्रीम कोर्ट

ॲडव्होकेट-ऑन-रेकॉर्ड असोसिएशन विरुद्ध भारत सरकार, [2015] 13 एससीआर 1 : (2016) 5 एससीसी 1; अजित मोहन विरुद्ध विधानसभा, राष्ट्रीय राजधानी प्रदेश दिल्ली, [2021] 14 एससीआर 611 : (2022) 3 एससीसी 529; राजीव सूरी विरुद्ध डीडीए, [2021] 15 एससीआर 283 : (2022) 11 एससीसी 1; अलगापुरम आर मोहनराज विरुद्ध तमिळनाडू विधानसभा, [2016] 6 एससीआर 611: (2016) 6 एससीसी 82; तेज किरण जैन विरुद्ध एन संजीव रेड्डी, [1971] 1 एससीआर 612 : (1970) 2 एससीसी 272; एम एस एम शर्मा विरुद्ध श्री कृष्ण सिन्हा , [1959] सप्लिमेंट 1 एससीआर 806 : ए आय आर 1959 सुप्रीम कोर्ट 395; १९६४ चा विशेष संदर्भ क्रमांक १, [१९६५]

१ एससीआर ४१३; कर्नाटक राज्य विरुद्ध भारत सरकार,[१९७८] २ एससीआर १ : (१९७७) ४ एससीसी ६०८; एन रवी विरुद्ध अध्यक्ष, विधानसभा चेन्नई, **2003 (9)** स्केल **464;** राज्य (एनसीटी ऑफ दिल्ली) विरुद्ध भारत सरकार**,** [2018] 7 एससीआर 1 **: (2018) 8** एससीसी **501;** किहोतो होलोहान विरुद्ध झाचिल्हू, [1992] 1 एससीआर 686 **: (1992)** सप्लिमेंट **2** एससीसी **651;** चतुरदास भगवानदास पटेल विरुद्ध गुजरात राज्य, [१९७६] ३ एससीआर १०५२ **:** (१९७६) ३ एससीसी ४६**;** नीरज दत्ता विरुद्ध राज्य (एनसीटी ऑफ दिल्ली), [2023] 2 एससीआर 997 **: (2023) 4** एससीसी **731;** पशुपति नाथ सुकुल विरुद्ध नेमचंद्र जैन आणि इतर,[१९८४] १ एससीआर ९३९ **:** (१९८४) २

एससीसी ४०४; मधुकर जेटली विरुद्ध भारत सरकार, (१९९७) ११ एससीसी १११; केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य, [१९७३]सप्लिमेंट १ एससीआर १ : (१९७३) ४ एससीसी २२५; के.एस. पुट्टास्वामी (आधार-5 जे.) विरुद्ध भारत सरकार, [2018] 8 एससीआर 1 : 2018 एससीसी ऑनलाइन सुप्रीम कोर्ट 1642 - संदर्भित

.

मार्क ग्रेव्स विरुद्ध पीपल ऑफ द स्टेट ऑफ न्यूयॉर्क, 306 यूएस 466 (1939); केली विरुद्ध कार्सन, (1841-42) 4 एम ओ ओ पीसी 63; राजा विरुद्ध सर जॉन इलियट, (१६२९) ३ सेंट टीआर 294,एक्स पार्टी वासन, (1969) 4 क्यूबी 573;आर विरुद्ध ग्रीनवे, [1998] पीएल 357; आर विरुद्ध मानक संसदीय आयुक्त एक्स पार्टी

फैद, **[1998] 1** डब्ल्यूएलआर **669;** हॅमिल्टन विरुद्ध अल फैद, [२००१] १ ए सी . ३९५**;** प्रेबल विरुद्ध टेलिव्हिजन न्यूझीलंड, **(1994) 3** ऑल ईआर **407;** सरकारी वाणिज्य कार्यालय विरुद्ध माहिती आयुक्त (ॲटर्नी जनरल इंटरव्हेनिंग , [२००९] ३ डब्ल्यूएलआर ६२७**;** आर विरुद्ध चायटर, **[2010] 3** डब्ल्यूएलआर **1707;** माकुडी विरुद्ध बॅरन ट्रायस्मन ऑफ ट्रॉटनहम, **[2014]** क्यूबी **839;** युनायटेड स्टेट्स विरुद्ध थॉमस एफ जॉन्सन, **383** यूएस **169 (1966);** युनायटेड स्टेट्स विरुद्ध ब्रूस्टर, **408** यूएस **501 (1972);** गेवेल विरुद्ध युनायटेड स्टेट्स, **408** यूएस **606 (1972);** युनायटेड स्टेट्स विरुद्ध हेल्स्टोस्की, **442** यूएस **477 (1979);** हचिंसन विरुद्ध प्रोक्समिअर, **439** यूएस **1066 (1979);** आर विरुद्ध बंटिंग एट अल, **6**

[1885] 17 ओ.आर.524, कनाडा (हाउस ऑफ कॉमन्स) विरुद्ध वैद [2005] 1 एससीआर 667; चागनॉन विरुद्ध सिंडिकॅट डी ला फॉन्क्शन पब्लिक एट पॅरापब्लिक डु क्यूबे, [2018] 2 एस.सी.आर. 687, आर विरुद्ध एडवर्ड व्हाइट, 13 एससीआर (एनएसडब्ल्यू) 332; आर विरुद्ध बोस्टन, (1923) 33 सीएलआर 386; ओबेद विरुद्ध क्वीन, [2017] एनएसडब्ल्यूसीसीए 221 - संदर्भित।

उद्धृत केलेली पुस्तके आणिq नियतकालिके

एस. के. नाग, १९४७ पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (१९७८), ३१७-१८; एस. के. नाग, १९४७ पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (१९७८), १०२-१०३; एस. के.

नाग, १९४७ पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (१९७८), १३९-१४१, १५८; एस. के. नाग, १९४७ पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (१९७८), ३२२; सुधारणा चौकशी समितीचा अहवाल (१९२४), ७५; एस. के. नाग, १९४७ पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (१९७८), २१३-२१४; ग्रॅनव्हिल ऑस्टिन, द इंडियन कॉन्स्टिट्यूशन: कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन, ओयूपी (1972), 9; ग्रॅनव्हिल ऑस्टिन, द इंडियन कॉन्स्टिट्यूशन: कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन, ओयूपी (१९७२), तेरा; सीएडी खंड आठवा 19 मे, 1949 मसुदा अनुच्छेद 85; सुभाष सी कश्यप, संसदीय प्रक्रिया-कायदा,

विशेषाधिकार, व्यवहार आणि उदाहरणे (प्रिसीडेंटस), तिसरी आवृत्ती, युनिव्हर्सल लॉ पब्लिशिंग कंपनी, ५०२; एमएन कौल आणि एस. एल. शकधर, संसदेची प्रॅक्टिस अँड प्रोसिजर, लोकसभा सचिवालय, मेट्रोपॉलिटन बुक कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, ७ वी आवृत्ती, २२९; न्यायमूर्ती जी. पी. सिंह, वैधानिक विवेचन सिद्धांत, 15 वां संस्करण (2021), 136; न्यायमूर्ती जी. पी. सिंह, वैधानिक विवेचन सिद्धांत, १५ वी आवृत्ती (२०२१), १८८-१८९ - संदर्भित.

एर्स्किन मे यांचा कायद्यावरील प्रबंध, संसदेचे विशेषाधिकार, कार्यवाही आणि वापर , लेक्सिसनेक्सिस, २५ वी आवृत्ती (२०१९) २३९; एर्स्किन मे यांचा कायद्यावरील प्रबंध, संसदेचे विशेषाधिकार, कार्यवाही आणि वापर ,

सीता सोरेन वि. भारत संघ

लेक्सिसनेक्सिस, २५ वी आवृत्ती (२०१९) २४२ -

संदर्भित आहे.

कायद्यांची यादी[संपादन]

भारतीय राज्यघटना; भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८; भारत सरकार अधिनियम, 1833; चार्टर कायदा, १८५३; इंडियन कौन्सिल ऍक्ट , १८६१; भारत सरकार अधिनियम, १९०९; लोकप्रतिनिधित्व कायदा , १९५१; भारत सरकार अधिनियम, 1919; भारत सरकार अधिनियम, १९३५; संविधान (४४ वी दुरुस्ती) अधिनियम, १९७८.

की वर्डची यादी

बोलण्यासाठी किंवा मतदान करण्यासाठी लाच; विशेषाधिकारांच्या तुलनेत लाचखोरी; संसदीय विशेषाधिकार; कायदेविषयक विशेषाधिकार; प्राचीन विशेषाधिकार; वैधानिक विशेषाधिकार; घटनात्मक

विशेषाधिकार; विधिमंडळाच्या विशेषाधिकारांचा इतिहास; संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सभागृहांना असणारी सूट ; पीव्ही नरसिंह राव प्रकरणाचा पुनर्विचार; सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा; संसदीय लोकशाही; डोळसपणाचे(स्टेअर डिसिसिस); राज्यसभेची निवडणूक; रद्द केले ; मागील न्याय निर्णयाचा दाखला ; घटनात्मक न्यायशास्त्र; अभिव्यक्ती स्वातंत्र्य; संसदेचे सभागृह; आवश्यकता चाचणी; सभागृहाचे सामूहिक कामकाज; "कोणत्याही गोष्टीसंदर्भात" सांगितलेले किंवा दिलेले कोणतेही मत याबद्दल सूट ; समांतर अधिकारक्षेत्र; विधानसभा; विधानमंडळ; वसाहतीचे नियम ; ब्रिटनमधील (यू के)हाऊस ऑफ कॉमन्स; परकीय अधिकारक्षेत्रे; अवाजवी लाभ मिळविणे, स्वीकारणे किंवा मिळवण्याचा प्रयत्न करणे ; न्यायालयीन पुनरावलोकन; न्यायालयीन शिस्त; एका विभागाला जोडलेली उदाहरणे ; एका विभागाला दिलेले

किरकोळ टिपण; समितीच्या सुधारणा, १९२४.

त्यातून उद्भवलेले प्रकरण

फौजदारी अपील अधिकार क्षेत्र : **2019 चे फौजदारी अपील क्रमांक 451**

2013 च्या डब्ल्यूपीसीआरएल क्रमांक 128 मधील रांची येथील झारखंड उच्च न्यायालयाच्या 17.02.2014 च्या निर्णय आणि आदेशावरून

पक्षांची उपस्थिती

परमजीत सिंग पटवालिया, वरिष्ठ अधिवक्ता .(एमिकस क्युरी), श्रीमती हर्षिका वर्मा, दीपांशु कृष्णन, गौरवजीत सिंग पटवालिया, मनन डागा, श्रीमती समराधी श्रीवास्तव, गौरव अग्रवाल, अधिवक्ते .

राजू रामचंद्रन, वरिष्ठ अधिवक्ता ., कौशिक लैक, विवेक सिंग , आशय कौशिक, एम. व्ही. मुकुंदा, शशांक तिवारी, राहुल आर्या,

प्रताप शंकर,श्रीमती देवयानी गुप्ता,श्रीमती तन्वी आनंद अपीलकर्त्यातर्फे अधीवक्ते

आर वेंकटरामाणी, भारताचे अटर्नी जनरल,सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, के. एम. नटराज, ए. एस. जी. , के. परमेश्वर, कानू अग्रवाल, श्रीमती चिन्मयी चंद्रा, उदय खन्ना, अक्षय अमृतांशू, अंकुर तलवार, अनमोल चंदन, आनंद वेंकटरामाणी, श्रीमती विजयालक्ष्मी वेंकटरामाणी, विनायक मेहरोत्रा, श्रीमती मानसी सूद, चितवन सिंघल, श्रीमती सोनाली जैन, अभिषेक कुमार पांडे, रमण यादव, कार्तिकेय अग्रवाल, अरविंद कुमार शर्मा. प्रतिवादीसाठी अधिवक्ते .

गोपाल शंकरनारायण, विजय हंसारिया, वरिष्ठ अधिवक्ते , अश्विनी कुमार उपाध्याय, अश्विनी कुमार दुबे, विशाल सिन्हा,श्रीमती जान्हवी दुबे, श्रीमती तान्या श्रीवास्तव, श्रीमती आदिती गुप्ता, श्रीमती तृषा चंद्रन, वैभव तिवारी, ऋषभ

शुक्ला,श्रीमती स्नेहा कलिता, श्रीमती काव्या झंवर, श्रीमती जेसी कुरियन, के. एस. भाटी,श्रीमती एस. आर. लिओना,श्रीमती शिल्पा बागडे, श्रीमती जयश्री बर्मन, शुभम सिंघल, अभिमन्यू भंडारी, श्रीमती रूह-ए-हिना दुआ, आरव पंडित, हर्षित खंडुजा, श्रीमती धनाक्षी गांधी, साहिब कोचर, श्रीमती श्रेया अरोरा, रणदीप सचदेवा, डॉ. विवेक शर्मा, के. व्ही. धनंजय, ए. वेलन, पवन श्याम, श्रीमती नवप्रीत कौर, सुशांत व्ही ए ओजस्वी. धीरज एस जे, मृत्युंजय पाठक, सचिन एस, आनंद नंदन,अमित पवन, आकाश, जुबेर, विकास, डॉ. ध्रुव मिश्रा, मोहम्मद फैज, श्रीमती शिवांगी, रामेश्वर प्रसाद गोयल, मध्यस्थ/मध्यस्थांसाठी अधिवक्ते.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय /आदेश

<u>निर्णय :</u>

डॉ.धनंजय वाय चंद्रचूड, सरन्यायाधीश

टेबल ऑफ कंटेंट (अनुक्रमणिका)

A. संदर्भ **4**

B. पी.व्ही. नरसिंह राव यांच्या खटल्यातील **8**

निकालाचा आढावा

C. प्रस्तुती **14**

D. पीव्ही नरसिंह राव या केसचा पुनर्विचार हे **22**
स्टेअर डिसिसिस च्या सिद्धांताचे उल्लंघन करत

नाही

E. भारतातील संसदीय विशेषाधिकारांचा इतिहास **34**

F. भारतातील संसदीय विशेषाधिकाराचा अर्थ **44**

1. कार्यात्मक विश्लेषण **44**

2. संसदीय विशेषाधिकार म्हणजे सभागृहाचा अधिकार **54**

३. विशेषाधिकाराचा दावा करण्यासाठी आणि **60**

वापरण्यासाठी आवश्यकता चाचणी

G. लाचखोरीला संसदीय विशेषाधिकाराने संरक्षण **65**

दिले जात नाही

1. काहीही सांगितलेले किंवा दिलेले कोणतेही **65**

मत याबद्दल लाचखोरी नसते

2. राज्यघटनेत सार्वजनिक जीवनातील शुचितेची कल्पना आहे 72

3. न्यायालये आणि सभागृह लाचखोरीच्या आरोपांबाबत समांतर अधिकारक्षेत्रात काम करतात 76

४. लाचखोरीच्या गुन्ह्यात परिणाम देणे अप्रासंगिक आहे 79

H. विशेषाधिकारांच्या तुलनेत लाचखोरीवर आंतरराष्ट्रीय भूमिका **87**

1. युनायटेड किंगडम **87**
२. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका **99**
३. कॅनडा **108**
४. ऑस्ट्रेलिया **114**

I. राज्यसभेच्या निवडणुका अनुच्छेद १९४ (२) च्या अंमलबजावणी अंतर्गत **118**

आहेत

J. निष्कर्ष 131

*1 राज्यघटनेच्या अनुच्छेद १०५ आणि १९४ मध्ये संहिताबद्ध केलेले संसदीय विशेषाधिकार हे संसदीय शासनपद्धतीचे कामकाज सुलभ करण्यासाठी विचारशील लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. ज्या आमदारांवर नागरिकांनी विश्वास टाकला आहे, त्यांना 'भीती किंवा पक्षपातीपणा' न बाळगता सभागृहात आपले विचार आणि मते मांडता येऊ शकतात , याची खात्री यातून मिळते. संसदीय विशेषाधिकाराच्या संरक्षणामुळे अल्प मताधिक्य असलेल्या राजकीय पक्षाचा आमदार कोणत्याही प्रस्तावावर निर्भयपणे मतदान करू शकतो; देशाच्या दुर्गम भागातील आमदार कायदेशीर खटल्याच्या त्रासाची भीती न बाळगता आपल्या मतदारसंघावर परिणाम करणारे मुद्दे उपस्थित करू शकतात; आणि मानहानीचा आरोप होण्याची भीती न बाळगता आमदार उत्तरदायित्वाची मागणी करू शकतो.

2. एखाद्या विशिष्ट दिशेला मतदान करण्यासाठी किंवा काही

मुद्द्यांवर बोलण्यासाठी लाच घेणाऱ्या आमदाराला संसदीय विशेषाधिकाराने संरक्षण मिळेल का? घटनात्मक विवेचनाच्या या प्रश्नावरच या न्यायालयाला निर्णय घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

A. संदर्भ

3. झारखंड उच्च न्यायालयाच्या १७ फेब्रुवारी २०१४ च्या निर्णयातून हे फौजदारी अपील दाखल झाले आहे.[1] ३० मार्च २०१२ रोजी झारखंड राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राज्यसभेच्या दोन सदस्यांच्या निवडीसाठी निवडणूक झाली. झारखंड मुक्ती मोर्चाचे असलेले याचिकाकर्ते[2] झारखंड विधानसभेचे सदस्य होते. एका अपक्ष उमेदवाराच्या बाजूने मतदान करण्यासाठी त्यांनी लाच स्वीकारल्याचा आरोप याचिकाकर्त्यावर आहे. मात्र, राज्यसभेच्या जागेसाठी झालेल्या

1 रिट याचिका (फौजदारी) क्र. १२८/२०१३

2 'जेएमएम'

खुल्या मतदानातून त्यांनी कथित लाच देणाऱ्याच्या बाजूने मतदान न करता आपल्याच पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूने मतदान केल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधित निवडणुकीची फेरी रद्द करण्यात आली आणि नव्याने निवडणूक घेण्यात आली जिथे अपीलकर्त्याने पुन्हा आपल्याच पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूने मतदान केले.

4. अपीलकर्त्याने आरोपपत्र आणि तिच्याविरुद्ध सुरू केलेली फौजदारी कारवाई रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली. पी व्ही नरसिंहा राव -वि -सरकार (सीबीआय /एसपीई)[3] या केसमधील या न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयाचा आधार घेत अपीलकर्त्याने घटनेच्या कलम १९४ (२) अंतर्गत संरक्षणाचा दावा केला .अपीलकर्त्याने कथित लाच देणाऱ्याच्या बाजूने मतदान केले नाही आणि त्यामुळे कलम १९४ (२) अन्वये संरक्षणास पात्र नाही, या कारणास्तव उच्च

3 (1998)2 एससी आर 870:(1998)4 एससीसी 626

न्यायालयाने फौजदारी कारवाई रद्द करण्यास नकार दिला. उच्च न्यायालयाने दिलेले कारण प्रामुख्याने पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) प्रकरणात न्यायालयाच्या या निर्णयावर आधारित (फिरत)होता. पी.व्ही. नरसिंह राव (सुप्रा) आणि सध्याच्या खटल्यातील वाद राज्यघटनेच्या कलम १०५ (२) मधील तरतुदींचा (जे संसदेच्या आणि संसदीय समित्यांच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षणाशी संबंधित आहे) आणि राज्यघटनेच्या कलम १९४ (२) मधील समतुल्य तरतुदीच्या स्पष्टीकरणाकडे वळतो जो राज्य विधिमंडळाच्या सदस्यांना समान सूट प्रदान करतो.

5. 23 सप्टेंबर 2014 रोजी या न्यायालयाच्या दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ज्यांच्या समोर हे अपील सुनावणीसाठी आले होते त्यांनी असे मत व्यक्त केले की, विचारार्थ उद्भवणारा मुद्दा हा “लक्षणीयरीत्या महत्त्वाचा आणि सामान्य सार्वजनिक महत्वाचा" असल्याने तो या न्यायालयाच्या तीन

न्यायाधीशांच्या मोठ्या खंडपीठासमोर ठेवला पाहिजे. 7 मार्च 2019 रोजी या याचिकेवर सुनावणी घेणाऱ्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या निर्णयात पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाद्वारे नेमका हाच प्रश्न हाताळण्यात आला.'निर्माण झालेल्या प्रश्नाचे व्यापक स्वरूप, उपस्थित करण्यात आलेल्या शंका आणि वादाचा मुद्दा हा सार्वजनिक महत्त्वाचा विषय असल्याने "हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवावे', असे मत खंडपीठाने व्यक्त केले.

6. अखेरीस २० सप्टेंबर २०२३ च्या आदेशाद्वारे या न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या निर्णयाच्या अचूकतेवर शंका घेण्याचे प्रथमदर्शनी कारण नोंदवले आणि हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या मोठ्या खंडपीठाकडे सोपवले. सीता सोरेन विरुद्ध भारत

सरकार[4](4)अशी नोंद असलेल्या आदेशाचा ऑपरेटिव्ह (कार्यरत)भाग खाली दिला आहे:

> **"24.** आम्ही सहमत होण्यास इच्छुक आहोत... पीव्ही नरसिंह राव यांच्या केस मध्ये बहुमताच्या निर्णयात जे मत व्यक्त करण्यात आले आहे, त्याचा मोठ्या खंडपीठाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. तसे करण्यामागची आमची कारणे खालीलप्रमाणे आहेत:
>
> सर्वप्रथम, राज्यघटनेच्या कलम १०५ (२) आणि त्या अनुरूप असलेली अनुच्छेद १९४ (२) मधील तरतुदींचा अर्थ मजकूर, संदर्भ आणि तरतुदीमागील उद्देश आणि हेतू याद्वारे निर्देशित असणे आवश्यक आहे.
>
> राज्यघटनेच्या अनुच्छेद १०५ (२) चा मूलभूत हेतू आणि उद्देश असा आहे की,संसद सदस्यांना किंवा राज्य विधिमंडळाच्या सदस्यांना (असेल त्याप्रमाणे) परिणामांची

4 (2023)12 एससीआर 753:2023 एससीसी ऑन लाईन सुप्रीम कोर्ट 1217

भीती न बाळगता सभागृहात किंवा सभागृहाच्या समित्यांचे सदस्य म्हणून आपले विचार (मत) मांडण्याचे किंवा त्यांचे मत देण्याचे, स्वातंत्र्य असावे. राज्यघटनेच्या कलम १९ (१) (अ) मध्ये व्यक्त होणे(बोलणे)व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या वैयक्तिक अधिकाराला मान्यता देण्यात आली आहे, तर कलम १०५ (२) मध्ये विधिमंडळाच्या सदस्यांना प्रतिशोध किंवा परिणामांची भीती न बाळगता व्यक्त होण्याचे आणि मतदान करण्याचे स्वातंत्र्य असण्याचे महत्त्व ओळखून त्या अधिकाराला संस्थात्मक स्वरूप देण्यात आले आहे. दुसऱ्या शब्दांत, कलम १०५ (२) किंवा कलम १९४ (२) चा हेतू,प्रथमदर्शनी संसद सदस्य किंवा राज्याच्या विधिमंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये वापरण्यामुळे स्वतंत्रपणे उद्भवू शकणाऱ्या फौजदारी कायद्याच्या उल्लंघनासाठी फौजदारी कारवाई सुरू करण्यापासून सूट देणे हा दिसत नाही;

दुसरे म्हणजे, पीव्ही नरसिंह राव यांच्या खटल्याच्या

निकालात न्यायमूर्ती एस. सी. अग्रवाल यांनी एक गंभीर विसंगती नमूद केली: कलम 105 (2) मधील तरतुदीचा अर्थ सूट देण्याच्या आधाराकरिता लावला (मान्य केला),तर एखाद्या सदस्याने संसदेत विशिष्ट पद्धतीने बोलण्यासाठी किंवा मत देण्यासाठी लाच स्वीकारली आणि प्रत्यक्षात तसे बोलले किंवा मतदान केले तर लाच घेणाऱ्या सदस्याला अशा आरोपासाठी खटल्यापासून सूट मिळेल. दुसरीकडे, विधिमंडळाच्या सदस्याने सभागृहासमोर विचाराधीन असलेल्या विषयावर न बोलण्याबद्दल किंवा मत न देण्याबद्दल लाच स्वीकारल्यास परंतु त्यांनी उलट कृती केल्यास त्यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही आणि त्यांच्यावर लाचखोरीच्या आरोपाखाली खटला चालविला जाईल. कलम १०५ (२) मधील 'संदर्भात' या शब्दाचा अर्थ 'त्यातून उद्भवलेला' असा अर्थ लावला

तर ही विसंगती टाळता येईल, असे न्यायमूर्ती अग्रवाल यांनी नमूद केले. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, अशा परिस्थितीत कायद्याला जन्म देणाऱ्या (निर्माण करणाऱ्या) कार्यवाहीच्या कारवाईसाठी केलेले भाषण किंवा दिलेले मत हा आवश्यक आणि अविभाज्य भाग असेल तरच ही सूट मिळेल; आणि तिसरे म्हणजे, न्यायमूर्ती एस. सी. अग्रवाल यांच्या निकालात लाचखोरीचा गुन्हा कधी पूर्ण होणार, या प्रश्नावर विशेष भर देण्यात आला आहे. निकालात नमूद केले आहे की गुन्हा पैसे स्वीकारण्याने किंवा पैसे स्वीकारण्याचा करार केल्यावर पूर्ण होतो आणि प्राप्तकर्त्याने दिलेल्या बेकायदेशीर आश्वासनाची कामगिरी करण्यावर अवलंबून नाही. लाच घेणाऱ्याने निविदा आणि त्यात अंतर्भूत असलेला लाच स्वीकारण्याचा सौदा, करण्यात अपयशी ठरला तरीही त्याने गुन्हा केल्याचे

मानले जाईल. लाचेच्या गुन्ह्यातील घटक असलेले व त्या घटकांवर परिणाम करणारा हा पैलू न्यायमूर्ती अग्रवाल यांच्या निर्णयात स्पष्ट होतो परंतु बहुमताच्या निर्णयात तो हाताळला गेला नाही.

26. वरील कारणांमुळे, प्रथमदर्शनी पी व्ही नरसिंह राव यांच्या केस मधील बहुमताच्या मताच्या अचूकतेचा पुनर्विचार सात न्यायमूर्तींच्या मोठ्या खंडपीठाने करावा, असे आमचे ठाम मत आहे.

7. सध्याच्या निकालाची व्याप्ती पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसच्या अचूकतेवर शंका उपस्थित करणाऱ्या या न्यायालयाच्या २० सप्टेंबर २०२३ च्या आदेशाने केलेल्या संदर्भापुरती (रेफरन्स) मर्यादित आहे . अपीलकर्त्याच्या खटल्याची गुणवत्ता आणि तिने कथित गुन्हा केला आहे की नाही याचा निर्णय या टप्प्यावर या

न्यायालयाद्वारे घेतला जात नाही. या निकालातील कोणत्याही गोष्टीचा खटल्याच्या गुणवत्तेवर किंवा त्यातून उद्भवणाऱ्या इतर कोणत्याही कार्यवाहीवर परिणाम होतो असा अर्थ काढू नये.

B. पी.व्ही. नरसिंह राव यांच्या खटल्यातील निकालाचा आढावा

8. दहाव्या लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक 1991 मध्ये झाली. काँग्रेस (आय) सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आणि त्यांनी अल्पमतात सरकार स्थापन केले ज्यांत पी व्ही नरसिंह राव हे पंतप्रधान झाले. सरकारविरोधात लोकसभेत अविश्वास ठराव मांडण्यात आला होता. अविश्वास ठराव पराभूत करण्यासाठी चौदा सदस्यांच्या पाठिंब्याची गरज होती. ठरावाच्या बाजूने दोनशे एक्क्यावन्न तर विरोधात दोनशे पासष्ट सदस्यांनी मतदान केल्याने हा ठराव फेटाळण्यात आला. खासदारांच्या एका गटाने[5] झामुमो शी असलेल्या पाठिंब्यामुळे आणि जनता दल (अजित सिंह)

5 एमपी

गटाने[6] [6] अविश्वास ठरावाच्या विरोधात मतदान केले. विशेष म्हणजे जेडी(एस)चे एक खासदार अजित सिंह यांनी मतदानात भाग घेतला नाही.

9. झामुमो आणि जेडी (एएस) च्या वरील सदस्यांनी समझोता करून गुन्हेगारी कट केला व अविश्वास ठरावाच्या विरोधात मतदान करण्यासाठी लाच घेतल्याचा आरोप करत केंद्रीय अन्वेषण विभागाकडे[7] तक्रार दाखल करण्यात आली होती[8]. पी व्ही नरसिंह राव आणि इतर अनेक खासदार गुन्हेगारी कटात सहभागी होते आणि त्यांनी अविश्वास ठराव पराभूत करण्यासाठी कथित लाच घेणाऱ्यांना “लाखो रुपये ”दिल्याचा आरोप करण्यात आला होता.[9]

10. कथित लाच देणारे आणि लाच घेणारे यांच्यावर खटला दाखल

6 जेडी (ए एस)”

7 सीबीआय

8 "लाच घेणारे ”

9 लाच देणारे ”

करण्यात आला आणि त्याची दखल दिल्लीच्या विशेष न्यायाधीशांनी घेतली. आरोप रद्द करण्यासाठी आरोपींनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने या याचिका फेटाळून लावल्या. या न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आणि त्याची परिणती पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या निर्णयात झाली. दोन प्रमुख प्रश्न न्यायालयासमोर विचारार्थ आले. पहिली गोष्ट म्हणजे घटनेच्या कलम १०५ नुसार एखादा खासदार फौजदारी न्यायालयात लाचखोरीच्या आरोपाखालीच्या खटल्यापासून सूट मिळवू शकतो काय? दुसरं म्हणजे एखादा खासदार भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या कक्षेत येतो काय? आणि पीसी ॲक्टअंतर्गत खासदारावर खटला चालवण्यासाठी मंजुरी देणारा अधिकारी म्हणुन कोण नेमला जातो. सध्याच्या निकालात, आम्ही केवळ पहिल्या प्रश्नावर पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या निर्णयाशी संबंधित आहोत, म्हणजे एखाद्या खासदारावर लाचखोरीचा आरोप असल्यास कलम १०५

(२) अन्वये खटल्यापासून संरक्षणाची व्याप्ती.

11. या प्रकरणात तीन मते लिहिली गेली - न्यायमूर्ती एस सी अग्रवाल, (स्वत: साठी आणि न्यायमूर्ती डॉ. ए एस आनंद,), न्यायमूर्ती एस पी भरुचा, (स्वत: साठी आणि न्यायमूर्ती एस राजेंद्र बाबू,) आणि न्यायमूर्ती जी एन रे, यांचे मत.

12. न्यायमूर्ती एस. पी. भरुचा (तेव्हाचे विद्वान सरन्यायाधीश म्हणून) म्हणाले की, अविश्वास ठरावाच्या विरोधात मतदान करणाऱ्या कथित लाचखोरांना घटनेच्या कलम १०५ (२) अन्वये न्यायालयात त्यांच्याविरुद्ध खटला चालविण्यापासून सूट आहे. मात्र, अजित सिंग (ज्यांनी मतदानात भाग घेतला नाही) आणि कथित लाच देणाऱ्यांना समान सूट मिळणार नाही, असे मानले गेले. संसदीय विशेषाधिकारांचे उल्लंघन आणि त्याचा अवमान केल्याबद्दल संसद, कथित लाच घेणारे आणि लाच देणारे या दोघांवर कारवाई करू शकते, असे न्यायमूर्ती भरुचा यांनी

म्हटले आहे. न्यायमूर्ती भरुचा म्हणाले:

> 12.1. कलम १०५ (१) आणि कलम १०५ (२) मधील तरतुदींनुसार खासदारांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे (कलम 19 मधील) अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि त्यातील अपवादांपासून स्वतंत्र आहे. खासदार संसदेत काय बोलतात याबद्दल सर्व बंधनांपासून मुक्त असले पाहिजे. मतदान हा भाषणाचा विस्तारीत रूप मानल्या जातो आणि त्याला बोलल्या जाणाऱ्या शब्दाचे संरक्षण दिले जाते;
>
> 12.2. अनुच्छेद १०५ (२) मधील "च्या संदर्भात" या शब्दाला "व्यापक अर्थ" मिळणे आवश्यक आहे आणि याचा अर्थ असा आहे की एखाद्या खासदाराला न्यायालयातील कोणत्याही कार्यवाहीपासून संरक्षण दिले जाते जे संसदेत सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीशी किंवा त्याने दिलेल्या मताशी संबंधित आहे , किंवा ज्याचा संबंध

आहे किंवा त्यांच्यात आपसांत संबंध आहे;

12.3. कथित लाच घेणाऱ्यांना कलम १०५ (२) अन्वये सूट मिळण्याचा अधिकार आहे, कारण कथित कट रचणे आणि लाच स्वीकारणे हे अविश्वास ठरावा विरोधातील मतदाना "च्या संदर्भात" होते. कथित षडयंत्र आणि कराराचा घोषित हेतू अविश्वास ठराव पराभूत करणे हा होता आणि कथित लाच घेणाऱ्यांनी "तो पराभूत करण्याचा हेतू किंवा बक्षीस" म्हणून लाच घेतली. कथित षडयंत्र, लाच आणि अविश्वास ठराव यांच्यातील संबंध स्पष्ट होता;

12.4. कलम १०५ (२) अन्वये दिलेल्या संरक्षणाचा उद्देश खासदारांना न्यायालयात उत्तरदायी ठरण्याची भीती न बाळगता, संसदेत मोकळेपणाने बोलता आणि मतदान करता यावे, हा आहे. ज्या कारवाईचे कारण त्यांचे भाषण

किंवा मत असते, अशा कार्यवाहीपासून खासदारांना संरक्षण मिळावे, एवढेच पुरेसे नाही. संसदीय चर्चेत मोकळेपणाने सहभागी होता यावे, यासाठी खासदारांना त्यांच्या भाषणाशी किंवा मताशी संबंध असलेल्या सर्व दिवाणी आणि फौजदारी खटल्यांपासून सूट असण्याचे व्यापक संरक्षण आवश्यक आहे. एखाद्या खासदाराने "सत्ताधाऱ्यांना न आवडणारे" भाषण किंवा मतदान केले तर त्याच्याविरुद्ध, संसदेत ठराविक निकाल मिळवण्यासाठी त्याला लाच दिल्याचा आरोप करून, कायदेशीर खटल्यामुळे अडचणीत आणणे याची कल्पना करणे अवघड नाही;

12.5. लाच घेणाऱ्यांनी केलेल्या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता,राज्यघटनेचा संकुचित अर्थ लावणे योग्य नाही. अशा अर्थ लावण्यामुळे प्रभावी संसदीय लोकशाहीची हमी क्षीण होण्याचा (कमी होण्याचा) धोका असतो;

12.6. कलम १०५ (२) अन्वये दिलेली सूट केवळ बोलल्या गेलेल्या किंवा मतदान केलेल्या गोष्टींशी संबंधित आहे. त्यामुळे मतदानापासून दूर राहिलेले खासदार अजितसिंग यांना सूट मिळण्याचे संरक्षण मिळाले नाही आणि त्यांच्याविरुद्ध खटला चालेल ;

12.7. लाच देणाऱ्यांना सूट मिळते का, या संदर्भात अजितसिंग यांच्याविरुद्ध खटला चालणार असल्याने,लाच देणाऱ्यांवर कट रचल्याचा आणि बेकायदेशीर कृत्य करण्यास अजितसिंग यांच्याशी सहमती केल्याचा आरोपही चालणार (पुढे जाणार) आहे. शिवाय कलम १०५ (२) मध्ये अशी तरतूद नाही की, एखादे कृत्य हा जर गुन्हा आहे तर तो खासदाराने केला म्हणुन गुन्हा होत नाही. या तरतुदीत केवळ असे म्हटले आहे की, संसदेतील त्याच्या भाषणाशी किंवा मताशी संबंध असलेल्या एखाद्या गोष्टीसाठी खासदार न्यायालयात उत्तरदायी होणार नाही. ज्यांनी तो गुन्हा

करतांना खासदारासोबत कट रचला आहे, त्यांना तशी सूट नाही. त्यामुळे लाच देणाऱ्यांवर कारवाई होऊ शकते आणि त्यांना कलम १०५ (२) चे संरक्षण नाही.

13. दुसरीकडे, न्यायमूर्ती एस सी अग्रवाल, म्हणाले की, कथित लाच घेणारे किंवा कथित लाच देणाऱ्यांना कलम 105 (2) चे संरक्षण नाही. संसदेत किंवा कोणत्याही समितीमध्ये बोलण्यासाठी किंवा मत देण्यासाठी लाच देण्याच्या किंवा स्वीकारण्याच्या गुन्ह्यासाठी त्यांच्याविरुद्ध खटला चालविण्यापासून खासदाराला कलम १०५ (२) अन्वये सूट मिळत नाही. न्यायमूर्ती अग्रवाल यांनी त्यांचे मत खालीलप्रमाणे मांडले :

13.1. कलम १०५ (२) अन्वये दिलेल्या संरक्षणाचा उद्देश संसदीय लोकशाहीच्या निरोगी कामकाजासाठी आमदारांचे स्वातंत्र्य सुनिश्चित करणे हा आहे . लाचखोरीच्या

गुन्ह्यासाठी खासदाराला खटल्यापासून सूट मिळविण्याची मुभा मागता येते असा कलम १०५ (२) चा अर्थ लावल्यास, ते कायद्याच्या वरचढ होतील . हे संसदीय लोकशाहीच्या निरोगी कार्यपद्धतीच्या विरोधात आणि कायद्याच्या राज्याला बाधा आणणारे ठरेल;

13.2. अनुच्छेद १०५ (२) मधील "काहीही बोलले किंवा दिलेले कोणतेही मत" या शब्दांच्या आधी " च्या संबंधात " हे शब्द आहेत."काहीही बोलले किंवा दिलेले कोणतेही मत" या शब्दाचा अर्थ केवळ आधी दिलेले भाषण किंवा आधीच दिलेले मतदान असू शकते आणि ज्या प्रकरणांमध्ये भाषण केले गेले नाही किंवा मतदान झाले नाही, अशा प्रकरणांमध्ये लागू होत नाही. त्यामुळे “च्या संबंधात” या शब्दांचा व्यापकपणे अर्थ लावल्यास विरोधाभासी परिस्थिती निर्माण होईल.

एखाद्या विषयावर न बोलण्याबद्दल किंवा मत न देण्याबद्दल

लाच स्वीकारल्यास खासदार त्याच्यावर लाचखोरीचा खटला चालविण्यास पात्र होईल, परंतु एखाद्या विशिष्ट पद्धतीने बोलण्यासाठी किंवा मत देण्यासाठी लाच स्वीकारल्यास आणि प्रत्यक्षात त्या पद्धतीने बोलल्यास किंवा मत दिल्यास त्याला सूट मिळेल. संविधान निर्मात्यांचा असा भेद (फरक) करण्याचा हेतू असण्याची शक्यता नाही;

13.3. "च्या संबंधात" या शब्दांचा अर्थ "त्यातून उद्भवणारा" असा केला पाहिजे. कलम १०५ (२) अन्वये दिलेले संरक्षण केवळ एखाद्या खासदाराने केलेल्या भाषणामुळे किंवा मत दिल्यामुळे होणाऱ्या किंवा यशस्वी झालेल्या कृत्याच्या उत्तरदायित्वापासून संरक्षण देण्यासाठी उपलब्ध आहे आणि भाषण किंवा मतदानाच्या आधी च्या कृतीसाठी नाही आणि भाषण किंवा मतदानामुळे स्वतंत्रपणे उद्भवलेल्या आणि निर्माण झालेल्या दायित्व

देणाऱ्या कृतीसाठी नाही;

13.4. लाचखोरीचा गुन्हा करण्यासाठी चा करार पूर्ण झाला म्हणजे गुन्हेगारी कटरचनेचा गुन्हा होतो आणि करारानुसार केलेल्या कृतीचा त्यावर कांहीही परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावाच्या विरोधात बोलण्यासाठी किंवा मत देण्यासाठी लाच स्वीकारण्याची कृती, खासदाराने केलेले भाषण किंवा दिलेले मत या पेक्षा स्वतंत्रपणे उद्भवते. त्यामुळे या गुन्ह्याची जबाबदारी "संसदेत सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीच्या किंवा दिलेल्या कोणत्याही मताच्या संदर्भात" मानली जाऊ शकत नाही; आणि

13.5. युनायटेड स्टेट्स, ऑस्ट्रेलिया आणि कॅनडामधील कायद्यासह आंतरराष्ट्रीय प्रवाह (कल) यानुसार लोकप्रतिनिधींवर त्यांच्या कायदेविषयक

कामकाजासंदर्भातील लाचखोरीबद्दल खटला चालविला जाण्याची भूमिका प्रतिबिंबित होते. बहुतेक कॉमनवेल्थ देश विधिमंडळाच्या सदस्यांकडून होणारा भ्रष्टाचार आणि लाचखोरी हा फौजदारी गुन्हा मानतात. युनायटेड किंग्डममध्येही यासंदर्भातील कायद्यात बदल करण्याच्या हालचाली सुरू आहेत. इतर सर्व सार्वजनिक अधिकारी अशा कायद्यांच्या अधीन असताना भारतातील आमदारांना लाचखोरी आणि भ्रष्टाचाराचे नियमन करणाऱ्या कायद्यांमध्ये सामावून न घेण्याचे कारण नाही.

14. न्यायमूर्ती जी एन. रे, यांनी एक वेगळे मत देतांना न्यायमूर्ती अग्रवाल, यांच्या कारणमीमांसेशी सहमती दर्शविली की खासदार हे पीसी कायद्यानुसार लोकसेवक असतात आणि पीसी कायद्यांतर्गत मंजुरी प्राधिकरणा संबंधी च्या प्रश्नावर असतात तथापि, अनुच्छेद १०५ (२) च्या विवेचनावर न्यायमूर्ती जी. एन. रे, यांनी न्यायमूर्ती भरुचा, यांच्या निर्णयाशी सहमती दर्शविली.

म्हणून, कलम १०५ (२) च्या विवेचनावर न्यायमूर्ती भरुचा, यांनी लिहिलेले मत या न्यायालयातील तीन न्यायमूर्तींचे बहुमत दर्शविते (प्रतिनिधित्व करते)[10] दुसरीकडे न्यायमूर्ती एससी अग्रवाल, यांनी लिहिलेले मत अल्पसंख्याकांच्या मताचे प्रतिनिधित्व करते.[11]

C. (मांडलेले मुद्दे)सबमिशन्स

15. सुनावणीदरम्यान आम्ही अपीलकर्त्याच्या वतीने वरिष्ठ वकील श्री राजू रामचंद्रन, भारताचे अटर्नी जनरल श्री आर. वेंकटरामाणी, भारताचे सॉलिसिटर जनरल श्री तुषार मेहता, न्यायमित्रांचे म्हणुन असलेले वरिष्ठ वकील श्री पीएस पटवालिया, वरिष्ठ वकील श्री गोपाल शंकरनारायणन आणि मध्यस्थांच्या

10 न्यायमूर्ती एसपी भरुचा यांनी लिहिलेल्या मताला बहुमताचा निकाल असे यानंतर संबोधले गेले आहे

11 न्यायमूर्ती एस सी अग्रवाल यांनी लिहिलेल्या मताला यापुढे अल्पसंख्यांकाचा निर्णय म्हणून संबोधले गेले आहे

वतीने असलेले वरिष्ठ वकील श्री विजय हंसारिया यांचे म्हणणे ऐकून घेतले. हे न्यायालय कोर्ट ऑफ रेकॉर्ड असल्याने विद्वान वकिलांनी केलेले म्हणणे थोडक्यात खाली दिले आहे.

16. पीव्ही नरसिंहराव (सुप्रा) प्रकरणातील बहुमताचा निर्णय सध्याच्या खटल्याला पूर्णपणे लागू आहे, असा युक्तिवाद अपीलकर्त्याच्या वतीने ज्येष्ठ वकील श्री राजू रामचंद्रन यांनी केला . शिवाय, बहुमताचा निकाल सकारण योग्य आहे आणि कायद्याच्या निश्चित भूमिकेचा पुनर्विचार करण्याचे कोणतेही कारण नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. या संदर्भात त्यांनी खालील प्रमाणे मुद्दे मांडलेत .

16.1. पी.व्ही. नरसिंह राव (सुप्रा) या केसमधील दीर्घकाळ निश्चित असलेला कायदा रद्द करणे, हे न्यायालयीन पूर्वीचे न्याय बदलण्याबाबत या न्यायालयाने घालून दिलेल्या

चाचण्यांनुसार अयोग्य आहे; [12]

16.2. खासदार आणि आमदारांना सूट देण्यामागचा हेतू त्यांना ' राजसत्तेच्या बळावर दडपण्यापासून' वाचवणे हा होता. संसदेत प्रत्यक्ष मतदानापूर्वी किंवा भाषणापूर्वी किंवा नंतर खासदारांना अटक होण्याची भीती (असे मत किंवा भाषण कार्यकारीणीच्या विरोधात निर्देशित केले जाते) हे विशेषाधिकार आणि संरक्षणाची संकल्पना सुरू करण्याचे नेमके कारण होते;

16.3. घटनात्मक विशेषाधिकार आणि संरक्षण ही संकल्पना कायद्याच्या राज्याच्या विरोधात नाही, तर

12 केशव मिल्स कंपनी लिमिटेड विरुद्ध सीआयटी (1965)2 एस सी आर 908 : ए आय आर 1965 सुप्रीम कोर्ट 1636, परिच्छेद 23 : कृष्णकुमार विरुद्ध भारत संघराज्य,(1990)3 एस सी आर 352 :(1990) 4 एस सी सी 207, परिच्छेद 33 : शंकर राजू विरुद्ध भारत संघराज्य,(2011)2 एस सी आर 1 :(2011)2 एस सी सी 132, परिच्छेद 10 : शाह फैसल आणि इतर विरुद्ध भारत संघ राज्य (यु ओ आय),(2020)3 एस सी आर 1115 : (2020)4 एसएससी 1, परिच्छेद 17

आपल्या घटनात्मक रचनेचे हे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. बहुमताच्या निकालाने खासदार आणि आमदारांना आमदार म्हणून आपल्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्याचा विशेषाधिकार राखून ठेवला आणि ते कायद्याच्या राज्याच्या विरोधात नाही;

16.4. संसदेच्या सदस्यांच्या भ्रष्ट कारभाराविरुद्ध योग्य पावले उचलण्याच्या संसदेच्या विशेष अधिकारांना बहुमताच्या निकालाने योग्य आदर आणि मान्यता दिली, तसेच राज्यघटनेच्या कलम १२१ अन्वये घटनात्मक न्यायालयांच्या न्यायाधीशांच्या वर्तणुकीवर चर्चा करण्यास असमर्थता, यासारख्या सभागृहातील चर्चेच्या मर्यादा संसदेने मान्य केल्या आहेत,

16.5. भारत आणि यू के मधील संसदीय विशेषाधिकारांबाबतची सध्याची स्थिती अशी आहे की

(अ) लोकशाही राज्यव्यवस्थेसाठी ते मूलभूत आहे आणि न्यायालयाने न्यायालयीन संयम पाळला आहे; आणि (ब) विशेषाधिकार हा "कायदेविषयक कार्ये" करण्याशी संबंधित असणे आवश्यक आहे, जे भारतात मतदान आणि भाषणे करण्याशी संबंधित आहे. एखादे कृत्य न्यायालयीन पडताळणीपासून मुक्त आहे की नाही हे ठरवताना 'गरज चाचणी' लागू करावी लागते, म्हणजेच संबंधित कृत्य आणि मतदान/भाषणे करण्याची कायदेविषयक प्रक्रिया यांचा संबंध आहे काय ;

16.6. बहुमताच्या निर्णयातील तथाकथित "विसंगती" कलम १०५ (२) आणि १९४ (२) च्या साध्या भाषेतून येते आणि "तार्किक", "न्याय्य" किंवा "वाजवी" वाटणाऱ्या गोष्टींचे पालन करण्यासाठी त्यांची संरक्षणात्मक व्याप्ती कमी करण्याचा कोणताही प्रयत्न घटनात्मकदृष्ट्या अन्यायकारक ठरेल. मात्र, श्री रामचंद्रन यांनी प्रत्युत्तर

म्हणून त्यांचे तोंडी म्हणणे मांडताना कलम १०५ (२) अन्वये मतदानापासून दूर राहणे यांस संरक्षण राहणार नाही, हे मत चुकीचे असून मतदानापासून दूर राहणे म्हणजे मतदान करणे असे आहे , हे मान्य केले;

16.7. पी.व्ही. नरसिंह राव (सुप्रा) यांच्या केसमधील अल्पमतातील निकालाने 'च्या संदर्भात' म्हणजे 'त्यातून उद्भवलेले' असे वाचण्यात चूक केली आहे. . साध्या भाषेतून किंवा तरतुदीच्या हेतूने सुद्धा असे वाचन अपेक्षित नाही ;

16.8. लाच दिल्यावर फौजदारी कायद्यातील लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो आणि तो आश्वासन दिलेल्या उपकाराच्या कामगिरीवर अवलंबून नसतो, ही वस्तुस्थिती कलम १०५ (२) आणि १९४ (२) अन्वये असलेल्या घटनात्मक संरक्षणावर परिणाम करत नाही. एकदा भाषण झाले (दिले

)किंवा मतदान झाले, (दिले)की संबंध , म्हणजे "च्या संबंधात ", पूर्ण होते;

16.9. बहुमताचा निर्णय फिरविल्यास त्याचे गंभीर अनपेक्षित परिणाम होतील. राजकीय वास्तव लक्षात घेता, खासदार, आमदारांना देण्यात आलेली संसदीय सूट कमी केल्यास, सत्तेत असलेल्या राजकीय पक्षांकडून कायद्याचा गैरवापर होण्याची शक्यता वाढेल; आणि

16.10. राज्यसभेच्या निवडणुकीत मतदान करणे हे कलम १९४ (२) च्या संरक्षणाच्या कक्षेत आहे कारण विधिमंडळातील इतर कोणत्याही कायदा बनविण्याच्या प्रक्रियेचे सर्व “सापळे” ("ट्रॅपिंग")त्यात आहेत.

17. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा)या प्रकरणातील निर्णय तात्काळ खटल्याला लागू होत नाही, असा प्राथमिक युक्तिवाद भारताचे विद्वान ॲटर्नी जनरल श्री वेंकटरामाणी यांनी केला.

त्यांनी सादर केले की, राज्यसभेच्या निवडणुकीत विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्याने मतदानाचा हक्क बजावणे कलम १९४ (२) च्या कक्षेत येत नाही आणि त्यामुळे पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसचा सध्याच्या खटल्यात कोणताही उपयोग नाही. कलम १९४ (२) चे उद्दिष्ट विधिमंडळाच्या कार्यासंदर्भातील बोलणे व आचरण करणे यांचे संरक्षण करणे हे आहे, असे ते सांगतात. त्यामुळे राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडीसारखे,विधिमंडळ कामकाजाशी संबंधित नसलेले कोणतेही वर्तन कलम १९४ (२) च्या कक्षेबाहेर राहील. विद्वान ॲटर्नी जनरल यांच्या मते, राज्यसभेच्या सदस्यांची निवड ही इतर कोणत्याही निवडणूक प्रक्रियेसारखीच असते आणि ती विधिमंडळाच्या कामकाजाची किंवा कार्याची बाब मानली जाऊ शकत नाही.

18. राज्यसभेच्या निवडणुकीला सभागृहाची कार्यवाही मानता येणार नाही, या विद्वान ॲटर्नी जनरल यांच्या युक्तिवादाला उत्तर देताना श्री रामचंद्रन यांनी असे म्हटले आहे

की, विद्वान ॲटर्नी जनरल यांनी ज्या प्रकरणांवर विश्वास ठेवला आहे, ते संसदीय विशेषाधिकार किंवा सूट लागू करण्याची मागणी ज्यांत करण्यात आली आहे त्या संदर्भात दिलेले नाही आणि 'कायदेविषयक कार्यवाही' या संकल्पनेचा ओझरता संदर्भ त्यात पूर्णपणे वेगळ्या संदर्भात देण्यात आला आहे. तसेच तदर्थ समित्या, स्थायी समित्या, राष्ट्रपती/उपराष्ट्रपती आणि राज्यसभेच्या सदस्यांच्या घटनात्मक पदांच्या निवडणुका, अशा काही कायदेविषयक प्रक्रिया सभागृहाचे अधिवेशन सुरू असताना सभागृहाच्या पटलावर होतातच असे नाही. मात्र, त्यांच्याकडे 'कायदेविषयक प्रक्रिया' पार पाडण्याचे सर्व 'सापळे' ('ट्रॅपिंग')आहेत.

19. बहुमताच्या निर्णयाचा फेरविचार व्हायला हवा,आणि अल्पसंख्याकांचा दृष्टिकोन कायद्याची योग्य स्थिती दर्शवतो, अशी भूमिका न्यायमित्र श्री पी. एस. पटवालिया यांनी मांडली आहे. या संदर्भात श्री पटवालिया यांनी खालील प्रमाणे मुद्दे मांडलेत :

19.1. बहुमताच्या निकालात "च्या संबंधात " या अभिव्यक्तीचा चुकीच्या पद्धतीने विस्तृत अर्थ लावला आहे आणि जेंव्हा संसदेत मतदान करण्यासाठी खासदार लाच स्वीकारतात त्यांना फौजदारी खटल्यापासून सूट दिली आहे. कलम १०५ चा उद्देश, खासदार संसदेच्या सभागृहात प्रवेश करण्यापूर्वीच गुन्हा घडला असताना,खासदारांना कायद्याच्या वरचढ ठेवण्याचा नाही ;

19.2. पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसनंतर या न्यायालयाने दिलेल्या निकालांचे गुणोत्तरात खासदारांनी मतदानासाठी लाच घेतल्यास त्यांना सूट देण्यास विरोध करते; [13]

19.3. सदस्याने सभागृहात प्रवेश करण्यापूर्वीच

13 राजा राम पाल विरुद्ध माननीय सभापती लोकसभा (2007)1 एस सी आर 317 : (2007)3 एस सी सी 184, लोकायुक्त न्यायमूर्ती रीपूसुदन दयाळ विरुद्ध मध्यप्रदेश राज्य (2014)3 एस सी आर 242 :(2014)4 एस सी सी 473 आणि केरळ राज्य विरुद्ध के अजित (2021)6 एस सी आर 774 :(2021) एस सी सी ऑनलाइन 510

लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो आणि त्यामुळे या गुन्ह्याचा संसदेत तीने /त्याने दिलेल्या मतदानाशी कोणताही संबंध किंवा परस्परसंबंध नाही, असे अल्पसंख्याक निकालात योग्यपणे नमूद करण्यात आले आहे. कथित गुन्हेगारी कृत्ये संसदेबाहेर केल्यास कलम १०५ (२) आणि १९४ (२) अन्वये संरक्षण मिळत नाही;

19.4. संसदेतील मतांच्या अनुषंगाने लाचखोरीच्या गुन्ह्यासंबंधात खासदारांना खटल्यापासून सूट आहे, हा प्रस्ताव कायद्याच्या राज्याला छेद देणारा आहे;

19.5. बहुमताच्या निर्णयामुळे अशी विसंगत परिस्थिती निर्माण होते, जिथे लाच स्वीकारणाऱ्या आणि मतदान न करणाऱ्या खासदारावर खटला चालवला जाऊ शकतो, तर मतदान करणाऱ्या सदस्याला सूट दिली जाते;

19.6. युनायटेड किंग्डममधील कायद्याचे स्थान, जे

वर्षानुवर्षे विकसित झाले आहे, या प्रस्तावास पुष्टी देते की विशेषाधिकाराचा दावा, लाचखोरीच्या गुन्ह्यासाठी खटल्यापासून सूट देण्यापर्यंत वाढविला जाऊ शकत नाही; आणि

19.7. आंतरराष्ट्रीय कल (विशेषत: युनायटेड स्टेट्स , कॅनडा आणि ऑस्ट्रेलियात) असा आहे की संसदीय विशेषाधिकार लाचखोरीच्या गुन्ह्याला लागू होत नाहीत. अल्पसंख्याकांच्या निर्णयात या प्रवृत्तीचा योग्य प्रकारे आधार घेतला आहे , तर बहुमताचा निर्णय अशा निर्णयांवर अवलंबून आहे जे नंतर त्यांच्या मूळ अधिकारक्षेत्रातही कमकुवत केले गेले आहेत.

20. मध्यस्थाच्या वतीने वरिष्ठ वकील श्री गोपाळ शंकरनारायण यांनी न्यायमित्रांच्या मताला दुजोरा दिला. याव्यतिरिक्त, त्यांनी खालीलप्रमाणे युक्तिवाद केले:

20.1. बहुमताच्या निर्णयावर अनेकदा शंका घेण्यात आली असली, तरी अल्पसंख्याकांच्या निर्णयावर या न्यायालयाने मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवला आहे;

20.2. राज्यघटनेच्या अनुच्छेद १०५ आणि १९४ मध्ये वापरण्यात आलेल्या "कोणत्याही" शब्दाचा संकुचित अर्थ लावला पाहिजे आणि यांत्रिकरित्या 'सर्वकाही' असा अर्थ लावू नये, विशेषत: कारण यामुळे सामान्य व्यक्तीला उपलब्ध नसलेली अपवादात्मक सुट मिळते;

20.3. " च्या संबंधात" हा शब्द संकुचित पणे वाचायला हवा. संसदेत किंवा समितीसमोर भाषण किंवा मतदानाचा समावेश असलेल्या वैधानिक प्रक्रियेचा एक भाग असलेल्या 'वैध कृत्यां'शी ते बांधले (जोडले) गेले पाहिजे. अन्य कोणताही अर्थ केल्यास लोकशाही प्रक्रियेचे पावित्र्य आणि जनतेने लोकप्रतिनिधींवर ठेवलेल्या विश्वासाचे

उल्लंघन होईल;

20.4. सार्वजनिक हितावर परिणाम करणाऱ्या भ्रष्टाचाराशी निगडित कायद्यांचा काटेकोर अर्थ लावला पाहिजे;

20.5. मतदान होण्यापूर्वीच किंवा संसदेत भाषण होण्यापूर्वीच,लाच मिळाल्यावर लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो. पीसी ॲक्टच्या कलम ७ (आणि कलम १३) अंतर्गत गुन्ह्यासाठी 'कृत्य करण्याची' ('परफॉर्मन्स')ची गरज नसते. त्यामुळे परिणाम होणे किंवा देणे हा गुन्हा प्रस्थापित होण्याशी संबंधित नसतो आणि बहुसंख्याकांनी निर्माण केलेला भेद कृत्रिम आहे ;

20.6. बहुमताच्या निर्णयाचा परिणाम असा होतो की यामुळे लोकसेवकांचा एक बेकायदेशीर वर्ग तयार होतो ज्याला अतीविशेष संरक्षण दिले आहे व जे कलम 14 चे

उल्लंघन असेल, तसेच उघडपणे स्वैर किंवा मनमानी आहे ; आणि

20.7. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिका, यू के , कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड मधील कायदेशीर स्थिती अल्पसंख्याकांच्या निर्णयाचे समर्थन करते.

21. भारताचे विद्वान सॉलिसिटर जनरल श्री तुषार मेहता यांनी संसदीय विशेषाधिकारां चे संरक्षण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या न्यायालयासमोर विचाराधीन मुद्दा संसदीय विशेषाधिकारांची रूपरेषा नसून लाचखोरीचा गुन्हा विधिमंडळाबाहेर पूर्ण होतो आहे का, हा आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. २०१८ च्या दुरुस्तीपूर्वी आणि नंतर सुद्धा ,पीसी कायद्यांतर्गत लाचखोरीचा गुन्हा लाच स्वीकारल्यावर पूर्ण होतो आणि लाच ज्या अधिकृत कार्याशी संबंधित आहे त्याचा प्रत्यक्ष

कामगिरी करण्याशी किंवा न करण्याशी त्याचा संबंध नाही, असा युक्तिवाद श्री मेहता यांनी केला.

22. मध्यस्थाच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री विजय हंसारिया यांनी बहुमताच्या निर्णयाच्या युक्तिवादाला पाठिंबा दिला. संसदीय विशेषाधिकाराच्या तत्त्वाचा अर्थ राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाच्या संदर्भात आणि घटनात्मक नैतिकतेच्या चष्म्यातून लावला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) प्रकरणातील बहुमताच्या निर्णयाचा फेरविचार करण्यात यावा, या युक्तिवादाचे मध्यस्थांचे वकील श्री ए. वेलन यांनी आपल्या लेखी युक्तिवादात समर्थन केले.

डी. पी व्ही नरसिंह राव या केसमधील निकालाचा पुनर्विचार केल्याने डोळसपणाच्या (स्टेअर डीसीसीस) तत्त्वाचे उल्लंघन होत नाही

23. श्री राजू रामचंद्रन यांच्या प्राथमिक युक्तिवादाकडे

लक्ष देऊन आम्ही सुरुवात करतो, की पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसमधील दीर्घकाळ प्रलंबित असलेला कायदा फिरविणे हे या न्यायालयाने न्यायालयीन दृष्टीकोन बदलण्याबाबत घालून दिलेल्या चाचण्यांच्या अंमलबजावणीमुळे अयोग्य आहे. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या निर्णयाच्या योग्यतेबद्दल प्रथमदर्शनी शंका घेण्याची कारणे या संदर्भाच्या (रेफरन्स) आदेशात देण्यात आली आहेत, ज्यात "राज्यव्यवस्थेवर आणि सार्वजनिक जीवनातील शुचितेच्या रक्षणावर" होणारा परिणाम समाविष्ट आहे. परंतु, पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या केसमधील निर्णयाचा या सात न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर फेरविचार करण्यास विद्वान वरिष्ठ वकिलांनी प्राथमिक आक्षेपाचा पुनरुच्चार केल्याने,हा युक्तिवाद खालीलप्रमाणे मांडण्यात आला आहे.

24. मोठ्या क्षमतेच्या खंडपीठाने दिलेला निर्णय कमी किंवा समान क्षमतेच्या पुढील कोणत्याही खंडपीठाला बंधनकारक असतो. कमी ताकदीचे (संख्या असलेले) खंडपीठ मोठ्या संख्येच्या खंडपीठाने

घेतलेल्या कायद्याच्या दृष्टिकोनाशी असहमत किंवा भिन्न मताचे असू शकत नाही. मात्र, त्याच ताकदीचे (संख्येचे) खंडपीठ समन्वय पीठाने दिलेल्या निर्णयाच्या योग्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकते. अशा परिस्थितीत हे प्रकरण मोठ्या ताकदीच्या (संख्येच्या) खंडपीठासमोर ठेवले जाते.[14]

25. सध्याच्या खटल्यात हे प्रकरण प्रथम दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर ठेवण्यात आले होते आणि त्यांनी हे प्रकरण तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे सोपवले.

तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने हे प्रकरण पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे सोपवले. न्यायालयीन शिस्तीला अनुसरून पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) प्रकरणातील निर्णयाच्या योग्यतेवर या न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या सह-समान पीठाने सविस्तर आदेशात शंका घेतली होती. त्यानुसार हे प्रकरण या सात न्यायमूर्तींच्या

14 दाऊदी बोहरा समाजाचे केंद्रीय मंडळ विरुद्ध महाराष्ट्र राज्य(2004) पुरवणी(सप्लिमेंट)6 एस सी आर 1054: (2005)2 एस सी सी 673 परिच्छेद 12

खंडपीठासमोर ठेवण्यात आले आहे.

26. पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या निर्णयाच्या योग्यतेविषयी या न्यायालयाने यापूर्वीही अनेक निर्णयांमध्ये शंका उपस्थित केली आहे. उदाहरणार्थ, कल्पना मेहता विरुद्ध भारत सरकार [15] या खटल्यात आमच्यापैकी एकाने (न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड,) असे निरीक्षण नोंदवले की :

> "**221.** अल्पसंख्यांकांचे मत असे होते की, लाच घेणाऱ्यावर लाचखोरीचा गुन्हा एका विशिष्ट पद्धतीने काम करण्याचे आश्वासन देऊन पैसे घेतल्यावर किंवा पैसे घेण्यास सहमती दर्शविल्यावर होतो. या तर्काला अनुसरून न्यायमूर्ती एस. सी. अग्रवाल, यांनी असे म्हटले की, संसदेत बोलण्यासाठी किंवा मत देण्यासाठी लाच स्वीकारणाऱ्या खासदाराची फौजदारी जबाबदारी भाषण देण्यापासून किंवा मत देण्यापासून स्वतंत्र असते

आणि म्हणूनच संसदेत "कांहीही बोलल्याबद्दल किंवा दिलेल्या कोणत्याही मतासंदर्भात" ती जबाबदारी नसते. बहुमताच्या निकालातील मताची अचूकता (योग्यता) सध्याच्या खटल्यात विचारार्थ येत नाही. भविष्यात योग्य प्रकरणात ते आवश्यक ठरल्यास मोठ्या खंडपीठाला या मुद्द्यावर विचार करावा लागू शकतो."

(जोर दिला आहे)

27. अशीच निरीक्षणे या न्यायालयाने राजा राम पाल विरुद्ध माननीय सभापती, लोकसभा[16] या खटल्यात नोंदवली आहेत. अशा अनेक निर्णयांमध्ये न्यायालयाने अल्पसंख्याकांच्या निकालाचा आधार घेतला आहे, उदा. कुलदीप नायर विरुद्ध भारत संघ राज्य [17] आणि अमरिंदर सिंग विरुद्ध पंजाब विधानसभा.18 पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या खटल्यातील निर्णयाची योग्यता

(अचूकता) या प्रकरणांमध्ये थेट उद्भवली नसल्याने न्यायालयाने या निर्णयाच्या अचूकतेबद्दल रेफरन्स (संदर्भ) किंवा निर्णायक निरीक्षणे करणे टाळले. तथापि, सध्याचे प्रकरण जवळजवळ पूर्णपणे पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांनी घालून दिलेल्या कायद्यावर अवलंबून आहे.

15.(2018)4 एस सी आर 1: (2018)7 एस सी सी 1

16.(2007)1 एस सी आर 317 :(2007)3 एस सी सी 184

17.(2006)7 एस सी सी 1

18.(2010)4 एस सी आर 1105 :(2010)6 एस सी सी 113

---

28. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसची अचूकता, या

खटल्याच्या वस्तुस्थितीत स्पष्टपणे दिसून येते हे उच्च न्यायालयाच्या वादग्रस्त निकालावरून स्पष्ट होते . "भारतीय राज्यघटनेच्या कलम १९४ (२) नुसार विधानसभा सदस्यांना लाच देण्याच्या किंवा स्वीकारण्याच्या गुन्ह्यात त्यांच्यावर फौजदारी न्यायालयात खटला चालविण्यापासून कांही सूट देण्यात आली आहे का," असा प्रश्न उच्च न्यायालयाने विचारार्थ तयार केला . कलम १०५ (२) च्या संदर्भात पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या प्रकरणातही या न्यायालयाने नेमका हाच प्रश्न सोडवला.

29. शिवाय, अपेलंटचे वकील आणि सीबीआयचे वकील या दोघांनीही पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसमधील कारण मीमांसेचा आधार घेतला. उच्च न्यायालयाने आपल्या विश्लेषणात म्हटले आहे की, कलम 194 (2) हे कलम 105 (2) शी एकाच विषयाशी संबंधित असल्याने पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) मध्ये नमूद केलेल्या कायद्यात या क्षेत्राचा समावेश आहे. ज्या खासदाराने मतदान केले नाही, त्याला संरक्षण (सुट)मिळत

नाही, असा निर्वाळा देताना उच्च न्यायालयाने पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसचा आधार घेतला. अपीलकर्त्याने ठरल्याप्रमाणे मतदान न केल्यामुळे तिला कलम १९४ (२) अन्वये सूट देण्याचे संरक्षण देता येत नाही, असे मानण्यात आले.

30. उच्च न्यायालयासमोर उभा राहिलेला मुद्दा पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या केसमधील निर्णयाकडे वळला. त्यामुळे या कारवाईमुळे कायदा कायमचा निकाली काढण्याची (स्थापित करण्याची) योग्य संधी मिळते. पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) प्रकरणातील निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी सात न्यायमूर्तींच्या कडे केलेल्या रेफरन्स मध्ये कोणतीही कमतरता नाही.

31. १९९८ पासून कोणतीही बाधा न येता अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या स्थितीत न्यायालयाने हस्तक्षेप करू नये, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याच्या (अपेलंट)वतीने ज्येष्ठ वकील

श्री राजू रामचंद्रन यांनी केला आहे. या न्यायालयाने स्वतःला डोळसपणाच्या सिद्धांताच्या (स्टेअर डिसिसिस) इतक्या कठोर (ताठर किंवा न वाकणाऱ्या)आकलनापुरते मर्यादित ठेवणे आम्हाला योग्य वाटत नाही. कायद्याच्या पद्धतशीर विकासासाठी आणि न्यायाच्या प्रगतीसाठी या न्यायालयाची आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याची क्षमता आवश्यक आहे. जर या न्यायालयाचा आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला तर घटनात्मक न्यायशास्त्राचा विकास अक्षरशः ठप्प होईल. यापूर्वी या न्यायालयाने राज्यघटनेचा वाक्यार्थ अयोग्य, अकार्यक्षम किंवा जनहिताच्या विरोधात असल्याचे सिद्ध झाल्यास त्याचा पुनर्विचार करण्याचे टाळलेले नाही. हा नाजूक समतोल न्यायमूर्ती एच आर खन्ना, यांनी मगनलाल छगनलाल (पी) लिमिटेड विरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका **19** या केस मध्ये स्पष्टपणे खालील शब्दात समजावून सांगितले :

---

19. (1975)1 एस सी आर 1:(1974)2 एस सी सी 402

"**22.** [...] न्यायालयाला निश्चितता आणि सातत्याची गरज आणि कायद्याच्या वाढीची आणि विकासाची आवश्यकता यांच्यात समतोल ठेवावा लागतो. न्यायालयीन निर्णयांद्वारे कायद्याला रूढीवादी कठोरतेत निर्जीव होण्याची परवानगी देता येत नाही किंवा क्रांतिकारी रूढ समजूतींचा विध्वन्सक म्हणून (आयकॉनोक्लॅझमला) प्रस्थापित तत्त्वांना पुसून टाकण्याची परवानगी देता येत नाही. एकीकडे न्यायालयीन कल्पकतेला तडा जाणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे, तर दुसरीकडे खटल्यांच्या सामान्य धावपळीत ,सुस्थापित तत्त्वांच्या जागी नवनवीन तत्त्वे मांडण्याचा मोह आणि काळाच्या ओघात त्यांच्या संतत्वावर शिक्कामोर्तब होण्याआधीच नव्या तत्त्वांना लवकर

मान्यता देण्याची इच्छा रोखणे आवश्यक आहे. [...]

32. बंगाल इम्युनिटी कंपनी लिमिटेड विरुद्ध बिहार राज्य आणि इतर **{20}** या खटल्यात या न्यायालयाच्या सात न्यायाधीशांचे खंडपीठ यांनी स्टेअर डीसीसीस या सिद्धांताच्या दृष्टिकोनातून न्यायालयाचे स्वतःच्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याचे अधिकार स्पष्ट केले आहेत. सरन्यायाधीश एस. आर. दास, आणि न्यायमूर्ती भगवती, या दोघांनीही आपापल्या स्वतंत्र मतांमध्ये या न्यायालयाच्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याचा अधिकार स्पष्ट केला, विशेषत: जेव्हा ते घटनात्मक महत्वाचे मुद्दे उपस्थित करतात. न्यायमूर्ती एस. आर. दास, यांनी इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि युनायटेड स्टेट्स (अमेरिका) यांसारख्या विविध न्यायक्षेत्रांमध्ये दिलेल्या निकालांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की या न्यायालयाला त्याच्या मागील निर्णयांपासून, विशेषत: राज्यघटनेच्या स्पष्टीकरणाच्या प्रश्नांवर वेगळे मत मांडण्याचा (प्रश्नांपासून दूर जाण्याचा) अधिकार काढून घेतला

जाऊ शकत नाही. राज्यघटनेचा चुकीचा अर्थ लावल्यास व दीर्घकाळ चुक दुरुस्त न केल्यास सर्वसामान्यांचे नुकसान होईल, अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. मागील निर्णयाचा 'जनतेच्या सामान्य हितावर' काय "अपायकारक" परिणाम होतो, हे सिद्ध करण्यातच न्यायालयाने घालून दिलेली चाचणी होती. असे मत मांडले की :

> **"15.** [...] युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि युनियन ऑफ इंडिया (भारतीय संघराज्य) सारख्या फेडरल राज्यघटनेने शासित असलेल्या देशात, जर या न्यायालयाने चुकीचा अर्थ लावला तर घटनेत सुधारणा करणे कोणत्याही प्रकारे सोपे नाही. (आपल्या राज्यघटनेचे कलम ३६८ पहा). राज्यघटनेचा चुकीचा अर्थ सहज स्थायी राहू शकतो किंवा कोणत्याही परिस्थितीत बराच काळ सुधारल्या शिवाय राहू शकतो ज्यामुळे सार्वजनिक कल्याणाचे मोठे नुकसान होऊ

शकते ... आपल्या राज्यघटनेत असे काहीही नाही जे आपल्याला आधीच्या निर्णयापासून दूर जाण्यापासून (वेगळे मत मांडण्यापासून) रोखते,जर आपल्याला त्याची चूक आणि त्याचा जनतेच्या सामान्य हितांवर होणारा वाईट परिणाम याची खात्री पटली असेल तर . या न्यायालयाने घोषित केलेला कायदा भारताच्या हद्दीतील सर्व न्यायालयांना बंधनकारक असेल, असे नमूद करणारे कलम १४१ स्पष्टपणे या न्यायालयाव्यतिरिक्त इतर न्यायालयांच्या संदर्भात आहे.भारत सरकार कायदा, १९३५ मधील यासारख्याच तरतुदीनुसारही हे स्पष्ट होते की, विचारात घेतलेली न्यायालये ही कनिष्ठ न्यायालये आहेत."

(जोर दिला आहे)

20. (1955)2 एस सी आर 603 : 1955 एस सी सी ऑनलाईन सुप्रीम कोर्ट 2

न्यायमूर्ती एन एच भगवती, यांनी वैधानिक तरतुदींचा अर्थ लावण्याशी संबंधित निर्णयापासून विचलित होणे आणि राज्यघटनेचा अर्थ लावणे यातील फरकावर ही भर दिला, त्यांचे असे मत देताना की एखाद्या कायद्याचा चुकीचा अर्थ विधिमंडळाद्वारे दुरुस्त केला जाऊ शकतो, परंतु अकार्यक्षम अर्थ दुरुस्त करण्यासाठी घटनेत दुरुस्ती करणे तितके सोपे नाही. न्यायमूर्ती एस. आर. दास, यांनी केलेल्या विवेचनाप्रमाणेच न्यायमूर्ती भगवती यांच्या मते आधीच्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याची कसोटी आहे , जी म्हणजे आधीचा निर्णय "स्पष्टपणे चुकीचा किंवा अयोग्य " आहे किंवा "सार्वजनिक हिताकरिता " त्याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

33. न्यायालयाने मागील निर्णयाशी सहजच (हलकेच)

असहमती व्यक्त करू नये, असे 'स्टेअर डीसिसिस 'चा सिद्धांत सांगतो. तथापि, या न्यायालयाने सातत्याने अनेक खटल्यांमधे {21}असे म्हटले आहे की हा सिद्धांत म्हणजे न वाकविता येणारा कायद्याचा नियम नाही, आणि यामुळे जनतेच्या सामान्य कल्याणास हानी पोहोचेल अशी चूक कायम राहील असे होऊ शकत नाही. चूक असल्यास, किंवा निर्णयाचा परिणाम जर जनतेच्या हिताला हानी पोहोचवत असेल किंवा "घटनेच्या कायदेशीर तत्त्वज्ञानाशी विसंगत आहे " असा विश्वास असल्यास हे न्यायालय आपल्या आधीच्या निर्णयांचा पुनरावलोकन करू शकते. राज्यघटनेच्या विवेचनाशी संबंधित प्रकरणांमध्ये, हे न्यायालय कायद्याच्या इतर शाखांपेक्षा अधिक सहजतेने हे करू शकेल कारण स्पष्ट दिसत असलेली चूक दुरुस्त न करणे हे सार्वजनिक हित आणि राज्यव्यवस्थेसाठी हानिकारक ठरेल. हे प्रकरण किती कालावधीपर्यंत त्या क्षेत्रात अधिकार राखून आहे , त्याचा फार (प्राथमिक)परिणाम होत नाही.

२१ पाहा शंभूनाथ सरकार विरुद्ध पश्चिम बंगाल .राज्य, [१९७४] १ एससीआर १ : (१९७३) १ एससीसी ८५६; लेफ्टनंट कर्नल खजूर सिंग विरुद्ध भारत सरकार, [1961] 2 एससीआर 828; भारत संघ राज्य विरुद्ध रघुबीर सिंह, [१९८९] ३ एससीआर ३१६ : (१९८९) २ एससीसी ७५४; प्रदीप कुमार बिस्वास विरुद्ध इंडियन इंस्टीट्यूट ऑफ केमिकल बायोलॉजी, [2002] 3 एससीआर 100 : (2002) 5 एससीसी 111; सुप्रीम कोर्टाचे ॲडव्होकेट-ऑन-रेकॉर्ड असोसिएशन विरुद्ध भारत सरकार, [2015] 13 एससीआर 1 : (2016) 5 एससीसी 1

राज्यघटनेच्या भावार्थ किंवा आशयाला धक्का पोहोचवणारे निर्णय दीर्घकाळ त्या क्षेत्रात अधिकार वाणीने टिकून असतानाही या न्यायालयाने राज्यघटनेचा अर्थ लावणारे निर्णय रद्दबातल ठरवले आहेत.

34. पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) प्रकरणातील बहुमताचा निकाल घटनात्मक विवेचनाच्या एका महत्वाच्या प्रश्नाशी निगडित आहे ज्याचा सार्वजनिक जीवनातील शुचितेवर परिणाम होतो. १९९८ मध्ये हा निर्णय दिल्यापासून या न्यायालयाच्या विविध खंडपीठांना या निर्णयाला मतभेद किंवा विरोधाच्या टिपणीसह सामोरे जावे लागले आहे. या प्रकरणात कायदा तयार करून विसंगती दूर करण्याची संधी निर्माण झाली आहे. या न्यायालयाने मागील निर्णयाचे सहजच उल्लंघन केल्याचे हे उदाहरण नाही. खरे तर पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या खटल्यातील निर्णयाचा, मागील निर्णयाच्या नियमाप्रमाणे योग्य तो आदर राखून पुनर्विचार करणे न्यायालयाने टाळले आहे, जोपर्यंत निर्णय विचार करण्याजोगा होत नाही,याचे हे प्रकरण उदाहरण आहे.

35. अपीलकर्त्याने शंकर राजू विरुद्ध भारत सरकार [2,2] शाह फैसल विरुद्ध भारत सरकार [23] केशव मिल्स कंपनी लिमिटेड विरुद्ध

सीआयटी [24] आणि कृष्ण कुमार विरुद्ध भारत सरकार {25} या खटल्यातील या न्यायालयाच्या निकालांचा आधार घेतला आहे. हे निकाल या प्रस्तावाचा पुनरुच्चार करतात की (१) डोळस पणाचा सिद्धांत (स्टेअर डीसीसीस) कायद्यात निश्चितता आणि सुसंगतता वाढवतो; (२) न्यायालयाने पूर्वनिर्णयाचा पुनर्विचार करण्याचा रेफरन्स (संदर्भ) बेफिकीरपणे देऊ नये; आणि (३) केवळ पर्यायी दृष्टिकोन उपलब्ध आहे म्हणून कायद्याच्या स्थिर स्थितीला बाधा आणू नये. तथापि, हे सर्व निकाल या न्यायालयाच्या ,काही विशिष्ट परिस्थितीत ,आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याचा अधिकार ओळखतात - ज्यात "सार्वजनिक धोरणा"चा विचार "सार्वजनिक हित" आणि "सतत च्या अन्यायावर उपाय करणे" देखील समाविष्ट आहे. त्या खटल्यांमध्ये जी वस्तुस्थिती निर्माण झाली, त्यात या न्यायालयाच्या काही निर्णयांचा पुनर्विचार करण्याचे कोणतेही सबळ कारण नसल्याचे या न्यायालयाला आढळले.

36. शंकर राजू (सुप्रा) प्रकरणात हे न्यायालय प्रशासकीय न्यायाधिकरण (सुधारणा) अधिनियम, २००६ चे अन्वयार्थ आणि केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या न्यायिक सदस्याच्या नियुक्तीशी संबंधित होते. अशाच विषयावर निर्णय देणाऱ्या मोठ्या संख्येच्या खंडपीठाच्या निर्णयाला आपण बांधील आहोत आणि केवळ पर्यायी दृष्टिकोन उपलब्ध आहे म्हणून त्या निर्णयात घेतलेल्या मताचा फेरविचार करू शकत नाही, असे निरीक्षण दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने नोंदवले.

---

22 [2011] 2 एससीआर 1 : (2011) 2 एससीसी 132

23 [2020] 3 एससीआर 1115 : (2020) 4 एससीसी 1

24 [1965] 2 एससीआर 908

25 [1990] 3 एससीआर 352 : (1990) 4 एससीसी 207

37. शाह फैसल (सुप्रा) प्रकरणात या न्यायालयाचे घटनापीठ पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने दोन परस्परविरोधी निर्णय घेतल्याच्या कारणास्तव याचिका सात न्यायाधीशांच्या मोठ्या खंडपीठाकडे पाठवायच्या का, या प्रश्नावर निर्णय देत होते. दोन निकालांमधील किरकोळ विसंगतींच्या आधारे किंवा सहजासहजी मोठ्या खंडपीठाकडे रेफरन्स करता येणार नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. त्या संदर्भात न्यायालयाला असे आढळले की, हे निर्णय एकमेकांशी विसंगत नव्हते किंवा एकही निर्णय निष्काळजीपणाने केलेला नव्हता. स्टेअर डेसिसिसच्या सिद्धांतावर कायदा तयार करताना, न्यायालयाने असे म्हटले की काही प्रकरणांमध्ये न्यायालय आपल्या निर्णयांचा पुनर्विचार करू शकते, विशेषत: जेव्हा ते "अकार्यक्षम" किंवा "सुस्थापित तत्त्वांच्या विरुद्ध" सिद्ध होतात. ब्रिटनमधील (यु के) हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या बदललेल्या पद्धतीकडे म्हणजे ,मागील निर्णयांचा पुनर्विचार करण्यास पूर्ण मनाई करण्यापासून ते सध्याच्या स्थितीपर्यंत, जे

विशिष्ट परिस्थितीत निर्णय रद्द करण्याची परवानगी देते, याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले. या पूर्वीच्या निर्णयांपासुन नित्यक्रमाने वेगळे मत मांडता कामा नये, पासुन "सार्वजनिक हिताच्या" दृष्टीने आवश्यक असताना पुनर्विचार करण्यास परवानगी आहे, अशी कॅनडाची भूमिकाही न्यायालयाने उद्धृत केली.

38. केशव मिल (सुप्रा) या केसमधील निर्णयात प्राप्तिकर कायदा, १९२२, मधील तरतुदींचा अर्थ लावण्यात आला आणि त्या खटल्याच्या परिस्थितीत न्यायालयाला साररख्याच कायद्याच्या मुद्द्यावर मागील निर्णयांचा पुनर्विचार करण्याचे कोणतेही सबळ कारण सापडले नाही. ज्या परिस्थितीत "जनतेच्या हिताचे" आहे किंवा इतर काही "वैध" किंवा "सक्तीची" कारणे असतील तर आधीच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची परवानगी आहे हे न्यायालयाने मान्य केले. शिवाय, न्यायालयाच्या निर्णयांचे पुनरावलोकन करताना न्यायालयाच्या दृष्टिकोनावर नियंत्रण ठेवण्यासाठी तत्त्वे ठरविणे शहाणपणाचे ठरणार नाही कारण ते

"कायद्याच्या सामान्य प्रशासनावर" किंवा "सार्वजनिक हितावर" चुकीचा परिणाम यासह अनेक विचारांवर आधारित आहे, असे न्यायालयाने नमूद केले. हे विवेचन खरं तर त्याच परिच्छेदात समाविष्ट आहे ज्यावर अपीलकर्ता स्टेअर डिसिसिस सिद्धांताची दृढ समज पुढे नेण्यासाठी विश्वास ठेवतो.या न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने (गजेंद्रगडकर, सरन्यायाधीश यांच्यामार्फत बोलताना) असे निरीक्षण नोंदवले:

> "**23.** [...] आपल्या आधीच्या निर्णयाचा आढावा घेतांना आणि त्यात सुधारणा करतांना,या न्यायालयाने स्वत:ला विचारले पाहिजे की, लोकहिताच्या दृष्टीने किंवा इतर कोणत्याही वैध व सक्तीच्या कारणास्तव, आधीच्या निर्णयात सुधारणा करणे आवश्यक आहे काय . जेव्हा हे न्यायालय कायद्याच्या प्रश्नांचा निर्णय घेते, तेंव्हा त्यांचे निर्णय, अनुच्छेद १४१ अन्वये, भारताच्या हद्दीतील सर्व न्यायालयांवर बंधनकारक

असतात आणि म्हणूनच , देशातील कायद्याच्या विवेचनात निश्चितता आणि सातत्य हा घटक आणणे आणि टिकवून ठेवणे हे या न्यायालयाचे कायम प्रयत्न आणि काळजी असणे आवश्यक आहे . या न्यायालयापुढे नंतर मांडलेले मत अधिक वाजवी वाटते, या कारणास्तव या न्यायालयाने आपल्या आधीच्या निर्णयांचा फेरविचार करण्याचा अधिकार वारंवार वापरल्याने प्रासंगिकपणे कायदा अनिश्चित होऊ शकतो आणि त्यामुळे संभ्रम निर्माण होऊ शकतो , जो सातत्याने टाळला पाहिजे. याचा अर्थ असा नाही की नंतरच्या प्रसंगी जर न्यायालयाचे समाधान झाले असेल की आपला आधीचा निर्णय स्पष्टपणे चुकीचा होता तरी त्याने चूक सुधारण्यास संकोच केला पाहिजे; परंतु आधीचा निर्णय स्पष्टपणे चुकीचा ठरविण्यापूर्वी, न्यायालयाचे आपल्या सदस्यांमध्ये एकमताने समाधान

व्हावे लागेल की वरील मताचे पुनरावलोकन पूर्णपणे योग्य आहे. हे शक्य नाही किंवा इष्ट नाही आणि कोणत्याही परिस्थितीत, आपल्या आधीच्या निर्णयांचे पुनरावलोकन आणि फेरविचार करण्याच्या प्रश्नाचा निपटारा करताना न्यायालयाच्या दृष्टिकोनावर नियंत्रण ठेवणारी कोणतीही तत्त्वे ठरविणे अयोग्य ठरेल. हे नेहमीच अनेक समर्पक बाबींवर अवलंबून असते: — पूर्वीच्या दृष्टिकोनाचा फेरविचार आणि पुनरावलोकन करण्याची याचिका ज्या दुर्बलतेवर किंवा त्रुटीवर आधारित आहे, त्याचे स्वरूप काय आहे? याआधीच्या प्रसंगी या प्रश्नाच्या काही उघड किंवा स्पष्ट पैलूंकडे लक्ष दिले गेले नाही का, किंवा कोणत्याही संबंधित व महत्त्वाच्या वैधानिक तरतुदीकडे न्यायालयाचे लक्ष वेधले गेले नाही का, किंवा ज्याकडे लक्ष दिले गेले नाही अशा मुद्द्याशी संबंधित या न्यायालयाचा यापूर्वीचा

कोणताही निर्णय होता काय ? अशा याचिकेवर सुनावणी करणारे न्यायालय,आधीच्या मतात अशी चुक आहे यावर एकमत आहे का? या चुकीचा कायद्याच्या सामान्य प्रशासनावर किंवा सार्वजनिक हितावर काय परिणाम होईल? आधीच्या निर्णयाचे पालन या न्यायालयाने किंवा उच्च न्यायालयांनी नंतरच्या प्रसंगी केले आहे का? आणि आधीचा निर्णय मागे घेतल्याने जनतेची गैरसोय, त्रास किंवा अनागोंदी होईल का? जेव्हा जेव्हा या न्यायालयाला आपल्या आधीच्या निर्णयांचे पुनरावलोकन आणि फेरविचार करण्यासाठी आपल्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यास सांगितले जाते तेव्हा या आणि इतर संबंधित बाबी काळजीपूर्वक लक्षात घेतल्या पाहिजेत. आधीचा निर्णय हा या न्यायालयाच्या पाच विद्वान न्यायमूर्तींच्या खंडपीठाने एकमताने घेतलेला निर्णय असेल तेव्हा या बाबी

अधिक महत्त्वाच्या ठरतात.

(जोर दिला आहे)

39. त्याचप्रमाणे कृष्ण कुमार (सुप्रा) हे सरकारी कर्मचाऱ्यांना देय पेन्शनबाबतचे प्रकरण होते. तेथेही न्यायालयाला त्या वस्तुनिष्ठ संदर्भात आपल्या आधीच्या निर्णयांचा पुनर्विचार करण्याची सबळ कारणे सापडली नसली, तरी 'सतत होत असलेल्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी' किंवा 'सार्वजनिक धोरणाचा विचार करून' तसे करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे, हे न्यायालयाने मान्य केले.

40. अपीलकर्त्याने उद्धृत केलेल्या वरील प्रकरणांमधील संदर्भ सध्याच्या प्रकरणाशी तुलनात्मक नाही. रेफरन्सच्या आदेशात दिल्याप्रमाणे आणि या निर्णयादरम्यान पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या केस मधील निर्णयाचा सार्वजनिक हित, सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा आणि संसदीय

लोकशाहीच्या कार्यपद्धतीवर व्यापक परिणाम होतो. बहुमताच्या निकालात अनुच्छेद १०५ च्या मजकुराच्या विवेचनात अनेक स्पष्ट त्रुटी आहेत; ज्यामध्ये संसदीय विशेषाधिकाराची व्याप्ती आणि हेतू आणि त्याचा आंतरराष्ट्रीय न्यायशास्त्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन या सर्वांचा विरोधाभासी परिणाम झाला आहे. सध्याची केस ही या प्रकारची आहे की जर, पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) प्रकरणातील निर्णयाचा पुनर्विचार न केल्यास या न्यायालयाने चुक (त्रुटी) कायम ठेवण्याचा धोका आहे.

41. सर्वात शेवटी, अपीलकर्ता यांनी अजित मोहन विरुद्ध विधानसभा, राष्ट्रीय राजधानी प्रदेश दिल्ली **{26}** या खटल्यातील या न्यायालयाच्या निकालाचा देखील आधार घेतला आहे, जिथे या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की "राज्यघटनेत परिभाषित केल्याप्रमाणे कायदेमंडळांचे अधिकार, विशेषाधिकार आणि सवलतींना पूर्णपणे वापरायचे कां?याबद्दल घटनातज्ञांमध्ये "भिन्न मते" आहेत. किंवा (त्यावर) निर्बंध ठेवायचे आहेत कां?."

मात्र, असे मत संसदेवर सोपवले पाहिजे, या कारणास्तव न्यायालयाने या विषयावर आपले मत व्यक्त करण्यास नकार दिला, असेही आग्रहपूर्वक सादर करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, या प्रकरणात, न्यायालयाने निर्णायक भूमिका घेणे टाळावे आणि हा मुद्दा संसदेच्या निर्णयावर सोडला पाहिजे, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. हा युक्तिवाद चुकीचा आहे.

42. या निर्णयात,राज्यघटनेत परिभाषित केल्याप्रमाणे विधिमंडळाचे "अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण" निश्चित करण्याचा किंवा प्रतिबंधित करण्याचा प्रयत्न नाही. त्याऐवजी

26.(2021)14 एससीआर 611 :(2022)3 एससीसी 529

या निर्णयाला राज्यघटनेच्या कलम १०५ आणि कलम १९४ च्या योग्य अन्वयार्थावर निर्णय घेण्याचा मर्यादित अधिकार आहे. त्यामुळे हे

न्यायालय राज्यघटनेचा अर्थ जसा आहे तसा ठरवत आहे, विशेषाधिकारांना 'पूर्ण वापरायचे ' कां , या प्रश्नावर नाही.

43. मार्क ग्रेव्ह्स वि. न्यूयॉर्क राज्यातील जनता {27} या केस मधील एका वेगळ्या पण सहमतीच्या मतात. न्यायमूर्ती फ्रॅंकफर्टर यांनी घटनात्मक महत्त्वाच्या प्रश्नावर अमेरिकेच्या (युनायटेड स्टेट्स) सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेले दोन निर्णय फेटाळून लावताना संक्षिप्तपणे आपले मत नोंदवले की :

> “आपल्या राज्यघटनेसारख्या कायद्याच्या संदर्भात न्यायालयीन विवेचन अपरिहार्य आहे, जे अनेक तपशीलांमध्ये हेतूपूर्ण अस्पष्टतेने रेखाटले गेले आहे जेणेकरून भविष्यात उघड करून सांगण्यास जागा शिल्लक राहील. पण घटनात्मकतेचा अंतिम निकष (टचस्टोन) संविधान च आहे, त्याबद्दल आपण काय बोललो आहोत हे नाही."

(जोर दिला आहे)

44. वरील मांडणी भारतीय राज्यघटनेसाठीही खरी ठरते, जो घटनात्मक विवेचनाचे नाजूक मुद्दे उपस्थित करणारा परिवर्तनकारी दस्तऐवज आहे. बहुमताच्या निकालाचे परिणाम लक्षात घेऊन,पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) मधील "आम्ही त्याबद्दल जे बोललो आहोत" त्यापासून दूर जाण्याची किंमत मोजावी लागली तरी,कलम १०५ (२) आणि १९४ (२) च्या अनुषंगाने "राज्यघटनेनेच" जे गृहीत धरले आहे, त्याच्याशी प्रामाणिक राहण्याचा आमचा प्रयत्न आहे. केवळ या न्यायालयातील पाच न्यायमूर्तींच्या आधीच्या मताशी ठाम निष्ठा असल्याने,आपण राज्यघटनेचा चुकीचा लावलेला अर्थ कायम ठेवु नये, असे आमचे मत आहे.

45. पार्श्वभूमी, निवेदने आणि प्राथमिक मुद्द्यांना पाहिल्यानंतर, आपण विचारार्थ निर्माण होणाऱ्या विषयाकडे

वळतो.

E. भारतातील संसदीय विशेषाधिकारांचा इतिहास

46. विचारशील लोकशाहीत लोकशाही संस्थांमधील चर्चेतून लोकांच्या आकांक्षा पूर्ण केल्या जातात. या संस्थांमध्ये संसद आणि राज्य विधिमंडळे अग्रगण्य आहेत . लोकांच्या आकांक्षांना जीवदान आणि अर्थ देण्याचा राज्यघटनेचा उद्देश त्याचे प्रतिनिधी कायदेविषयक कामकाज, चर्चा आणि संवादाच्या माध्यमातून पार पाडतात. संसदेला " राष्ट्राची भव्य चौकशी" म्हणतात.

---

27 - 306 यूएस 466 (1939)

तत्कालीन सरकारच्या कृती आणि कायदेविषयक प्राधान्यक्रमांची छाननी केली जाऊ शकते आणि त्याला

जबाबदार धरण्यासाठी टीका पण केली जाऊ शकतेच, पण संसद व्यक्ती, नागरी समाज आणि सार्वजनिक भागधारकांच्या तक्रारी मांडण्याचे व्यासपीठ म्हणूनही काम करते. विधिमंडळात चर्चेची जागा संकुचित झाली की लोक विधिमंडळाबाहेर संभाषण आणि लोकशाही कृतींचा आधार घेतात. संसदेतील कामकाजाची छाननी करण्याचा नागरिकांचा हा विशेषाधिकार हा विचारशील लोकशाहीचा आनुषंगिक अधिकार आहे, जे राज्यघटनेचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. लोकशाही आणि शांततापूर्ण सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी चर्चा, विचार आणि प्रतिविचार मुक्तपणे व्यक्त करता येतील अशा संस्था निर्माण करण्याचा आपल्या राज्यघटनेचा हेतू होता.

47. संसद ही एक उत्कृष्ट सार्वजनिक संस्था आहे जी सर्व भारतीयांच्या आकांक्षा प्रत्यक्षात आणण्याचा विचार करते. घटनात्मक आणि लोकशाही व्यवस्थेअंतर्गत संसदीय विशेषाधिकारांचा आधार आहे ज्यामुळे आमदारांना

सभागृहासमोरील कामकाजावर मोकळेपणाने मत मांडता यावे. त्यामुळे विधिमंडळातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा प्रत्येक विधिमंडळासाठी आवश्यक असलेला विशेषाधिकार आहे.

48. विचारशील लोकशाही विचारमंथनाला सुशासनाची नैतिकता समजते आणि ती केवळ संसदीय क्षेत्रापुरती मर्यादित नसते. राजीव सूरी विरुद्ध डीडीए [28] या खटल्यातील न्यायमूर्ती संजीव खन्ना, यांचे मत, विचारशील लोकशाहीची रूपरेषा खालीलप्रमाणे स्पष्ट करते:

> "**653.** विचारशील लोकशाही विचारविनिमयात, निर्णय प्रक्रियेत आणि सार्वजनिक निर्णय प्रक्रियेतील वादविवादात सहभागी होण्याच्या अधिकारावर भर देते. निर्णय किंवा कायद्यानंतर न्यायालयासमोर संघर्ष करणे हा सहभागाचा एक प्रकार आहे. प्रक्रियात्मक निष्पक्षता आणि न्यायालयीन पुनरावलोकनाची

मर्यादशील शक्ती या कायदेशीर तत्त्वांद्वारे संरचित न्यायालयांद्वारे निर्णय घेणे, हा निर्णय घेण्याच्या आधी आणि घेण्याच्या टप्प्यावर लोकसहभागाला पर्याय नाही. प्रजासत्ताक किंवा प्रातिनिधिक लोकशाहीत नागरिक कायदे बनवण्याची आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निवडून आलेल्या सरकारवर सोपवतात, जे त्यांच्या वतीने निर्णय घेतात. हे अपरिहार्य आणि आवश्यक आहे कारण छोट्या गटांमध्ये चर्चा आणि निर्णय घेणे अधिक कार्यक्षम आहे. या प्रक्रियेसाठी विशेषत: वादग्रस्त प्रकरणांमध्ये माहिती गोळा करणे, त्यावर प्रक्रिया करणे आणि निष्कर्ष काढणे आवश्यक आहे.

(2021)15 एस सी आर 283:(2022)11 एस सी सी 1

निहीत हितसंबंधांना आळा घालता येईल. कठीण, तरीही फायदेशीर निर्णयांची अंमलबजावणी होऊ शकते. कुशल, सुजाण आणि समस्यांची जाण असणारे सरकारी अधिकारी आणि निवडणुकीच्या जनादेशाने समर्थित आणि मतदारांशी जोडलेले राजकीय कार्यकारी अधिकारी निर्णय घेण्यास अधिक सुसज्ज आणि सक्षम आहेत. यामुळे निवडून आलेल्या राजकीय कार्यकारिणीला आपली धोरणे व आश्वासने प्रत्यक्ष आचरणात आणता येतात. शिवाय, नागरिक निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींशी संपर्क साधतात आणि त्यांच्या माध्यमातून प्रस्तावित कायदे आणि धोरणात्मक उपाययोजनांच्या बाजूने आणि विरोधात आपली मते व्यक्त करतात. तथापि, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा कायद्यांचा मसुदा तज्ञ आणि

भागधारकांशी विस्तृत सल्लामसलत करण्यासाठी संसदीय समित्यांकडे पाठविला जातो. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींद्वारे प्राथमिक कायदे करण्याची प्रक्रिया विविध मते आणि निवडींवर छाननी, सल्लामसलत आणि विचारविनिमय करून तयार केली जाते ज्यात सर्वांची संमती समाविष्ट असते.

...

656. तथापि, कायदे करण्याचा आणि शासन करण्याचा अधिकार निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना देणे म्हणजे नागरिकांचा जाणून घेण्याचा आणि माहिती देण्याचा अधिकार नाकारणे नव्हे. लोकशाही हा लोकांनी वेळोवेळी सार्वमत घेण्याचा किंवा मतदानाचा अधिकार वापरण्याचा अधिकार नाही आणि त्याद्वारे निवडून आलेले प्रतिनिधी निवडणे, समाधान, निराशा

व्यक्त करणे, अनुमानित धोरणे मंजूर करणे किंवा नामंजूर करणे हा अधिकार नाही. नागरिकांचा जाणून घेण्याचा अधिकार आणि माहिती देण्याचे सरकारचे कर्तव्य हे लोकशाही शासनपद्धतीत तसेच अभिव्यक्ती (बोलणे आणि व्यक्त होणे) स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारात अंतर्भूत आहे. पारदर्शकता आणि ग्रहणशीलता हे दोन प्रमुख घटक आहेत कारण अत्यंत सक्षम आणि प्रामाणिक निर्णय कर्त्यांनाही मतदारसंघाच्या गरजा तसेच विद्यमान धोरणे आणि निर्णय व्यवहारात कसे कार्य करीत आहेत याबद्दल माहिती आणि अभिप्राय आवश्यक आहे. यासाठी दोन्ही दिशांना (बाजुनी) माहितीचा मुक्त प्रवाह आवश्यक आहे. जेव्हा माहिती रोखून धरली जाते/ नाकारली जाते, संशय आणि शंका बळावते आणि किनाऱ्यांवरचे व हितसंबंध असलेले गट त्याचा फायदा

घेतात. यामुळे सामाजिक अस्थिरता निर्माण होऊ शकते. [ओल्सनच्या सातव्या ध्वनितार्थाच्या संदर्भात, "७. वितरणात्मक आघाडी... आर्थिक विकासाचा दर कमी करा...". मॅन्कुर ओल्सन यांचे 'राष्ट्रांचा उदय आणि पतन' 'आणि त्यानंतरचा अभ्यास.]"

(जोर दिला आहे)

निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सभागृहाच्या पटलावर त्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे आणि वादविवाद करण्याचे स्वातंत्र्य हा संसदीय शासनपद्धतीतील विचारशील लोकशाहीचा महत्त्वाचा घटक आहे. जबरदस्ती किंवा भीतीला बळी न पडता,आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या वातावरणात आपले कार्य पार पाडण्याची आमदारांची क्षमता घटनात्मकदृष्ट्या सुरक्षित आहे. नागरिक म्हणून लोकप्रतिनिधींना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार आहे. त्यापलीकडे जाऊन राज्यघटनेने केंद्र

आणि राज्यांच्या विधिमंडळात बोलण्याचे आणि वादविवाद करण्याचे स्वातंत्र्य संरक्षित केले आहे. वैयक्तिक आमदारांना दिलेले हे संरक्षण आहे. लोकशाही टिकवणाऱ्या संवाद, वादविवाद आणि टीकेचे प्रमुख घटक म्हणून संसदेचा आणि राज्य विधिमंडळांचा संस्थात्मक पाया सुरक्षित ठेवण्याच्या गरजेवर त्या अधिकाराची मान्यता आधारलेली आहे.

49. भारतीय परिप्रेक्ष्यात वसाहतवादी राजवटीपासून स्वातंत्र्यलढ्यानंतरच्या इतिहासाचा आणि विकासाचा संदर्भ घेतल्याशिवाय विचारशील लोकशाही तसेच विधिमंडळातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आवश्यक विशेषाधिकार समजून घेता येणार नाही. प्रातिनिधिक संस्था टप्प्याटप्प्याने विकसित झाल्या याचे उदाहरण भारताने इतिहासात दिले आहे. भारतातील विधिमंडळांच्या विशेषाधिकारांचा या संस्थांच्या इतिहासाशी जवळचा संबंध आहे. हा इतिहास ब्रिटनमधील (यु के) हाऊस ऑफ कॉमन्समधील संसदीय विशेषाधिकारांचा इतिहास, तसेच

वसाहतवादी राजवटीत या विशेषाधिकारांवर दावा करण्यासाठी भारतीय कायदेमंडळांनी केलेल्या संघर्षात सापडतो. वसाहतवादी राजवटीत भारतात राजकीय आणि संसदीय कारभार आणण्यासाठी जी पावले उचलली गेली, ती भारतीयांच्या आकांक्षांमध्ये नेहमीच कमी पडली. याचे मुख्य कारण म्हणजे ब्रिटिश राजवट भारतीयांच्या स्वतंत्र होण्याच्या इच्छेला प्रतिरोधक होती, ही वस्तुस्थिती आहे.त्यामुळे भारतीय विधिमंडळांना ब्रिटनच्या (यु के) हाऊस ऑफ कॉमन्सच्या तुलनेत विशेषाधिकार असल्याचे मान्य करण्यात आले नाही. किली विरुद्ध कार्सन[२९] या खटल्यात प्रिव्ही कौन्सिलने असे प्रतिपादन केले होते की ब्रिटनमधील (यु के)हाऊस ऑफ कॉमन्सने प्राचीन वापराने विशेषाधिकार प्राप्त केले आहेत आणि वसाहतवादी कायदेमंडळांना 'लेक्स एट कन्सुएटुडो' संसद किंवा संसदेचा कायदा आणि प्रथा नाही.

29 (१८४१-४२) ४ मू. पीसी 63

कारण त्यांचे हक्क एका कायद्यातून निर्माण झाले. याचा अर्थ वसाहतवादी राजवटीत विधिमंडळांना कोणतेही अंगभूत अधिकार देण्यात आलेले नाहीत.

50. ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत १८३३ पर्यंत कायदा बनविणे हे फक्त कार्यकारीणीच्या अधिकारात होते. भारत सरकार अधिनियम, १८३३ ने बंगालच्या गव्हर्नर जनरल यांना भारताचे गव्हर्नर जनरल म्हणून पुन्हा नियुक्त केले आणि फक्त त्यांना कायदेविषयक अधिकार दिले. गव्हर्नर जनरलमध्ये चार सदस्य असणे आवश्यक होते, त्यापैकी एक कायदा सदस्य असेल ज्याला कायदेविषयक हेतू वगळता कौन्सिलचे सदस्य म्हणून काम करण्याचा अधिकार नव्हता. भारतातील विधिमंडळांसाठी हा एक सुरुवातीचा (प्रस्तावना म्हणून) उपाय होता कारण गव्हर्नर

जनरलची परिषद आपली कार्यकारी कार्ये आणि कायदेविषयक कार्ये पार पाडण्यासाठी स्वतंत्र बैठका घेईल . चांगले कायदे बनविण्याचे साधन म्हणून प्रतिनिधित्व देण्याच्या इच्छेपेक्षा , भारतातील विशाल आणि वैविध्यपूर्ण सामाजिक वातावरणात कायदे बनविण्याच्या सोयीसाठी या प्रक्रियेची कल्पना करण्यात आली होती. तथापि, आमदारांची कर्तव्ये पार पाडताना कायदेविषयक विशेषाधिकारांची आवश्यकता लक्षात घेऊन प्रथम कायदा सदस्य लॉर्ड मेकॉले यांनी आपल्या मसुदा स्थायी आदेशाद्वारे अधिकारांच्या स्वरूपात काही विशेष सुविधा मिळविण्याचा प्रयत्न केला. या विशेष सुविधांमध्ये कायद्याच्या विषयाची संपूर्ण माहिती देणे, गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलच्या सर्व बैठकांना उपस्थित राहण्याचा अधिकार , अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मतदानस्वातंत्र्य यांचा समावेश होता.[150]

15 अस्वीकरण

या न्याय निर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

51. नॉन लेजिस्लेटिव्ह (कायदेविषयक नसलेल्या) कामकाजातही उपस्थिती आणि मतदानाचे विशेषाधिकार चार्टर ॲक्ट १८५३ द्वारे वाढविण्यात आले. त्यातून कार्यकारी व कायदेविषयक कामकाजाचे आणखी विभाजन झाले. विधान परिषदेत विधिमंडळाचे कामकाज चालविण्यास मदत करण्यासाठी अतिरिक्त सदस्य असणे आवश्यक होते आणि त्यांनी तपासणीखालील कायद्यांचा त्यांचा स्वतंत्र विचार देणे आवश्यक होते. विधान परिषदेतील या सदस्यांना कायद्याने कोणतेही विशेषाधिकार नव्हते, परंतु त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने नसणे म्हणजे त्यांना अंगभूत हक्क व विशेषाधिकार प्रदान करणे असे समजले जात होते. त्यामुळे परिषदेने ब्रिटनमधील (यु के)हाऊस ऑफ कॉमन्सभोवती (सारखे)तयार करण्यात आलेल्या मिनी पार्लमेंटसारखे (छोटी संसद) अधिकार स्वत:कडे घेण्याचा प्रयत्न केला . १८३३ व १८५३ च्या अधिनियमानुसार विधान परिषदेला स्वत:चे कार्यपद्धतीचे नियम

तयार करण्याचे अधिकार होते.

52. इंडियन कौन्सिल ॲक्ट १८६१ मध्ये हा अधिकार काढून घेण्यात आला. तथापि, १८६१ च्या कायद्याच्या कलम १० ने विधान परिषदेत सहा ते बारा अशासकीय सदस्यांचा समावेश केला, जे ब्रिटिश किंवा भारतीय असू शकत होते. या अतिरिक्त सदस्यांच्या अभिव्यक्ती व मतस्वातंत्र्याची अप्रत्यक्ष मान्यता होती. ब्रिटीश संसदेने भारतीय परिषदेच्या सदस्यांसाठी विशेषाधिकाराचे अस्तित्व मान्य केले होते, ज्याला भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनीही दुजोरा दिला होता.[31] परंतु १८६१ च्या कायद्यातील तरतुदी पुरेशा कडक होत्या आणि कायद्याने विहित केलेल्या मर्यादित क्षेत्रापलीकडे कौन्सिलला कोणतेही कार्य करण्यास परवानगी नव्हती. शिवाय, अधिकृत सदस्य आणि नामनिर्देशित भारतीय सदस्य यांनी वास्तविकपणे उपभोगलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यातही लक्षणीय फरक होता.[32]

53. भारत सरकार अधिनियम 1909 ने भारताच्या राजकीय संस्थांच्या उत्क्रांतीत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणला. या कायद्याने अधिकाधिक भारतीयांना विधान परिषदेचा भाग बनण्याची मुभा दिली आणि त्यांची कार्ये वाढविली. सदस्यांना कार्यकारिणीला प्रश्न व पुरवणी प्रश्न विचारण्याची मुभा देण्यात आली. परिषदेवर भारतीयांची अप्रत्यक्ष निवड निश्चित करून हा कायदा निवडुन दिलेल्यांच्या आणि प्रातिनिधिक प्रशासनासाठी पुढे जाण्याचा एक मार्ग होता. मात्र, या परिषदांमध्येही काही विषयांवर चर्चा करण्यास परवानगी नव्हती. परिषदेत अशासकीय सदस्य अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क बजावत राहिले. अप्रत्यक्षपणे निवडून येऊनही,भारतातील विधिमंडळांच्या भारतीय सदस्यांनी भारतातील वसाहतवादी कारभाराचा कठोरपणा कमी केला. अधिकृत पाठिंब्याअभावी विशेषाधिकार कायद्याऐवजी परंपरा म्हणून वाढले. विधान परिषदेच्या विशेषाधिकारांचे उल्लंघन करण्याचे स्वातंत्र्य कार्यकारिणीला वाटले आणि कोणत्याही

परिस्थितीत भारतातील परिषदांना ब्रिटनच्या (यु के) हाऊस ऑफ कॉमन्ससारखा विशेषाधिकार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.[33]

54. भारत सरकार अधिनियम १९१९ ने कायदेमंडळांना कार्यकारी नियंत्रणापासून वेगळे केले. त्यामुळे विधिमंडळाला उत्तरदायी नसलेले कार्यकारी नगरसेवक आणि विधिमंडळाचा विश्वास संपादन करणारे मंत्री _असे प्रशासकांचे दोन वर्ग ठरवून, त्यात अराजकता आणली. या कायद्याने विधिमंडळांना पूर्वी जेवढे अधिकार होते, त्यापेक्षा अधिक अधिकार दिले. मात्र, सदस्यांना कोणत्या विषयांवर चर्चा करता येईल, त्यात सहभागी होता येईल आणि मतदान करता येईल, यावर निर्बंध घालण्यात आले होते. १९१९ च्या कायद्यात किंवा सभागृहाच्या कार्यपद्धतीच्या नियमांमध्ये अनेक विशेषाधिकार निर्दिष्ट करण्यात आले नव्हते. असे असले तरी, विधिमंडळाने एका अनिच्छुक कार्यकारिणीच्या समोर, विशेषाधिकार हा विधिमंडळाचा अंगभूत अधिकार असल्याचा दावा केला होता.

---

31. 9 ऑगस्ट 1861 च्या लेजिस्लेटिव्ह प्रेषण (डिस्प्याच) क्रमांक 14 परिच्छेद 23.

32. एस. के. नाग 1947 पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (1978),102-103

33. एस. के. नाग, 1947 पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (1978),139-141,158

वसाहतवादी भारत सरकारच्या संकोचाचे कारण असे होते की, परकीय सत्तेने चालवलेले सरकार भारतीय विधिमंडळाला (लोकप्रतिनिधींना) त्यांच्या सार्वभौम अधिकारांची मान्यता म्हणून संसदीय विशेषाधिकार देण्यास तयार नव्हते.[34] १९१९ च्या कायद्याने विधिमंडळाच्या सभागृहांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा

हक्काचा विशेषाधिकार दिला. 1919 च्या कायद्याच्या कलम 24 (7) मध्ये असे म्हटले आहे:

> (७) विधान परिषदेवर परिणाम करणारे नियम व स्थायी आदेश यांच्या अधीन राहून राज्यपालांच्या विधान परिषदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल. अशा कोणत्याही कौन्सिलमधील भाषण किंवा मतदानामुळे किंवा अशा कोणत्याही कौन्सिलच्या कामकाजाच्या अधिकृत अहवालात असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कारणास्तव कोणतीही व्यक्ती कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही कार्यवाहीस जबाबदार राहणार नाही."

प्रांतीय विधान परिषदांच्या संदर्भात कायद्याच्या कलम ११ (७) मध्ये तशी तरतूद करण्यात आली होती. विधान परिषदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे गव्हर्नर जनरल यांनी जारी

केलेल्या नियमांच्या अधीन होते. त्यामुळे विधान परिषदांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विस्तार करण्यात आला असला, तरी विधिमंडळाच्या नियम निर्मितीच्या अधिकारासाठी त्यांना अखेर गव्हर्नर जनरल आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांच्या मर्जीच्या अधीन करण्यात आले होते.त्यामुळे या कायद्यात भारतीय विधिमंडळांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याच्या तरतुदी करण्यात आल्या नाहीत, तर सभागृहातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने आणण्याचा हेतू होता. या निर्बंधांमुळे विधिमंडळाच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्याची आणि कायदा मांडण्याच्या क्षमतेत अडथळा निर्माण झाला. मात्र,या कायद्याने विधिमंडळाला स्वत:चे विशेषाधिकार निश्चित करण्याचा अधिकार दिला.

55. भारत सरकार कायदा १९१९ लागू झाल्यानंतर काही वर्षांतच १९२४ मध्ये एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीला १९१९ च्या कायद्यातील अडचणी किंवा त्रुटींची चौकशी करून त्या

सुरक्षित करण्यासाठी उपाय शोधण्याची जबाबदारी देण्यात आली होती. १९२४ च्या सुधारणा समितीने भारतीय कायदेमंडळांच्या विशेषाधिकारांचा उल्लेख केला आणि असे मत व्यक्त केले की:

> "... सद्यस्थितीत अशी कारवाई अकाली होईल. त्याचबरोबर विधिमंडळे आणि त्यातील सदस्यांना भारत सरकारच्या कायद्याने आवश्यक ते सर्व संरक्षण दिलेले नाही, असे आम्हाला वाटते.

---

34. एस. के. नाग, 1947 पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (1978),322

कायद्यानुसार सर्व विधिमंडळांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे आणि भाषणे किंवा मतांच्या बाबतीत

न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रातून सूट आहे. नियमांनुसार राष्ट्रपतींना सुव्यवस्था राखण्याचे बऱ्यापैकी अधिकार देण्यात आले आहेत, पण तेथेच हे प्रकरण संपते."[35]

56. विशेष म्हणजे भारतीय विधिमंडळांना काही अतिरिक्त विशेषाधिकार देण्यात यावेत, असे समितीने सुचवले. या समितीने इतर गोष्टींबरोबरच लाचखोरीच्या माध्यमातून विधिमंडळातील मतांवर प्रभाव टाकण्यासाठी, दंडात्मक तरतूद करण्याची शिफारस केली आहे. अहवालात म्हटले आहे:

"विधिमंडळातील मतांच्या भ्रष्ट प्रभावाला सामोरे जाण्यासाठी सध्या कोणतेही साधन नाही, हे आम्हाला समजले आहे. लाचखोरी, धमकावणे आणि तत्सम गोष्टींद्वारे सदस्यांच्या मतांवर प्रभाव टाकण्याविरोधात कायदा केला जावा, यावर आमचे एकमत आहे. येथे

पुन्हा आम्ही हे प्रकरण विशेषाधिकारभंग म्हणून हाताळले जावे अशी शिफारस करत नाही. हे गुन्हे सामान्य कायद्यानुसार दंडनीय करण्यात यावेत, अशी आमची मागणी आहे."

57. सरकारने विधिमंडळ भ्रष्ट व्यवहार विधेयक सादर केले ज्यात दंड देण्याची तरतूद करण्यात आली (१) विधिमंडळाच्या सदस्याला त्याच्या कार्यासंदर्भात लाच देणे,आणि (२) विधीमंडळाच्या सदस्याने त्याच्या कार्यासंदर्भात लाचेची मागणी करून ती घेणे.[36] अखेर हे विधेयक संपुष्टात आले आणि ते पुन्हा मांडले गेले नाही.

58. १९१९ च्या कायद्यातील तरतुदी,भारत सरकार अधिनियम १९३५ च्या कलम २८ (१) मध्ये बऱ्यापैकी कायम ठेवण्यात आल्या. कलम २८ (१) मध्ये असे म्हटले आहे:

"(१) या अधिनियमातील तरतुदी आणि संघीय

विधिमंडळाच्या कार्यपद्धतीचे नियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांच्या अधीन राहून, विधिमंडळात अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल आणि विधिमंडळाचा कोणताही सदस्य विधिमंडळात किंवा त्याच्या कोणत्याही समितीमध्ये सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही मताच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस उत्तरदायी राहणार नाही, आणि तसेच कोणताही अहवाल, कागदपत्रे, मते किंवा कार्यवाही विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाद्वारे किंवा अधिकाराखाली प्रकाशित करण्यासंदर्भात कोणतीही व्यक्ती जबाबदार राहणार नाही."

---

35. सुधारणा चौकशी समितीचा अहवाल (1924),75

36. एस. के. नाग, 1947 पर्यंत भारतातील संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती, स्टर्लिंग प्रकाशन, (1978),213-214

प्रांतीय विधिमंडळांच्या संदर्भात १९३५ च्या कायद्याच्या कलम ७१ (१) मध्ये त्यासारखी तरतूद करण्यात आली होती.सभागृहाला कामकाज चालविण्यासाठी नियम बनविण्याचे अधिकार देण्यात आले होते. मात्र, गव्हर्नर जनरलने सभागृहासाठी आखून दिलेल्या नियमांना ते नेहमीच मार्ग देत असत.(त्यांच्या विरुद्ध नसत). भारतात संसदीय विशेषाधिकार ,ब्रिटनच्या (यु के)हाऊस ऑफ कॉमन्समधल्या सारखेच, समानतेची मागणी करणाऱ्या आमदारांमुळे ,भारतीय गरजा भागविण्यासाठी वाजवी समायोजन करून, रुजले होते. कारण भारतातील लोकप्रतिनिधींना असे वाटत होते की,या विशेषाधिकारांअभावी आपल्या विधिमंडळाच्या कामकाजावर

विपरीत परिणाम होईल. सभागृहाचा अवमान केल्याबद्दल शिक्षेचा अधिकार, सभागृहाच्या बाबतीत सभापतींचे वर्चस्व आणि सदस्यांना कामकाजात भाग घेऊन त्यांचे कार्य पार पाडण्याची मुभा देण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि अटकेपासून मुक्तता या आमदारांच्या प्रमुख मागण्या होत्या.

59. फौजदारी कायद्यापासून सरसकट सूट म्हणून या विशेषाधिकारांची मागणी कधीच करण्यात आली नाही. वसाहतवादी अनिच्छेसमोरही भारतातील संसदीय विशेषाधिकारांची मागणी नेहमीच भारतीय लोकप्रतिनिधींनी पार पाडण्याचा प्रयत्न केलेल्या कार्याशी निगडित होती.

60. ही पार्श्वभूमी चालू राहिली, जेव्हा संविधान सभा मसुद्याच्या कलम ८५ आणि १६९ चे भवितव्य ठरवत होती , जे नंतर राज्यघटनेचे कलम १०५ आणि १९४ बनले आहेत. संविधान ही 'आधुनिकीकरण' करणारी शक्ती असावी, अशी आमच्या

संस्थापक पालकांची (निर्मात्यांची)इच्छा होती. संसदीय लोकशाही हा राज्यघटनेच्या निर्मात्यांनी कल्पिलेल्या या आधुनिकीकरणाच्या प्रभावाचा पहिला टप्पा होता.[37] म्हणूनच स्वातंत्र्यलढ्यातून जन्माला आलेल्या आदर्शवादाच्या वातावरणात आणि ध्येयशक्तीच्या वातावरणात राज्यघटनेचा जन्म झाला . आधुनिक भारताचा मार्ग प्रशस्त करणारी राज्यघटना असावी , अशी निर्मात्यांची इच्छा होती.[38]

61. राज्यघटनेच्या मसुद्याच्या कलम ८५ वर चर्चा करण्यासाठी जेव्हा संविधान सभेची बैठक झाली, तेव्हा श्री एच. व्ही. कामत यांनी ब्रिटनमधील (यु के)हाऊस ऑफ कॉमन्सचा संदर्भ काढून त्या जागी भारतातील डोमिनियन (साम्राज्यातील) विधीमंडळ अशी, राज्यघटनेच्या सुरुवात होण्याच्या ताबडतोब आधी, एक दुरुस्ती मांडली. या दुरुस्तीला विरोध करताना श्री शिब्बनलाल सक्सेना म्हणाले की, "माझ्या माहितीप्रमाणे आम्हाला कोणतेही विशेषाधिकार नाहीत आणि जर त्यांना आमचे सर्व विशेषाधिकार

पूर्णपणे रद्द करायचे असतील तर त्यांची दुरुस्ती मंजूर करून घेण्याचे स्वागत आहे."[39]

---

37. ग्रॅनव्हील ऑस्टीन, द इंडियन कॉन्स्टिट्यूशन : कॉर्नर स्टोन ऑफ अ नेशन, ओयुपी (1972),ix

38. ग्रॅनव्हील ऑस्टिन, द इंडियन कॉन्स्टिट्यूशन : कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन, ओयूपी (1972), xiii

39.सीएडी खंड viii 19 मे, 1949 मसुदा अनुच्छेद 85

त्यामुळे वसाहतवादी राजवटीतील आपले विशेषाधिकार हे ब्रिटनमधील (यु के) हाऊस ऑफ कॉमन्सप्रमाणे 'प्राचीन आणि निःसंशय' नसून विधिमंडळांनी सातत्याने कायदे आणि प्रतिपादन करून दिलेले वैधानिक अनुदान आहे, याची जाणीव संविधान सभेच्या सदस्यांना होती.

F. भारतातील संसदीय विशेषाधिकाराचा अर्थ

I <u>कार्यात्मक विश्लेषण</u>

62. राज्यघटनेच्या भाग ५ अध्याय २ मध्ये असलेल्या कलम १०५ मध्ये संसद, त्याचे सदस्य आणि समित्यांचे अधिकार , विशेषाधिकार आणि सवलती नमूद केल्या आहेत. अशीच तरतूद राज्य विधिमंडळाशी संबंधित,राज्यघटनेच्या अनुच्छेद १९४ मध्ये आहे. अनुच्छेद १०५ खालीलप्रमाणे आहे:

> "**105.** संसदेच्या सभागृहांचे आणि त्यातील सदस्य व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार इ.
>
> (1) या घटनेतील तरतुदींच्या अधीन राहून आणि संसदेच्या कार्यपद्धतीचे नियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांच्या अधीन राहून,संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल.
>
> (2) संसदेचा कोणताही सदस्य संसदेत किंवा त्याच्या

डिजिटल सुप्रीम कोर्टाचा अहवाल

कोणत्याही समितीमध्ये सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही मताच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस उत्तरदायी राहणार नाही आणि तसेच संसदेच्या कोणत्याही सभागृहाने किंवा त्याच्या अधिकाराखाली कोणताही अहवाल, पेपर किंवा मतदान किंवा कार्यवाही प्रकाशित करण्यासंदर्भात कोणतीही व्यक्ती जबाबदार राहणार नाही.

(3) इतर बाबतीत, संसदेच्या प्रत्येक सभागृहाचे आणि प्रत्येक सभागृहाच्या सदस्यांचे आणि समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण संसदेने वेळोवेळी कायद्याने परिभाषित केल्याप्रमाणे असतील आणि तसे परिभाषित होईपर्यंत , संविधान (चौरेचाळीस वी दुरुस्ती) कायदा, 1978

चे कलम 15 लागू होण्यापूर्वी लगेचच त्या सभागृहाचे आणि त्याच्या सदस्यांचे आणि समित्यांचे होते त्याप्रमाणे असतील.

(4) कलम (१), (२) आणि (३) मधील तरतुदी अशा व्यक्तींच्या,ज्यांना या घटनेनुसार संसदेच्या सभागृहाच्या किंवा त्यातील कोणत्याही समितीच्या कामकाजात बोलण्याचा आणि अन्यथा भाग घेण्याचा अधिकार आहे, त्यांच्या संदर्भात लागू होतील, ज्याप्रमाणे संसदेच्या सदस्यांना या संबंधात लागू होतात."

63. राज्यघटनेच्या कलम १०५ मध्ये चार कलमे आहेत. कलम (१) मध्ये संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल, असे नमूद करण्यात आले आहे. हे स्वातंत्र्य राज्यघटनेच्या आणि संसदेतील प्रक्रियेचे नियमन करणारे नियम आणि स्थायी आदेशांच्या अधीन आहे.

त्यामुळे संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य कलम ११८ अन्वये तयार करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे नियमन करणाऱ्या तरतुदींच्या अधीन असेल. हे कलम 121 च्या सुद्धा अधीन आहे जे संसदेला सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाच्या कर्तव्यबजावणीदरम्यानच्या त्यांच्या वर्तनावर चर्चा करण्यास प्रतिबंधित करते , फक्त न्यायाधीशांना हटविण्याची विनंती करणारी राष्ट्रपतींकडे अभिभाषण सादर करण्याचा प्रस्ताव वगळता. कलम १०५ (१) अन्वये संसदेत दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कलम १९ (१) (अ) अन्वये देण्यात आलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यापेक्षा वेगळे आहे. अलगापुरम आर मोहनराज विरुद्ध तमिळनाडू विधानसभा[४०] या खटल्यात या न्यायालयाने या स्वातंत्र्यांमधील फरक खालीलप्रमाणे स्पष्ट केलेत :

ए.) कलम १९ (१) (अ) अन्वये दिलेला अभिव्यक्तीचा मूलभूत अधिकार प्रत्येक नागरिकाला असला तरी कलम

१०५ व १९४ अन्वये दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला नसून केवळ विधिमंडळाच्या सदस्याला च आहे;

बी.) कलम १०५ हे केवळ त्या संस्थांच्या सदस्यत्वाच्या कालावधीतच उपलब्ध आहे. दुसरीकडे, कलम 19(1)(अ)खालील मूलभूत अधिकार अहस्तांतरणीय आहे;

सी.) कलम १०५ हे विधिमंडळाच्या आवारापुरतेच मर्यादित आहे. कलम १९ (१) (अ) ला अशी कोणतीही भौगोलिक मर्यादा नाही; आणि

डी.) कलम १९ (१) (अ) हे कलम १९ (२) च्या अनुषंगाने वाजवी निर्बंधांच्या अधीन आहे. मात्र, कलम १०५ किंवा १९४ अन्वये आमदाराला मिळणारा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार अशा मर्यादांच्या अधीन नाही. कलम १०५ च्या खंड (१) मध्ये संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे, यावरून हे स्वातंत्र्य, अनुच्छेद 19 द्वारे प्रदान केलेल्या,अभिव्यक्ती स्वातंत्र्यापासून स्वतंत्र

डिजिटल सुप्रीम कोर्टाचा अहवाल

असल्याचे सूचित होते

---

40 [2016] 6 एससीआर 611 : (२०१६) ६ एससीसी ८२

आणि हे त्यात असलेल्या अपवादांद्वारे प्रतिबंधित नाही.

64. कलम १०५ च्या खंड (२) मध्ये दोन शाखा (भाग)आहेत. पहिल्या तरतुदीनुसार संसद सदस्याने संसदेत किंवा त्यासंबंधी च्या कोणत्याही समितीमध्ये "सांगितलेल्या(बोललेल्या)किंवा दिलेल्या कोणत्याही मताच्या" संदर्भात कोणत्याही न्यायालयासमोर उत्तरदायी राहणार नाही. दुसऱ्या शाखेत असे नमूद केले आहे की संसदेच्या कोणत्याही सभागृहाद्वारे किंवा त्यांच्या अधिकाराखाली कोणताही अहवाल, कागद, मतदान किंवा कार्यवाही प्रकाशित करण्यासंदर्भात कोणतीही व्यक्ती कोणत्याही न्यायालयासमोर उत्तरदायी राहणार नाही. संसद

सदस्याने दिलेले मत हा भाषणाचा विस्तार असतो. त्यामुळे संसदेच्या सदस्याच्या मतदानाच्या स्वातंत्र्यालाही संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याने संरक्षण दिले आहे. तेज किरण जैन विरुद्ध एन. संजीव रेड्डी [41] या खटल्यात या न्यायालयाच्या सहा न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, कलम १०५ (२) जोपर्यंत "संसदेत" आहे तोपर्यंत "कोणत्याही बोलण्याबद्दल" सूट देते. त्यामुळे हे संरक्षण किंवा सूट मिळण्याकरिता संसदेतील कामकाजा दरम्यानचे भाषण किंवा वक्तव्य असणे आवश्यक ठरते.या वरून ही प्रतिकारशक्ती पात्र ठरते. या न्यायालयाने असे म्हटले आहे की "काहीही" हा शब्द सर्वात व्यापक अर्थाचा आहे आणि "सर्वकाही" समतुल्य आहे. ते केवळ "संसदेत" या शब्दांनी मर्यादित आहे.

65. कलम (१) आणि (२) संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याची स्पष्ट हमी देतात. कलम (१) हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देणारा सकारात्मक सिद्धांत आहे, तर कलम (२) हा त्याच स्वातंत्र्याचा

नकारात्मक विस्तार आहे. न्यायालयासमोरील कार्यवाहीपासून ते भाषणाचे आणि विस्ताराने मतदानाचे रक्षण करतात. संसदेच्या सभागृहात आणि त्यांच्या समित्यांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा सभागृहाच्या कामकाजासाठी एक आवश्यक विशेषाधिकार आहे. आपण वर नमूद केल्याप्रमाणे, संसदेच्या सभागृहात किंवा विधिमंडळात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विशेषाधिकार भारतीय लोकप्रतिनिधींच्या संघर्षातून शोधला जाऊ शकतो आणि वसाहतवादी सरकारच्या प्रागतिकीकरणाने दिला होता. हा विशेषाधिकार केवळ संसदेच्या आणि त्याच्या सदस्यांच्या कर्तव्ये पार पाडण्याच्या क्षमतेसाठी आवश्यक नाही , तर तो लोकशाही कायदेविषयक संस्थेच्या कार्याचा गाभा (आत्मा)आहे.संसद आणि विधिमंडळ सदस्य हे लोकांच्या इच्छेचे आणि त्यांच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करतात. आधुनिकीकरणाचा प्रभाव पाडण्यासाठी राज्यघटनेचा स्वीकार करण्यात आला. लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणे, सामाजिक वर्गवारी आणि भेदभावावर

आधारित अन्यायकारक समाजाचा त्याग करणे आणि समतामूलक समाजाच्या दिशेने वाटचाल सुकर करणे हा राज्यघटनेचा हेतू आहे.

(1971)1 एस सी आर 612:(1970)2 एस सी सी 272

संसदेतील आणि विधिमंडळातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा त्याच आकांक्षेचा एक भाग आहे,जेणेकरून सदस्य आपल्या मतदारांच्या तक्रारी व्यक्त करू शकतील, विविध दृष्टीकोन व्यक्त करू शकतील आणि त्यांच्या मतदारांचे दृष्टीकोन मांडू शकतील. संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य,सरकारला सभागृहाने जबाबदार धरले आहे, याची हमी देते. कल्पना मेहता (सुप्रा) मध्ये आमच्यापैकी एकाला (न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड,) या विशेषाधिकाराचे महत्त्व स्पष्ट करण्याची संधी मिळाली:

"**181.** [...] संसद आपल्या सदस्यांच्या प्रातिनिधिक स्वरूपामुळे, लोकांच्या आवाजाचे आणि आकांक्षांचे सामूहिक प्रतिनिधित्व करते. लोकशाही प्रशासनासाठी संसदेतील मुक्त अभिव्यक्ती महत्वाची आहे. आपल्या विचारांच्या निर्भीड अभिव्यक्तीतूनच खासदार त्यांना निवडून देणाऱ्यांप्रती आपली बांधिलकी जोपासतात. अभिव्यक्तीची शक्ती निवडून आलेल्या सरकारांकडून लोकशाही उत्तरदायित्व निश्चित करते. संवादाचा मुक्त प्रवाह हे सुनिश्चित करतो की कायदे तयार करताना आणि सरकारी धोरणांवर देखरेख ठेवताना, संसद मतदारांचे वैविध्यपूर्ण विचार प्रतिबिंबित करते ,जे प्रतिनिधित्व एक निवडून आलेली संस्था करते.

182. राज्यघटनेने कलम 19 (1) (अ) मध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता दिली आहे. अनुच्छेद १०५ (१) मधील त्या

अधिकाराचा स्वतंत्र उल्लेख हे दर्शवितो की संसदेतील वादविवाद आणि विचारांची अभिव्यक्ती याकडे मसुदाकारांनी किती महत्त्वपूर्ण रीतीने पाहिले आहे हे दिसून येते.कलम १०५ (१) ही साधी पुनरावृत्ती किंवा त्याकरिता गरजेपेक्षा जास्त दिलेला अधिकार नाही. संसदेतील समीक्षेचे मुक्त आणि निर्भीड विवेचन हेच लोकशाहीचे सार आहे, या मूलभूत मूल्याचे ते प्रतीक आहे. निवडून आलेले खासदार नागरिकांच्या आवाजाचे (म्हणण्याचे)प्रतिनिधित्व करतात . नागरिकांच्या प्रश्नांना अभिव्यक्ती देताना संसदीय भाषणामुळे लोकशाही वाढते. [...]"

(जोर दिला आहे)

66. विशेष म्हणजे ब्रिटनच्या (यु के)हाऊस ऑफ कॉमन्सप्रमाणे भारताला संसद आणि राजा यांच्यातील संघर्षानंतर मिळालेले

'प्राचीन आणि निःसंशय' अधिकार नाहीत. याउलट भारतात विशेषाधिकार नेहमीच कायद्याने चालत असत. राज्यघटनेच्या प्रारंभानंतर या वैधानिक विशेषाधिकाराचे घटनात्मक विशेषाधिकारात रूपांतर झाले. मात्र, राज्यघटनेच्या मसुद्यात संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याची स्पष्ट कल्पना असली, तरी कायद्याने ठरवायचे इतर विशेषाधिकार संसदेने ठरविण्यासाठी त्यांनी सोडले. अनुच्छेद १०५ च्या कलम (३) मध्ये असे म्हटले आहे की, कलम १०५ च्या उपकलम (१) आणि (२) अंतर्गत न येणाऱ्या,विशेषाधिकारांच्या संदर्भात, संसदेच्या प्रत्येक सभागृहाचे आणि प्रत्येक सभागृहाचे सदस्य आणि समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि सवलती संसदेने वेळोवेळी कायद्याने परिभाषित केल्या प्रमाणे असतील. जोपर्यंत संसद या विशेषाधिकारांची व्याख्या करत नाही, तोपर्यंत ते संविधान (४४ वी दुरुस्ती) अधिनियम, १९७८ चे कलम १५ लागू होण्यापूर्वी,सभागृह आणि त्यातील सदस्य आणि समित्यांना

मिळालेले विशेषाधिकार असतील. कलम 15 खालीलप्रमाणे आहे:

> **"15.** कलम १०५ मध्ये सुधारणा.- घटनेच्या कलम १०५ मध्ये, उपकलम (३) मध्ये, " या घटनेच्या प्रारंभी,युनायटेड किंग्डमच्या संसदेच्या हाऊस ऑफ कॉमन्सचे आणि त्याचे सदस्य आणि समित्यांचे असतील" या शब्दांसाठी, शब्द, आकडे आणि कोष्टके(कंस)"संविधान (४४ वी दुरुस्ती) अधिनियम 1978, कायद्याच्या कलम १५ लागू होण्यापूर्वी लगेचचे,त्या सभागृहाचे आणि त्याच्या सदस्यांचे आणि समित्यांचे असतील," हे शब्द बदलल्या जातील "

67. राज्यघटनेतील चौदाव्या घटना दुरुस्तीचे कलम १५ लागू होण्यापूर्वी,सभागृह आणि त्यातील सदस्य व समित्यांना जे विशेषाधिकार प्राप्त होते, ते भारतीय राज्यघटनेच्या प्रारंभी,

ब्रिटनमधील (यु के)हाऊस ऑफ कॉमन्सला लाभले तेच होते. घटनेच्या ४४ व्या दुरुस्तीच्या कलम २६ द्वारे सुधारित करण्यात आलेल्या कलम १९४ च्या उपकलम (३) च्या बाबतीतही हीच स्थिती होती. हाऊस ऑफ कॉमन्सचा संदर्भ संविधान सभेने दोन कारणांसाठी स्वीकारला होता. पहिली गोष्ट म्हणजे, भारतीय लोकप्रतिनिधींना राज्यघटना सुरू होण्यापूर्वी कोणतेही विशेषाधिकार नव्हते आणि म्हणूनच डोमिनियन पार्लमेंटचा संदर्भ घेतल्यास सभागृहाला अक्षरशः कोणतेही विशेषाधिकार मिळणार नव्हते.दुसरं म्हणजे त्यावेळी विशेषाधिकारांची संपूर्ण यादी बनवणं शक्य नव्हतं तसेच एवढी लांबलचक यादी राज्यघटनेच्या अनुसूचीत समाविष्ट करणेही श्रेयस्कर नव्हतं.[42]

68) कलम (३) संसदेला वेळोवेळी आपल्या विशेषाधिकारांबाबत कायदा करण्याची मुभा देते. येथे हे लक्षात

घेतले पाहिजे की ब्रिटनचे (यु के)हाऊस ऑफ कॉमन्स

सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर आणि डॉक्टर बी आर आंबेडकर यांनी संविधान सभेला दिलेले उत्तर,सीएडी खंड VIII वा 19 मे 1949 मसुदा कलम 85 आणि खंड क्षि 16 ऑक्टोबर 1949 मसुदा कलम 85 पहा.

नवीन विशेषाधिकार निर्माण करत नाही.[43] त्यांचे विशेषाधिकार ते आहेत जे सभागृहाने आचरणात आणले आहेत आणि जे प्राचीन आणि निर्विवाद झाले आहेत.

69. तसेच ब्रिटनमधील (युके)हाऊस ऑफ कॉमन्सप्रमाणे भारतातील संसद स्वत: रचीत अधिकारांचा दावा करू शकत नाही. भारतातील विशेषाधिकारांची व्याप्ती ही राज्यघटनेच्या

चौकटीत असणे आवश्यक आहे. या योजनेत, संसदेच्या सभागृहाने किंवा विधिमंडळाने दावा केलेला विशेषाधिकार प्रत्यक्षात अस्तित्वात आहे की नाही आणि त्यांचा योग्य वापर केला गेला आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयांना आहे. विशेषाधिकारांबाबत कायदा नसल्यामुळे संसद किंवा विधिमंडळ केवळ अशा विशेषाधिकाराचा दावा करू शकते जे संविधान सुरू होताना हाऊस ऑफ कॉमन्सकडे होते आणि सभागृह स्वत:च्या विशेषाधिकाराचा निर्णय घेणारे एकमेव न्यायाधीश नाही, असे मागील अनेक ठाम निर्णयांमध्ये या न्यायालयाने म्हटले आहे.

70. जेव्हा संसद किंवा विधिमंडळे विशेषाधिकारांबाबत कायदा करतात, तेव्हा असा कायदा घटनेच्या भाग (3) च्या तपासणीच्या अधीन असेल. राज्यघटनेचा भाग तिसरा आणि कलम १०५ (३) यांच्यातील परस्परसंबंध एमएसएम शर्मा विरुद्ध श्रीकृष्ण सिन्हा {44}या खटल्याच्या या न्यायालयाच्या निर्णयात

उद्धवला,जिथे घटनापीठाने सरन्यायाधीश एस. आर. दास, यांच्यामार्फत बोलताना असे म्हटले की कलम १०५ च्या उपकलम (३) अंतर्गत संसदेच्या सभागृहाचे विशेषाधिकार तेच असतील जे संविधानाच्या प्रारंभी ब्रिटनमधील(युके)हाऊस ऑफ कॉमन्सचे आहेत आणि जे,राज्यघटनेच्या कलम १९ (१) (अ) अन्वये नागरिकांना निश्चित देण्यात आले आहेत त्या मूलभूत अधिकारांपेक्षा प्रबळ असतील.. तथापि, जर संसदेला आपल्या विशेषाधिकाराची संहिता करणारा कायदा करायचा असेल तर ते घटनेच्या अनुच्छेद १३ नुसार नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणू शकत नाही. न्यायमूर्ती के. सुब्बा राव, (तेव्हाचे विद्वान सरन्यायाधीश म्हणून) यांनी बहुमताशी असहमती दर्शविली आणि असे म्हटले की संसद किंवा कायदेमंडळे आपापल्या विशेषाधिकारांना संहिताबद्ध करणारा कायदा तयार करेपर्यंत,ब्रिटनमधील(युके)हाऊसऑफ कॉमन्सकडे असलेल्या विशेषाधिकारांची आयात(महत्व) ही केवळ एक तात्पुरती तरतूद

आहे. त्यामुळे न्यायमूर्ती सुब्बा राव यांनी आपल्या असहमतीत म्हटले आहे की, ज्या नागरिकांनी तत्त्वतः आपले हक्क कायम ठेवले आहेत आणि त्यातील काही भाग विधिमंडळाला दिला आहे, त्यांच्या मूलभूत अधिकारांवर विधिमंडळ दबाव आणू शकत नाही.

---

43. 1704 मध्ये असे ठरले होते की संसदेच्या कोणत्याही सभागृहाला कोणत्याही मताने किंवा घोषणेद्वारे संसदेच्या ज्ञात कायदे आणि चालीरीतींद्वारे आवश्यक नसलेले नवीन विशेषाधिकार निर्माण करण्याचा अधिकार नसेल. त्यामुळे हाऊस ऑफ कॉमन्सच्या ' प्राचीन आणि नि :संशय' विशेषाधिकारांचा दावा करणारी हाऊस ऑफ कॉमन्सच्या

सभापतींनी मुकुटाला (राजाला) दिलेली प्रतीकात्मक याचिका बदलली जाणार नाही.

44. (1959) सप्लीमेंट 1 एस सी आर 806 : ए आय आर 1959 सुप्रीम कोर्ट 395

---

71. १९६४ च्या विशेष रेफरन्स क्रमांक १ मध्ये [45] या न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने,राष्ट्रपतींच्या रेफरन्सवर(निर्णयाकरिता पाठविणे) राज्य विधिमंडळाच्या विशेषाधिकारांवर मत व्यक्त केले. उत्तर प्रदेश विधानसभेच्या अध्यक्षांनी उच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांना अटक करून हजर करण्याचे आदेश दिल्यानंतर हा रेफरन्स करण्यात आला होता. विधानसभेच्या एका सदस्याची बदनामी करणारे पत्रक प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीला ताकीद देण्याच्या शिक्षेच्या ठरावात या दोन्ही न्यायमूर्तींनी हस्तक्षेप केला होता. राज्यघटनेच्या कलम 19 (1) (अ) पेक्षा कलम 105 (3) आणि कलम 194 (3) प्रबळ असेल, या एमएसएम शर्मा (सुप्रा)यांच्या निर्णयाशी सरन्यायाधीश गजेंद्रगडकर यांनी, बहुमताचे मत

नोंदविताना,असहमती दर्शविली नाही.मात्र, कलम १०५ (३) आणि १९४ (३) आणि कलम 21 यामध्ये जर वाद झाला तर, या दोन कलमांऐवजी कलम २१ प्रबळ राहील , असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. संसद किंवा विधिमंडळ हे आपल्या विशेषाधिकारांचे एकमेव न्यायाधीश नाहीत आणि विधिमंडळाने दावा केलेला विशिष्ट विशेषाधिकार प्रत्यक्षात अस्तित्वात आहे की नाही याची चौकशी करण्याचा अधिकार न्यायालयांना कॉमन्सच्या विशेषाधिकारांचा सल्ला घेऊन ठरविण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. विशेषाधिकारनिश्चिती आणि ते राज्यघटनेच्या निकषांशी सुसंगत आहेत का, हा एक प्रश्न आहे, ज्याचे उत्तर न्यायालयाने दिले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे. या न्यायालयाने असे मत व्यक्त केले की:

> "**37.** सभागृहाच्या वतीने आमच्यासमोर हजर राहिल्यामुळे, सभागृहाने कलम १९४ (३) चा अर्थ लावण्याचे अधिकार न्यायालयाला दिले आहेत, जे

त्यांच्यावर बंधनकारक असतील,असे समजू नये, असे श्री सीरवई यांनी उपस्थित केलेल्या प्राथमिक युक्तिवादातुन नंतरचा प्रश्न आमच्यासमोर उभा राहतो. आम्ही आधीच सूचित केल्याप्रमाणे, विशेषाधिकारांच्या बाबतीत सभागृह हे सर्व टप्प्यांवर एकमेव आणि अनन्य न्यायाधीश आहे, अशी त्यांची भूमिका आहे. [...]

...

42. कलम 194 (3) मधील अंतर्गत गोष्टी शेवटी विधिमंडळांनी नव्हे तर न्यायालयांनी ठरवला पाहिजे, या निष्कर्षापर्यंत पोहोचताना, घटनेनुसार विधिमंडळांना सोपविण्यात आलेल्या कार्याच्या भव्यतेकडे आणि वैभवाकडे आमचे दुर्लक्ष झालेले नाही. थोडक्यात सांगायचे झाले तर, आज आपल्या

देशातील सर्व विधायी (कायदे करणारी) सभागृहे आपल्या देशासमोर राज्यघटनेने मांडलेल्या कल्याणकारी राज्याच्या आदर्शाच्या पाठपुराव्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत

---

45. (1965)1 एस सी आर 413 :1964 एस सी सी ऑनलाइन सुप्रीम कोर्ट 21

आणि साहजिकच आज इतिहास घडविण्यात विधिमंडळ सभागृहांना उच्च स्थान प्राप्त झाले आहे. [...]

(जोर दिला आहे)

72. १९६४ च्या विशेष रेफरन्स क्रमांक १ (सुप्रा) मधील मताला, कर्नाटक राज्य विरुद्ध भारत सरकार **{46}** या खटल्यातील या न्यायालयाच्या आणखी एका सात

न्यायाधीशांच्या खंडपीठाने दुजोरा दिला आहे आणि असे म्हटले की जेव्हा जेव्हा असा प्रश्न निर्माण होतो की सभागृहाला त्याच्या विशेषाधिकाराखालील प्रकरणावर अधिकार आहे की नाही, तेव्हा अशा दाव्याचा निर्णय केवळ न्यायालयांकडे असतो.1964 च्या विशेष रेफरन्स क्रमांक 1 (सुप्रा) आणि कर्नाटक राज्य (सुप्रा) चा आधार घेत राजा राम पाल (सुप्रा) या केस मध्ये या न्यायालयाच्या घटनापीठाने असे म्हटले आहे की, सभागृहाने (किंवा विस्ताराने सदस्यानेही) अधिकाराने बजावलेला विशेषाधिकार खरोखरच राज्यघटनेनुसार प्राप्त होतो की नाही हे तपासण्याचा अधिकार आणि अधिकारक्षेत्र न्यायालयाला आहे. तसेच अमरिंदर सिंग (सुप्रा)या प्रकरणात या न्यायालयाच्या घटनापीठाने म्हटले आहे की, सभागृहाने वापरलेल्या विशेषाधिकाराची छाननी करण्याचा अधिकार न्यायालयांना आहे.[47] नागरिकांचे मूलभूत हक्क आणि संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सभागृहांचे विशेषाधिकार यांच्यातील

परस्परसंबंध एन रवी विरुद्ध अध्यक्ष, विधानसभा चेन्नई.[48] या केस मध्ये या न्यायालयाच्या घटनापिठासमोर प्रलंबित आहे.

73. अनुच्छेद १०५ च्या कलम (४) मध्ये वरील कलमांमधील स्वातंत्र्य अशा सर्व व्यक्तींना देण्यात आले आहे ज्यांना घटनेनुसार संसदेत बोलण्याचा अधिकार आहे. अनुच्छेद १०५ आणि १९४ मधील चार कलमे एक संमिश्र संपूर्ण तयार करतात जी एकमेकांना रंग देतात (सहाय्यक आहेत)आणि एकत्रितपणे संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सभागृहांचे आणि जशी केस असेल त्याप्रमाणे,सदस्य आणि समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण यांचा कोश तयार करतात.

74. संसदीय विशेषाधिकारांचा, विशेषत: भारतीय विधिमंडळातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मार्ग आम्ही शोधला आहे. विधिमंडळाची अत्यावश्यक कामे पार पाडण्याकरिता त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण व्हावे व त्याला मान्यता

मिळावी,हा आमदारांचा कालातीत आग्रह राहिला आहे.जरी आपल्या राज्यघटनेच्या निर्मात्यांनी संसदेत आणि विधिमंडळात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची स्पष्ट हमी दिली असली, तरी इतर विशेषाधिकार त्यांनी असंहिताबद्ध ठेवले आहेत.

_____{

46. (1978)2 एस सी आर 1:(1977)4 एस सी सी 608, परिच्छेद 63

47. (2010)6 एस सी सी 113 परिच्छेद 54

48. डब्ल्यू पी (क्रिमिनल) क्रमांक 206_210/2003 इ.

_____

75. या न्यायालयाने एका सुसंगत अशा पूर्वीच्या बांधील निर्णयात असे म्हटले आहे की - प्रथम, संसद किंवा राज्य विधिमंडळ, त्यांनी कोणते विशेषाधिकार वापरावे हे ठरविणारे एकमेव न्यायाधीश नाही. आणि दुसरे म्हणजे, संसद किंवा विधिमंडळ केवळ सभागृहाच्या

कामकाजासाठी आवश्यक आणि गरजेचे असलेल्या विशेषाधिकारांचा दावा करू शकतात . यापैकी आपण पहिल्या शाखेचा वर सांगितल्याप्रमाणे शोध घेतला आहे. आता आपण संसदेचे सभागृह, त्याचे सदस्य आणि समित्या यांच्या विशेषाधिकारांचे अस्तित्व, व्याप्ती आणि वापर याविषयीच्या न्यायशास्त्राचे विश्लेषण करू.

II. सभागृहाचा सामूहिक अधिकार म्हणून संसदीय विशेषाधिकार

76. एर्स्किन मे यांच्या मते, संसदीय विशेषाधिकार म्हणजे "संसदेच्या उच्च न्यायालयाचा" घटक भाग म्हणून प्रत्येक सभागृहाने एकत्रित रित्या आणि प्रत्येक सभागृहाच्या सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरलेल्या काही अधिकारांची बेरीज आहे, ज्याशिवाय ते त्यांचे कार्य पार पाडू शकत नाहीत आणि जे इतर संस्था किंवा व्यक्तींकडे असलेल्या अधिकारांपेक्षा जास्त आहेत.[49] 'संसदेचे उच्च न्यायालय' हा शब्द त्या काळातील आहे

जेव्हा कायदा करण्याचे आणि न्याय देण्याचे सर्व अधिकार राजाकडे होते आणि त्यांनी ते अशा संस्थेकडे हस्तांतरित केले जे संसदेच्या उच्च न्यायालयात बसलेला राजा म्हणून विधिमंडळाचे कार्य पार पाडतील. त्या अर्थाने , भारताच्या संदर्भात हा शब्द निरर्थक आहे,जिथे राज्यघटना सर्वोच्च आहे आणि संसदेचे त्याच्या कार्यक्षेत्रावरील अधिकार संविधानातुन आले आहेत आणि त्यात परिभाषित केले आहेत. तथापि, ही व्याख्या संसदीय विशेषाधिकारांचा अर्थ आणि व्याप्ती समजून घेण्यासाठी एक अधिकृत मार्गदर्शक प्रदान करते. ही व्याख्या स्पष्टपणे विशेषाधिकारांची दोन घटकांमध्ये विभागणी करते. पहिला म्हणजे संसदेच्या सभागृहाने वापरलेल्या अधिकारांची बेरीज आणि दुसरे म्हणजे सभागृहाच्या सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरलेले अधिकार. स्वत:च्या कार्यपद्धतीचे नियमन करण्याचा अधिकार, सभागृहाचा अवमान केल्याबद्दल शिक्षा करण्याचा किंवा सभागृहाच्या उर्वरित अधिवेशनासाठी सदस्याची

हकालपट्टी करण्याचा अधिकार,यासारखे अधिकार आणि सवलती,सभागृहाला त्याच्या योग्य कामकाजासाठी, सदस्यांच्या संरक्षणासाठी आणि स्वतःचे अधिकार आणि प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी,सामूहिक संस्था म्हणून असलेल्या विशेषाधिकारांच्या पहिल्या घटकाशी संबंधित आहेत. सभागृहातील सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरलेल्या अधिकारांचा दुसरा घटक म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि अटकेपासून मुक्तता यांचा समावेश आहे.

---

49. एर्स्किन मे यांचा संसदेचा कायदा, विशेषाधिकार कार्यवाही आणि वापर यावरील प्रबंध, लेक्सिसनेक्सीस, 25 वी आवृत्ती (2019)239.

---

77. सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरलेला विशेषाधिकार त्याच्या

गरजेनुसार आवश्यक आहे, म्हणजे विशेषाधिकार असा असावा की "ज्याशिवाय ते आपली कार्ये पार पाडू शकणार नाहीत." या निर्णयाच्या दरम्यान आपण नंतर हा भाग स्पष्ट करू. सभागृहाच्या सदस्यांना वैयक्तिकरित्या मिळणारे हे विशेषाधिकार सभागृहाचे सामूहिक कार्य प्रभावीपणे पार पाडण्याची खात्री आणि सुविधा देण्याचे साधन आहेत.[50] म्हणूनच हे लक्षात घेतले पाहिजे की सभागृहातील सदस्यांना मिळणारे विशेषाधिकार इतर संस्था किंवा व्यक्तींकडे असलेल्या विशेषाधिकारांपेक्षा जास्त असले तरी ते अनिर्बंध किंवा बिनाअटीचे नसतात. वैयक्तिक सदस्याचा विशेषाधिकार केवळ सभागृहाचे कामकाज चालविण्यास मदत करण्याएवढाच असतो आणि ज्याशिवाय सभागृह आपले कार्य एकत्रितपणे पार पाडू शकणार नाही.

78. सुभाष सी कश्यप यांनी संसदीय विशेषाधिकार जे भारतीय संदर्भात समजू शकतील असे स्पष्ट केले आहेत.[51] संसदीय कार्यपद्धतीवरील त्यांच्या पुस्तकात लेखकाने पुढीलप्रमाणे मत मांडले आहे.

"[...] संसदीय भाषेत विशेषाधिकार या शब्दाचा अर्थ संसदेच्या प्रत्येक सभागृहाला आणि त्याच्या समित्यांना एकत्रितपणे आणि प्रत्येक सभागृहाच्या सदस्यांना वैयक्तिकरित्या मिळणारे काही अधिकार आणि सवलती असा आहे ज्याशिवाय ते आपली कार्ये कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे पार पाडू शकत नाहीत. संसदीय विशेषाधिकाराचा उद्देश संसद संस्था आणि त्याच्या सदस्यांचे स्वातंत्र्य, अधिकार आणि प्रतिष्ठेचे रक्षण करणे हा आहे. त्यांना कोणतीही परवानगी न घेता किंवा अडथळा न येता आपले कार्य पार पाडता यावे यासाठी राज्यघटनेने त्यांना मान्यता दिली आहे. संसदीय विशेषाधिकार सदस्यांना समाजाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांपासून सूट देत नाहीत जे इतर नागरिकांना लागू होतात. संसदेच्या हितासाठी चांगली आणि पुरेशी कारणे असल्याशिवाय संसदेचे

विशेषाधिकार देशाच्या कायद्यांच्या लागु होण्याच्या बाबतीत संसद सदस्याला, सामान्य नागरिकापेक्षा वेगळ्या पातळीवर स्थान देत नाहीत. संसद सदस्यांसह सर्व नागरिकांना कायद्यासमोर समान वागणूक मिळायला हवी, हे मूलभूत तत्त्व आहे.

50.एर्स्कीन मे यांचा संसदेचा कायदा, विशेषाधिकार, कार्यवाही आणि वापर , यावरील प्रबंध, लेक्सिसनेक्सीस, 25 वी आवृत्ती (2019)239.

51. सुभाष सी कश्यप,संसदीय प्रक्रिया- कायदा, विशेषाधिकार, व्यवहार आणि जुने बांधील असणारे निर्णय, तिसरी आवृत्ती, युनिव्हर्सल लॉ पब्लिशिंग कंपनी, 502.

सदस्यांना हे विशेषाधिकार तेव्हाच मिळतात जेव्हा ते संसद सदस्य म्हणून त्यांच्या काम करत असतील आणि संसदीय कर्तव्ये पार पाडत असतील.

(जोर दिला आहे)

79. सभागृहातील सदस्यांना वैयक्तिकरित्या मिळणारे विशेषाधिकार हे तिथेच संपत नाहीत, या म्हणण्याला स्पष्टपणे समोर येणारी समजूत समर्थन देते. विशेषाधिकारांचा हेतू असा आहे की सभागृह आणि त्याच्या समित्यांचे कामकाज चालण्यासाठी ते आवश्यक आहेत. त्यामुळे संसदेचे कामकाज व्यवस्थित, लोकशाही पद्धतीने आणि सुरळीतपणे चालण्यास अनुमती देणारे आणि ज्याशिवाय सभागृहाचे आवश्यक कामकाज बिघडेल,असे अधिकार आणि सवलती म्हणून आपण संसदीय विशेषाधिकार समजू शकतो.

80. राज्यघटना निर्मात्यांचा हेतू एक जबाबदार, उत्तरदायी

आणि प्रातिनिधिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा होता. ज्या जुलमी वसाहतवादी सरकारचा अंमल भारतावर होता, त्याचा इतिहास पाहता अशा लोकशाहीचे मूल्य आणि महत्त्व राज्यघटनेच्या निर्मात्यांसाठी फार जास्त होते. संसदीय लोकशाहीचा इतिहास सांगतो की वसाहतवादी सरकारने भारताला एक जबाबदार सरकार नाकारले, जिथे सुरुवातीला भारतीयांना त्यांच्या वैविध्यपूर्ण सामाजिक व्यवस्थेवर लागू होणारे कायदे करण्यापासून दूर ठेवले गेले. विधिमंडळात भारतीयांना परवानगी असतानाही,जनतेला अर्थपूर्ण पद्धतीने उत्तरदायी ठरू शकणारे,उत्तरदायी सरकार वसाहतवादी काळातील दूरचे वास्तव होते. कार्यकारीणीच्या कृतींची छाननी करण्याची विधिमंडळाची क्षमता संपवून टाकण्यात आली आणि भारत सरकार अधिनियम १९१९, मध्ये सभागृहातील सदस्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याची वैधानिक हमी असूनही, अनेक विषयांवर विधिमंडळात चर्चा होण्यापासून रोखले गेले, इतकी ही हमी भ्रामक राहिली.

डिजिटल सुप्रीम कोर्टाचा अहवाल

81. त्या अर्थाने, जबाबदारी, उत्तरदायित्व आणि प्रतिनिधित्वावर आधारित विचारशील लोकशाहीचा पाया,हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करते की त्या वेळचे कार्यकारी सरकार संसद किंवा विधानसभांद्वारे निवडले जाते आणि त्यास जबाबदार असते,ज्यात निवडून आलेल्या प्रतिनिधींचा समावेश असतो. हे प्रतिनिधी नागरिकांच्या वतीने आपले विचार मांडू शकतील आणि त्यांच्या आकांक्षा, तक्रारी आणि गाऱ्हाणी सरकार ऐकून घेईल अशी खात्री असते. अर्थपूर्ण लोकशाही टिकविण्यासाठी सभागृहाच्या कामकाजाचा हा पैलू आवश्यक आहे. यामुळे सभागृहातील सदस्यांना सभागृहात उपस्थित राहता यावे,आणि त्यानंतर सभागृहाचे सदस्य म्हणून त्यांचे कर्तव्य करण्याकरिता,कार्यपालिका किंवा इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेकडून त्यांच्या कृत्याबद्दल त्रास होण्याची भीती न बाळगता आपले मत मांडता यावे, याची आवश्यकता आहे.या वैशिष्ट्याअभावी संसद आणि राज्य विधिमंडळे लोकशाही

राज्यव्यवस्थेतील त्यांच्या प्रातिनिधिक स्वरूपाचे मर्म गमावून बसतील.

82. राज्यघटनेच्या कलम १०५ आणि कलम १९४ अन्वये दिलेले विशेषाधिकार व्यापक स्वरूपाचे आहेत, परंतु ज्या उद्दिष्टांसाठी ते देण्यात आले आहेत, ते पूर्ण करण्याइतपतच त्यांची मर्यादा आहे . सभागृहाच्या योग्य कामकाजासाठी जे अधिकार कांही साध्य करू शकणार नाहीत , ते अधिकार विधिमंडळांना देण्याचा राज्यघटनेच्या निर्मात्यांचा हेतू नसेलच. सभागृहातील सदस्यांच्या विशेषाधिकारांचा वैयक्तिकरित्या सभागृहाचे कामकाज सामूहिकरित्या पार पाडण्याच्या क्षमतेशी कार्यात्मक संबंध आहे आणि त्याने त्यांचे अधिकार आणि प्रतिष्ठा सिद्ध होते . दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, हे स्वातंत्र्य विचारशील,टीकात्मक आणि उत्तरदायी लोकशाहीच्या पुढे जाण्यासाठी आवश्यक आहे. केरळ राज्य विरुद्ध के. अजित, {52} या खटल्यात आमच्यापैकी एकाने (न्यायमूर्ती डी. वाय.

चंद्रचूड,) असे म्हटले होते की, विधिमंडळाच्या सदस्याला, ज्यात विरोधकांचाही समावेश आहे, त्याला विधिमंडळाच्या पटलावर हरकत घेण्याचा अधिकार आहे. तथापि, घटनेच्या अनुच्छेद १०५ (१) अन्वये दिलेल्या या अधिकारात सभागृहाचा सदस्य म्हणून व्यक्तीच्या कर्तव्यांचा थेट वापर न करणाऱ्या कृत्यांविरुद्ध सामान्य फौजदारी कायद्याचा वापर वगळला जाणार नाही. सभागृहातील सदस्यांना आपले कार्य पार पाडता यावे आणि आपली कर्तव्ये मोकळेपणाने पार पाडता यावीत, यासाठी राज्यघटनेने विशेषाधिकार आणि सवलतींना मान्यता दिली आहे, असे या न्यायालयाने म्हटले आहे. या विशेषाधिकारांचा आमदाराची कार्ये पार पाडण्याशी कार्यात्मक संबंध असतो. आमदारांना असमान पायावर उभे करणारे ते दर्जाचे चिन्ह नाहीत.

83. एम एन कौल आणि एस. एल. शकधर यांनी संसदेच्या सराव आणि कार्यपद्धतीवरील त्यांच्या प्रसिद्ध कार्यात या मताचे

समर्थन केले आहे आणि असे म्हटले आहे की{ 53}

> आधुनिक काळात, संसदीय विशेषाधिकाराकडे, कार्यकारी अधिकाराविरुद्ध संसदेच्या लढ्याच्या पूर्वीच्या दिवसांपेक्षा,वेगळ्या दृष्टिकोनातून पाहावे लागेल. त्या काळी विशेषाधिकार हे संसद सदस्यांचे,

---

52 [2021] 6 एससीआर 774 : (2021) 17 एससीसी 318

53 एम एन कौल आणि एस. एल. शकधर, संसदेची प्रॅक्टिस अँड प्रोसिजर, लोकसभा सचिवालय, मेट्रोपॉलिटन बुक कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, ७ वी आवृत्ती, २२९.

> संसदेला जबाबदार नसलेल्या कार्यकारी प्राधिकरणाविरोधात, संरक्षण मानले जात असे. संसदेच्या विशेषाधिकारांकडे आता ज्या पार्श्वभूमीवर

पाहिले जाते, ती सर्व पार्श्वभूमी बदलली आहे कारण कार्यपालिका आता संसदेला जबाबदार आहे. ज्या पायावर ते स्थिर आहेत , तो म्हणजे सभागृहाची आणि त्याच्या सदस्यांची प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य राखणे."

(जोर दिला आहे)

सभागृहातील सदस्यांना मिळणारे विशेषाधिकार एकत्रितपणे सभागृहाच्या कामकाजाशी तात्विक रित्या निगडित असतात. संसदेचे किंवा विधिमंडळाचे सभागृह आपल्या वैयक्तिक सदस्यांच्या सामूहिक इच्छेने चालते. सभागृहाचे घटक म्हणून काम करणारे हे सदस्य संपूर्ण सभागृहाच्या कामकाजाशी संबंधित नसलेल्या कोणत्याही विशेषाधिकाराचा किंवा सवलतीचा दावा करू शकणार नाहीत.

84. अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह सभागृहातील सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरलेले आणि मनाशी बाळगलेले कांही स्वातंत्र्य, एकूणच

सभागृहाच्या कामकाजासाठी आवश्यक असल्याचे निर्विवादपणे समजले गेले आहे, परंतु सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे किंवा हिंसा करणे यासारख्या इतर कृत्यांना सूट नाही आणि मानली जाऊ शकत नाही. राज्यघटनेच्या अनुच्छेद १०५ आणि १९४ मध्ये अनुक्रमे संसदेची सभागृहे आणि विधिमंडळे, त्यांचे सदस्य आणि समित्या यांच्यासंदर्भात दिलेले विशेषाधिकार आणि सवलती एकत्रितपणे सभागृहाच्या आहेत. सदस्यांनी स्वतंत्रपणे विशेषाधिकारांचा वापर करणे हे सभागृहाच्या निरोगी आणि आवश्यक कामकाजाशी निगडित आहे की नाही, याची चाचपणी केली पाहिजे.

३. <u>विशेषाधिकाराचा दावा करण्यासाठी आणि वापरण्यासाठी आवश्यकता चाचणी</u>

85. सभागृहातील सदस्यांनी वैयक्तिकरित्या वापरायचे विशेषाधिकार आणि सवलती सभागृहाच्या कामकाजाशी निगडित असायला

हव्यात, हे सिद्ध झाल्यानंतर आता आपण सभागृहाला सामूहिकरित्या आणि त्याचा विस्तार म्हणून वैयक्तिक सदस्यांना कोणते विशेषाधिकार मिळू शकतात याचा शोध घेतला पाहिजे कर्नाटक राज्य (सुप्रा) या केसमध्ये या न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने सरन्यायाधीश एम एच बेग यांच्यामार्फत बोलताना म्हटले की, कलम १९४ (तसेच कलम १०५) अंतर्गत अधिकार असे आहेत जे प्रत्येक सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी संबंधित आहेत आणि आवश्यक आहेत. त्या अर्थाने, हे अधिकार हाऊस ऑफ कॉमन्सला मिळणाऱ्या सर्व विशेषाधिकारांना लागू होऊ शकत नाहीत परंतु सभागृहाच्या कामकाजासाठी आवश्यक नसतील. विद्वान सरन्यायाधीश म्हणाले:

> "**57.** ज्या अध्यायात कलम १९४ आले आहे, तसेच शीर्षक आणि त्याच्या किरकोळ नोंदीवरून (कडेला लिहिलेल्या) हे स्पष्ट होते की, येथे सूचित केले जाणारे

"अधिकार" स्वतंत्र नाहीत. ते अधिकार आहेत जे प्रत्येक सभागृहाच्या कामकाजाच्या संचालनासाठी संबंधित असतात आणि आवश्यक असतात. त्यांचा विस्तार इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्समध्ये असल्याप्रमाणे सर्व कारणांसाठी करता येणार नाही. उदाहरणार्थ, राज्य विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहाला पूर्णपणे सार्वभौम विधिमंडळाचा घटक भाग म्हणून हाऊस ऑफ कॉमन्सइतकाच वैधानिक अधिकार आहे, असा युक्तिवाद करता येणार नाही. आपल्या कायद्यानुसार राज्यघटनाच सार्वभौम किंवा सर्वोच्च आहे. संसदेला तसेच भारतातील प्रत्येक राज्याच्या विधिमंडळाला राज्यघटनेने दिलेले तेवढेच कायदेविषयक अधिकार आहेत. त्याचप्रमाणे संसदेच्या प्रत्येक सभागृहाला किंवा राज्य विधिमंडळाला राज्यघटनेनेच जेवढा दिला आहे, तेवढाच वाटा

वैधानिक अधिकारात तेवढावाटा असतो. [...]

(जोर दिला आहे)

86. या न्यायालयाने असे म्हटले आहे की, भारतात अधिकाराचा स्त्रोत संविधान आहे जो लोकांकडून सार्वभौमत्व प्राप्त करतो. सभागृहाने दावा केलेले अधिकार आणि विशेषाधिकार राज्यघटनेने मान्य केलेल्या अधिकारांपलीकडे जाऊ शकत नाहीत. राज्यघटना केवळ तेवढेच अधिकार, विशेषाधिकार आणि सवलती वापरण्याची परवानगी देते जे सभागृहाच्या किंवा त्यातील समितीच्या कामकाजासाठी आवश्यक आहेत.एम एन कौल आणि एस. एल. शकधर यांनी असे मत व्यक्त केले आहे की[54]

> "त्यामुळे या विशेषाधिकारांचा अर्थ लावताना, संसदेचे विशेषाधिकार सदस्यांना दिले जातात, जेणेकरून "ते संसदेत आपले कर्तव्य मोकळेपणाने आणि

विनाअडथळा पार पाडू शकतील,"या सर्वसाधारण तत्त्वाचा विचार व्हायला हवा. ते वैयक्तिक सदस्यांना लागू होतात " सभागृह आपले कार्य मुक्तपणे पार पाडू शकेल यासाठी आवश्यक तेवढेच. ते सदस्याला समाजाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांपासून मुक्त करत नाहीत,ज्या त्याला त्या अधिकारात लागू होतात,तितक्या आणि कदाचित इतरांपेक्षा अधिक बारकाईने लागू होतात".

---

54. एम एन कौल आणि एस एल शकधर, संसदेची प्रॅक्टिस आणि प्रोसिजर , लोकसभा सचिवालय, मेट्रोपॉलिटन बुक कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, सातवी आवृत्ती, 229.

डिजिटल सुप्रीम कोर्टाचा अहवाल

संसदेच्या हिताच्या दृष्टीने योग्य आणि पुरेशी कारणे असल्याशिवाय, संसदेच्या विशेषाधिकारांनी कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत संसद सदस्याला सामान्य नागरिकापेक्षा वेगळ्या पातळीवर स्थान दिलेले नाही.

(जोर दिला आहे)

87. संसदीय विशेषाधिकारांची उत्क्रांती तसेच या न्यायालयाच्या न्यायशास्त्रावरून हे सिद्ध होते की सभागृहाचे सदस्य किंवा खरोखरच सभागृह स्वत: त्यांच्या कामकाजाशी आवश्यक रूपाने संबंधित नसलेल्या विशेषाधिकारांचा दावा करू शकत नाही. संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या कामकाजाशी आवश्यक म्हणून संबंधित नसलेले कोणतेही विशेषाधिकार देणे म्हणजे कायद्याचा साधारण वापर करण्यापासून,अनियंत्रित सूट उपभोगणारा नागरिकांचा वर्ग निर्माण करणे होय. संसदेला आणि

विधिमंडळाला अधिकार, विशेषाधिकार आणि सवलती देण्याचा हा ना राज्यघटनेचा हेतू होता, ना उद्दिष्ट.

88. अमरिंदर सिंग(सुप्रा) याप्रकरणात या न्यायालयाच्या घटनापीठाने असे म्हटले आहे की, विशेषाधिकारांच्या वापराची पडताळणी करण्याची चाचणी ही आहे की कायदेविषयक कामकाजाच्या सचोटीचे रक्षण करण्यासाठी ते आवश्यक आहेत की नाही. सरन्यायाधीश के. जी. बालकृष्णन यांनी या विषयावरील अनेक साहित्याचा शोध घेतल्यानंतर असे मत व्यक्त केले की, विशेषाधिकार सभागृहाच्या सचोटीचे रक्षण करण्याचा विशिष्ट हेतू साध्य करतात . विशेषाधिकार हे नावापुरतेच (तेवढ्यापुरतेच) नसतात, तर कायदेविषयक कामकाजाचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यासाठी त्याचा वापर केला पाहिजे, असे या न्यायालयाने म्हटले आहे. सरन्यायाधीशांनी असे निरीक्षण नोंदवले आहे की:

"**35.** कायदेविषयक विशेषाधिकारांची उत्क्रांती मध्ययुगीन इंग्लंड पर्यंत मागे नेते, जेव्हा राजा आणि संसद यांच्यात सत्तेसाठी संघर्ष सुरू होता . बहुतेक प्रकरणांमध्ये, संसद सदस्यांना इतर कारणांमध्ये, राजाच्या अवाजवी दबावापासून किंवा प्रभावापासून वाचविण्यासाठी विशेषाधिकारांचा वापर केला गेला. याउलट संसदेचे हळूहळू बळकटीकरण झाल्याने, कायदेविषयक विशेषाधिकारांच्या नांवाखाली काही अतिरेकही झाले. मात्र, त्यानंतर कार्यपालिका आणि विधिमंडळ यांच्यातील संबंधांचे नियमन करणाऱ्या विचारांमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. आधुनिक संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असलेल्या विधिमंडळानेच कार्यकारी कामकाजावर लक्ष ठेवणे अपेक्षित आहे . कार्यकारी अधिकार असणारे विधिमंडळाला उत्तरदायी असावेत, अशा

'सामूहिक जबाबदारी'च्या कल्पनेला मूर्त स्वरूप देऊन हे साध्य केले आहे .

36. तथापि, कायदेविषयक विशेषाधिकार एक विशिष्ट हेतू साध्य करतात. सभागृहातील सदस्यांमुळे तसेच सदस्य नसणाऱ्यांमुळे उद्भवू शकणाऱ्या अडथळ्यांपासून कायदेविषयक कामकाजाच्या सचोटीचे रक्षण करण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. काही घटनांमध्ये कार्यकारी पदावर असलेल्या व्यक्तींमुळे विधिमंडळाच्या कामकाजात संभवतः अडथळे निर्माण होऊ शकतात, हे प्रतिपादित होते, हे सांगण्याची गरज नाही. त्यामुळे सध्याच्या प्रकरणात कायदेविषयक विशेषाधिकारांच्या वापराची वैधता तपासण्यासाठी ज्या गुणकारी (परिणामात्मक) तत्त्वांचा आधार घेता येईल, त्यावर भर देण्याची गरज आहे.

...

47. [...] कायदेविषयक विशेषाधिकारांचा वापर हा काही शेवट (अंत) नाही. अवाजवी अडथळे न येता कायदेविषयक कामे प्रभावीपणे पार पाडता यावीत, या सुरक्षिततेसाठी त्यांचा वापर होणे अपेक्षित आहे. या कामांमध्ये सदस्यांना सभागृहाच्या पटलावर तसेच विविध विधी समित्यांच्या कामकाजामध्ये बोलण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार यांचा समावेश आहे. या संदर्भात, प्रशासकीय कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तींचे सुद्धा संरक्षण करण्यासाठी विशेषाधिकारांचा वापर केला जाऊ शकतो. कायदेविषयक विशेषाधिकारांच्या वापराची छाननी करण्यासाठी महत्त्वाचा विचार म्हणजे कायदेविषयक कामकाजाच्या सचोटीचे रक्षण करण्यासाठी ते आवश्यक होते का? [...]

(जोर दिला आहे)

89. लोकायुक्त, यामध्ये न्यायमूर्ती रिपुसूदन दयाळ विरुद्ध मध्य प्रदेश राज्य {55} या खटल्यात या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की, सभागृह आणि त्यातील सदस्यांनी वापरलेल्या विशेषाधिकाराची व्याप्ती सभागृहाच्या मुक्त कामकाजासाठी विशेषाधिकाराच्या आवश्यकतेच्या आधारे तपासली गेली पाहिजे. या न्यायालयाने असेही म्हटले आहे की, सभागृहातील सदस्य त्यांना घटनेनुसार सभागृहाचे सदस्य म्हणून मिळणाऱ्या विशेषाधिकारांच्या नावाखाली सामान्य फौजदारी कायद्याच्या लागू होण्यापासून सूट मागू शकत नाही. सरन्यायाधीश पी. सदाशिवम, यांनी असे मत व्यक्त केले की,

---

55. (2014)3 एस सी आर 242:(2014)4 एस सी सी 473

"**51.** उपभोगलेल्या विशेषाधिकारांची व्याप्ती विशेषाधिकारांच्या गरजेवर म्हणजेच त्या कां देण्यात आल्या आहेत, यावर अवलंबून असते. सदस्यांना मिळणाऱ्या विशेषाधिकारांचा मूळ आधार म्हणजे त्यांना सदस्य म्हणून आपले कार्य करण्याची मुभा देणे आणि सभागृहाच्या कामकाजात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये. [...]

52. हे स्पष्ट आहे की मूलभूत संकल्पना अशी आहे की विशेषाधिकार हे ते अधिकार आहेत ज्याशिवाय सभागृह आपले कायदेविषयक कार्य करू शकत नाही**.** सर्वसामान्य नागरिकांना लागू असलेल्या इतर कायद्यांप्रमाणे त्यांना लागू असलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत ते सदस्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांपासून मुक्त करत नाहीत. त्यामुळे विधानसभेतील काही

अधिकाऱ्यांवरील भ्रष्टाचाराच्या आरोपाची चौकशी किंवा तपास केल्यास विधानसभेच्या विधिमंडळाच्या कामकाजात ढवळाढवळ होते, असे म्हणता येणार नाही. फौजदारी खटला लावण्याविरुद्ध कोणालाही विशेषाधिकार नाही.

...

76. सभागृहाला आपले कार्य मुक्तपणे पार पाडता यावे यासाठी आवश्यक तेवढ्याच सवलती उपलब्ध आहेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कायद्यांच्या लागु होण्यासाठी , विशेषत: लोकायुक्त कायदा आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मधील तरतुदींसाठी, लोकायुक्त किंवा मध्य प्रदेश विशेष पोलिस आस्थापनाचे कार्यक्षेत्र, सर्व लोकसेवकांसाठी आहे (लोकायुक्त कायद्याच्या उद्देशाने मध्य प्रदेश

विधानसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष वगळता) आणि अधिकाऱ्यांना कोणतेही विशेषाधिकार उपलब्ध नाहीत आणि, कोणत्याही परिस्थितीत, ते सामान्य नागरिकापेक्षा,ज्यांना या अधिनियमातील तरतुदी लागू होतात,अधिक कोणत्याही विशेषाधिकाराचा दावा करू शकत नाहीत . ज्या उपक्रमांना कायदेविषयक तरतुदी लागू होतील,ते सभागृहाबाहेर असल्यास, त्यांना कोणताही भेदभाव न करता विशेषाधिकार लागू होत नाहीत.

(जोर दिला आहे)

90. संसदीय विशेषाधिकार निश्चित करण्याची आवश्यकता चाचणी भारतीय संदर्भात खोलवर रुजली आहे. या विषयावर या वेळी भारतीय न्यायशास्त्राच्या वरील विवेचनापलीकडे इतर न्यायक्षेत्रांत आवश्यकतेच्या कसोटीवर सुस्थापित न्यायशास्त्राचा

शोध घेण्याची गरज नाही. विविध संसदीय अधिकारक्षेत्रांतील संसदीय विशेषाधिकारांच्या उत्क्रांतीने एक सुसंगत नमुना दर्शविला आहे की जेव्हा विशेषाधिकारांशी संबंधित मुद्दा उद्भवतो, तेव्हा दावा केलेला विशेषाधिकार सभागृहाच्या किंवा त्याच्या समितीच्या सुव्यवस्थित कामकाजासाठी आवश्यक आणि गरजेचा आहे की नाही ही चाचणी लागू केली जाते. विशेषाधिकार अस्तित्वात आहे आणि सभागृहाने आपले कार्य एकत्रितपणे पार पाडण्यासाठी तो (विशेषाधिकार) आवश्यक आहे याचे समाधान करण्याचा भार (दायित्व) विशेषाधिकाराचा दावा करणाऱ्या व्यक्तीवर किंवा संस्थेवर आहे हे देखील आपण लक्षात घेऊ शकतो. संसदेची सभागृहे किंवा कायदेमंडळे आणि समित्या ही अशी बेटे नाहीत जी आतील लोकांना सामान्य कायद्यांच्या अंमलबजावणीपासून (लागू होण्यापासून) संरक्षण देणारे एन्क्लेव्ह म्हणून कार्य करतात. कायदे बनवणारी संस्था ज्या लोकांवर शासन करते आणि ज्या लोकांचे प्रतिनिधित्व

करण्याचा दावा करते, त्यांच्यासाठी जे कायदे करते, त्याच कायद्याच्या अधीन कायदे बनविणारे असतात.

91. त्यामुळे संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या वैयक्तिक सदस्याने विशेषाधिकाराचा दावा करणे हे दुहेरी चाचणीद्वारे नियंत्रित केले जाईल, असे आमचे मत आहे. एक तर दावा केलेला विशेषाधिकार सभागृहाच्या सामूहिक कामकाजाशी निगडित असावा लागतो आणि दुसरे म्हणजे त्या गरजेचा विधिमंडळाच्या सभासदाची (आमदाराची) अत्यावश्यक कर्तव्ये पार पाडण्याशी कार्यात्मक संबंध असायला हवा .

G. लाचखोरीला संसदीय विशेषाधिकाराने संरक्षण दिले जात नाही

I. <u>लाचखोरी म्हणजे सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संदर्भात किंवा दिलेल्या कोणत्याही मताच्या संदर्भात नाही</u>

92. आपल्या भाषणाच्या किंवा मतदानाच्या अनुषंगाने लाचखोरीत गुंतलेल्या संसद सदस्याला किंवा विधिमंडळाच्या सदस्याला या

विशेषाधिकारांमुळे सूट मिळते कां,हा प्रश्न अजून शिल्लकच आहे. कलम १०५ (३) आणि १९४ (३) अन्वये विशेषाधिकारांची व्याप्ती ठरविण्याच्या संदर्भात सभागृहाच्या कामकाजाशी असलेल्या अंतर्गत संबंधाची चाचणी आणि या न्यायालयाने निर्माण केलेली आवश्यकता चाचणी तरतुदींच्या उपकलम (१) आणि (२) संदर्भात देखील विशेषाधिकारांचे निर्धारण करताना विचारात घेणे आवश्यक आहे. राज्यघटनेतील एखाद्या तरतुदीच्या अन्वयार्थाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी जेव्हा या न्यायालयाला बोलावले जाते, तेव्हा राज्यघटनेच्या रचनेला धक्का पोहोचणार नाही अशा पद्धतीने मजकुराचा अर्थ लावला पाहिजे. पी.व्ही. नरसिंह राव (सुप्रा) या केसमधील या न्यायालयाचे मत राज्यघटनेच्या कलम १०५ च्या उपकलम (२) मधील दोन वाक्प्रचारांवर अवलंबून होते. हे वाक्प्रचार म्हणजे " च्या संदर्भात" आणि "काहीही" शब्दांनंतरचे शब्द होते . त्या कलमातील उपकलम (२) खालीलप्रमाणे आहे

"(२) संसदेचा कोणताही सदस्य संसदेत किंवा त्याच्या कोणत्याही समितीमध्ये सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल (बोलण्याबद्दल) किंवा त्याने दिलेल्या मताच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस उत्तरदायी राहणार नाही आणि संसदेच्या कोणत्याही सभागृहाने किंवा त्याच्या अधिकाराखाली कोणत्याही अहवाल,कागद,मतदान किंवा कार्यवाही च्या प्रकाशना संदर्भात कोणतीही व्यक्ती न्यायालयात जबाबदार राहणार नाही ."

93. राज्य (एनसीटी ऑफ दिल्ली) विरुद्ध भारत सरकार,{56} या खटल्यात सरन्यायाधीश दीपक मिश्रा म्हणाले की, न्यायालयाने घटनात्मक तरतुदीचा अर्थ लावावा आणि त्या तरतुदीतील इतर शब्दांचा संदर्भ घेऊन ज्या संदर्भात शब्द येतात त्या संदर्भात मजकूरातील विशिष्ट शब्दांचा अर्थ लावावा. या न्यायालयाने त्या प्रकरणात असे म्हटले होते की "कोणताही" या शब्दाचा अर्थ तो

ज्या संदर्भात येतो त्यानुसार वेगवेगळा असू शकतो आणि "कोणतीही बाब" हा शब्द "प्रत्येक विषय" म्हणून समजू नये.

94. तेजकिरण जैन (सुप्रा) या निर्णयात कलम १०५ च्या उपकलम (१) मधील 'काहीही' या शब्दाचा अर्थ व्यापक स्वरूपाचा आणि त्यानंतर येणाऱ्या शब्दांच्या अधीन राहून 'संसदेत' असा करण्यात आला आहे. हे कलम संसदेत व्यापक अभिव्यक्ती स्वातंत्र्य देते. 'काहीही' या शब्दाचा अर्थ असा लावता येणार नाही की, भाषण करताना ज्या विषयाबद्दल ते बोलत(चर्चा करत) होते, त्या विषयाशी त्या भाषणाचा संबंध आहे की नाही, हे ठरवण्यासाठी न्यायालयाचा हस्तक्षेप मान्य करावा . तेज किरण जैन (सुप्रा) या केस मध्ये अस्पृश्यतेवर भाषण करणाऱ्या एका धर्मगुरूच्या अनुयायांनी लोकसभेत भाषणावरील लक्षवेधी ठरावादरम्यान झालेल्या मानहानीच्या नुकसानभरपाईसाठी उच्च न्यायालयात दावा दाखल केला. संसदेत केलेल्या भाषणाचे विच्छेदन करून त्या भाषणाचा त्याच्या समोरील विषयाशी थेट संबंध आहे की

नाही याचा निर्णय न्यायालय घेऊ शकत नाही, असे या न्यायालयाने म्हटले आहे. संसदेचे लक्ष कोणत्या बाबींकडे घेतल्या जाते यावर संसदेचे पूर्ण नियंत्रण असते आणि त्यानंतर बोलण्याचे स्वातंत्र्य असलेल्या सदस्यांना किंवा व्यक्तींना सभागृहात ते जे काहीही बोलतील त्याविरुद्ध खटल्याची भीती घालू नये .

95. हा संदर्भ अनुच्छेद १०५ च्या उपकलम (२) मध्ये स्पष्टपणे बदलतो,ज्यामुळे सभागृहातील सदस्यांना आणि त्यातील समित्यांना सभागृहात "काहीही" बोलल्याबद्दल किंवा सभागृहात दिलेल्या कोणत्याही मतदानासंदर्भात कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीमध्ये सूट मिळते. सरन्यायाधीश एम. एच. बेग यांनी कर्नाटक राज्य (सूप्रा) या केस मध्ये सभागृहात गुन्हेगारी कृत्य होऊ शकते, अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवली होती आणि घटनेनुसार त्याचे संरक्षण करता येणार नाही, असे निरीक्षण नोंदवले होते. सरन्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले की:

"**63.** [...] संसदेचे सभागृह किंवा राज्य विधिमंडळ न्यायालयाप्रमाणे थेट कोणावरही किंवा कोणताही खटला चालवू शकत नाही,

---

56. (2018)7 एस सी आर 1:(2018)8 एस सी सी 501

परंतु ते आपल्या अधिकाराचा अवमान केल्याच्या प्रकरणांमध्ये अर्धन्यायिक पणे पुढे जाऊ शकते आणि आपल्या "विशेषाधिकार" आणि "संरक्षण" संबंधी ठराव घेऊ शकते कारण, असे करताना, ते केवळ आपल्या कायदेविषयक कामकाज उचितपणे करीत असताना येणारे अडथळे दूर करण्याचा प्रयत्न करते. परंतु, एखादे प्रकरण येथे येऊ शकते की नाही, असा अधिकारक्षेत्राचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर योग्य त्या प्रक्रियेत सर्वसामान्य न्यायालयांना निर्णय घ्यावा लागतो. उदाहरणार्थ, खुनासारख्या फौजदारी गुन्ह्याचा खटला, जरी गुन्हा सभागृहात झाला असेल, तरी ते चालविण्याचे अधिकारक्षेत्र

सामान्य फौजदारी न्यायालयाला आहेत, संसदेला किंवा राज्य विधिमंडळाला नाहीत.[...]"

(जोर दिला आहे)

96. के. अजित (सुप्रा या केस मध्ये,) केरळ विधानसभेच्या एका सदस्यावर राज्याच्या अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प सादर करताना सभापतींच्या व्यासपीठावर चढून मालमत्तेचे नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला होता. विधिमंडळाच्या सभागृहातील वर्तनाबद्दल सदस्यावर न्यायालयात खटला चालवता येईल का, असा प्रश्न या न्यायालयासमोर उभा राहिला. ब्रिटनमधील या संदर्भातील कायद्याच्या उत्क्रांतीचा शोध घेतल्यानंतर आमच्यापैकी एकाच्या (न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड,) माध्यमातून बोलतांना या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की:

"**36.** [...] सभागृहाच्या आवारात फौजदारी गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला पूर्ण विशेषाधिकार नसल्याचे स्पष्ट

आहे. त्याऐवजी, त्याला एक मर्यादित विशेषाधिकार असेल आणि जर या कृतीचा सभागृहातील सदस्याच्या प्रभावी सहभागाशी संबंध असेल तरच त्याला सूट मिळेल."

97. या न्यायालयाने पुढे असे म्हटले आहे की, विधिमंडळात मिळणारे विशेषाधिकार हे कायद्याच्या सामान्यपणे लागू होण्यापासून (अनुप्रयोगातून) सूट मिळविण्याचे प्रवेशद्वार(मार्ग)नाहीत:

"**65.** विशेषाधिकार आणि संरक्षण हे देशाच्या सामान्य कायद्यातून सूट मिळविण्याचे प्रवेशद्वार(मार्ग)नाहीत, विशेषत:जसे या प्रकरणात, कारण फौजदारी कायदा जो प्रत्येक नागरिकाच्या कृतीवर नियंत्रण ठेवतो. फौजदारी कायद्याच्या लागू होण्यापासून (अंमलबजावणीतून सूट मिळण्याचा दावा करणे म्हणजे कायद्याचे तयार करणारे आणि निर्माते म्हणून

निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या चारित्र्यावर ठसा असणाऱ्या विश्वासाचा विश्वासघात करणे होय. कलम ३२१ अन्वये माघार घेण्याचा अर्ज सरकारी वकिलांनी ज्या पायावर केला तो संपूर्ण पाया कलम १९४ मधील घटनात्मक तरतुदींच्या मूलभूत गैरसमजावर आधारित आहे. सरकारी वकील अभियोजन पक्षाच्या आड येणारे विशेषाधिकार आणि सवलतींच्या अस्तित्वाने प्रभावित झालेले दिसतात. अशी समजूत घटनात्मक तरतुदीशी गद्दारी करते आणि विधिमंडळाचे निवडून आलेले सदस्य फौजदारी कायद्याच्या सर्वसाधारणपणे लागू होण्याच्या (अंमलबजावणीपेक्षा) वरचढ असतात, या गैरसमजुतीवर चालतात.

(जोर दिला आहे)

98. लोकायुक्त या मध्ये न्यायमूर्ती रिपुसूदन दयाळ (सुप्रा) मध्य

प्रदेश विधानसभेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचार आणि आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या आरोपाखाली फौजदारी कारवाई सुरू केली होती. विधानसभा अध्यक्षांनी लोकायुक्त आणि दक्षता अधिकाऱ्यांविरोधात हक्कभंगाची कारवाई सुरू केली . भ्रष्टाचारासाठी फौजदारी कारवाई सुरू करणे हा विशेषाधिकारभंग ठरू शकत नाही , असे सांगताना या न्यायालयाने मत व्यक्त केले होते की:

"**48.** लोकायुक्त किंवा मध्य प्रदेश विशेष आस्थापनाच्या अधिकारक्षेत्राच्या संदर्भात, विशेषत: लोकायुक्त कायदा आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीच्या बाबतीत, लोकायुक्त कायद्याच्या उद्देशाने मध्य प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष वगळता सर्व लोकसेवक एकाच श्रेणीत मोडतात आणि एका सामान्य नागरिकापेक्षा ज्याला या कायद्यातील तरतुदी

लागू होतात या पेक्षा जास्त कोणत्याही विशेषाधिकाराचा दावा करू शकत नाहीत हे स्पष्ट आहे. [...]. .

49. श्री के के वेणुगोपाल यांनी योग्यरित्या मांडल्याप्रमाणे, भारतात कायद्याचे राज्य आहे,आणि पुरुषांचे (मनुष्यांचे) नाही आणि म्हणूनच , विधिमंडळाने लागू केलेल्या कायद्यांना प्राधान्य आहे जे अशा व्यक्तींमध्ये भेदभाव करत नाहीत ज्यांना असे कायदे लागू होतील. जोपर्यंत कायदाच वैध वर्गीकरणाद्वारे अपवाद करत नाही,तोपर्यंत अशा सर्व व्यक्तींना कायदे लागू होतील. कोणतीही व्यक्ती कायद्याच्या अंमलबजावणीविरुद्ध (लागू होण्याच्या विरुद्ध) आणि प्रतिबंधित कृत्य केल्यावर त्याकरिता असलेल्या दायित्वांसाठी विशेषाधिकाराचा दावा करू शकत नाही.

(जोर दिला आहे)

99. वरील प्रकरणांतून जे तत्त्व समोर येते ते असे की, सभागृह, त्याचे सदस्य आणि समित्या यांचे विशेषाधिकार हे केवळ जागेवर अवलंबून नसतात किंवा ते केवळ संबंधित कायद्यावर अवलंबून नसतात. संसदेत किंवा विधिमंडळात केलेल्या भाषणावर कोणत्याही न्यायालयासमोर कोणतीही कार्यवाही होऊ शकत नाही. तथापि, मालमत्तेचे नुकसान करणे किंवा गुन्हेगारी कृत्ये यासारख्या इतर कृत्यांवर सभागृहाच्या आवारात असूनही खटला चालविला जाऊ शकतो. कलम १०५ च्या उपकलम (२) मध्ये "कोणत्याही गोष्टीबद्दल" बोलण्याबद्दल किंवा दिलेल्या कोणत्याही मताबद्दल सूट देण्यात आली आहे. या सूट देण्याबद्दलची व्याप्ती वर दिलेल्या चाचण्यांच्या आधारे तपासली पाहिजे. सदस्याची बोलण्याची ताकद (क्षमता) ही मुळात सभागृहाच्या सामूहिक कामकाजाशी निगडित असते आणि ती सभागृहाच्या कामकाजासाठी आवश्यक असते. भाषणाचा विस्तार असलेल्या

मतदानावर न्यायालयात प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही किंवा त्याविरोधात कारवाई ही होऊ शकत नाही. अनुच्छेद १०५ च्या उपकलम (२) अन्वये देण्यात आलेल्या सूट ची व्याप्ती स्पष्ट करण्यासाठी "च्या संदर्भात" हे शब्द महत्त्वपूर्ण आहेत.

100. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) मध्ये बहुमताच्या निर्णयात "च्या संदर्भात" या शब्दाचा व्यापक अर्थ आहे आणि कोणत्याही गोष्टीचा उल्लेख हा दिलेल्या मताशी किंवा भाषणाशी संबंधित आहे.त्यामुळे संसद सदस्याचे मत विकत घेण्यासाठी दिलेली लाच कलम १०५ च्या उपकलम (२) अन्वये खटल्यापासून मुक्त असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. या तर्काद्वारे, बहुमताच्या निकालाने असा निष्कर्ष काढला की,ज्या लाचखोर सदस्याने ज्या कामाकरिता लाच घेतली त्याचे पालन केले नाही तो खटल्यापासून मुक्त नाही कारण त्याच्या कृतीचा त्याच्या मताशी संबंध नाही. आपण वर नमूद केल्याप्रमाणे, एखाद्या तरतुदीमध्ये

येणाऱ्या शब्दाचा (वाक्याचा) अर्थ तरतुदीच्या उद्देशाला तडा जाईल अशा प्रकारे केला जाऊ शकत नाही. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) मधील बहुमताने कलम १०५ चा हेतू असा घेतला आहे की संसद सदस्यांना सभागृहात त्यांचे कार्य करण्यास सक्षम होण्यासाठी कायद्यानुसार अतीव्यापक संरक्षण असणे आवश्यक आहे. या तरतुदीचा हा अर्थ अधिक व्यापक आहे आणि वाढीव विशेषाधिकारांमुळे सभागृहातील सदस्यांचे कामकाज अधिक चांगले होईल, असे गृहीत धरले आहे.

101. बहुसंख्याकांनी समजून घेतल्याप्रमाणे संसदीय शासनपद्धतीत विशेषाधिकार हा अंत (शेवट) नसतो. संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सदस्याला सभागृहात किंवा त्यासंबंधीच्या समितीमध्ये त्यांच्या कार्याच्या कामगिरीत, त्याच्याविरुद्ध खटला भरण्यापासून सूट आहे कारण दिलेले भाषण किंवा दिलेले मत विधिमंडळाचे सदस्य म्हणून त्यांच्या कामगिरीशी कार्यात्मकरित्या संबंधित असते. ही सूट मिळण्यासाठी एखाद्या सदस्याचा दावा

हा सभागृहाच्या किंवा समितीच्या कामकाजाशी त्याचा महत्त्वाचा संबंध आहे. संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याची आणि मतदानस्वातंत्र्याची हमी देण्याचे कारण म्हणजे त्याशिवाय संसद किंवा विधिमंडळ चालू शकत नाही (काम करू शकत नाही). त्यामुळे एखाद्या सदस्याने वैयक्तिकरित्या वापरावयाच्या विशेषाधिकाराची व्याप्ती साठी,या न्यायनिर्णयाच्या भाग 'फ'मध्ये नमूद केलेल्या दुहेरी कसोटीची पूर्तता करणे आवश्यक आहे, ते म्हणजे सभागृहाच्या सामूहिक कामकाजाशी त्याचा संबंध आणि त्याची गरज (आवश्यकता).

102. अनुच्छेद १०५ च्या उपकलम (२) मधील "च्या संदर्भात" हे शब्द "काहीही बोलले किंवा दिलेले कोणतेही मत" या वाक्याला आणि उत्तरार्धात सभागृहाने किंवा सभागृहाच्या अधिकाराने प्रकाशित केलेल्या प्रकाशनास लागू होतात. "काहीही" किंवा "कोणतेही" या शब्दांचा अर्थ ते ज्या क्रियात्मक शब्दावर लागू होतात म्हणजे अनुक्रमे "सांगितलेले (बोललेले)" आणि "दिलेले मत"

वाचल्याशिवाय लावू शकत नाही. सभागृहात किंवा त्याच्या समितीमध्ये बोलण्याचा किंवा मतदानाचा अधिकार असलेल्या व्यक्तीने केलेल्या कृतीला "काहीही बोलले" आणि "दिलेले कोणतेही मत" हे शब्द लागू होतात. याचा अर्थ असा की, एखाद्या सदस्याने किंवा व्यक्तीने आपल्या बोलण्याच्या अधिकाराचा वापर केला असावा किंवा प्रसंग आल्यावर सभागृहात किंवा समितीत बोलणे टाळले असावे.त्याचप्रमाणे कलम १०५ (२) आणि १९४ (२) अन्वये सूट मिळण्याचा दावा करण्यासाठी एखाद्या व्यक्तीने किंवा सदस्याने बाजूने, विरोधात किंवा मतदान न करण्याचा पर्याय वापरला असावा.

103. "काहीही" आणि "कोणतेही" हे शब्द जेंव्हा आपापल्या क्रियात्मक शब्दांसोबत वाचले असता तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की एखादा सदस्य सभागृहासमोरील कोणत्याही विषयावर त्यांना वाटेल तसे बोलण्यास आणि त्याच्या इच्छेप्रमाणे वाटेल त्या बाजूने मतदान करण्यास सूट घेऊ शकतो. हे पूर्णपणे

न्यायालयाच्या हस्तक्षेपाच्या कक्षेबाहेर आहेत. "काहीही" आणि "कोणतेही" यांचा विस्तृत अर्थ त्यांच्या सोबतच्या शब्दांसह वाचले असता ते सभागृह किंवा समितीमध्ये भाषण किंवा मतदानाच्या कृती अनिर्बंध आहे असे दर्शवितात. "च्या संदर्भात" हे शब्द "काहीही बोललेले किंवा दिलेले कोणतेही मत" या सामूहिक वाक्याला लागू होते. "च्या संदर्भात" या शब्दाचा अर्थ स्पष्ट संबंधातून उद्भवणारा किंवा त्याच्याशी असलेला स्पष्ट संबंध असणे असा होतो. हे अति विस्तृत केले जाऊ शकत नाही, किंवा दिलेल्या भाषणाशी किंवा मताशी दूरस्थ संबंध असू शकेल असे कांहीही असा अर्थ लावला जाऊ शकत नाही. त्यामुळे पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या बहुमताच्या निर्णयाशी आम्ही सहमत होऊ शकत नाही.

II. राज्यघटनेत सार्वजनिक जीवनातील शुचितेची कल्पना आहे

104. राज्यघटनेने ज्या हेतूने आणि उद्देशाने संसदेत अधिकार,

विशेषाधिकार आणि सूट दिली आहे, ती लक्षात घेतली पाहिजे. विशेषाधिकार हे मूलत: सभागृहाशी सामूहिकरित्या संबंधित असतात आणि त्यांच्या कामकाजासाठी आवश्यक असतात. म्हणून, "च्या संदर्भात" या शब्दांचा विशेषाधिकार आणि सवलतीच्या उद्देशाशी सुसंगत असा अर्थ असणे आवश्यक आहे. राज्यघटनेच्या कलम १०५ आणि १९४ मध्ये संसदेच्या सभागृहात आणि राज्य विधिमंडळांमध्ये वादविवाद, चर्चा आणि विचारांची देवाणघेवाण होऊ शकेल असे निर्भयी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. ही प्रक्रिया अर्थपूर्ण होण्यासाठी, सभागृह किंवा कोणत्याही समितीसमोर बोलण्याचा अधिकार असलेले सदस्य आणि व्यक्ती तृतीय पक्षाकडून दिल्या गेलेल्या भीती किंवा पक्षपातीपणापासून मुक्त असणे आवश्यक आहे. विधिमंडळाचे सदस्य आणि विधिमंडळाच्या समित्यांच्या कामात गुंतलेल्या व्यक्तींना सभागृहाचे कामकाजाची गुणवत्ता वाढविण्यासाठी (समृद्ध करण्यासाठी) आपली स्वतंत्र इच्छाशक्ती

आणि विवेक वापरता आला पाहिजे. एखाद्या सदस्याला एखाद्या मुद्द्यावर विश्वास किंवा भूमिकेमुळे नव्हे, तर सदस्याने घेतलेल्या लाचेमुळे विशिष्ट पद्धतीने मतदान करण्यास प्रवृत्त केले जाते तेव्हा नेमके हेच हिरावून घेतले जाते. विधिमंडळातील सदस्यांचा भ्रष्टाचार आणि लाचखोरी मुळे भारतीय संसदीय लोकशाहीचा पाया झिजवला आहे (नष्ट केला आहे). हे राज्यघटनेच्या महत्त्वाकांक्षी आणि विचारशील आदर्शांना विध्वंसक आहे आणि नागरिकांना जबाबदार, उत्तरदायी आणि प्रातिनिधिक लोकशाहीपासून वंचित ठेवणारी राज्यव्यवस्था तयार करते.

105. पी.व्ही. नरसिंह राव (सुप्रा) यांच्या अल्पमताच्या निकालात म्हटले आहे की, "च्या संदर्भात" हे शब्द "पासुन उद्भवलेले" समजले पाहिजेत आणि सभागृहाच्या सदस्याने घेतलेली लाच त्याच्या मतातून उद्भवली असे मानले जाऊ शकत नाही. अल्पसंख्याकांनी असे मत व्यक्त केले की:

"**46.** [...] त्यामुळे अनुच्छेद १०५ (२) मधील 'च्या संदर्भात' या शब्दाचा अर्थ,अनुच्छेद १०५ (२) चा उद्देश आणि त्या तरतुदीतील अभिव्यक्ती कोणत्या मांडणीत दिसते हे लक्षात घेऊन, घ्यावा लागेल.

47... कलम १०५ (२) अन्वये देण्यात आलेल्या सवलतीचा (सुट)उद्देश वैयक्तिक आमदारांचे स्वातंत्र्य सुनिश्चित करणे हा आहे. राज्यघटनेत अंगिकारलेल्या संसदीय लोकशाहीच्या व्यवस्थेच्या सुदृढ (निरोगी) कामकाजासाठी असे स्वातंत्र्य आवश्यक आहे . संसदीय लोकशाही हा राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा एक भाग आहे. कलम १०५ (२) मधील तरतुदींचा असा अर्थ लावणे ज्यामुळे संसद सदस्याला त्याने संसदेत किंवा त्याच्या कोणत्याही समितीमध्ये त्याने सांगितलेल्या (बोललेल्या) कोणत्याही गोष्टीच्या संबंधात किंवा दिलेल्या मताच्या संबंधात

लाचखोरीच्या गुन्ह्यासाठी फौजदारी न्यायालयात खटल्यापासून सूट मिळू शकेल आणि त्यामुळे अशा सदस्यांना कायद्याच्या वर ठेवणे हे संसदीय लोकशाहीच्या निरोगी कामकाजास विरोधी असेलच , शिवाय कायद्याचे राज्य, जे राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा एक आवश्यक भाग आहे, या संकल्पनेला ही विध्वंसक ठरेल घटनात्मक तरतुदींचा अन्वयार्थ लावताना न्यायालयाने राज्यघटनेची मूलभूत वैशिष्ट्ये आणि मूलभूत रचना बळकट करणारी रचना स्वीकारावी, असा स्थिरावलेला कायदा आहे. (पाहा: न्यायिक उत्तरदायित्व उपसमिती वि. भारत सरकार [(१९९१) ४ एससीसी ६९९] एससीसी पृष्ठ ७१९.) [...]"

(जोर दिला आहे)

106. अल्पसंख्यांकांनी त्यानंतर समोर येणाऱ्या विरोधाभासी

परिणामाकडे निर्देश केला की जर सदस्यांना त्यांच्या भाषणासाठी किंवा मतदानासाठी खटल्यातून सूट दिली गेली तर, परंतु न बोलल्याबद्दल किंवा मतदान न केल्याबद्दल लाच मिळाल्यास त्यांना संरक्षण मिळणार नाही. अल्पसंख्याक पुढे म्हणतात की:

> "**47.** [...] कलम १०५ (२) मधील "च्या संदर्भात" या शब्दाचा अर्थ "त्यातून उद्भवलेला" असा अर्थ लावला तर अशी विसंगत परिस्थिती टाळता येईल. जर "च्या संदर्भात" या शब्दाचा असा अर्थ लावला गेला तर कलम १०५ (२) अन्वये दिलेली सूट ही सदस्याने संसदेत किंवा त्यातील कोणत्याही समितीत बोललेल्या किंवा दिलेल्या मतदानामुळे उद्भवलेल्या किंवा कारणीभूत असलेल्या दायित्वापुरती मर्यादित असेल. हे संरक्षण तेव्हाच मिळेल जेव्हा केलेले भाषण किंवा दिलेले मत हे जबाबदारीला निर्माण करणाऱ्या (जन्म देणाऱ्या) कार्यवाहीच्या कृतीच्या कारणाचा आवश्यक

आणि अविभाज्य भाग असेल .संसदेत एखाद्या सदस्याने भाषण करण्यापूर्वी किंवा मत देण्यापूर्वी च्या कृतीच्या उत्तरदायित्वापासून संरक्षण देण्यास सूट उपलब्ध होणार नाही, जरी त्याचा सदस्याने केलेल्या भाषणाशी किंवा मताशी संबंध असू शकतो आणि अशा कृतीमुळे स्वतंत्रपणे उद्भवणारी जबाबदारी निर्माण होते आणि संसदेत सदस्याने भाषण देण्यावर किंवा मत देण्यावर अवलंबून नसते. असे स्वतंत्र दायित्व सदस्याने संसदेत सांगितलेल्या किंवा दिलेल्या मताच्या संदर्भात दायित्व मानले जाऊ शकत नाही. अनुच्छेद १०५ (२) अन्वये ज्या जबाबदारीसाठी सूट मागता येते,ती म्हणजे संसदेत केलेल्या भाषणामुळे किंवा दिलेल्या मतदानामुळे निर्माण झालेली जबाबदारी होय.

"

107. लाचखोरीचा गुन्हा पैसे स्वीकारल्यावर किंवा पैसे स्वीकारण्याचा

करार पूर्ण केल्यावर पूर्ण होतो. ज्या आश्वासनासाठी पैसे दिले जातात किंवा देण्याचे मान्य केले जाते त्या आश्वासनाच्या पूर्ततेवर गुन्हा अवलंबून नसतो. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) मधील अल्पसंख्याक मताने आपले मत दुसऱ्या दृष्टीकोनावर आधारित केले जे बहुसंख्याकांनी हाताळले नाही. सभागृहात भाषण देण्यापूर्वी किंवा मतदान करण्यापूर्वी बेकायदा लाच घेणे म्हणजे लाचखोरीचे कृत्य असल्याचे अल्पसंख्याकांचे मत आहे. "च्या संदर्भात" या शब्दांचा अर्थ "त्यातून उद्भवलेला" असा अर्थ लावत अल्पसंख्याकांनी असा निष्कर्ष काढला की लाचखोरीचा गुन्हा बेकायदेशीर आश्वासनाच्या पूर्ततेवर अवलंबून नाही. अल्पसंख्याकांनी असे निरीक्षण केले की:

> "**50.** ... अनुच्छेद १०५ (२) मधील "च्या संदर्भात" हा शब्द असा प्रश्न उपस्थित करतो की, सभागृहासमोर विचाराधीन असलेल्या विषयावर संसदेत विशिष्ट पद्धतीने बोलण्याच्या किंवा मत देण्याच्या हेतूने संसद

सदस्याने लाच स्वीकारल्यामुळे उद्भवणारी न्यायालयात खटला दाखल करण्याची होणारी कारवाई ही स्वतंत्र जबाबदारी आहे का, जी संसदेतील सदस्याने सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीतून किंवा दिलेल्या कोणत्याही मतातून उद्भवली असे म्हणता येणार नाही का? आमच्या मते या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले पाहिजे. एखाद्या विशिष्ट मार्गाने काम करण्याचे आश्वासन देऊन पैसे घेतल्यास किंवा घेण्यास तयार झाल्यास प्राप्तकर्त्याविरुद्ध लाचखोरीचा गुन्हा झाला असे म्हणता येते. गुन्हा पैसे स्वीकारल्याने किंवा पैसे स्वीकारण्याचा करार झाल्यावर पूर्ण होतो आणि प्राप्तकर्त्याने दिलेल्या बेकायदेशीर आश्वासनाच्या कामगिरीवर अवलंबून नसतो. पैसे घेणाऱ्याने बेकायदेशीर सौदेबाजी प्रमाणे कृत्य केले नाही केली तरीही त्याने गुन्हा केला आहे असे मानले जाईल.

लाचखोरीचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी फक्त एवढेच सिद्ध करणे आवश्यक आहे की, गुन्हेगाराने विशिष्ट मार्गाने काम करण्याचे वचन देऊन पैसे घेतले आहेत किंवा स्वीकारण्यास सहमती दर्शविली आहे आणि त्यापुढे जाऊन त्याने खरोखरच तसे कृत्य केले आहे हे सिद्ध करण्याची आवश्यकता नाही."

108. या न्यायालयाच्या घटनापीठाने किहोतो होलोहान विरुद्ध झचिल्हू{57} या खटल्यात भारतीय राज्यघटनेत दहावी अनुसूची जाहीर (दाखल) करणाऱ्या घटना (५२ वी दुरुस्ती) अधिनियम १९८५ च्या वैधतेवर निर्णय देताना,कलम १०५ च्या उपकलम (२) अन्वये संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे उल्लंघन होत नाही, असे मत व्यक्त केले. या न्यायालयाने या तरतुदीचा अर्थ असा केला की फ्लोअर क्रॉसिंगच्या राजकीयदृष्ट्या पापी(वाईट)कृत्याला राज्यघटनेनुसार परवानगी नाही किंवा त्याला सूटही नाही. या न्यायालयाने असे म्हटले आहे की:

"**40.** सदस्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे निरंकुश स्वातंत्र्य नाही. त्याशिवाय, दहाव्या अनुसूचीतील तरतुदींमध्ये सभागृहाच्या सदस्याने संसदेत सांगितलेल्या (बोललेल्या) कोणत्याही गोष्टीसाठी किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही मतासाठी कोणत्याही 'न्यायालयात' उत्तरदायी ठरविण्याचा हेतू नाही. अनुच्छेद १०५ (२) हे तत्त्वहीन फरशी ओलांडण्याच्या परिणामांपासून मुक्तीचे स्त्रोत कसे आहे याची कल्पना करणे कठीण आहे.

...

43.संसदीय लोकशाहीमध्ये सरकारच्या धोरणांच्या अंमलबजावणीशी संबंधित बाबींवर लोकप्रतिनिधींनी चर्चा केली पाहिजे, अशी कल्पना आहे. त्यामुळे वादविवाद, चर्चा आणि अनुनय ही लोकशाही

प्रक्रियेची साधने आणि सार आहे. चर्चेदरम्यान सदस्य वेगवेगळी मते मांडतात . एकाच राजकीय पक्षाच्या सदस्यांमध्ये एखाद्या विषयावर मतभिन्नता असू शकते आणि व्यक्त ही होऊ शकते . बरेचदा,सभागृहात सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांमुळे विचाराधीन प्रस्तावांमध्ये भरीव बदल झाले आहेत आणि माघारही घेण्यात आले आहेत. अशा प्रकारे विविध दृष्टिकोनांची चर्चा आणि अभिव्यक्ती संसदीय लोकशाहीच्या कामकाजात एक आवश्यक आणि निरोगी हेतू साध्य करते. कांही वेळा सभागृहात चर्चेदरम्यान अशा प्रकारे विचार व्यक्त केल्यास , सभागृहात,पक्षाच्या विचारापेक्षा वेगळे मतदान होऊ शकते किंवा मतदान टाळले जाऊ शकते.

III. लाचखोरीच्या आरोपांवर न्यायालये आणि सभागृह समांतर अधिकारक्षेत्र वापरतात

109. लाचखोर सदस्यांवर शिस्त लावण्यासाठी सभागृहाने आपल्या अधिकारांचा वापर करून लाचखोरीला विशेषाधिकारभंग मानले आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याच्या वतीने विद्वान ज्येष्ठ वकील श्री राजू रामचंद्रन यांनी केला आहे. संसदेच्या सभागृहात मतदान, भाषण किंवा वर्तनाबद्दलची सूट कोणत्याही प्रकारे दोषी सदस्यांना निर्दोष किंवा मंजुरीपासून मुक्त ठेवत नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. अशा सदस्यांना सभागृहातून हकालपट्टी करण्यासह शिक्षा करण्यात आली आहे. श्री रामचंद्रन यांनी सभागृहाने लाच घेतलेल्या सदस्यांवर केलेल्या कारवाईची अनेक उदाहरणे दिली. भारतातील संसदीय विशेषाधिकारांच्या इतिहासाच्या आमच्या विवेचनात, ब्रिटनमधील (युके) हाऊस ऑफ कॉमन्सने सुरुवातीला लाच घेणे हे विशेषाधिकारभंग कसे मानले होते हे आम्ही स्पष्ट केले आहे. ब्रिटनमधील कायद्याच्या

स्थितीच्या आधारे ब्रिटिश सरकार भारतातील स्थितीबद्दल अनिश्चित होते, परंतु स्पष्ट वैधानिक कायद्याअभावी ते विशेषाधिकारभंगाचा विषय मानले गेले. १९२४ मध्ये सुधारणा चौकशी समितीच्या अहवालात लाचखोरीला दंडात्मक गुन्हा ठरवण्याची शिफारस करण्यात आली होती, जेणेकरून सदस्यांवर न्यायालयात गुन्ह्यांसाठी खटला चालवता येईल.

110. लाचखोरीचा मुद्दा हा सभागृहाच्या लाचखोर सदस्यांवरील केवळ सभागृहाच्या अधिकारक्षेत्राचा नाही. लाच घेतल्याबद्दल सदस्याने केलेल्या अवमानाविरुद्ध सभागृहाने कारवाई करण्याचा हेतू फौजदारी खटल्यापेक्षा वेगळा हेतू साध्य करतो. सभागृह जी कारवाई करू शकते, त्याचा हेतू त्याची प्रतिष्ठा परत मिळवणे हा असतो. अशा कारवाईमुळे सभागृहाच्या सदस्यत्वातून त्या सदस्याची हकालपट्टी होऊ शकते आणि कायद्याने अपेक्षित असलेले इतर परिणाम असू शकतात. फौजदारी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याया विरुद्ध एखाद्या गुन्ह्यासाठी फौजदारी

खटला हा विशिष्ट क्षेत्रात काम करतो. फौजदारी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या गुन्हेगारांवर खटला चालविण्याच्या राज्याच्या अधिकारातून गुन्हेगारी चुकीची शिक्षा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. देशाच्या फौजदारी कायद्याच्या निर्बंधांच्या अधीन राहून नंतरचा उत्तरार्ध सर्वांना समानपणे लागू होतो. दोन्ही अधिकारक्षेत्रांचा उद्देश, परिणाम आणि निष्पत्ती वेगवेगळे आहेत. फौजदारी खटला सभागृहाचा अवमान करण्यापेक्षा वेगळा असतो कारण तो प्रक्रियात्मक संरक्षण, पुराव्यांचे नियम आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनी पूर्णपणे आच्छादित केलेला असतो.

111. त्यामुळे देशाच्या फौजदारी कायद्यानुसार एखाद्या गुन्ह्यासाठी खटला चालविणे हे फौजदारी न्यायालयाचे अधिकारक्षेत्र, सभागृहाच्या अधिकारक्षेत्रामुळे वगळण्यात आले आहे, याबद्दल आम्ही श्री रामचंद्रन यांच्याशी असहमत आहोत. कलम १०५ च्या उपकलम (२) अन्वये लाचखोरी मुक्त नाही, या वरील निष्कर्षामुळे आम्ही असे मानतो. लाचखोरीत गुंतलेला सदस्य

असा गुन्हा करतो ज्याचा त्यांच्या मतदानाच्या क्षमतेशी किंवा त्यांच्या मतावर निर्णय घेण्याच्या क्षमतेशी संबंध नसतो. या कृतीमुळे संसदेच्या सभागृहाची किंवा विधिमंडळाची बदनामी होऊ शकते आणि त्यामुळे खटलाही चालू शकतो. संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या सदस्याच्या आवश्यक आणि गरजेच्या कामांना दिलेली सुट याला ते लागू होत नाही.

112. आपण न्यायमूर्ती एस सी अग्रवाल, यांच्या मताचा ज्यात ते अल्पमतात होते पण त्याच मतावर पोहोचले, या मताचा संदर्भ घेऊ शकतो :

> "**45.** संसदेच्या कामकाजासंदर्भात लाच स्वीकारल्याचे आढळलेल्या सदस्याला सभागृहाकडून अवमानाची शिक्षा होऊ शकते, ही खरे असल्याबद्दल शंका नाही. पण तो समाधानकारक तोडगा नाही. अवमानाबद्दल शिक्षा करण्याच्या अधिकाराचा वापर करून हाऊस

ऑफ कॉमन्स एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवू शकते आणि कारावासाची शिक्षा देऊ शकते आणि सभागृहाच्या सेवेतून हकालपट्टी किंवा निलंबनाचे आदेश देखील देऊ शकते. दंड आकारण्याचा मात्र अधिकार नाही. अधिवेशनाच्या कालावधीपेक्षा जास्त काळापेक्षा कोठडीत पाठविण्याचा अधिकार असू शकत नाही आणि सभागृहाने लवकर सुटका न केल्यास त्या व्यक्तीची सत्र समाप्तीनंतर ताबडतोब तुरुंगातून सुटका केली जाते. (पहा: मे यांची संसदीय प्रथा, २१ वी आवृत्ती, पृ. १०३, १०९ आणि १११.) भारतातील संसदेची सभागृहे यापेक्षा जास्त (उच्च) अधिकाराचा दावा करू शकत नाहीत. सॅल्मन कमिशनने म्हटले आहे की, "एखाद्या व्यक्तीला ताब्यात घेण्याचा सभागृहाचा सैद्धांतिक अधिकार निःसंशयपणे अस्तित्वात आहे, परंतु शंभर वर्षांपासून किंवा तसे

संसदेचा अवमान केल्याबद्दल कोणालाही तुरुंगात डांबले गेले नाही आणि आधुनिक परिस्थितीत संसद या अधिकाराचा वापर करेल याची शक्यता नाही". (परिच्छेद ३०६) या प्रकारच्या चौकशीसाठी आवश्यक असणारे विशेष कौशल्य लक्षात घेता विशेषाधिकार समिती ही पोलिस तपासासारखी तपास यंत्रणा पुरवत नाही, असे मतही सॅल्मन आयोगाने व्यक्त केले आहे."

(जोर दिला आहे)

113. त्यामुळे कलम १०५ चे उपकलम (२) कोणत्याही व्यक्तीला लाचखोरीच्या विरोधात सूट देत नाही, कारण बेकायदा लाच मिळविणे किंवा लाच मिळविण्यासाठी करार करणे हे सदस्याच्या सभागृहात बोलणे किंवा मतदान करणे या कार्या "च्या संदर्भात" नाही, असे आमचे म्हणणे आहे. लाचखोरीचा खटला फौजदारी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातून वगळला जात नाही निव्वळ या

कारणासाठी की सभागृह त्याला अवमान किंवा विशेषाधिकाराचा भंग म्हणून देखील मानू शकते.

IV. निकाल देणे हे लाचखोरीच्या गुन्ह्याशी अप्रासंगिक आहे

114. आणखी एक पैलू विचारार्थ उभा राहतो तो म्हणजे लाचखोरीचा गुन्हा कोणत्या टप्प्यावर पूर्ण होतो (स्थिर स्वरूपात येतो) . हा गुन्हा विधिमंडळाबाहेर पूर्ण होत असून तो भाषण किंवा मतदानावर 'अवलंबित नाही' असा आग्रह सॉलिसिटर जनरलयांनी केला आहे. त्यामुळे विशेषाधिकाराचा प्रश्न प्रथम उद्भवत नाही आणि या प्रश्नाचे उत्तर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ मधील तरतुदींद्वारे दिले आहे . त्याचप्रमाणे संसदेत मतदान करण्याच्या किंवा भाषण देण्याच्या बऱ्याच आधी म्हणजे लाच मिळाल्यावर लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो, असा युक्तिवाद विद्वान ज्येष्ठ वकील श्री गोपाळ शंकरनारायण यांनी केला आहे. आश्वासनाची पूर्तता करणे याचा होत असलेल्या गुन्ह्याशी संबंध

नाही, असे ठामपणे सांगण्यात आले आहे, आणि म्हणूनच पी व्ही नरसिंह राव (सु प्रा) यांच्या केस मध्ये दाखविलेला फरक पूर्णपणे कृत्रिम आहे.

115. विशेष म्हणजे पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या बहुमताच्या निकालात या प्रश्नाचा अजिबात विचार करण्यात आलेला नाही. दुसरीकडे, अल्पसंख्याक निर्णयात या पैलूची चर्चा केली आहे आणि नमूद केले आहे की गुन्हा पैसे स्वीकारल्यावर किंवा पैसे स्वीकारण्याचा करार पूर्ण झाल्यावर पूर्ण होतो आणि प्राप्तकर्त्याने दिलेल्या बेकायदेशीर आश्वासनाच्या कामगिरीवर अवलंबून नाही. न्यायमूर्ती अग्रवाल, यांनी असे निरीक्षण नोंदवले की :

> "**50.** अनुच्छेद १०५ (२) मधील "च्या संदर्भात" या अभिव्यक्तीवर आम्ही काढलेला अर्थ हा प्रश्न उपस्थित करतो की: सभागृहासमोर विचाराधीन असलेल्या

विषयावर संसदेत विशिष्ट पद्धतीने बोलण्याच्या किंवा मत देण्याच्या हेतूने संसद सदस्याने लाच स्वीकारल्यामुळे न्यायालयात खटला चालविण्याची होणारी कारवाई ही एक स्वतंत्र जबाबदारी आहे का, जी सदस्याने संसदेत बोलल्या गेलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा दिलेल्या कोणत्याही मतातून उद्भवली असे म्हणता येणार नाही ? आमच्या मते या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले पाहिजे. एखाद्या विशिष्ट मार्गाने काम करण्याचे आश्वासन देऊन पैसे घेतल्यास किंवा घेण्यास तयार झाल्यास प्राप्तकर्त्याविरुद्ध लाचखोरीचा गुन्हा होतो. गुन्हा पैसे स्वीकारल्याने किंवा पैसे स्वीकारण्याचा करार झाल्यावर पूर्ण होतो आणि प्राप्तकर्त्याने दिलेल्या बेकायदेशीर आश्वासनाच्या कामगिरीवर अवलंबून नसतो. पैसे घेणाऱ्याने बेकायदेशीर सौदेबाजी प्रमाणे कृत्य केले नाही तरीही

त्याने गुन्हा केला आहे असे मानले जाईल. लाचखोरीचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी फक्त एवढेच सिद्ध करणे आवश्यक आहे की गुन्हेगाराने विशिष्ट मार्गाने काम करण्याचे वचन देऊन पैसे प्राप्त केले आहेत किंवा स्वीकारण्यास सहमती दर्शविली आहे आणि त्यापुढे जाऊन त्याने खरोखरच तसे कृत्य केले आहे हे सिद्ध करण्याची आवश्यकता नाही."

(जोर दिला आहे)

116. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम ७ खालीलप्रमाणे आहे :

"7. लोकसेवकाला लाच दिल्याचा गुन्हा . - कोणताही लोकसेवक जो, -

(a) सार्वजनिक कर्तव्य अयोग्यरित्या किंवा अप्रामाणिकपणे पार पाडण्याच्या

हेतूने किंवा त्याचे कारण होण्याकरिता किंवा असे कर्तव्य करण्यापासून दूर राहणे किंवा असे काम करण्यापासून दूर राहण्याचे कारण होणे यासाठी स्वत: किंवा दुसऱ्या लोकसेवकाद्वारे कोणत्याही व्यक्तीकडून अनुचित लाभ मिळविणे किंवा स्वीकारणे किंवा मिळविण्याचा प्रयत्न करणे; किंवा

(b) सार्वजनिक कर्तव्याच्या अयोग्य किंवा अप्रामाणिक कामगिरीचे किंवा कामगिरी करण्यापासून दूर राहण्याचे बक्षीस म्हणून स्वत: किंवा दुसऱ्या लोकसेवकाद्वारे म्हणून कोणत्याही व्यक्तीकडून अवाजवी लाभ मिळविणे किंवा स्वीकारणे किंवा मिळविण्याचा

प्रयत्न करणे; किंवा

(c) स्वतः किंवा दुसऱ्या लोकसेवकाला सार्वजनिक कर्तव्य चुकीच्या पद्धतीने किंवा अप्रामाणिकपणे पार पाडण्यास प्रवृत्त करणे किंवा असे कर्तव्य पार पाडण्यापासून दूर राहण्यासाठी, कोणत्याही व्यक्तीकडून अनुचित लाभ घेण्याच्या अपेक्षेने किंवा परिणामी, याबद्दल कमीत कमी तीन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल परंतु हा कारावास सात वर्षांपर्यंत वाढू शकतो आणि दंडदेखील होऊ शकतो.

स्पष्टीकरण १. —या कलमाच्या हेतूने, लोकसेवकाने सार्वजनिक कर्तव्य पार पाडणे अयोग्य असले किंवा नसले तरीही अवाजवी लाभ मिळविणे, स्वीकारणे किंवा मिळविण्याचा प्रयत्न करणे हेच (स्वतःच) गुन्हा

ठरेल.

उदाहरणार्थ _ एक लोकसेवक, 'एस' एका व्यक्तीला 'प' सांगतो की त्याच्या नियमित शिधापत्रिका अर्जावर वेळेत प्रक्रिया करण्यासाठी त्याला पाच हजार रुपयांची रक्कम देण्यास सांगतो. या कलमांतर्गत 'एस' गुन्ह्यात दोषी आहे.

स्पष्टीकरण २.—या कलमाच्या हेतूने,—

(1) "प्राप्त करणे " किंवा "स्वीकारणे" किंवा "मिळविण्याचा प्रयत्न करणे" या अभिव्यक्तींमध्ये अशा प्रकरणांचा समावेश असेल जिथे एखादी व्यक्ती लोकसेवक म्हणून आपल्या पदाचा गैरवापर करून किंवा दुसऱ्या लोकसेवकावर आपला वैयक्तिक प्रभाव वापरून किंवा इतर कोणत्याही भ्रष्ट किंवा बेकायदेशीर मार्गाने, स्वत:

साठी किंवा दुसऱ्या व्यक्तीसाठी कोणताही अनुचित फायदा मिळवते किंवा "स्वीकारते" किंवा मिळवण्याचा प्रयत्न करते;

(2) अशी व्यक्ती लोकसेवक असल्याने थेट किंवा तृतीय पक्षामार्फत अवाजवी लाभ मिळवते किंवा स्वीकारते किंवा मिळवण्याचा प्रयत्न करते, हे महत्त्वाचे ठरणार नाही."

(जोर दिला आहे)

117. पीसी कायद्याच्या कलम ७ अन्वये,एखाद्या विशिष्ट मार्गाने वागणे किंवा वागण्यापासून परावृत्त करण्याच्या हेतूने केवळ "मिळविणे", "स्वीकारणे" किंवा अवाजवी फायदा मिळविण्याचा "प्रयत्न करणे" गुन्हा पूर्ण करण्यासाठी पुरेसे आहे. ज्या कामासाठी लाच दिली जाते, ती कृती प्रत्यक्षात करावी, असे गरजेचे नाही. या तरतुदीचे पहिले स्पष्टीकरण अशा अर्थाला अधिक बळकटी

देते,जेव्हा त्यात स्पष्टपणे म्हटले आहे की लोकसेवकाने सार्वजनिक कर्तव्य पार पाडणे अयोग्य नसले तरी अवाजवी लाभ "मिळविणे, स्वीकारणे किंवा प्रयत्न करणे" हेच (हा स्वत:)गुन्हा ठरेल. त्यामुळे एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला लाच दिल्याचा गुन्हा हा अवाजवी लाभ मिळविणे किंवा स्वीकारण्यास सहमती दर्शविणे याच्याशी जोडला आहे, आणि ज्या कृत्यासाठी अवाजवी लाभ मिळविला आहे त्या कृत्याच्या प्रत्यक्ष कामगिरीशी नाही.

118. एखाद्या कलमाला जोडलेली उदाहरणे वैधानिक तरतुदीच्या मजकुराचा अर्थ लावताना मोलाची आणि प्रासंगिक असतात आणि म्हणून त्या कलमाच्या विरोधात म्हणून सहजपणे नाकारता कामा नयेत, हा आम (प्रचारातील) कायदा आहे.[58] लाचेच्या देवाणघेवाणीवर लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो आणि त्यासाठी त्या कामाच्या प्रत्यक्ष कामगिरीची आवश्यकता नसते, असा अर्थ लावण्यास पहिल्या स्पष्टीकरणाचे उदाहरण आपल्याला मदत

करते. यात अशी परिस्थिती दाखविली आहे की,त्यात "लोकसेवक, 'एस' एका व्यक्तीला 'पी' त्याच्या नियमित शिधापत्रिका अर्जावर वेळेत प्रक्रिया करण्यासाठी पाच हजार रुपयांची रक्कम देण्यास सांगतो. एस' या कलमांतर्गत गुन्ह्यासाठी दोषी आहे." 'एस'ने रेशनकार्डच्या अर्जावर वेळीच प्रक्रिया केली की नाही, याची पर्वा न करता, यात लाचखोरीचा गुन्हा होतो,हे स्पष्ट आहे . त्याचप्रमाणे लाच स्वीकारणाऱ्या आमदाराच्या मांडणीत ती ठरलेल्या दिशेला मतदान करते की निव्वळ मतदान करते, याने अजिबात फरक पडत नाही. ज्या वेळी ती लाच स्वीकारते, त्याच वेळेस लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो.

119. 2017 मध्ये पीसी कायद्यात सुधारणा होण्यापूर्वीही कलम 7 मध्ये लाचखोरीच्या गुन्ह्याला ज्या कृत्यासाठी अवाजवी लाभ मिळतो त्याच्या प्रत्यक्ष कामगिरीपासून स्पष्टपणे वेगळे करण्यात आले होते.ती तरतुद खालीलप्रमाणे आहे:

"७. कार्यालयीन कामाच्या संदर्भात कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त अन्य लाच घेणारे लोकसेवक. –

जो कोणी लोकसेवक आहे किंवा त्याची अपेक्षा करतो, तो कोणत्याही व्यक्तीकडून, स्वतःसाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी, कायदेशीर मोबदला वगळता, कोणतेही अधिकृत कृत्य करण्यासाठी किंवा करण्याचे दूर ठेवण्यासाठी किंवा दाखविण्यासाठी किंवा न दाखविण्यासाठी हेतू किंवा बक्षीस म्हणून कोणतीही लाच स्वीकारतो किंवा मिळवितो किंवा स्वीकारण्याचा करार करतो किंवा मिळविण्याचा प्रयत्न करतो, व त्याच्या अधिकृत कार्याचा वापर करताना, केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा संसद किंवा कोणत्याही राज्याच्या विधिमंडळाबरोबर किंवा कलम 2 च्या उपकलम (सी) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरण, महामंडळ किंवा सरकारी

कंपनीबरोबर किंवा लोकसेवकाबरोबर मग त्याचे नाव असो वा अन्यथा कोणत्याही व्यक्तीला कोणतीही लाभ किंवा हानी पोहोचवितो, देतो, किंवा सेवा किंवा हानी पोहोचविण्याचा प्रयत्न करतो , त्याला कमीत कमी सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते परंतु ती सात वर्षांपर्यंत वाढू शकते आणि ती दंडास देखील पात्र असेल.

स्पष्टीकरण —

...

(ड) "करण्याचा हेतू किंवा बक्षीस". एखाद्या व्यक्तीला जे करायचे नाही किंवा जे करायची परिस्थिती नाही किंवा केले नाही ते केल्याबद्दल हेतू किंवा बक्षीस म्हणून लाच प्राप्त करणारी व्यक्ती या अभिव्यक्तीच्या आत येते.

..."

(जोर दिला आहे)

120. पीसी कायद्याच्या कलम ७ मधील सुधारित न केलेला मजकूर सुद्धा असे सूचित करतो की बेकायदेशीर लाच "स्वीकारणे", "मिळविणे", "स्वीकारण्यास सहमत होणे" किंवा "घेण्यास (मिळविण्यास)सहमत होणे" ही एक पुरेशी अट आहे. ज्या कामासाठी लाच दिली जाते, ते कृत्य (काम)प्रत्यक्षात करण्याची गरज नसते. या तरतुदीचे स्पष्टीकरण (ड) द्वारे याला आणखी स्पष्ट करण्यात आले. 'करण्याचा हेतू किंवा बक्षीस' या वाक्याचे स्पष्टीकरण देताना असे स्पष्ट करण्यात आले की, लाच प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला ज्या कृतीसाठी किंवा चूकीसाठी हेतू/बक्षीस मिळते ते करण्याची किंवा न करण्याची इच्छा किंवा स्थिती असण्याची आवश्यकता नाही.

121. चतुर्दास भगवानदास पटेल विरुद्ध गुजरात राज्य या खटल्यात

{59} या न्यायालयाच्या दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने पुनरुच्चार केला की, लाचखोरीचा गुन्हा ठरविण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्याने आपल्या पदाचा वापर करून बेकायदेशीर लाच वसूल करणे ही पुरेशी अट आहे. अशा परिस्थितीत, लोकसेवकाला खरोखरच पक्षपातीपणाचे किंवा अपक्षपातीपणाचे कोणतेही अधिकृत कृत्य करायचे होते काय,याचा विचार करणे न्यायालयाला आवश्यक नाही. या प्रकरणातील वस्तुस्थितीत लोकसेवकाने तक्रारदाराला अपहरणाच्या आरोपातून मुक्त होण्यासाठी लाच देण्यास प्रवृत्त केले. अपहरणाप्रकरणी फिर्यादीविरोधात कोणतीही तक्रारही दाखल करण्यात आली नसल्याचे नंतर उघड झाले. मात्र, लाच घेणाऱ्याने ज्या कामासाठी लाच घेतली होती, ती कृती केली की नाही, याची पर्वा न करता केवळ बेकायदा लाच मागणे आणि स्वीकारणे पुरेसे आहे, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

122. नुकतेच नीरज दत्ता विरुद्ध राज्य (एनसीटी ऑफ दिल्ली){60} या प्रकरणात घटनापीठाने पीसी कायद्याच्या कलम ७ अन्वये

लाचखोरीच्या गुन्ह्यातील घटक घटकांची यादी केली (२०१७ मधील दुरुस्तीपूर्वी ती जशी होती). न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी गुन्हा घडण्यासाठीचे घटक तयार केले:

"5. या कायद्याच्या कलम 7 चे घटक खालीलप्रमाणे आहेत:

(1) आरोपी लोकसेवक असावा किंवा लोकसेवक होण्याची अपेक्षा करत असावा ;

(2) त्याने कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारणे किंवा मिळवणे किंवा स्वीकारण्यासाठी कबूल करणे किंवा मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे ;

(3) स्वतःसाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी;

(4) कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त इतर कोणतीही लाच; आणि

(5) कोणतेही अधिकृत कृत्य करणे किंवा करण्यापासून परावृत्त होणे किंवा कोणतीही मेहेरबानी किंवा

अवकृपा दर्शविण्याचा हेतू किंवा बक्षीस म्हणून."

परिणामी, अधिकृत कृत्य प्रत्यक्ष "करणे किंवा करण्यापासून दूर राहणे " हा गुन्ह्याचा घटक भाग नाही. गरज फक्त एवढीच आहे की बेकायदेशीर लाच अशा कृतीसाठी किंवा न करण्यासाठी "हेतू किंवा बक्षीस" म्हणून मिळवली जावी - ती प्रत्यक्षात केली गेली की नाही हे अप्रासंगिक आहे.

---

59. (1976)3 एस सी आर 1052: (1976)3 एस सी सी 46

60. (2023)2 एस सी आर 997: (2023)4 एस सी सी 731

---

123. सुनावणीदरम्यान यासंदर्भात एक काल्पनिक प्रश्न निर्माण झाला. विधिमंडळाच्या आवारात लाचेची देवाणघेवाण झाली असताना च्या परिस्थितीत काय होते? आता हा गुन्हा संसदीय विशेषाधिकाराच्या कक्षेत येईल का? हा प्रश्न चुकीचा वाटतो. जेव्हा हे न्यायालय असे

मानते की लाचखोरीचा गुन्हा अवाजवी फायदा स्वीकारण्यावर किंवा स्वीकारण्याच्या प्रयत्नावर पूर्ण होतो आणि तो भाषण किंवा मतावर अवलंबून नाही, तेव्हा तो आपोआपच गुन्ह्याला कलम 105 (2) आणि 194 (2) च्या कक्षेबाहेर ढकलतो. याचे कारण अवाजवी लाभाचा स्वीकार विधिमंडळाबाहेर झाला म्हणून नाही तर तो गुन्हा कलम १०५ (२) आणि १९४ (२) द्वारे संरक्षित "मत किंवा भाषण" पासून स्वतंत्र आहे. संसदीय विशेषाधिकाराची व्याप्ती 'मतदान' किंवा 'भाषण' करण्याच्या आणि संसदीय कामकाजाच्या व्यवहाराशी असलेल्या संबंधाशी गुंतागुंतीने निगडित आहे.

124. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) या केसच्या बहुमताच्या निकालात लाचखोरीचा गुन्हा कधी पूर्ण होतो किंवा गुन्ह्यातील घटक घटकांचा विचार करण्यात आलेला नाही. मात्र, या प्रकरणातील वस्तुस्थितीवर बहुमताने असे म्हटले की, ज्या खासदारांनी सहमतीनुसार मतदान केले त्यांना सूट लागू होते , तर ज्यांनी अजिबात मतदान केले नाही (अजित सिंह) त्यांना कलम

१०५ (२) आणि १९४ (२) अन्वये सूट लागू होत नाही . हे चुकीच्या पद्धतीने लाचखोरीच्या गुन्ह्याचा संबंध कामगिरी करण्याशी जोडते. किंबहुना, या निकालातही उच्च न्यायालयाने या भूमिकेचा आधार घेत अपीलकर्त्याला सुट मिळत नाही असा अर्थ काढला कारण शेवटी तिने ठरल्याप्रमाणे मतदान केले नाही आणि आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मतदान केले.

125. पी व्ही नरसिंह राव (सुप्रा) या केस मधील बहुमताच्या निर्णयातील कायद्याचे आकलन बेकायदेशीर लाच घेणारे आणि सौदेबाजीचा ठरल्याप्रमाणे शेवट पार पाडणारे आणि तेच बेकायदेशीर लाच घेणारे परंतु मान्य केलेले कार्य पार न पाडणारे यांच्यात कृत्रिम फरक निर्माण करतात. लाचखोरीचा गुन्हा मान्य केलेल्या कारवाईच्या कामगिरीवर अज्ञेयवादी आहे आणि बेकायदेशीर लाचेच्या देवाणघेवाणीवर आधारित आहे. बहुमताच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या विरोधाभासातील प्रथमदर्शनी अवास्तवताही अल्पसंख्याक निकालाने अधोरेखित

केली. न्यायमूर्ती अग्रवाल, यांनी निरीक्षण केले की:

> **"47.** [...] श्री.राव यांनी "च्या संदर्भात" या अभिव्यक्तीवर काढलेला अर्थ स्वीकारला तर एखाद्या सदस्याने सभागृहासमोर विचाराधीन विषयावर न बोलण्याबद्दल किंवा मत न देण्याबद्दल लाच स्वीकारल्यास त्याच्यावर लाचखोरीच्या आरोपाखाली खटला चालविला जाईल, परंतु एखाद्या विशिष्ट पद्धतीने संसदेत बोलण्यासाठी किंवा मत देण्यासाठी लाच स्वीकारल्यास आणि ठरल्याप्रमाणे जर संसदेत तो बोलला किंवा तसे मत त्याने दिले तर त्याला अशा आरोपासाठी खटल्यापासून सूट मिळेल. संसदेत विशिष्ट पद्धतीने बोलण्यासाठी किंवा मत देण्यासाठी लाच घेणारा आणि त्या पद्धतीने बोलणारा किंवा मत देणारा खासदार आणि सभागृहासमोर येणाऱ्या एखाद्या विशिष्ट विषयावर न बोलण्याबद्दल किंवा मत न

देण्याबद्दल लाच घेणारा खासदार आणि करारानुसार न बोलणारा किंवा आपले मत न देणारा, जेणेकरून आधीच्याला लाचखोरीच्या आरोपाखाली खटल्यापासून सूट मिळेल परंतु नंतरच्याला अशी सूट नाकारली जाईल, अशा प्रकारे यांच्यात सूट देण्याच्या बाबतीत राज्यघटनेच्या निर्मात्यांनी असा फरक करण्याचा हेतू ठेवला आहे, याची कल्पना करणे अवघड आहे. कलम १०५ (२) मधील "च्या संदर्भात" या शब्दांचा अर्थ "त्यातून उद्भवलेला" असा अर्थ लावला तर अशी विसंगत परिस्थिती टाळता येईल [...]"

(जोर दिला आहे)

126. खरे तर कलम १०५ (२) आणि १९४ (२) बहुमताच्या निकालात सुचविलेल्या पद्धतीने वाचल्यास विरोधाभासी परिणाम होतो. अशा अर्थाचा परिणाम असा होतो की, एखाद्या आमदाराने

लाच स्वीकारली आणि कबुल केल्याप्रमाणे त्या दिशेने मतदान करून पाठपुरावा केला तेव्हा त्याला सूट दिली जाते. दुसरीकडे, जो आमदार लाच स्वीकारण्यास तयार असेल, परंतु शेवटी स्वतंत्रपणे मतदान करण्याचा निर्णय घेईल त्याच्यावर कारवाई केली जाईल. असा अर्थ केवळ कलम १०५ आणि १९४ मधील मजकूरच नव्हे, तर विधिमंडळाच्या सदस्यांना संसदीय विशेषाधिकार प्रदान करण्याच्या हेतूलाही छेद देणारा आहे.

H. विशेषाधिकारांच्या तुलनेत लाचखोरीवर आंतरराष्ट्रीय भूमिका

127. वरील विवेचनात भारतातील संसदीय विशेषाधिकार या विषयावर नियंत्रण ठेवणारा कायदा आणि त्याचा लाचखोरीत गुंतलेल्या विधिमंडळाच्या सदस्यावर होणारा परिणाम स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतातील संसदीय विशेषाधिकारांची स्थिती अधोरेखित करण्यापूर्वी इतर न्यायक्षेत्रातील कायद्याचा अभ्यास करणे हा भारतातील या

विषयावरील बहुतेक निर्णयांचा विषय राहिला आहे. त्यानंतर भारतातील संसदीय विशेषाधिकारांविषयीचे न्यायशास्त्र स्वतःच विकसित झाले आहे आणि आम्ही या न्यायालयाच्या समृद्ध न्यायशास्त्राचा आणि भारतातील संसदीय विशेषाधिकारांच्या इतिहासाचा उल्लेख केला आहे. तथापि, पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) या केस मधील बहुसंख्य आणि अल्पसंख्याक दोन्ही निर्णय परकीय न्यायक्षेत्रातील न्यायशास्त्रावर मोठ्या प्रमाणात आधारित असल्याने, विशेषाधिकारांवरील कायद्याची उत्क्रांती आणि स्थिती थोडक्यात सांगणे योग्य ठरेल कारण ते इतर न्यायक्षेत्रात संसद सदस्याने घेतलेल्या लाचेच्या मुद्द्याशी संबंधित आहे. आपण प्रथम युनायटेड किंग्डममधील कायद्याच्या स्थितीकडे आपले लक्ष केंद्रित करू आणि त्यानंतर युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया.

I. युनायटेड किंगडम

128. आम्ही वर शोधल्याप्रमाणे, यूकेमधील संसदीय विशेषाधिकारांवरील कायदा ट्यूडर आणि स्टुअर्ट राजां (किंग्ज)बरोबर हाऊस ऑफ कॉमन्सच्या संघर्षानंतर विकसित केला गेला. राजा वि. सर जॉन इलियट,[61 या केस मध्ये] १६२९ मध्ये कॉमन्स आणि राजा यांच्यातील संघर्षाच्या शिखरावर असताना, किंग्ज बेंचने हाऊस ऑफ कॉमन्सचे तीन सदस्य, सर जॉन इलियट, डेन्जेल हॉलिस आणि बेंजामिन व्हॅलेंटाइन यांच्यावर देशद्रोही भाषण केल्याबद्दल व सार्वजनिक शांतता भंग केल्याबद्दल आणि सभागृहाचे कामकाज तहकूब होण्यापासून रोखण्यासाठी सभापतींना हिंसकपणे त्यांच्या जागेवरच ठेवल्याबद्दल खटला चालविला. संसद सदस्यांना दोषी ठरवण्यात आले, दंड ठोठावण्यात आला आणि तुरुंगात डांबण्यात आले. सर जॉन इलियट यांना एका टॉवरमध्ये कैद ठेवण्यासाठी पाठवण्यात आले जिथे त्यांची तब्येत खालावली आणि शेवटी त्यांचे निधन

झाले. खटल्याचा अहवाल १६६७ मध्ये प्रसिद्ध झाला आणि हाऊस ऑफ कॉमन्स यांनी त्याची नोंद घेतली. हा निर्णय बेकायदेशीर आणि संसदेच्या विशेषाधिकारांच्या विरोधात असल्याचा ठराव सभागृहाने केला. डेन्जेल हॉलिस यांनी सादर केलेल्या त्रुटीच्या रिटवर हाऊस ऑफ लॉर्ड्सने किंग्ज बेंचचा निर्णय फिरविला (बदलला).

129. इ.स. १६८८ च्या गौरवशाली क्रांतीने स्टुअर्ट राजांपैकी शेवटचा जेम्स हद्दपार झाला (याला काढण्यात आले) व एका नव्या घराण्याची स्थापना झाली. या कडव्या संघर्षामुळे एक मजबूत घटनात्मक राजेशाही निर्माण झाली आणि हाऊस ऑफ कॉमन्सने शेवटी सार्वभौमत्व आणि काही विशेषाधिकार या दोन्हींचा दावा केला जो सभागृहाच्या चिकाटीमुळे आणि हळूहळू मान्यता मिळाल्यामुळे प्राचीन आणि निर्विवाद बनला. एर्स्किन मे यांनी नमूद केले आहे की:

"प्रत्येक संसदेच्या प्रारंभी अध्यक्षांनी त्यांच्या नावाने आणि कॉमन्सच्या वतीने त्यांच्या प्राचीन आणि निर्विवाद हक्क आणि विशेषाधिकारांवर नम्र याचिकेद्वारे दावा करण्याची प्रथा झाली आहे;

---

61. (1629)3 एसटी. टीआर. 294

विशेषतः वादविवादातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, अटकेपासून मुक्तता, प्रसंगी (जेव्हा गरज भासेल तेव्हा) महाराजांना प्रवेशाचे स्वातंत्र्य; आणि त्यांच्या सर्व कार्यवाहीवर सर्वात अनुकूल अन्वयार्थ काढण्यात यावा.}[62]

130. संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि खटल्यापासून सूट देणारे कलम बिल ऑफ राइट्स १६८९ मधून येते. हे कृत्य कायद्याच्या आधारे आपल्या दर्जावर दावा करण्यासाठी इंग्लंडमधील संसदेने

घेतलेला एक महत्त्वाचा घटनात्मक उपक्रम होता. हा कायदा संसदेला न्यायालयातील किंवा न्यायालयांच्या माध्यमातून शाही हस्तक्षेपापासून वाचवण्यासाठी होता. बिल ऑफ राइट्सच्या कलम ९ (IX)मध्ये असे म्हटले आहे:

> "संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वादविवाद किंवा कामकाजावर कोणत्याही न्यायालयात किंवा संसदेबाहेरील ठिकाणी महाभियोग चालवू नये किंवा त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करू नये."

हे कलम संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देते आणि संसदेबाहेरील कोणत्याही न्यायालयात किंवा ठिकाणी "महाभियोग किंवा चौकशी" होण्यापासून संरक्षण देते.

131. बिल ऑफ राइट्सच्या कलम ९(IX)चे दोन पैलू सुरुवातीला नमूद केले जाऊ शकतात. प्रथम, यूकेमध्ये कलम 9 (IX)अंतर्गत विशेषाधिकार केवळ वैयक्तिक सदस्यांना जोडलेला (करिता

)नाही. याने संसदेतील भाषण आणि वादविवाद किंवा कामकाज हे संरक्षित केले आहेत आणि त्यावर 'महाभियोग किंवा प्रश्नचिन्ह' केला जाणार नाही, अशी अट घातली आहे. दुसरे म्हणजे, कलम ९ (IX)नुसार संसदेतील कामकाजावर केवळ संसदेतच 'महाभियोग किंवा प्रश्नचिन्ह' करता येईल. यामुळे संसदीय कामकाजातील काही सामग्री (भाग) न्यायालयासमोर मांडता येतो कां आणि संसदेचे अधिकारक्षेत्र हे न्यायालयांचे अधिकारक्षेत्र काढून टाकते आहे काय , यावर चर्चा सुरू झाली. जसे आम्ही खाली स्पष्ट करू, जी स्थिती आहे ती,ब्रिटनमधील संसदीय कामकाजातील सामग्री (भाग)न्यायालयासमोर ठेवण्यास अनुमती देते, परंतु त्याचा वापर कारवाईमागील दुर्भावना दर्शविण्यासाठी किंवा तसा युक्तिवाद करण्यासाठी केला जात नसेल तर . ब्रिटनमधील न्यायालयांनी बिगर कायदेविषयक कामांसाठी आवश्यक असलेल्या संबंधांना संरक्षण देण्यासाठी संकुचित वाव दिला आहे. यामुळे लाच घेताना एखाद्या

सदस्याला शिस्त लावण्याचे संसदेचे अधिकार क्षेत्र आपोआप न्यायालयांचे अधिकारक्षेत्र कमी करत नाही , असा अर्थ काढण्यात आला आहे.

---

62. एर्स्किन मे यांचा संसदेचा कायदा,विशेषाधिकार, कार्यवाही आणि वापर यावरील प्रबंध, लेक्सिसनेक्सिस, **25** वी आवृत्ती

(2019)242.

---

132. संसदेत केलेल्या भाषणाला मिळालेली संसदीय सूट एक्स पार्टे वॅसनच्या**{63}**केसच्या बाबतीत लागू करण्यात आली,जिथे एका संसद सदस्यावर, खोटे असल्याचे माहित असलेले विधान करण्याचा कट रचल्याचा आरोप करण्यात आला. एका व्यक्तीने अर्ल रसेल यांना हाऊस ऑफ लॉर्ड्ससमोर हजर करण्यासाठी एक याचिका सादर केली

होती, ज्यात लॉर्ड चीफ बॅरन यांनी संसदीय समितीसमोर जाणूनबुजून खोटे बोलल्याचा आरोप केला होता. यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांनी,अशा प्रकारची हकालपट्टी करण्यासाठी केलेल्या अभिभाषणावर,लॉर्ड चीफ बॅरन यांना हटवावे लागले असते. अर्ल रसेल, लॉर्ड चेम्सफोर्ड आणि लॉर्ड चीफ बॅरन यांनी हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये भाषणे करण्याचा कट रचला की, आरोप खरे आहेत हे माहीत असूनही, खोटेपणाचे आरोप निराधार आहेत. संसदेत केलेले भाषण कोणतेही दोषारोपीय गुन्हा दाखवीत नाही, या कारणास्तव दंडाधिकाऱ्यांनी अर्जदाराची दखल घेण्यास नकार दिला. राणीच्या खंडपीठाने या आदेशावर शिक्कामोर्तब केले.

133. सरन्यायाधीश कॉकबर्न म्हणाले की, कोणत्याही सभागृहात केलेली भाषणे तिसऱ्या व्यक्तीच्या हितसंबंधांना इजा झाली तरी दिवाणी किंवा फौजदारी कारवाईला जन्म देऊ शकत नाहीत. या मताशी सहमती दर्शवत न्यायमूर्ती लश म्हणाले की:

> "[...] माझे स्पष्ट मत आहे की, कोणत्याही सभागृहातील सदस्यांनी सभागृहात जे काही केले किंवा बोलले त्यासंदर्भात फौजदारी कारवाईद्वारे त्यांच्या उद्देशांची किंवा हेतूंची चौकशी होऊ शकत नाही, अशी शंका आपण क्षणभरही घेऊ देऊ नये."

त्यामुळे दिवाणी किंवा फौजदारी कारवाईत न्यायालयासमोरील कोणत्याही कारवाईत सभागृहात केलेल्या भाषणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही आणि अशी कृत्ये करण्यामागील हेतूंवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही, असे राणीच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

134. लाचखोरीचा मुद्दा १८८९ पर्यंत केवळ सामान्य कायद्याने नियंत्रित होतं होता. वेगवेगळ्या कार्यालयांकडून होणारा भ्रष्टाचार आणि त्यांची कामे यांच्या आधारे वेगवेगळे कॉमन लॉ (सामान्य कायद्याचे)गुन्हे होत होते.केवळ स्थानिक

स्वराज्य संस्थांना लागू होणारा सार्वजनिक संस्था भ्रष्ट व्यवहार कायदा १८८९ ने भ्रष्टाचाराचा पहिला वैधानिक गुन्हा निर्माण केला. त्यानंतर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९०६ ने भ्रष्टाचाराचा गुन्हा खाजगी क्षेत्रापर्यंत वाढविला. यापैकी कोणत्याही कायद्यात संसद सदस्याने लाच स्वीकारल्याचा समावेश नव्हता.

---

63. (1969)4 क्यूबी 573

कायद्याअभावी संसद सदस्याने लाच घेण्याचा प्रश्न विशेषाधिकारभंगाचा प्रश्न राहिला होता आणि अशा भ्रष्टाचारावर कारवाई करण्याचे अधिकार केवळ सभागृहाला च होते.

135. लॉर्ड सॅल्मन यांच्या अध्यक्षतेखालील रॉयल कमिशन ऑन स्टँडर्ड्स ऑफ कंडक्ट इन पब्लिक लाइफ यांनी १९७६ मध्ये आपला अहवाल सादर केला, ज्यात इतर गोष्टींबरोबरच

"आपल्या संसदीय अधिकाराने काम करणाऱ्या खासदाराचा भ्रष्टाचार, लाचखोरी आणि लाचखोरीचा प्रयत्न फौजदारी कायद्याच्या कक्षेत" आणण्याची शिफारस करण्यात आली होती. हाऊस ऑफ लॉर्ड्सला आपला अहवाल सादर करताना लॉर्ड सॅल्मन म्हणाले:

> "माझ्या मते कायद्यासमोर समानता हा स्वातंत्र्याचा एक आधारस्तंभ आहे. एखाद्या खासदाराला लाच देण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि लाच स्वीकारणाऱ्या कोणत्याही खासदारावर फौजदारी कारवाईपासून सूट मिळणे हे बिल ऑफ राइट्समुळे होते, असे म्हणणे ही बहुधा गंभीर चूक आहे. बिल ऑफ राइट्समधील परिच्छेद असा आहे: "संसदेतील भाषण स्वातंत्र्य आणि वादविवाद किंवा कार्यवाही यावर कोणत्याही न्यायालयात किंवा संसदेबाहेर महाभियोग चालवू नये किंवा प्रश्न उपस्थित करू नये ." आता सभागृहातील अभिव्यक्ती

स्वातंत्र्याची ही सनद आहे. ही भ्रष्टाचाराची सनद नाही. माझ्या मते, बिल ऑफ राइट्स या विधेयकाबद्दल माझ्यापेक्षा जास्त आदर कुणालाच नाही , त्या विधेयकाचा, आपण ज्या विषयावर चर्चा करत आहोत त्याच्याशी,मर्चेंडाइज मार्क्स ॲक्टपेक्षा जास्तीचा संबंध नाही. लाच देऊ केल्या जाते किंवा दिली जाते किंवा मागितली जाते आणि घेतली जाते तेव्हा भ्रष्टाचाराचा गुन्हा पूर्ण होतो.

आम्ही शिफारस केली आहे की भ्रष्टाचाराशी संबंधित सर्व कायदे बदलून एक व्यापक कायदा आणला जावा ज्यामुळे सध्याच्या विसंगती दूर होतील. जर आपण एजंट नसाल - आणि या सभागृहाचे किंवा इतर ठिकाणचे संसद सदस्य एजंट नसतील - जर आपण सार्वजनिक संस्थेचे सदस्य नसाल (आणि आम्ही सार्वजनिक संस्थांचे सदस्य नाही) तर कायदे

आपल्याला स्पर्श करत नाहीत. कॉमन लॉमध्ये, तुम्ही एखादे पद धारण करत असल्याशिवाय तुम्हाला लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली दोषी ठरवता येत नाही आणि आपल्यापैकी बहुतेक जण पदाचे धारक नाहीत."

(जोर दिला आहे)

136. सॅल्मन अहवालाच्या या शिफारशीवर संसदेने कोणतीही कारवाई केली नाही. तथापि, आर विरुद्ध ग्रीनवे [64], संसद सदस्य यांच्यावर एका कंपनीच्या हितसंबंधांना मदत करण्यासाठी लाच स्वीकारल्याचा आरोप होता. खटला रद्द करण्यासाठी केस दाखल करण्यात आली. आपल्या कृतीला संसदीय विशेषाधिकारांनी संरक्षण दिले आहे, असे संसद सदस्यानी ठामपणे सांगितले. हा दावा (म्हणणे) फेटाळून लावताना न्यायमूर्ती बकले, म्हणाले की:

"ज्या खासदाराविरुद्ध भ्रष्टाचाराचा प्रथमदर्शनी खटला

आहे, त्याला न्यायालयात खटल्यापासून सूट दिली पाहिजे, हा माझ्या मते सध्याच्या घडीला अमान्य प्रस्ताव आहे. हा कायदा आहे असे मला वाटत नाही."

137. संसदेच्या अनेक सदस्यांनी केलेल्या गैरवर्तनाच्या आरोपानंतर आणखी एका आयोगाची स्थापना करण्यात आली. लॉर्ड नोलन यांच्या अध्यक्षतेखालील सार्वजनिक जीवनातील मानके विषयक स्थायी समितीने १९९४ मध्ये आपला अहवाल सादर केला. लाच घेणाऱ्या खासदारावर कोणाचे अधिकारक्षेत्र (कारवाई करण्यासाठी) असेल, अशी शंका या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. सभागृह आणि न्यायालय यांच्यातील अधिकारक्षेत्राचा प्रश्न सोडविण्यासाठी या अहवालात कायद्याच्या स्वरूपात संसदेकडून स्पष्टता आणण्याची शिफारस करण्यात आली आहे. अहवालात अशी शिफारस करण्यात आली आहे की:

"१९७६ मध्ये सॅल्मन आयोगाने अशा शंकेचे निराकरण कायद्याने करावे, अशी शिफारस केली होती, पण त्यावर कार्यवाही झालेली नाही. आचारसंहितेशी संबंधित संसदेच्या कायद्यातील इतर बाबी स्पष्ट होत असताना हा मुद्दा प्रलंबित ठेवणे असमाधानकारक ठरेल, असे आमचे मत आहे. संसद सदस्याने लाच घेतल्याबद्दल किंवा घेण्यासंदर्भातील कायदा स्पष्ट करण्यासाठी सरकारने आता पावले उचलावीत, अशी आमची शिफारस आहे. सॅल्मन यांनी सुद्धा शिफारस केलेल्या लाचखोरीच्या कायद्याच्या एकत्रीकरणाशी हे उपयुक्त ठरू शकते, जे सरकारने स्वीकारले, परंतु जे केले गेले नाही. हे एक असे काम असू शकते जे विधी आयोग पुढे नेऊ शकेल.

(जोर दिला आहे)

ही शिफारस सरकारने विधी आयोगाकडे पाठवली होती.

विधि आयोगाने १९९८ मध्ये आपला अहवाल सादर

---

64. (1998)पीएल 357, पी व्ही नरसिंहराव(सुप्रा) या केस मध्ये आर विरुद्ध करी म्हणून संबोधले आहे

करून,भ्रष्टाचाराचा गुन्हा सर्वांना लागू करणारा नवा कायदा करण्याची शिफारस केली. यामुळे घटनांची एक साखळी तयार झाली त्याची परिणीती म्हणून अखेरीस लाचलुचपत कायदा २०१० लागू झाला. या कायद्यात संसद सदस्य जे भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत अशा घटनांचा समावेश आहे.

138. कायदे तयार करणाऱ्यांकडून असे प्रयत्न सुरू असताना , ब्रिटनमधील (युके) न्यायालयांनी लाचखोरीत गुंतलेल्या संसद सदस्यांवरील बिल ऑफ राइट्सच्या कलम ९ (IX)च्या

व्याप्तीविषयी च्या प्रश्नांची उत्तरे देणे सुरूच ठेवले. नोलन समिती स्थापन करण्यास कारणीभूत ठरलेले आरोप आर विरुद्ध स्टँडर्डसाठी संसदीय आयुक्त एक्स पार्टे फयेद,[65] आणि हॅमिल्टन विरुद्ध अल फैद {66} मध्ये न्यायालयासमोर आले.पहिल्या प्रकरणात एका व्यक्तीने खासदार सरकारमध्ये मंत्री पदावर असताना त्यांच्याकडून भ्रष्टाचाराचे पैसे घेतल्याचा आरोप केला होता. संसदीय मानके आयुक्तांनी एका खासदाराला लाच घेतल्याच्या आरोपातून मुक्त केले होते. तक्रारदाराने न्यायालयीन पुनरावलोकनासाठी अर्ज करण्यासाठी परवानगीसाठी अर्ज केला होता. अपील न्यायालयाने हा अर्ज मंजूर केला आणि असे म्हटले की:

> या अर्जावरील तक्रारीचा विषय असलेले संसदीय मानक आयुक्तांचे विशिष्ट कार्य ओळखणे , हे या अर्जासाठी महत्त्वाचे आहे. ते म्हणजे एका खासदाराला भ्रष्ट मोबदला मिळाला. एखाद्या खासदाराने फौजदारी

गुन्हा केला आहे की नाही, किंवा एखाद्या खासदाराने संसदेच्या सभागृहाबाहेर असे वक्तव्य केले आहे की नाही, जे मानहानीकारक असल्याचा आरोप आहे, अशा मुद्द्यांचा तपास करणाऱ्या न्यायालयांना संसदीय विशेषाधिकार रोखू शकणार नाहीत, असे श्री पॅनिक यांचे म्हणणे योग्यच आहे . या अनुषंगाने अर्जदाराने या प्रकरणात ज्या प्रकारची तक्रार केली आहे, ती अशा कृतीशी संबंधित नाही, ज्यासंदर्भात संसद सदस्याला कोणत्याही प्रकारची संसदीय सूट असेल, असे त्यांचे म्हणणे आहे.

(जोर दिला आहे)

139. हॅमिल्टन विरुद्ध अल फैद (सुप्रा) या केस मध्ये याच वस्तुस्थितीतून समोर आलेल्या आणखी एका खटल्यात आणखी एका संसद सदस्यविरुद्ध, संसदीय विशेषाधिकारांचा त्याग करता

येईल काय असा प्रश्न निर्माण झाला . न्यायालयाने वस्तुस्थितीवरील विशिष्ट निष्कर्ष परत करताना असेही म्हटले आहे की, "संसदीय कामकाजातील साक्षीदाराने जाणीवपूर्वक संसदेची दिशाभूल केली हे दर्शविण्यासाठी तयार केलेले पुरावे, प्रश्न विचारणे किंवा युक्तिवाद करणे न्यायालयांना कोणत्याही कार्यवाहीत (त्या कार्यवाहीत कोणताही मुद्दा विचाराधीन असला तरी) ग्राह्य धरण्यापासून रोखले गेले आहे." असा निष्कर्ष काढतांना न्यायालयाने प्रीबल विरुद्ध टेलिव्हिजन न्यूझीलंड{67} या खटल्यातील निकालाचा आधार घेतला.

140. वरील प्रकरणात, प्रतिवादीने सरकारवर आरोप करणारा कार्यक्रम प्रसारित केला होता की एका मंत्र्याने एका व्यापाऱ्याला अवाजवी अनुकूल अटींवर मालमत्ता मिळविण्याची परवानगी देण्याच्या उद्देशाने सरकारी मालमत्ता विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अंमलात आणण्यासाठी एका व्यावसायिक आणि सार्वजनिक अधिकाऱ्यांसोबत कट रचला होता. मंत्र्यांनी चॅनेलवर

मानहानीचा दावा दाखल केला. चॅनेलने सत्य असल्याचा बचाव घेण्याचा प्रयत्न केला आणि संसदेत सांगितलेल्या आणि केलेल्या कृतींवर अवलंबून राहण्याचा प्रयत्न केला. बिल ऑफ राइट्सच्या अनुच्छेद ९ (IX)चे संरक्षण, एखाद्या सदस्याला कोणत्याही सभागृहात त्याच्या भाषणासाठी जबाबदार धरण्यापासून संरक्षित करेल,, असा युक्तिवाद करण्यात आला. मात्र, कोणत्याही सभागृहात केलेल्या भाषणाबद्दल उत्तरदायित्व देण्यासाठी त्याचा वापर होत नसेल तर,बचाव म्हणून ते रेकॉर्डवर ठेवले जाऊ शकतात. प्रिव्ही कौन्सिलने असे म्हटले आहे की एखाद्या खटल्यातील पक्षकार सभागृहात सांगितलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही गोष्टीवर प्रश्न चिन्ह उपस्थित करू शकत नाहीत किंवा त्या कृतींमागे कोणताही हेतू लावू शकत नाहीत. सभागृहाच्या कामकाजाच्या अधिकृत प्रकाशनावर अवलंबून राहण्यास न्यायालयाने परवानगी दिली या मर्यादेपर्यंत की ते शब्द चुकीच्या पद्धतीने बोलले गेले किंवा अयोग्य वापरासाठी कोणताही कायदा

संमत करण्यात आला असे सूचित करण्यासाठी त्यांचा वापर केला जात नाही.

141. विधिमंडळाच्या बाजूने २००९ मध्ये कायदेविषयक साहित्यावर अवलंबून राहण्याचा प्रश्न अधिक विचारात घेतल्या गेला. शासकीय वाणिज्य कार्यालय विरुद्ध माहिती आयुक्त (हस्तक्षेप करणारे अटर्नी जनरल){68}, या केस मध्ये, संसदीय समित्यांच्या कामाचे स्वरूप पाहता त्यांची मते न्यायालयासमोर अप्रासंगिक ठरतील, असे मत राणीच्या खंडपीठाने नोंदवले. भारतीय राज्यघटनेच्या कलम १०५ आणि १९४ च्या उपकलम (२) पेक्षा अधिक व्यापकपणे शब्दबद्ध केलेल्या बिल ऑफ राइट्सच्या कलम ९(IX) मधील शब्द आणि संबंधित इतिहासाचा या धारणेवर प्रभाव होता. पी.व्ही. नरसिंह राव (सुप्रा) या केस मधील अल्पसंख्याकांचे मत या विषयावर खालीलप्रमाणे प्रकाश टाकते:

डिजिटल सुप्रीम कोर्टाचा अहवाल

67. (1994)3 ऑल ईआर 407

68. (2009)3 डब्ल्यू एल आर 627

"**41.** [...] अनुच्छेद १०५ च्या उपकलम (२) अन्वये दिलेले संरक्षण हे बिल ऑफ राइट्सच्या कलम ९ अन्वये देण्यात आलेल्या संरक्षणापेक्षा संकुचित आहे या अर्थाने की त्या कलमाने दिलेली सूट वैयक्तिक स्वरूपाची आहे आणि सदस्याने सभागृहात किंवा त्यातील कोणत्याही समितीमध्ये सांगितलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही मताच्या संदर्भात सदस्यास उपलब्ध आहे. या कलमात संसद सदस्याने दिलेल्या भाषणावर किंवा मतावर न्यायालयात आव्हान देण्याची मुभा देण्यात आलेली नाही. अशा प्रकारे कलम १०५ च्या उपकलम (२) अन्वये दिलेले संरक्षण हे न्यायमूर्ती

हंट, यांनी आर. विरुद्ध मर्फी [(१९८६) ५ एनएसडब्ल्यूएलआर १८] मध्ये बिल ऑफ राइट्सच्या कलम ९ वर दिलेल्या अर्थाने दिलेल्या परिकल्पित संरक्षणासारखेच आहे परंतु जे प्रिव्ही कौन्सिलने प्रीबल वि. टेलिव्हिजन न्यूझीलंड लि. [(१९९४) ३ ऑल ईआर ४०७, पीसी] या केस मध्ये मान्य केले नाही. त्यामुळे एक्स पी वासन [(१८६९) ४ क्यूबी ५७३ : ३८ एलजेक्यूबी ३०२] मधील निर्णय, जो बिल ऑफ राइट्सच्या कलम ९ च्या संदर्भात देण्यात आला होता, तो निर्णय कलम १०५ च्या उपकलम (२) च्या अर्थाच्या बाबतीत लागू होऊ शकत नाही. [...]"

संसदीय समितीच्या अहवालातील निरीक्षणांवर न्यायालये अवलंबून राहू शकतात का, हा प्रश्न आता या न्यायालयाच्या घटनापीठाने कल्पना मेहता (सुप्रा) या केसमधील निकालाने निकाली काढला आहे.

142. पी.व्ही. नरसिंह राव (सुप्रा) या केसमधील बहुमताच्या निकालात ब्रिटनमधील (UK)आधीच्या प्रकरणांचा आधार घेण्यात आला होता, जे सामान्यत: भाषण आणि चर्चेचे रक्षण करण्यासाठी कलम ९ (IX)चा अर्थ लावतात. या निकालांच्या आधारे, बहुमताने न्यायालयासमोर कोणतीही गोष्ट सादर करण्यास परवानगी न देण्याचे एक सामान्य तत्त्व मांडले जे आमदाराच्या कृत्याशी आकस्मिक रित्या किंवा योगायोगाने संबंधित असू शकते. त्यानंतर न्यायालयाने कलम १०५ (२) चा व्यापक पद्धतीने अर्थ लावत कायदेविषयक कामकाजासाठी मिळालेली सूट लाचेसाठी सुद्धा देण्यासाठी या तत्त्वाचा आधार घेतला. न्यायालयाने न्यायमूर्ती बकले, यांचे आर विरुद्ध ग्रीनवे या केस मधील मता कडे दुर्लक्ष केले या कारणास्तव की अपीलात त्याची चाचणी बाकी आहे. त्यामुळे ब्रिटन(UK) आणि भारतातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या विविध कलमांना प्रासंगिकपणे उपयोगात आणण्यास न्यायालयाचे बहुमत अपयशी

ठरले. बहुमताने नमूद केलेली प्रकरणे सामान्यत: कायदा समजून घेण्यास उपयुक्त असली तरी मतांवर प्रभाव टाकण्यासाठी मिळालेल्या लाचेला सूट देण्यास मदत करत नाहीत. आपण वर नमूद केल्याप्रमाणे, लाचखोरीवरील प्रकरणांवरील अधिकार क्षेत्राचा केवळ संसदेने दावा करण्यामागील एक कारण म्हणजे संसद सदस्यांना भ्रष्टाचारविरोधी कायद्यात समाविष्ट केले गेले नव्हते.मात्र, कायदा नसल्यामुळे एखादा संसद सदस्य भ्रष्टाचाराचे पैसे घेतल्याबद्दल सूट मिळवू शकतो काय आणि त्याद्वारे त्याच्या मतावर प्रभाव टाकू शकतो काय, याचे उत्तर घटनात्मक अन्वयार्थात द्यावे लागेल.

143. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) प्रकरणात या न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर ब्रिटनमधील (UK)न्यायालयांनी कलम ९(IX)अंतर्गत संरक्षणाचा संकुचित अर्थ लावला आहे. आर विरुद्ध चॅटोर{69} या केसमध्ये खोटे दावे सादर करून आर्थिक लाभ मिळवल्याबद्दल आणि खोटे हिशेब ठेवल्याप्रकरणी

खासदारांवर खटला चालवण्यात आला. बिल ऑफ राइट्सच्या कलम ९(IX) चा उद्देश सभागृहातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करणे हा आहे, असे ब्रिटनच्या सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. या तरतुदीकरिता संकुचित दृष्टिकोनच ठेवला पाहिजे आणि खटला चालविणे हे संसदेच्या विशेषाधिकाराचा भंग करणार नाही, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. लाच आणि संसदेत केलेले भाषण यांच्यातील संबंधामुळे न्यायालयांचे अधिकारक्षेत्र संपुष्टात येत नाही, या ग्रीनवे (सुप्रा) या केसमधील मतावर न्यायालयाने विश्वास ठेवला. त्यामुळे खर्चाचा दावा सादर करणे आणि अशा कार्यवाहीत भाग घेणे याचा संसदीय विशेषाधिकारांशी अधिकच वरवरचा संबंध आहे आणि तो खटल्यापासून मुक्त होऊ शकत नाही, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. ज्या संसद सदस्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते, त्याच्या कृतीचा संसदेच्या मूळ किंवा अत्यावश्यक कार्याशी संबंध आहे का, याची कसोटी न्यायालयाने लावली. लॉर्ड फिलिप

यांनी असे मत व्यक्त केले की:

"**47.** मी ज्या न्यायशास्त्राचा उल्लेख केला आहे तो दूर आहे आणि या अपीलांच्या वस्तुस्थितीवर त्याचा थेट परिणाम नाही. तथापि, कलम ९ (X) ज्या मुख्य मुद्द्याकडे निर्देशित करते तो संसदेच्या सभागृहात आणि संसदीय समित्यांमध्ये भाषण आणि वादविवाद स्वातंत्र्य आहे, या प्रस्तावाचे हे समर्थन करते. इथेच संसदेचे मूळ किंवा अत्यावश्यक कामकाज चालते. सभागृहे आणि समित्यांच्या बाहेरील कृती संसदीय कामकाजात, त्यांचा त्यांच्याशी असलेल्या संबंधांमुळे, मोडतात का, याचा विचार करताना त्या संबंधाचे स्वरूप काय आहे आणि अशा कृतींना विशेषाधिकार न मिळाल्यास त्याचा संसदेच्या मूळ किंवा अत्यावश्यक कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे का, याचा विचार करणे आवश्यक आहे.

(जोर दिला आहे)

144. लॉर्ड रॉजर यांनी आपल्या सहमतीच्या मतादरम्यान हा मुद्दा संसद सभागृहाच्या अवमान अधिकारक्षेत्राशी संबंधित असल्याबद्दल अधिक प्रकाश टाकला.

---

69. (2010)3 डब्ल्यूएलआर 1707

लॉर्ड रॉजर यांनी असे म्हटले की हे दोन अधिकारक्षेत्र काही अंशी एकमेकात मिसळतील आणि त्यामुळे न्यायालयाचे अधिकारक्षेत्र काढून घेतल्या जाणार नाही. माकुडी विरुद्ध बॅरन ट्रायस्मन ऑफ ट्रॉटनहॅम [70] या खटल्यात अपील न्यायालयाने असे म्हटले आहे की, साक्षीदाराने सार्वजनिकरित्या केलेले विधान ज्यात संसदीय समितीसमोर त्याची साक्ष पुन्हा दिली जाते, त्याला सूट मिळणार नाही कारण ते संसदेबाहेरील भाषण होते जे संसदीय समितीसमोर

उच्चारण्यापासून खूप दूर होते. ही सुट केंव्हा मिळू शकते, असे मतही न्यायालयाने व्यक्त केले. न्यायालयाने असे म्हटले की:

> "**25.** तथापि, मी हे मान्य करतो की अशी काही उदाहरणे असू शकतात जिथे अनुच्छेद 9 चे संरक्षण खरोखरच संसदेबाहेरील भाषणापर्यंत पोहोचलेले आहे. वस्तुस्थितीनुसार त्या भिन्न असतील यात शंका नाही, परंतु सामान्यत: मला असे वाटते की अशा प्रकरणांमध्ये ही दोन वैशिष्ट्ये असतील: (१) संसदीय उच्चाराची पुनरावृत्ती करण्यात असलेला सार्वजनिक हितसंबंध ज्याची अध्यक्षांनी योग्य प्रकारे मदत केली पाहिजे,आणि (२) संसदेत आणि नंतर संसदेबाहेर त्यांच्या भाषणाच्या प्रसंगांमध्ये इतका जवळचा संबंध असतो की दुसऱ्या प्रसंगी बोलण्याची त्यांची जबाबदारी बद्दल (किंवा ते तसे करतील अशी अपेक्षा किंवा वचन) पहिल्या वेळी वाजवी अंदाज बांधला

जातो आणि दोन्ही प्रसंगी बोलण्याचा त्याचा हेतू एकच किंवा अगदी जवळचा असतो. [...]"

145. ब्रिटनमधील(UK) न्यायालयांनी विशेषाधिकारांच्या क्षेत्रावर नियंत्रण ठेवणाऱ्या पूर्वीच्या खटल्यांपेक्षा कालांतराने संकुचित दृष्टिकोन मांडला आहे. बिगर कायदेविषयक कामांकरिता सूट असण्यासाठी आवश्यक असलेल्या संबंधांना त्यांनी संकुचित अर्थ दिला आहे. सदस्यांच्या संरक्षणामुळे किंवा सभागृहाच्या लाचखोरीच्या विरोधात अवमान कारवाई करण्याच्या क्षमतेमुळे न्यायालयांचे अधिकार क्षेत्र संपत नाही, असा निर्वाळा निर्माण झाला आहे.

II). <u>युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका</u>

146. अमेरिकेतील संसदीय विशेषाधिकार राज्यघटनेतील आर्टिकल १ च्या कलम ६ मधून प्राप्त झाले आहेत. या तरतुदीचा संबंधित भाग, ज्याला स्पीच अँड डिबेट क्लॉज म्हणून संबोधले जाते,

इंग्रजी बिल ऑफ राइट्स 1689 च्या अनुच्छेद 9 (IX)ने प्रभावित आहे.v हे कलम खालीलप्रमाणे आहे:

"सिनेटर आणि प्रतिनिधींना

त्यांच्या सेवांसाठी मोबदला, कायद्याने निश्चित केला जाईल,

---

70. (2014)क्यूबी 839

कायदा, आणि अमेरिकेच्या कोषागारातून पैसे दिले जातील.देशद्रोह, घोर अपराध , आणि शांतता भंग वगळता इतर सर्व प्रकरणांमध्ये त्यांना आपापल्या सभागृहाच्या अधिवेशनात उपस्थित असतांना आणि तिथे जाणे व तेथून परततांना अटकेपासून संरक्षण दिले जाईल; तसेच कोणत्याही सभागृहातील भाषण किंवा चर्चेसाठी इतर कोणत्याही ठिकाणी त्यांची चौकशी

केली जाणार नाही.

(जोर दिला आहे)

अमेरिकेतील न्यायालयांनी काँग्रेसच्या सदस्यांच्या कायदेविषयक कृत्यांबाबत स्पीच अँड डिबेट कलमाचा व्यापक अर्थ लावला आहे. त्यापलीकडे न्यायालयाने असे म्हटले आहे की काँग्रेसचा सदस्य सामान्य अनुप्रयोगाच्या फौजदारी कायद्यानुसार जबाबदार असू शकतो. फक्त सरकारी खटला सिद्ध करण्यासाठी सदस्याच्या अधिकृत कृत्यांवर अवलंबून राहणे निषिद्ध आहे.

147. युनायटेड स्टेट्स वि. थॉमस एफ जॉन्सन ([७१]) काँग्रेसचे एक सदस्य यांच्यावर हितसंबंधांचा संघर्ष आणि संघराज्यांची (युनायटेड स्टेट्स) फसवणूक करण्याचा कट रचल्याचा आरोप होता. जॉन्सन यांच्यावर आरोप होता की, त्यांनी मेल फसवणुकीच्या आरोपाखाली बचत आणि कर्ज कंपनी आणि तिच्या अधिकाऱ्यांवरील प्रलंबित आरोप फेटाळण्यासाठी आणि दबाव

तंत्र वापरून प्रभाव पाडण्याचा कट रचला होता. या षड्यंत्राचा एक भाग म्हणून जॉन्सन यांनी सभागृहात स्वतंत्र बचत व कर्ज संघटनांना अनुकूल भाषणे केली. कनिष्ठ न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले होते. स्पीच अँड डिबेट क्लॉजअंतर्गत आरोप न्यायालयात मांडण्यास बंदी घालण्यात आली आहे, या कारणास्तव चौथ्या सर्किटच्या अपील न्यायालयाने त्यांची शिक्षा रद्द बातल ठरवली होती. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने स्पीच अँड डिबेट क्लॉजचा अर्थ लावताना म्हटले आहे की, सरकार काँग्रेसच्या सदस्याने केलेल्या भाषणाचा वापर करू शकत नाही किंवा न्यायालयात त्याच्या प्रेरणेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करू शकत नाही. तथापि, काँग्रेससदस्याने दिलेल्या भाषणावर अवलंबून न राहता सरकारी पक्ष खटला दाखल करू शकतो. न्यायालयाने असे मत व्यक्त केले की त्यांचा निर्णय सामान्य फौजदारी कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल अभियोजन पक्षाला लागू होत नाही जे "काँग्रेसच्या प्रतिवादी सदस्याच्या

कायदेविषयक कृत्यांवर किंवा ते पार पाडण्याच्या त्याच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नाही."

148. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने जॉन्सन (सुप्रा) या केसवर,काँग्रेस सदस्यांच्या नंतरच्या लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये विश्वास ठेवला आहे, व असा अर्थ काढला आहे की

---

71 383 यूएस 169 (1966)

जोपर्यंत ते आमदाराने दिलेल्या भाषणावर किंवा मतावर अवलंबून राहात नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर कारवाई केली जाऊ शकते. युनायटेड स्टेट्स विरुद्ध ब्रूस्टर (७२) या खटल्यात एका सिनेटरवर टपाल दर कायद्यासंदर्भात त्याच्या अधिकृत कृत्यांमध्ये प्रभावित होण्याच्या बदल्यात लाच स्वीकारल्याचा आरोप करण्यात आला होता. सिनेटरला संसदीय विशेषाधिकार लागू होतात या कारणास्तव कनिष्ठ

न्यायालयाने हे आरोप फेटाळून लावले. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने असे म्हटले आहे की स्पीच अँड डिबेट क्लॉजने, अभियोजकांना असे पुरावे सादर करण्यास मनाई केली आहे की काँग्रेसच्या सदस्याने भ्रष्ट योजनेचा भाग म्हणून भाषण करणे किंवा कायदा सादर करणे यासारखे काही कायदेविषयक कृत्य केले आहे, परंतु इतर पुरावे हे सिद्ध करू शकतात की सदस्याने भ्रष्टाचार विरोधी कायद्यांचे उल्लंघन केले आहे. न्यायालयाने असे म्हटले की:

> "**43.** आपल्या राज्यघटनेच्या निर्माणकर्त्यांना विशेषाधिकाराची गरज आणि खूप व्यापक सुरक्षा उपायांमधून येऊ शकणारे दुरुपयोग या दोन्हींचा इतिहास चांगलाच ठाऊक होता. इतर मूल्ये जपण्यासाठी त्यांनी विशेषाधिकार लिहिला जेणेकरून सदस्यांचे वर्तन सहन केले जाते आणि त्याचे संरक्षण केले जाते पण ते इतर नागरिकांकडून केले जात असताना सहन केले जात नाही आणि त्यांचे संरक्षण

केले जात नाही,परंतु कायदेशीर प्रक्रियेची अखंडता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींपलीकडे हे कवच विस्तारत नाही. [...]

...

60. भाषण किंवा वादविवाद कलम,कायद्याच्या नियमित प्रक्रियेत घडणाऱ्या कृत्यांच्या चौकशीपासून आणि त्या कृत्यांच्या प्रेरणेपासून संरक्षण करते यात शंका नाही. त्यामुळे विधिमंडळ शाखेच्या ऐतिहासिक स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याइतपत हा विशेषाधिकार व्यापक आहे, जो आपल्या अधिकारांच्या पृथक्करणासाठी आवश्यक आहे, परंतु त्याच्या सदस्यांना भ्रष्ट करून प्रक्रिया भ्रष्ट करणाऱ्यांच्या अतिरेकांपासून संरक्षण देण्याइतपत संकुचित आहे. [...]

...

62. या कायद्याचे उल्लंघन झाले हे दाखविण्याकरिता, अपीलकर्ता कसे बोलले, त्यांनी कसे वाद विवाद केले, त्यांनी मतदान कसे केले किंवा त्यांनी सभागृहात किंवा समितीत काहीही केले, याची चौकशी करणे आवश्यक आहे का, हा प्रश्न आहे.

---

72 - 408 यूएस 501 (1972)

बेकायदेशीर वर्तन म्हणजे विशिष्ट मार्गाने काम करण्याचे वचन देण्यासाठी पैसे घेणे किंवा घेण्यास सहमती देणे होय.अपीलकर्त्याने कथित बेकायदेशीर सौदेबाजी पूर्ण केली हे दाखवण्याची सरकारला गरज नाही; लाच स्वीकारणे हे कायद्याचे उल्लंघन आहे, बेकायदेशीर आश्वासनाची पूर्तता नाही."

(जोर दिला आहे)

त्यामुळे काँग्रेसच्या सदस्यांनी स्वतंत्रपणे वापरलेले विशेषाधिकार विधिमंडळाचे स्वातंत्र्य जपण्यासाठी आहेत , असे मत अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. स्पीच अँड डिबेट क्लॉज हे काँग्रेसच्या सदस्यांच्या लाचखोरीच्या कृत्यांना संरक्षण देणारे समजले तर स्वातंत्र्याशी तडजोड होईल. त्यामुळे राज्यघटनेतील संरक्षण केवळ अशा कृतींकडेच आकर्षित होते, जी स्पष्टपणे कायदेप्रक्रियेचा एक भाग आहे.

149. ब्रुस्टर (सुप्रा) या केस मध्ये येथील न्यायालय,कार्यकारणीद्वारे तपास अधिकारांच्या संभाव्य गैरवापराबद्दल जागरूक होते, परंतु बहुमताने कार्य करणारे सभागृह अंतिम मध्यस्थ म्हणून सोडले तर ते आरोपींच्या अधिकारांसाठी अधिक हानिकारक ठरेल असे मत नोंदवले. न्यायालयाने नमूद केले की काँग्रेसचा सदस्य प्रक्रियात्मक संरक्षणापासून ज्या आरोपी व्यक्तींना कोर्ट देते

वंचित राहील. न्यायालयाने पुढे म्हटले की:

"**58.**अनेक बिगर-कायदेविषयक उपक्रम हा सदस्याच्या भूमिकेचा एक प्रस्थापित आणि स्वीकृत भाग आहे आणि तो खरोखरच कायदेविषयक प्रक्रियेशी 'संबंधित' आहे, हे मान्य करण्यात आपण अपयशी ठरलो तर आपण अमेरिकन राजकीय व्यवस्थेच्या वास्तवाकडे डोळे झाकीत आहोत.पण जर लाचेच्या मोबदल्यात सरकारच्या दुसऱ्या शाखेवर प्रभाव टाकण्याच्या जॉन्सन केस प्रमाणे, एखाद्या सदस्याच्या प्रयत्नावर कार्यपालिका खटला चालवू शकते, तर लाचेच्या बदल्यात कायदेविषयक कृत्याच्या संबंधित वचनासाठी खटला चालवता आला तर त्याचा छळ करण्याची शक्ती फारशी वाढणार नाही. त्यामुळे आज च्या आमच्या धारणेमुळे विधिमंडळ शाखेवरील कार्यकारी व न्यायिक शाखांच्या अधिकारात लक्षणीय

वाढ होताना दिसत नाही. [...]

59. [...] आपण सुरुवातीलाच नमूद केल्याप्रमाणे, भाषण किंवा वादविवाद कलमाचा हेतू वैयक्तिक आमदाराचे रक्षण करणे हा आहे, आणि हे केवळ त्याच्या स्वतःसाठी नाही, तर स्वातंत्र्य आणि त्याद्वारे कायदेविषयक प्रक्रियेचा प्रामाणिकपणा टिकवून ठेवणे यासाठी.परंतु लाचेच्या माध्यमातून होणारा आर्थिक गैरवापर, कदाचित कार्यकारी सत्तेपेक्षाही अधिक, कायदेविषयक प्रामाणिकपणाला गंभीर धक्का देईल आणि जनतेच्या प्रामाणिक प्रतिनिधित्वाच्या अधिकारावर गदा आणेल, कार्यकारी मंडळाला चौकशी आणि खटला चालविण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवेल आणि न्यायपालिकेला काँग्रेस सदस्यांच्या लाचखोरीला शिक्षा करण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवेल, यामुळे कायदेविषयक स्वातंत्र्य वाढण्याची

शक्यता नाही. [...]

...

63. लाच घेणे हा अर्थातच कायदेविषयक प्रक्रियेचा किंवा कार्याचा भाग नाही; व ते कायदेविषयक कृत्य नाही. हे कोणत्याही कल्पनीय अर्थाने, आमदाराच्या भूमिकेचा एक भाग म्हणून किंवा प्रासंगिक म्हणून केलेले कृत्य नाही. हे कार्यालयाच्या स्वरूपातून आणि अंमलबजावणीत घडलेले कृत्य नाही. तसेच प्रतिनिधी म्हणून, त्या कार्यालयाची कार्ये पार पाडताना त्याने सांगितलेली किंवा केलेली गोष्ट नाही.› ४ मास., २७ला. तसेच या कायद्यांतर्गत किंवा या दोषारोपपत्रांतर्गत खटला चालविण्यासाठी कायदेविषयक कृत्याची चौकशी किंवा कायदेविषयक कृत्याची प्रेरणा आवश्यक नसते. जेव्हा लाच घेतली जाते, तेव्हा ज्या

वचनासाठी लाच देण्यात आली होती, ती इथल्याप्रमाणे कायदेविषयक कृत्याच्या अंमलबजावणीसाठी होती की जॉन्सन प्रमाणे कार्यकारी शाखेत काँग्रेस सदस्याच्या प्रभावाचा वापर करण्यासाठी होती, हे महत्त्वाचे नाही. आणि लाचेच्या हेतूची चौकशी करतांना 'काँग्रेसच्या प्रतिवादी सदस्याची कायदेविषयक कृत्ये किंवा ती पार पाडण्याच्या त्याच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह निर्माण करत नाही.' 383 यू.एस., 185 ला , 86 एस. सीटी., 758 ला

64. तसेच सदस्याने आपला बेकायदेशीर सौदा चुकवला तरी फरक पडत नाही. या दोषारोपपत्रांतर्गत प्रथमदर्शनी खटला दाखल करण्यासाठी, सरकारने,देण्याच्या भ्रष्ट आश्वासनानंतर अपीलकर्त्याचे कोणतेही कृत्य, दर्शविण्याची आवश्यकता नाही, कारण लाच घेणे हेच फौजदारी कृत्य आहे ,

बेकायदेशीर कराराची कामगिरी नाही. उदाहरणार्थ, एखाद्या सदस्याने दिलेल्या विधेयकाच्या बाजूने मतदान करण्याच्या कराराच्या बदल्यात लाच घेतल्याचे निर्विवाद पुरावे असतील आणि त्याने खरोखरच विधेयकाच्या विरोधात मतदान केल्याचा निर्विवाद पुरावा असेल, तर यामुळे लाचखोरीचे स्वरूप बदलते किंवा काँग्रेसने गुन्हा करण्याचा प्रयत्न केलेल्या चुकीच्या क्षेत्रातून तो काढून टाकला जातो, असा विचार केला जाऊ शकतो का?

...

67. न्यायमूर्ती श्री ब्रेनन सुचवतात की, कथित लाचेची चौकशी म्हणजे कायदेविषयक कृत्याच्या प्रेरणेची चौकशी आहे आणि जॉन्सन या केसमध्ये हीच चौकशी अनुज्ञेय असल्याने त्याची निंदा केली आहे, हे

आग्रहपूर्वक सांगण्यात आले आहे. हा युक्तिवाद कायदेविषयक कृतींसाठी प्रेरणा या संकल्पनेचा चुकीचा अर्थ लावतो. स्पीच किंवा डिबेट क्लॉज बेकायदेशीर वर्तनाची चौकशी करण्यास मनाई करत नाही फक्त यासाठी की त्याचा कायदेशीर कामकाजाशी काही संबंध आहे. जॉन्सन प्रकरणात न्यायालयाने म्हटले आहे की, न्यायालयाने परत पाठविल्यावर,जोपर्यंत जॉन्सन यांच्या सभागृहातील भाषणासंदर्भातील पुरावे ग्राह्य धरले जात नाहीत, तोपर्यंत त्यांच्यावर फसवणुकीचा कट रचल्याप्रकरणी पुन्हा खटला चालवला जाऊ शकतो. [...]

(जोर दिला आहे)

त्यामुळे कायदेविषयक कामकाजाशी संबंध असलेल्या कोणत्याही गोष्टीला अमेरिकेच्या राज्यघटनेतील स्पीच अँड डिबेट

क्लॉजअंतर्गत आपोआप सूट मिळेल, ही कल्पना न्यायालयाने फेटाळून लावली.

150. गॅवेल विरुद्ध युनायटेड स्टेट्स{73} या खटल्यात सिनेटर गॅवेल यांनी अमेरिकन सिनेटमध्ये झालेल्या उपसमितीच्या सुनावणीच्या रेकॉर्डमध्ये काही गुप्त कागदपत्रे समाविष्ट केली होती. त्यानंतर त्यांनी हा संपूर्ण दस्तऐवज एका खासगी प्रकाशनात प्रसिद्ध केला. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या ग्रँड ज्युरीने सिनेटरच्या एका सहकाऱ्याला ताब्यात घेतले होते. सिनेटरच्या सहकाऱ्याला स्पीच अँड डिबेट क्लॉजअंतर्गत काही सूट आहे का आणि त्याची किती प्रमाणात चौकशी करता येईल, असा प्रश्न अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या विचारार्थ समोर आला. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, विधिमंडळाच्या कामाचे विस्तृत स्वरूप लक्षात घेता, काँग्रेसच्या सदस्याच्या सहाय्यकास भाषण आणि वादविवाद कलमांतर्गत संरक्षण दिले जाईल, परंतु ते केवळ आमदाराला त्याचे

कायदेविषयक कार्य पार पाडण्यास मदत करण्यापुरते मर्यादित आहे. दस्तऐवजाचे खाजगी प्रकाशन हा सिनेटरच्या कार्याचा आवश्यक भाग नाही आणि त्यासंदर्भात कोणतीही सूट दिली जाणार नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने असे म्हटले की:

---

73 408 यूएस 606 (1972)

"**26.** कायदेविषयक कृत्य ही सर्वसमावेशक नसतात. कोणत्याही सभागृहातील भाषण किंवा चर्चा हा या कलमाचा केंद्रबिंदू असतो. इतर बाबींपर्यंत पोहोचण्यासाठी या कलमाचा अर्थ लावला तर, ते विचारपूर्वक आणि संप्रेषणात्मक प्रक्रियेचा अविभाज्य भाग असणे आवश्यक आहे,ज्याद्वारे सदस्य प्रस्तावित

कायद्याचा विचार आणि मंजूर करणे किंवा नामंजूर करणे किंवा घटनेने कोणत्याही सभागृहाच्या कार्यक्षेत्रात ठेवलेल्या इतर बाबींच्या संदर्भात,समिती आणि सभागृहाच्या कामकाजात भाग घेतात. अपील न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे न्यायालयाने कोणत्याही सभागृहात शुद्ध भाषण किंवा वादविवादाच्या पलीकडे असलेल्या बाबींना विशेषाधिकार दिला आहे, परंतु 'अशा चर्चांची अप्रत्यक्ष कमतरता टाळण्यासाठी आवश्यक असेल तेव्हाच.' युनायटेड स्टेट्स वि. डो, 455 एफ.2 डी, 760 वर.

...

27. येथे, सिनेटर ग्रेव्हल यांनी बीकन प्रेसच्या सहकार्याने केलेले खाजगी प्रकाशन सिनेटच्या चर्चेसाठी कोणत्याही प्रकारे आवश्यक नव्हते; तसेच

खाजगी प्रकाशनाबद्दल प्रश्न उपस्थित केल्याने ,व परवानगी नसतानाही त्यांचे वादविवाद कार्यकारिणीच्या प्रभावासाठी उघडकीस आणल्याने, सिनेटची अखंडता किंवा स्वातंत्र्य धोक्यात येत नाही. सिनेटरने आपली सुनावणी घेतली होती; रेकॉर्ड आणि समोर येणारा कोणताही अहवाल त्यांच्या समितीकडे आणि सिनेटकडे उपलब्ध होता . आम्हाला सांगितल्याप्रमाणे काँग्रेस किंवा पूर्ण समितीने प्रकाशनाचे आदेश दिले नाहीत किंवा अधिकार दिले नाहीत. [येथे मांडलेला एकमेव घटनात्मक दावा स्पीच किंवा डिबेट क्लॉजवर आधारित आहे. काँग्रेस किंवा कोणतेही सभागृह, एका सदस्यापेक्षा वेगळे असताना, समितीच्या सुनावणी, अहवाल किंवा इतर सामग्रीच्या प्रकाशन आणि / किंवा सार्वजनिक वितरणाचे आदेश देतात तेव्हा उद्भवू शकणाऱ्या मुद्द्यांकडे लक्ष देण्याची

आवश्यकता नाही. अर्थात, आर्टिकल I, § 5, cl. 3, नुसार प्रत्येक सभागृहाने आपल्या कार्यवाहीचे एक नियतकालिक (जर्नल) ठेवावे आणि वेळोवेळी ते प्रकाशित करावे, त्यांच्या निर्णयात गोपनीयतेची आवश्यकता असू शकेल असे भाग वगळता. . . . › हे कलम व्यापक न्यायालयीन तपासणीचा विषय राहिलेला नाही. पहा फिल्ड वि. क्लार्क, 143 यू.एस. 649, 670-671, 12 एस.सीटी. 495, 496-497, 36 एल.ईडी.294 (1892); युनायटेड स्टेट्स वि. बॅलिन, १४४ यु.एस. १, ४, १२ एस. सीटी. ५०७, ५०८, ३६ एल.ईडी.३२१ (१८९२)] सिनेटरची बीकन प्रेससोबतची व्यवस्था ही कायदेविषयक प्रक्रियेचा भाग नव्हती, असा निष्कर्ष आम्ही काढू शकत नाही, परंतु, समारोप करतो.

(जोर दिला आहे)

151. सभागृहाच्या चर्चेसाठी किंवा घटनेने दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कृत्येच न्यायालयासमोर खटला चालविण्यापासून मुक्त आहेत, असा निर्वाळा देण्यासाठी गवेल (सुप्रा) या केस मधील न्यायालयाने ब्रुस्टर (सुप्रा) मध्ये जे मानक लागू केले होते, तेच मानक लागू केले. इतर कृत्ये जी एखाद्या प्रकारे आमदाराच्या भाषणाशी किंवा मताशी संबंधित असू शकतात त्यांना भाषण आणि वादविवाद कलमानुसार संरक्षण दिले जाणार नाही जोपर्यंत ते आमदाराच्या कार्यासाठी आवश्यक नसतात. त्यामुळे काँग्रेसच्या सदस्यांना केवळ त्यांच्या 'कायदेशीर कायदेविषयक कार्यक्षेत्रा'साठी राज्यघटनेनुसार सूट असेल, अशी अविचल (ठाम)भूमिका न्यायालयाने घेतली .

152. युनायटेड स्टेट्स विरुद्ध हेलस्टोस्की (७४), या खटल्यात हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हच्या एका सदस्यावर इमिग्रेशन कायद्यांची अंमलबजावणी स्थगित करण्यासाठी काही खाजगी विधेयके सादर करण्याच्या बदल्यात पैसे स्वीकारल्याचा आरोप होता.

जॉन्सन (सुप्रा), ब्रूस्टर (सुप्रा) आणि गॅवेल (सुप्रा) या मधील आपल्या मागील निर्णयांचा आधार घेत अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की स्पीच अँड डिबेट क्लॉजचा हेतू आमदाराला कार्यकारी आणि न्यायालयीन देखरेखीपासून मुक्त करणे आहे ज्यामुळे प्रत्यक्षात आमदार म्हणून त्याच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा धोका आहे. न्यायालयाने अमेरिकन कायद्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला की आरोपी काँग्रेससदस्याच्या कायदेविषयक कृत्यांमधील सामग्रीवर विश्वास ठेवला जाऊ शकत नाही किंवा ते ग्रँड ज्युरीसमोर ठेवल्या जाऊ शकत नाही परंतु लाचेचे पुरावे आणि भविष्यातील कायदेविषयक कृत्य करण्याचे आश्वासन तपासले जाऊ शकते कारण ते त्याचे कर्तव्य पार पाडताना आमदाराचे आवश्यक कार्य बनत नाहीत.

153. अमेरिकेतील कायद्याच्या स्थितीचे विश्लेषण पूर्ण करण्यापूर्वी आपण दुसऱ्या निर्णयाचा मदत म्हणून संदर्भ घेऊ शकतो. हचिंसन वि. प्रॉक्समिरे [75] या केस मध्ये एका सिनेटरने एक

प्रकाशन प्रसिद्ध केले ज्यात त्यांनी "फालतू सरकारी खर्च" असल्याचे त्यांना वाटले असे अधोरेखित केले . सिनेटरने सिनेटच्या पटलावर भाषण केले आणि ते प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध करवून घेतले. सिनेटरने तक्रारदाराचे नाव घेतले ज्याला त्याच्या संशोधनासाठी सार्वजनिक संस्थांकडून निधी मिळत होता.एजन्सीसह एक लाखांहून अधिक लोकांपर्यंत या प्रसिद्धीपत्रकाचा प्रचार करण्यात आला

---

74 - 442 यूएस 477 (1979)

75 439 यूएस 1066 (1979)

ज्यांनी तक्रारदाराच्या संशोधनाला निधी दिला. आपल्या व्यवसायातील मान-सन्मान गमावणे, उत्पन्न गमावणे आणि भविष्यात उत्पन्न मिळविण्याची क्षमता कमी होणे असा दावा

करत तक्रारदाराने दावा दाखल केला. जिल्हा न्यायालयाने सिनेटरच्या बाजूने संक्षिप्त निकाल दिला आणि असे म्हटले की हे प्रकाशन काँग्रेसच्या 'माहिती कार्या'अंतर्गत येते आणि भाषण आणि वादविवाद कलमांतर्गत मुक्त असेल.

154. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, स्पीच अँड डिबेट क्लॉजचा हेतू काँग्रेसच्या सदस्यांच्या बाजूने संपूर्ण विशेषाधिकार निर्माण करण्याचा नव्हता. हे कलम केवळ 'कायदेविषयक कामकाजा'साठी (आकर्षित) आहे आणि मानहानीकारक विधानांच्या पुन:प्रकाशनाचे संरक्षण करणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने असे म्हटले की:

> "कायदेविषयक कामकाज" हा शब्द कितीही ढोबळ वाटत असला तरी हे स्पष्ट आहे की इतिहासातील किंवा कलमाच्या स्पष्ट भाषेत सभागृहाबाहेर केलेल्या

<u>मानहानीकारक विधानांसाठी दायित्व किंवा खटल्यापासून पूर्ण विशेषाधिकार निर्माण करण्याचा कोणताही हेतू सुचवत नाही</u>.

...

कायदेविषयक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींच्या पलीकडे जाणाऱ्या या कलमाखालील दाव्यांची बारकाईने छाननी केली जावी

.

...

किंबहुना, प्रारंभी कोणत्याही सभागृहात केलेली मानहानीकारक विधाने पुन्हा प्रकाशित केल्याबद्दल एखाद्या सदस्याला जबाबदार धरले जाऊ शकते, या निष्कर्षाला मागील दाखले पुष्कळ प्रमाणात समर्थन देतात. आम्हाला त्या प्रस्थापित नियमांपासून वेगळे

जाण्यास कोणतेही कारण दिसत नाही.

(जोर दिला आहे)

155. अमेरिकेतील विशेषाधिकारांबाबत घेतलेल्या दृष्टिकोनातून समोर येणारे तत्त्व असे आहे की, भाषण किंवा मतदानाच्या बाबतीत कायदेविषयक कामे करण्यासाठी लाचखोरीत गुंतलेल्या काँग्रेसच्या सदस्याला सुट नाही. भाषण आणि वादविवाद कलम विधिमंडळाच्या कामकाजाशी संबंध असलेल्या सर्व गोष्टींबाबत आमदाराला कोणतीही पूर्ण सूट देत नाही. सुट केवळ त्या कार्यांकडे आकर्षित होते (त्यासाठी आहे) जी आवश्यक आहेत आणि कायदेविषयक कामकाजाच्या कायदेशीर क्षेत्रात आहेत. एखाद्या काँग्रेससदस्याला खटल्यात एकमेव विशेषाधिकार मिळू शकतो तो म्हणजे भाषण, मतदान किंवा कायदेविषयक कृतींचा मजकूर अभियोजन पक्षाकडून पुरावा म्हणून सादर केला जाऊ शकत नाही.

156. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) या केस मधील बहुमताच्या निकालाने जॉन्सन (सुप्रा) आणि ब्रूस्टर (सुप्रा)केस मधील असहमत मताचा अर्थ लावला आहे आणि एकाच (सारख्याच) निष्कर्षापर्यंत पोहोचले आहे जे त्यांनी केलेल्या यूके (UK)मधील कायद्याचे प्रतिबिंब आहे. येथेही बहुमताचा निकाल दोन मुद्द्यांवर अपयशी ठरतो. पहिली गोष्ट म्हणजे, इंग्रजी बिल ऑफ राइट्सच्या कलम ९(आर्टिकल IX) मधून बहुतांशाने घेतलेल्या स्पीच अँड डिबेट क्लॉजमुळे संसदेत केलेल्या भाषणाला आणि मतदानाला सूट मिळते, या वस्तुस्थितीबद्दल उत्तर देण्यात ते अपयशी ठरले. बहुमताच्या निकालात जो समज झाला तो अमेरिकेतील अनेक खटल्यातील कायद्याच्या उत्क्रांतीमुळे सुचवला गेला नाही. याउलट, बहुमताचा निर्णय, अशा विसंबून राहण्यासाठी पुरेसे पुरावे न देता फक्त ब्रुस्टर (सुप्रा) मधील असहमत मतावर अवलंबून होता. दुसरे म्हणजे, बहुमताच्या निकालाने भाषण आणि वादविवाद कलमाचा अर्थ वाढवला आहे आणि या

समजुतीचे समाधान करण्यासाठी कलम १०५ (२) चा अर्थ काटेकोरपणे लावला आहे.

III. कॅनडा

157. ठराविक दिशेला मतदान करण्यासाठी आमदारांना लाच देणे हे संसदीय विशेषाधिकाराच्या कक्षेत येते का, या नेमक्या प्रश्नावर राणीच्या खंडपीठाने आर विरुद्ध बंटिंग एट अल. [76] या प्रकरणात निकाल दिला. त्या प्रकरणात विधिमंडळाच्या सदस्यांना सरकारच्या विरोधात मतदान करण्यासाठी लाच देऊन ओंटारियो प्रांताचे सरकार बदलण्याचा कट रचल्याचा आरोप रद्द करण्याची मागणी प्रतिवादींनी केली होती. लाचखोरी आणि विधिमंडळाच्या सदस्यांना लाच देण्याचा कट रचणे हा गुन्हा न्यायालयाच्या अखत्यारीत येतो आणि अशा चौकशीमुळे संसदीय विशेषाधिकारावर अतिक्रमण होणार नाही, असे न्यायालयाने ठामपणे सांगितले. तसेच, जर प्रतिवादींवर न्यायालयाने कारवाई

केल्यास,अधिकार आणि विशेषाधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल विधिमंडळाकडून सुद्धा त्यांची समांतर चौकशी केली जाऊ शकते, असेही मत व्यक्त करण्यात आले. ही कारवाई वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी आहे, ती आपापल्या परीने चालवली जाऊ शकते आणि अशा परिस्थितीत दुहेरी शिक्षा किंवा दुहेरी धोक्याचे (डबल जिओपार्डी)प्रकरण ठरत नाही. न्यायालयाने (मुख्य न्यायमूर्ती विल्सन, यांच्यामार्फत बोलताना) असे म्हटले:

> "माझ्या मते एक प्रस्ताव अगदी स्पष्ट आहे की,या प्रकारच्या प्रकरणात सामान्य कायद्याप्रमाणे या न्यायालयाला लाचखोरीच्या गुन्ह्यावर अधिकार आहे, जिथे विधानसभेचा सदस्य लाच देण्यामध्ये किंवा देण्याच्या प्रस्तावात

---

76. (1885)17 ओ. आर. **524**

किंवा त्या विधानसभेचा सदस्य म्हणून त्याच्या कोणत्याही कर्तव्यासाठी किंवा त्यासंदर्भात घेण्याचा संबंध आहे; आणि हेही तितकेच स्पष्ट आहे की अशा प्रकारच्या प्रकरणात या न्यायालयाला जे अधिकार क्षेत्र आहे ते विधानसभेला नाही; आणि हेही अगदी स्पष्ट आहे की लाचखोरीची प्राचीन व्याख्या ही त्या गुन्ह्याची योग्य किंवा कायदेशीर व्याख्या नाही.

...

इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्स आणि विविध वसाहतवादी कायदेमंडळांना गुन्हेगारी अधिकार क्षेत्र नव्हते आणि कधीच नव्हते, यापेक्षा जास्त निश्चितपणे काहीही स्थिरावलेले (निश्चित झालेले)नाही.

...

परंतु,हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या दोन सदस्यांनी ही खोटी

विधाने करावीत, किंवा त्यांना दिलेली किंवा देण्यात येणारी लाच विचारात घेऊन कोणत्याही विशिष्ट पद्धतीने मतदान करावे, हे जर या तिघांनी मान्य केले असते, तर ते कृत्य करण्याचे षड्यंत्र ठरले असते , कदाचित परिणामतः बेकायदेशीर नव्हे, तर बेकायदेशीर मार्गाने हे कृत्य करणे, लाच घेणे हा कायद्याविरुद्धचा गुन्हा आहे; आणि ज्या बेकायदेशीर मार्गाने हे कृत्य केले जाणार होते, त्या कारणास्तव कट रचण्याचा गुन्हा पूर्ण झाला असता. त्या गुन्ह्याची चौकशी न्यायालय करू शकले असते , कारण जे काही केले गेले त्याची चौकशी ही हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या बाहेरील प्रकरणांची झाली असती आणि म्हणूनच संसदेच्या कायद्याचे (लेक्स) कोणत्याही प्रकारे उल्लंघन किंवा अतिक्रमण होऊ शकत नाही".

(जोर दिला आहे)

158. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या केस मध्ये न्यायालयासमोर,बंटिंग(सुप्रा) यातील निकाल होता. कॅनडा आणि ऑस्ट्रेलियातील फौजदारी कायद्यानुसार आमदाराला लाच देणे हा सामान्य कायद्याचा गुन्हा मानला जातो आणि या गुन्ह्यासाठी आमदारावर फौजदारी न्यायालयात खटला चालवला जाऊ शकतो, हे ओळखून अल्पसंख्याकांनी स्पष्टपणे या निर्णयावर विश्वास ठेवला. न्यायमूर्ती अग्रवाल, यांनी नमूद केले की :

> "**54.** [...] ऑस्ट्रेलिया आणि कॅनडामध्ये जेथे आमदाराने लाच घेणे हा सामान्य कायद्यानुसार गुन्हा मानला जात होता, तेथे व्हाईट या केसमध्ये [13 एससीआर (एनएसडब्ल्यू) 332], बोस्टन [(1923) 33 सीएलआर 386] आणि बंटिंग [(1884-85) 7 ओंटारियो अहवाल 524] मधील न्यायालयांनी असे म्हटले होते की आमदारावर या गुन्ह्यासाठी फौजदारी

न्यायालयात खटला चालविला जाऊ शकतो. त्यामुळे असे म्हणता येणार नाही की हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्याने लाच स्वीकारणे हे हाऊस ऑफ कॉमन्सने विशेषाधिकारभंग मानले आणि सदस्याविरुद्ध अवमान केल्याबद्दल सभागृहाद्वारे कारवाई केली जाऊ शकते, म्हणून २६-१-१९५० रोजी हाऊस ऑफ कॉमन्सच्या सदस्यांना संसदेच्या कामकाजाच्या अनुषंगाने लाच स्वीकारण्याच्या वर्तनासंदर्भात विशेषाधिकार प्राप्त होता, व त्यांना केवळ सभागृहाच्या विशेषाधिकारभंगाची शिक्षा होऊ शकत होती आणि त्यांच्यावर न्यायालयात खटला चालविला जाऊ शकत नव्हता. त्यामुळे राज्यघटनेच्या कलम १०५ च्या उपकलम (३) चा वापर अपीलकर्त्यांना त्यांच्यावरील आरोपांसंदर्भात खटल्यापासून सूट मिळण्यासाठी करता येणार नाही.

55. [...] निकालाच्या आधीच्या भागात आपल्याला असे आढळले आहे की गेल्या १०० वर्षांहून अधिक काळ ऑस्ट्रेलिया आणि कॅनडामधील लोकप्रतिनिधींवर त्यांच्या कायदेविषयक कामकाजासंदर्भात लाचखोरीचा खटला चालविल्या जाऊ शकत होता आणि युनायटेड किंगडमचा अपवाद वगळता, बहुतेक राष्ट्रकुल देश विधिमंडळाच्या सदस्यांकडून भ्रष्टाचार आणि लाचखोरी हा फौजदारी गुन्हा मानतात. युनायटेड किंग्डममध्येही या संदर्भातील कायद्यात बदल करण्याच्या हालचाली सुरू आहेत. इतर सर्व सार्वजनिक अधिकारी अशा कायद्यांच्या अधीन असतांना भारतातील लोकप्रतिनिधी लाचखोरी आणि भ्रष्टाचाराला नियंत्रणात ठेवणाऱ्या कायद्यांच्या पलीकडे असण्याचे काहीच कारण दिसत नाही. त्यामुळे श्री ठाकूर यांचा वरील युक्तिवाद आम्ही मान्य करू शकत नाही.

(जोर दिला आहे)

दुसरीकडे, बहुमताच्या निकालात बंटिंग (सुप्रा) चा संदर्भ देण्यात आला आहे परंतु या निर्णयावर किंवा या प्रकरणात रेकॉर्डवर ठेवलेल्या कॅनेडियन न्यायालयांच्या इतर कोणत्याही निर्णयावर आधार न ठेवणे त्यांनी पसंत केले आहे.

159. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या केस मधील निर्णयानंतर कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने विस्तारलेली न्यायशास्त्राची आणखी एक विस्तार (मनोरंजक ओळ) या न्यायालयासमोरील प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी समर्पक आहे. संसदीय विशेषाधिकाराची व्याप्ती याचा विचार करताना कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने,या निर्णयाच्या भाग एफ मध्ये तयार केलेल्या चाचणीप्रमाणेच सूत्र रूपाने (फॉर्म्युलेशनमध्ये) 'गरजे'ची कसोटी स्वीकारली आहे. या संदर्भात कॅनडातील सर्वोच्च न्यायालयाने, कॅनडा (हाऊस ऑफ कॉमन्स) विरुद्ध वैद {77} या केस मध्ये दिलेला ऐतिहासिक

निर्णय काही तपशीलवार लक्षात घेता येईल.

160. वरील प्रकरणात, हाऊस ऑफ कॉमन्सच्या माजी सभापतींवर कॅनेडियन मानवी हक्क अधिनियम, 1985 अंतर्गत कामाच्या ठिकाणी भेदभाव केल्याच्या कारणास्तव,त्यांच्या चालकाला बडतर्फ केल्याचा आरोप होता. हाऊस ऑफ कॉमन्सने याला विरोध केला आणि असा युक्तिवाद केला की अशा प्रकारची चौकशी संसदीय विशेषाधिकारावर अतिक्रमण आहे आणि सभागृहातील कर्मचाऱ्यांना कामावर ठेवणे आणि काढून टाकणे ही "अंतर्गत बाब" आहे ज्यावर सभागृहाव्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायाधिकरण किंवा न्यायालयाद्वारे प्रश्न चिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही किंवा पुनरावलोकन केले जाऊ शकत नाही. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला नाही.

161. कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की कायदेमंडळे देशाच्या सामान्य कायद्यापासून संरक्षित एन्क्लेव्ह (विदेशी

अंत:क्षेत्र) तयार करत नाहीत. संसदीय विशेषाधिकाराच्या व्यापक छत्रछायेखाली संरक्षण किंवा सूट यावर अवलंबून राहू पाहणाऱ्या पक्षावर त्याचे अस्तित्व प्रस्थापित करण्याची जबाबदारी असते. कॅनडामध्ये ब्रिटनमधील(युके)हाऊस ऑफ कॉमन्सचा वापर संसदीय विशेषाधिकाराचे अस्तित्व निश्चित करण्यासाठी बेंचमार्क (संदर्भ बिंदू) म्हणून केला जातो. म्हणूनच, विशेषाधिकार खरोखर अस्तित्वात आहे कां, हे ठरविण्यासाठी, पहिली पायरी म्हणजे कॅनेडियन संसद किंवा हाऊस ऑफ कॉमन्सच्या संदर्भात तो अधिकृतपणे स्थापित आहे कां याची तपासणी करणे. जर अस्तित्व प्रस्थापित झाले नाही, तर हे कृत्य संसदीय विशेषाधिकाराने संरक्षित आहे की नाही हे ठरविण्यासाठी आवश्यकतेचा सिद्धांत लागू करावा लागतो. थोडक्यात, ज्या कार्यासाठी विशेषाधिकाराचा दावा केला जातो,त्या कार्याचा विधिमंडळाने आपल्या कार्याच्या पूर्ततेशी जवळचा आणि थेट संबंध आहे आणि बाह्य हस्तक्षेपामुळे

विधानसभेला "प्रतिष्ठेने आणि कार्यक्षमतेने" आपले कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या स्वायत्ततेवर परिणाम होईल हे विधिमंडळाने किंवा सूट मागणाऱ्या सदस्याने सिद्ध केले पाहिजे.

162. कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निकाल दिला:

> "संसदेच्या प्रत्येक सभागृहाला बरेच स्वातंत्र्य दिले असले, तरी विशेषाधिकाराच्या व्याख्येकडे पाहण्याचा असा हेतूपूर्ण दृष्टिकोन महत्त्वाच्या मर्यादा दर्शवितो. उदाहरणार्थ, विशेषाधिकार "संसदेतील कार्यवाही" शी जोडला जातो,अशी सर्वसाधारण मान्यता आहे. तथापि, एर्स्किन मे (19 वी आवृत्ती 1976) पृष्ठ 89 वर, मध्ये म्हटल्याप्रमाणे "कामकाजाच्या व्यवहारादरम्यान चेंबरमध्ये जे काही बोलले जाते किंवा केले जाते ते सर्व

---

77. (2005)1 एससीआर 667

संसदेतील कामकाजाचा भाग बनत नाही. विशिष्ट शब्द किंवा कृती कोणत्याही कामकाजाशी पूर्णपणे संबंध नसलेले असू शकतात जे व्यवहारादरम्यान आहेत किंवा अधिक सामान्य अर्थाने सभागृहासमोर आहेत कारण त्यांना योग्य वेळी सभागृहासमोर येण्याचे आदेश देण्यात आले आहेत." (या परिच्छेदाचा संदर्भ रे क्लार्क मध्ये मान्यतेने देण्यात आला आहे.) अशा प्रकारे आर. विरुद्ध बंटिंग (१८८५), ७ ओ. आर. ५२४ मध्ये, उदाहरणार्थ, राणीच्या खंडपीठ विभागाने असे म्हटले आहे की प्रांतीय विधिमंडळाच्या सदस्यांना लाच देऊन सरकारमध्ये बदल घडवून आणण्याचे षड्यंत्र कोणत्याही प्रकारे संसदेतील कारवाईशी संबंधित नव्हते आणि म्हणूनच, गुन्ह्याचा खटला चालविण्याचा अधिकार न्यायालयाला होता.एर्स्किन मे (२३ वी आवृत्ती) "विशेषाधिकार समितीच्या १८१५ मधील मताचा संदर्भ देतात की लॉर्ड कोचरेन (कॉमन्सचे सदस्य) यांना चेंबरमध्ये

(सभागृह बसले नसतांना) पुन्हा अटक करणे हा विशेषाधिकारभंग नव्हता. विशिष्ट शब्द किंवा कृती, व्यवहारात आणल्यामुळे किंवा योग्य वेळी सभागृहासमोर येण्याचे आदेश दिल्यामुळे,कोणत्याही कामकाजाशी पूर्णपणे संबंध नसलेले असू शकतात.

...

हे सर्व स्त्रोत समान निष्कर्षाच्या दिशेने निर्देश करतात. संसदीय विशेषाधिकाराचा दावा टिकवून ठेवण्यासाठी, त्याची सूट मागणाऱ्या विधानसभेने किंवा सदस्याने हे दर्शविणे आवश्यक आहे की ज्या कार्यक्षेत्रासाठी विशेषाधिकाराचा दावा केला आहे त्या कार्यक्षेत्राचा विधानसभेने किंवा त्याच्या सदस्यांनी वैधानिक आणि विचार करणारी संस्था म्हणून त्यांच्या कार्याच्या पूर्ततेशी इतका जवळचा आणि थेट संबंध आहे, ज्यात

सरकारला जबाबदार धरण्याच्या विधानसभेच्या कार्याचाही समावेश आहे, की बाहेरील हस्तक्षेपामुळे विधानसभा आणि त्याच्या सदस्यांना त्यांचे काम सन्मानाने आणि कार्यक्षमतेने करण्यास सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्वायत्ततेची पातळी कमी होईल."

(जोर दिला आहे)

163. त्याचप्रमाणे कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने चॅग्नॉन विरुद्ध सिंडिकेट दे ला फॉन्क्शन पब्लिक एट पॅरापब्लिक डु क्यूबे{78} या खटल्यात दिलेल्या निर्णयात वैद (सुप्रा) वर विश्वास ठेवला आहे आणि त्याच अटींवर 'गरजे'ची कसोटी स्वीकारली.

---

78. (2018)2 एससीआर 687

त्या केसमध्ये क्युबेकच्या नॅशनल असेंब्लीने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांना सभेच्या अध्यक्षांनी सेवेतून बडतर्फ केले. कामगार लवादासमोर बडतर्फीच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले. सुरक्षारक्षकांना बडतर्फ करण्याचा निर्णय पुनरावलोकनाच्या अधीन नाही आणि हा निर्णय संसदीय विशेषाधिकाराने संरक्षित आहे, या कारणास्तव यावर आक्षेप घेण्यात आला. कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने बहुमताच्या मतानुसार असे म्हटले की सुरक्षा रक्षकांना बडतर्फ करणे संसदीय विशेषाधिकाराने संरक्षित नाही. संसदीय विशेषाधिकाराचे अंगभूत स्वरूप असे सूचित करते की त्याची व्याप्ती त्याच्या तर्काशी निगडित असणे आवश्यक आहे, म्हणजे कायदेमंडळांना त्यांचे कायदेविषयक आणि वैचारिक कार्य पार पाडताना संरक्षण देणे आहे . संसदेच्या विशेषाधिकाराला मान्यता देणाऱ्या न्यायालयाने असा अर्थ लावला आहे की न्यायालय त्याच्या प्रक्रियेचे पुनरावलोकन करू शकत नाही. त्यामुळे विधानसभेची घटनात्मक भूमिका पार पाडण्यासाठी आवश्यक तेवढीच व्यापकता

असावी, यासाठी उद्दिष्टपूर्ण दृष्टिकोन अवलंबला पाहिजे . वस्तुस्थितीच्या अनुषंगाने,सुरक्षा रक्षकांच्या व्यवस्थापनावर संसदीय विशेषाधिकाराची आवश्यकता प्रस्थापित करता आली नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. सभेच्या सुरक्षिततेला किंवा मुद्द्यांवर विचारविनिमय करण्याच्या क्षमतेला बाधा न आणता सुरक्षा रक्षकाचे व्यवस्थापन सामान्य कायद्यानुसार हाताळले जाऊ शकते.

IV. ऑस्ट्रेलिया

164. ऑस्ट्रेलियात कायद्याची स्थिती १८७५ पासून सातत्यपूर्ण आहे. विधिमंडळाच्या एखाद्या सदस्याला त्यांच्या मतांवर प्रभाव टाकण्यासाठी लाच देण्याचा प्रयत्न करणे हा सामान्य कायद्यानुसार फौजदारी गुन्हा आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यू साऊथ वेल्सच्या सर्वोच्च न्यायालयाने आर विरुद्ध एडवर्ड व्हाईट {७९} या खटल्यात दिलेला निर्णय, या संदर्भात एक मैलाचा दगड (महत्त्वाची गोष्ट) होता. सरन्यायाधीश सर

जेम्स मार्टिन म्हणाले:

> त्यामुळे घेतलेला आक्षेप वैध आहे की नाही, किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर विधानसभेच्या सदस्याला लाच देण्याचा प्रयत्न हा फौजदारी गुन्हा आहे का, हा मुद्दा आता न्यायालयाच्या विचाराधीन आहे. माझे स्पष्ट मत आहे की असा प्रयत्न हा सामान्य कायद्याचा गैरवापर आहे. विधिमंडळाच्या सदस्याला लाच देण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एखाद्या व्यक्तीविरुद्ध माहिती किंवा दोषारोपपत्रावर कोणतेही प्रकरण सापडत नसले, तरी असा प्रयत्न हा गुन्हा असल्याचे दर्शविणारी अनेक प्रकरणे आहेत.

---

79 13 एससीआर (एनएसडब्ल्यू) 332

...

जनतेला होणारी इजा अधिक थेट असते आणि त्याला निवडून देणाऱ्या व्यक्तींपेक्षा प्रत्यक्ष निवडून आलेल्या व्यक्तीला लाच देऊन वळविणे यात नक्कीच जास्त असते. भ्रष्टाचाराने मिळवलेल्या मतांच्या माध्यमातून विधिमंडळात पाठवलेली व्यक्ती सक्षम व कर्तव्यदक्ष सदस्य असू शकते; परंतु जो आमदार लाचेच्या प्रभावाखाली आपले मत येणे सहन करतो असा आमदार प्रातिनिधिक संस्थांची उपयुक्तता कमी करण्यासाठी त्यांच्या पायावरच डळमळीत करण्याचे गणित करतो.अशा व्यक्तीला लाच देण्याचा प्रयत्न करणे किंवा लाच स्वीकारणे हा जर गुन्हा नसेल तर तो सामान्य कायद्याचा अवमान ठरेल."

(जोर दिला आहे)

त्याचप्रमाणे न्यायमूर्ती हार्ग्रेव्ह यांनीही पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले :

> "या असंख्य आधुनिक प्राधिकरणांनी स्पष्टपणे सिद्ध केले आहे की, लाचखोरीविरोधातील जुन्या सामान्य कायद्याची बंदी केवळ पदाच्या शपथेखाली काम करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या पलीकडे, जनतेच्या विश्वासाची आणि भरंवशाची पदे भूषविणाऱ्या सर्व व्यक्तींपर्यंत फार पूर्वीपासून लागू करण्यात आली आहे; आणि हे समजणे अशक्य वाटते की आपल्या विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांना, ज्यांना आपले कायदे बनविण्याची सार्वजनिक जबाबदारी सोपविण्यात आली आहे, त्यांना किमान लाचखोरी आणि भ्रष्टाचारापासून कायद्याचे पालन करावे लागणाऱ्या कोणत्याही न्यायाधीश किंवा कॉन्स्टेबलइतकेच संरक्षण कां देऊ नये."

(जोर दिला आहे)

165. त्यानंतर व्हाईट **(सुप्रा)** मधील निर्णयाचे ऑस्ट्रेलियाच्या उच्च न्यायालयानेही आर विरुद्ध बोस्टन {80}या खटल्यात निकाल देतांना अनुसरण केले. हे असे प्रकरण होते जिथे काही खाजगी पक्षांनी विधानसभेच्या सदस्यांना लाच देण्याचा करार केला जेणेकरून ते आपल्या अधिकृत पदाचा वापर करून विशिष्ट मालमत्तांचे अधिग्रहण सुरक्षित करतील. न्यायालयासमोर मांडलेला युक्तिवाद अनोखा होता. व्हाईट (सुप्रा) मध्ये प्रस्थापित केलेल्या प्रस्तावावर अपीलकर्त्याने वाद घातला नाही की विधानसभेच्या एखाद्या सदस्याला त्यांच्या मतावर प्रभाव टाकण्यासाठी पैसे देण्याचा करार फौजदारी गुन्हा ठरेल.

---

80. (1923)33 सीएलआर 386

मात्र, या प्रकरणात लाच ही लाच देणाऱ्यांच्या बाजूने विधानसभेच्या आंत नव्हे तर विधानसभेच्या बाहेर विधानसभेच्या सदस्याने आपल्या पदाचा वापर करण्यास भाग पाडण्यासाठी होती, असा युक्तिवाद करण्यात आला. संसदेतील कृत्ये करण्यासाठी बेकायदेशीर लाच देणे आणि संसदेबाहेरील कृत्ये यातील कृत्रिम फरक न्यायालयाने फेटाळून लावला आणि असे म्हटले की दोन्ही प्रकरणांमध्ये लाचखोरीच्या कृतीमुळे सदस्याची निरपेक्ष निर्णय घेण्याची क्षमता कमी होते आणि त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर परिणाम होतो. सरन्यायाधीश नॉक्स, म्हणाले:

> "[...] माझ्या मते, संसदेच्या आंत किंवा बाहेर आपल्या अधिकृत पदाचा वापर करण्यास प्रवृत्त करण्यासाठी संसद सदस्याला पैसे देणे आणि त्याने पैसे प्राप्त करणे, जेणेकरून एखाद्या मंत्री किंवा राज्याच्या (क्राऊनच्या) इतर अधिकाऱ्यावर सार्वजनिक निधीतून

पैसे देण्याशी संबंधित व्यवहार करण्यासाठी किंवा करण्यासाठी दबाव आणण्याच्या हेतूने, सार्वजनिक उपद्रवाला खतपाणी घालणारी कृत्ये आहेत आणि अशी कृत्ये करण्याचा करार किंवा संयोजन फौजदारी गुन्हा आहे. सार्वजनिक उपद्रवाच्या प्रवृत्तीच्या दृष्टीकोनातून एखाद्या सदस्याला संसदेतील त्याचे मत विशिष्ट दिशेने वापरण्यास प्रवृत्त करण्यासाठी त्याला पैसे देणे आणि मंत्र्यांना प्रभावित करण्याच्या किंवा दबाव आणण्याच्या हेतूने संसदेबाहेर सदस्य पदाचा वापर करण्यास प्रवृत्त करण्यासाठी त्याला पैसे देणे यात मला फारसा फरक दिसत नाही.

...

एखाद्या मंत्र्याला विशिष्ट व्यवहार करण्यासाठी राजी करण्यासाठी किंवा प्रभावित करण्यासाठी किंवा दबाव

आणण्यासाठी संसद सदस्याला पैसे देणे, हे संसदेच्या आत किंवा बाहेर च्या वर्तनाने दबाव आणायचे असले तरी,अनेक प्रकारे सार्वजनिक उपद्रव घडवून आणते. हे प्राप्तकर्त्याला, सार्वजनिक हिताची पर्वा न करता, त्याला पैसे देणाऱ्याच्या (त्याच्या पेमास्टरच्या) हिताची सेवा करण्यासाठी,आणि संसदेत बसण्याच्या आणि मतदान करण्याच्या त्याच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून कार्य करते,जे साध्य करण्यासाठी त्याला पैसे दिले जातात. यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून व्यवहाराच्या गुणवत्तेवर निरपेक्ष निर्णय घेण्याची त्याची क्षमता क्षीण होते आणि तो लोकांचा प्रतिनिधीऐवजी त्याला पैसे देणाऱ्या व्यक्तीचा सेवक बनतो."

(जोर दिला आहे)

166. ऑस्ट्रेलियातील न्यायालयांनीही ब्रिटनच्या सर्वोच्च न्यायालयाने चॅटोर (सुप्रा) मध्ये घालून दिलेल्या कायद्याच्या स्थितीचे पालन केले आहे की केवळ हाऊस ऑफ कॉमन्सला सभागृहातील सदस्यांच्या गुन्हेगारी वर्तनाबद्दल हाताळणी करण्याचे अधिकारक्षेत्र नाही. अशा प्रकरणांना अपवाद एवढाच की जेव्हा संसदीय विशेषाधिकाराच्या अस्तित्वामुळे मुद्दे निश्चित करणे अक्षरशः अशक्य होते किंवा कामकाजामुळे सभागृहाचे कायदेविषयक व विचारपूर्वक कामकाज करण्याच्या क्षमतेत अडथळा निर्माण होतो. उदाहरणार्थ, ओबेद विरुद्ध राणी[81] मध्ये, अपीलकर्त्यावर स्वतःसाठी आर्थिक फायदा मिळविण्यासाठी आपल्या पदाचा वापर करून पदावरील गैरवर्तनाच्या गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात आला होता. न्यू साऊथ वेल्सच्या कोर्ट ऑफ क्रिमिनल अपीलसमोर युक्तिवाद करण्यात आलेल्या पैकी एक कारण असे होते की, असेंब्ली सदस्यांकडून होणाऱ्या अशा उल्लंघनांना (शंकांना) हाताळण्याचा अधिकार संसदेला

असल्याने न्यायालयाला अधिकारक्षेत्राचा वापर करण्यास रोखायला हवे होते. न्यायालयाने चॅटोर (सुप्रा) या केसचे अनुकरण केले व असा अर्थ काढला की ,फौजदारी बाबींच्या संदर्भात न्यायालय आणि संसदेचे समवर्ती अधिकार क्षेत्र असू शकते आणि असा कोणताही कायदा नाही जो न्यायालयाला "संसदेतील कार्यवाही" नसणारी प्रकरणे निश्चित करण्यास प्रतिबंधित करेल.

167. व्हाईट (सुप्रा) आणि बोस्टन (सुप्रा) मधील निर्णय पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) यांच्या केस मध्ये न्यायालयासमोर ठेवण्यात आले . अल्पसंख्याकांच्या निकालात दोन्ही निर्णयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि त्यावर आधार ठेवून असा निष्कर्ष काढला गेला की एखाद्या आमदाराला संसदेत मतदान करण्यासाठी किंवा बोलण्यासाठी प्रभावित करण्यासाठी लाच देणे हा फौजदारी गुन्हा आहे, जो कलम 105 (2) आणि 194 (2) द्वारे संरक्षित नाही. बहुमताच्या निकालात मात्र ऑस्ट्रेलियन मागील उदाहरणांचा

उल्लेख नाही.

I. राज्यसभेची निवडणूक कलम १९४ (२) च्या कक्षेत आहे

168. शेवटी,आपण आपले लक्ष विद्वान ॲटर्नी जनरल श्री . वेंकटरामाणी यांनी मांडलेल्या युक्तिवादाकडे वळवू शकतो. पीव्ही नरसिंह राव या केस मधील निर्णय सध्याच्या खटल्यातील वस्तुस्थितीला लागू नाही, असा युक्तिवाद ॲटर्नी जनरल यांनी केला. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) मधील वस्तुस्थिती अविश्वास प्रस्तावाशी संबंधित होती, तर सध्याच्या प्रकरणात अपीलकर्त्याने राज्यपरिषद किंवा राज्यसभेच्या रिक्त जागा भरण्यासाठी मतदान केले. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी सभागृहाबाहेर लॉबीमध्ये मतदान झाल्याने ते अविश्वास ठरावाप्रमाणे सभागृहाचे कामकाज मानता येणार नाही, असे प्रतिवादींनी दाखल केलेल्या विरुद्धच्या प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले होते. पण

81 [2017] एनएसडब्ल्यूसीसीए 221

तोंडी युक्तिवाद करताना आणि आपल्या लेखी युक्तिवादात अॅटर्नी जनरल यांनी असा युक्तिवाद केला की राज्यसभेच्या मतदानाला कलम १९४ (२) द्वारे संरक्षण दिले जात नाही कारण निवडणुकीच्या भौगोलिक जागेचा विचार न करता अशी निवडणूक सभागृहाच्या कायदेविषयक कामकाजाचा भाग बनत नाही. या युक्तिवादाला पुष्टी देण्यासाठी अॅटर्नी जनरल यांनी पशुपति नाथ सुकुल विरुद्ध नेमचंद्र जैन आणि इतर **{82},** मधुकर जेटली विरुद्ध भारत सरकार**{83},**आणि कुलदीप नायर विरुद्ध भारत सरकार **{84}** या, या न्यायालयाच्या तीन निकालांचा आधार घेतला.

169. असा युक्तिवाद प्रथमदर्शनी आकर्षक असला तरी चुकीचा

वाटतो. थोडक्यात, राज्यसभेच्या निवडणुकीत राज्य विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांनी दिलेली मते राज्यघटनेच्या कलम १९४ (२) नुसार संरक्षित आहेत का, हा प्रश्न आहे. विद्वान ॲटर्नी जनरल यांनी दिलेल्या निर्णयांवर लक्ष देण्यापूर्वी, आम्ही घटनात्मक विवेचनाच्या या मनोरंजक प्रश्नावर नियंत्रण ठेवणाऱ्या राज्यघटनेतील तरतुदींचे विश्लेषण करू.

170. कलम ८० हे राज्यपरिषद किंवा राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडीवर नियंत्रण ठेवते. ती तरतुद खालीलप्रमाणे आहे:

"80. कौन्सिल ऑफ स्टेट्सची रचना. -

(1) राज्यपरिषदेत खालील गोष्टींचा समावेश असेल-

(अ) कलम (३) मधील तरतुदींनुसार राष्ट्रपतींनी नामनिर्देशित केलेले बारा सदस्य; आणि

(ब) राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे दोनशे अडोतीसपेक्षा जास्त प्रतिनिधी नाहीत.

(2) राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रतिनिधींकडून भरण्यात येणाऱ्या राज्य परिषदेतील जागांचे वाटप चौथ्या अनुसूचीत असलेल्या त्या संदर्भातील तरतुदींनुसार होईल.

...

—----------

82.(1984)1 एससीआर 939:(1984)2 एससीसी 404

83. (1997)11 एससीसी 111

84. (2006)पुरवणी 5 एससीआर 1:(2006)7 एससीसी 1

—----------

(४) राज्यपरिषदेतील प्रत्येक राज्याचे प्रतिनिधी राज्याच्या विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांद्वारे एकल हस्तांतरणीय मतदानाद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार निवडले जातील.

..."

(जोर दिला आहे)

171. कलम ८० नुसार राज्यसभेमध्ये राष्ट्रपतींनी नामनिर्देशित केलेले बारा सदस्य असतात आणि राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे दोनशे अडोतीस पेक्षा जास्त प्रतिनिधी नसतात. विशेष म्हणजे कलम ८० (४) अन्वये राज्यसभेचे प्रतिनिधी राज्यांच्या विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांद्वारे निवडले जातील. त्यामुळे राज्यसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांकरिता 'मतदान' करण्याचा अधिकार केवळ राज्यांच्या विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांकडे सोपवला आहे.प्रत्येक राज्याच्या विधानसभेचे सदस्य म्हणून हे त्यांच्या अधिकारांचा आणि जबाबदाऱ्यांचा अविभाज्य भाग आहे.

172. त्यामुळे अनुच्छेद १९४ (२) मधील मजकुरात अशा मतदानाला संसदीय विशेषाधिकाराने संरक्षण देण्यावर काही बंधने घालण्यात

आली आहेत कां , हा पुढचा प्रश्न आहे. वर म्हटल्याप्रमाणे राज्यघटनेचे कलम १९४ (२) खालीलप्रमाणे आहे :

"**194.** विधिमंडळाच्या सभागृहांचे व त्यातील सदस्य व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार इ. -

...

(२) राज्याच्या विधिमंडळाचा कोणताही सदस्य विधिमंडळात किंवा त्यासंबंधी च्या कोणत्याही समितीमध्ये सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही मताच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस उत्तरदायी राहणार नाही आणि अशा विधिमंडळाच्या सभागृहाद्वारे किंवा अधिकाराखाली, कोणत्याही अहवालाच्या, कागद,मते,किंवा कार्यवाही प्रकाशित करण्यासंदर्भात कोणतीही व्यक्ती अशी जबाबदार असणार नाही.

...”

173. अनुच्छेद १९४ मधील समासातील टिप्पणी मध्ये (मार्जिनल नोटमध्ये) "विधिमंडळाच्या सभागृहांचे आणि त्यातील सदस्यांचे व समित्यांचे अधिकार, विशेषाधिकार इ.” हे वाक्य वापरण्यात आले आहे. ही कायद्याची एक निश्चित स्थिती आहे की कायद्यातील एखाद्या कलमाच्या समासातील टिप्पणी ने जर वापरली जाणारी भाषा स्पष्ट असेल तर,त्या कलमाच्या मुख्य भागाच्या अर्थावर नियंत्रण ठेवता येणार नाही. राज्यघटनेच्या कलमांच्या संदर्भात, "कलमाचा अर्थ आणि हेतू याबद्दल काही सूचक अर्थ” प्रदान करण्यासाठी एक साधन म्हणून समासातील टिप्पणी वापरली जाऊ शकते. तथापि, कलमाचा खरा अर्थ कलमाच्या केवळ मजकुरावरून घ्यावा लागेल. जेव्हा त्या कलमाची भाषा सरळ आणि संदीग्ध असते , तेव्हा त्यास जोडलेल्या समासातील टिप्पणीला अवाजवी महत्त्व देता येत नाही.[85] केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या खटल्यात (86)

न्यायमूर्ती हेगडे, (स्वत:साठी आणि न्यायमूर्ती ए. के. मुखर्जी, यांच्यासाठी) यांनी खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले:

"**620.** [...] ही स्थिती पुन्हा मांडण्यासाठी कलम ३६८ मध्ये घटनादुरुस्तीचा उल्लेख आहे. या कलमात घटनादुरुस्तीचे अधिकार आणि कार्यपद्धती दोन्ही आहेत. 'राज्यघटनेच्या दुरुस्तीची कार्यपद्धती' असे लिहिलेल्या समासातील टिप्पणीला अवाजवी महत्त्व देता कामा नये. वैधानिक तरतुदीला अर्थ देताना समासातील टिपणीचा फारसा वाटा नसतो. घटनात्मक तरतुदीचा अर्थ लावताना त्याला फारसे महत्त्व नसावे. आमच्या मते कलम ३६८ ची भाषा सरळ आणि निःसंदिग्ध आहे. त्यामुळे त्याचा अर्थ लावताना, कोणत्याही नियमांची मदत घेण्याची गरज नाही ज्या नियमांबाबत सुनावणीत बरीच चर्चा (वादविवाद)झाली. या कलमांतर्गत सुधारणा करण्याचा अधिकार

जसा मुळात होता, तसाच तो केवळ अभिप्रेत असल्याने समासातील टिप्पणीमध्ये दुरुस्तीच्या प्रक्रियेचा योग्य उल्लेख करण्यात आला होता. समासातील टिप्पणी मधील प्रक्रियेचा संदर्भ कलमातील अधिकाराच्या अस्तित्वावर नकारात्मक परिणाम करत नाही."

(जोर दिला आहे)

174. समासातील टिप्पणी पेक्षा वेगळे, तरतुदीच्या मजकुरात योग्य ठिकाणी "विधिमंडळाचे सभागृह" ऐवजी "विधीमंडळ" या शब्दाचा जाणीवपूर्वक वापर करण्यात आला आहे. तरतुदीच्या मसुद्यावरून हे स्पष्ट होते की, या दोन्ही शब्दांचा अदलाबदलीने वापर करण्यात आलेला नाही. कलम १९४ (२) चा पहिला भाग "त्यांनी विधिमंडळात किंवा त्यासंबंधीच्या कोणत्याही समितीमध्ये सांगितलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही मताशी”

संबंधित आहे .

_—----------

85. न्यायमूर्ती जी पी सिंग, कायद्याचे अर्थ लावण्याचे सिद्धांत,15 वी आवृत्ती(2021),188-189, बंगाल इम्युनिटी कंपनी लिमिटेड विरुद्ध बिहार राज्य (1955)2 एससीआर 603

86. (1973) पुरवणी1 एससीआर 1:(1973)4 एससीसी 225

—----------

पण दुसऱ्या भागात, वापरलेले वाक्य म्हणजे "अशा विधिमंडळाच्या सभागृहाद्वारे किंवा अधिकाराखाली कोणताही अहवाल, कागद, मते किंवा कार्यवाही प्रकाशित करण्याच्या संदर्भात." तरतुदीच्या दुसऱ्या भागात वापरलेले "अशा विधिमंडळाचे सभागृह" हे शब्द पहिल्या भागात वापरल्या गेलेल्या 'विधीमंडळ' या शब्दापासून स्पष्ट पणे वेगळे आहे. त्यामुळे या तरतुदीमुळे एकूणच "विधिमंडळ" (पहिल्या भागात)

आणि त्याच विधिमंडळाचे "सभागृह" (दुसऱ्या भागात) असा भेद निर्माण होतो, हे स्पष्ट आहे.

175. अपीलकर्त्याचे वरिष्ठ वकील श्री राजू रामचंद्रन यांनी योग्यरित्या सादर केल्याप्रमाणे, "विधिमंडळाचे सभागृह" आणि "विधिमंडळ" या शब्दांचे वेगवेगळे अर्थ आहेत. "विधिमंडळाचे सभागृह" म्हणजे कायदेविषयक संस्था, जी कलम 174 नुसार राज्यपालांद्वारे बोलावले जाते.[87] "विधिमंडळ" हा शब्द कलम 168,(88) अंतर्गत राज्यपाल आणि विधिमंडळाच्या सभागृहांचा समावेश असलेल्या व्यापक संकल्पनेचा संदर्भ देतो. राज्यपालांनी सभागृह बोलावले नसले तरी ते अनिश्चित काळासाठी चालते (काम करते) आणि अस्तित्वात राहते.

176. "विधिमंडळाचे सभागृह" ऐवजी "विधिमंडळात" या वाक्याचा वापर अर्थपूर्ण आहे. अशा अनेक संसदीय प्रक्रिया आहेत ज्या सभागृहाच्या पटलावर, होत नाहीत,म्हणजे अधिवेशन,

राज्यपालांनी बोलावून घेतलेले, चालू असताना. उदाहरणार्थ, तिथे तदर्थ समित्या आणि स्थायी समित्या आहेत ज्या धोरण संबंधी बाबी किंवा सरकारी प्रशासनाच्या बाबींसह विविध विषयांची तपासणी करतात. यापैकी अनेक समित्या सभागृहात मांडल्या जाणाऱ्या कायद्यांवर किंवा विधेयकांवर चर्चा करत नाहीत किंवा 'सभागृह' बसत नसताना कामकाज बंद करतात. अशा समित्यांमध्ये होणारी चर्चा ("काहीही म्हटलेली") संसदीय विशेषाधिकाराने संरक्षित न करण्याचे कारण दिसत नाही.

---

87 १७४. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन, कामकाज स्थगित ठेवणे व विघटन.- (१) राज्यपाल वेळोवेळी सभागृहाला किंवा राज्याच्या विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहाला त्यांना योग्य वाटेल त्या वेळी व त्या ठिकाणी बैठकीसाठी बोलावतील,परंतु एका अधिवेशनातील शेवटची बैठक आणि पुढील अधिवेशनात पहिल्या बैठकीसाठी

नेमलेली तारीख यात सहा महिने अंतर मध्ये नसावे.

(2) राज्यपाल वेळोवेळी- —(अ) सभागृह किंवा कोणतेही सभागृह स्थगित करू शकतात; (ब) विधानसभा बरखास्त करू शकतात.]

88 **168.** राज्यांमध्ये विधिमंडळांची रचना.—(1) प्रत्येक राज्यासाठी एक विधिमंडळ असेल ज्यात राज्यपाल असेल आणि -

(अ) आंध्र प्रदेश), बिहार, मध्य प्रदेश , महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांत दोन सभागृहे;

(ब) इतर राज्यांत, एक सभागृह.

(2) ज्या राज्याच्या विधिमंडळाची दोन सभागृहे असतील तर, एक विधान परिषद आणि दुसरी विधानसभा म्हणून ओळखली जाईल आणि जिथे एकच सभागृह असेल तेथे त्याला विधानसभा म्हणून ओळखले जाईल.

---

177. राज्यसभेची निवडणूक वर नमूद केल्याप्रमाणे कलम ८० अन्वये होऊ शकते, जेव्हा सभागृहाचे अधिवेशन सुरू नसते तेव्हा सुद्धा

ही निवडणूक होऊ शकते कारण राज्याच्या विधानसभेचे अधिवेशन सुरू नसताना जागा रिक्त होऊ शकतात . तथापि, निवडणुका विधिमंडळाच्या कामकाजाचा एक भाग राहतात आणि विधानसभेच्या आवारातच होतात. त्याचप्रमाणे कलम ५४ (89)अन्वये भारताच्या राष्ट्रपतींची आणि कलम ६६ अन्वये उपराष्ट्रपतींची[90] निवडणूकही संसदेचे किंवा विधानसभेचे अधिवेशन सुरू नसताना होऊ शकते. तथापि, ते संसद आणि राज्य विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांच्या अधिकार आणि जबाबदाऱ्यांचा अविभाज्य भाग आहेत . अशा निवडणुकांसाठी विधिमंडळ किंवा संसदेत मतदान दिले जाते, जे कलम १०५ (२) आणि १९४ (२) च्या पहिल्या भागातील संरक्षण मिळविण्यासाठी पुरेसे आहे. विधिमंडळाच्या कामकाजात आणि संसदीय लोकशाहीच्या व्यापक रचनेत अशा प्रक्रिया महत्त्वाच्या असतात. कलम १०५ (२) आणि कलम १९४ (२) च्या मजकुरातही अशा निवडणुकांना तरतुदींनी दिलेल्या संरक्षणाबाहेर

ढकलणारे कोणतेही बंधन दिसत नाही. शिवाय, आमदारांना न घाबरता 'बोलण्याचे' आणि 'मतदान' करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संसदीय विशेषाधिकाराचा हेतू राज्यसभेच्या निवडणुका आणि राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीलाही तितकाच लागू पडतो.

178. आता ॲटर्नी जनरल यांनी आपला युक्तिवाद पुढे नेण्यासाठी ज्या प्रकरणांचा आधार घेतला आहे, त्या प्रकरणांकडे आम्ही लक्ष देतो.पशुपतिनाथ सुकुल (सुप्रा) या प्रकरणात या न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की, राज्यघटनेच्या कलम १८८ अन्वये आवश्यक असलेली घटनात्मक शपथ घेण्यापूर्वीच विधानसभेचा सदस्य राज्यसभेच्या निवडणुकीत एका जागेसाठी उमेदवारी देऊ शकतो आणि मतदान करू शकतो. राज्यसभेच्या जागा भरण्यासाठी होणारी निवडणूक हा सभागृहाच्या विधिमंडळाच्या कामकाजाचा भाग नसतो किंवा ते सभागृहासमोर उद्भवणाऱ्या कोणत्याही विषयावर

सभागृहात दिलेले मतदानही होत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. त्यामुळे त्याला घटनेच्या 193 कलमाची बाधा येत नाही ज्यात असे म्हटले आहे की विधानसभेच्या सदस्याला शपथ घेण्यापूर्वी सभागृहात बसून मतदान करता येणार नाही. विशेष म्हणजे निवडून आलेल्या सदस्याचे नाव अधिसूचनेत येणे आणि सदस्याने घटनात्मक शपथ घेणे, यांच्यातील दरम्यानच्या काळात, तिला विधानसभेचा सदस्य म्हणून सर्व विशेषाधिकार, वेतन आणि भत्ते मिळण्याचा अधिकार आहे, असेही न्यायालयाने नमूद केले.

—----------

89. इलेक्टोरल कॉलेज (निर्वाचक गण) मध्ये निवडून आलेले खासदार आणि आमदार असतात.

90. इलेक्टोरल कॉलेज (निर्वाचक गण) मध्ये निवडून आलेल्या खासदार यांचा समावेश असतो.

विधानसभेचे सदस्य, यांना विशेषाधिकाराचा अधिकार आहे, जरी ते सहभागी होऊ शकत नसले किंवा 'कायदा निर्मितीत' भाग घेत नसले तरी, हे न्यायालयाने मान्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी एक विशेषाधिकार म्हणजे कलम १९४ अन्वये विधानसभेच्या सदस्यांना देण्यात आलेला संसदीय विशेषाधिकार. न्यायालयाने पुढीलप्रमाणे निकाल दिला:

> "**18.** [...] राज्यघटनेच्या कलम १९३ मध्ये, आधी म्हटल्याप्रमाणे, नियम असा आहे की, विधानसभेवर निवडून आलेला सदस्य शपथ किंवा अभिवचन (पुष्टी)देण्यापूर्वी सभागृहात बसू शकत नाही व मतदान करू शकत नाही. राज्यघटनेच्या कलम १९३ मधील ' बसणे व मतदान करणे' या शब्दांचा अर्थ राज्यघटनेच्या कलम १७४ अन्वये राज्यपालांनी योग्य वाटेल त्या वेळी

व ठिकाणी सभागृहाची बैठक बोलावणे आणि त्या समन्सच्या अनुषंगाने सभागृहाची बैठक घेणे किंवा तहकूब केलेली बैठक घेणे असा होतो. निवडून आलेल्या सदस्याला, सभागृहाच्या अशा सभेत जेव्हा तो बसतो व मतदान करतो तेव्हाच घटनेच्या कलम १९३ चे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्यावर दंड ठोठावला जातो. कायद्याच्या कलम ७३ मधील तरतुदीनुसार सार्वत्रिक निवडणुकीनंतर सभागृहाची स्थापना आणि सभागृहाची पहिली सभा बोलावणे, यात बहुधा नेहमीच वेळेचे अंतर असते. या कालावधीत कायद्याच्या कलम ७३ अन्वये जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत ज्याचे नाव आहे, त्या विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्याला विधानसभेच्या सदस्याचे सर्व विशेषाधिकार, वेतन व भत्ते मिळतात, त्यापैकी एक म्हणजे राज्यसभेची जागा भरण्यासाठी झालेल्या

निवडणुकीत मतदार म्हणून काम करण्याचा अधिकार.कायद्याच्या कलम ७३ चा हा परिणाम आहे, ज्यात म्हटले आहे की, त्याअंतर्गत अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर सभागृहाची स्थापना झाल्याचे समजले जाईल. सभागृहाच्या बैठकीत पार पडलेल्या विधिमंडळाच्या कामकाजाचा ही निवडणूक भाग होत नाही. तसेच अशा निवडणुकीत दिलेले मतदान हे सभागृहासमोर उद्भवणाऱ्या कोणत्याही विषयावर सभागृहात दिले जाणारे मत नसते. निवडणुकीवर सभापतींचे नियंत्रण नसते. ही निवडणूक त्यासाठी नेमलेल्या निवडणूक अधिकाऱ्याकडून घेतली जाते. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे ,या कायद्याच्या कलम ३३ अन्वये, नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करावे लागतात, व कलम ३० अन्वये उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अधिसूचित

केलेल्या शेवटच्या दिवसापूर्वी दुपारी अकरा ते दुपारी तीन या वेळेत. त्यानंतर उमेदवारी अर्जांची छाननी, उमेदवारी अर्ज मागे घेणे अशा पुढील सर्व प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर होतात. निवडणूक आचारसंहिता नियम १९६१ च्या नियम ६९ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, विधानसभा सदस्यांच्या निवडणुकीत जिथे मतदान आवश्यक असेल, अशा निवडणुकीसाठीचा निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या तारखेनंतर, शक्य तितक्या लवकर, प्रत्येक मतदाराला मतदानासाठी निश्चित केलेली तारीख, वेळ आणि ठिकाणाची माहिती देणारी नोटीस पाठवतील. निवडणूक आचारसंहिता नियम १९६१ च्या भाग ६ मध्ये नियम ६९ आणि भाग ७ मध्ये विधानसभा सदस्यांनी निवडणुकीत कोणती कार्यपद्धती अवलंबली

जावी याची माहिती देण्यात आली आहे. निवडणूक आचारसंहिता नियम १९६१ च्या नियम ८५ मध्ये अशी तरतूद आहे की, एखादा उमेदवार निवडून आल्याचे जाहीर झाल्यानंतर लगेचच निवडणूक निर्णय अधिकारी अशा उमेदवाराला फॉर्म २४ मध्ये निवडणुकीचे प्रमाणपत्र देईल आणि उमेदवाराकडून त्याच्या सह्या असलेल्या पावतीची रसीद प्राप्त करेल आणि तत्काळ नोंदणीकृत पोस्टाने पावती राज्य परिषदेच्या सचिवांकडे किंवा विधान परिषदेचे सचिव जसे असेल तसे,पाठवेल. विधान परिषदेचे सचिव असावेत. त्यामुळे निवडणुकीच्या काळात उचललेली सर्व पावले सभागृहाच्या बैठकीत होणाऱ्या कामकाजाच्या बाहेर असतात."

(जोर दिला आहे)

179. मधुकर जेटली (सुप्रा) प्रकरणात न्यायालयाने पशुपतिनाथ सुकुल (सुप्रा) यांचा आधार घेत राज्यसभेची निवडणूक हा सभागृहाच्या विधिमंडळाच्या कामकाजाचा भाग नसतो आणि अशा निवडणुकीत दिलेले मत हे सभागृहाच्या बैठकीत दिलेले मत ठरत नाही, असा पुनरुच्चार केला. विशेष म्हणजे पशुपतिनाथ सुकुल (सुप्रा) आणि मधुकर जेटली (सुप्रा) या दोन्ही केसेस कलम १९४ (२) चा अर्थ आणि व्याप्ती किंवा संसदीय विशेषाधिकाराच्या कोणत्याही दाव्याशी संबंधित कोणत्याही प्रश्नाशी संबंधित नाही.

180. वर म्हटल्याप्रमाणे,राज्यसभेची निवडणूक हा कायदा बनवण्याच्या कामाचा भाग नसतो आणि सभागृहाच्या बैठकीदरम्यान होत नाही, या प्रस्तावाबद्दल कोणताही वाद नाही. तथापि, कलम १९४ च्या मजकुरात जाणीवपूर्वक संसदीय प्रक्रियांचा, ज्या सभागृहाच्या पटलावर घडत नाहीत किंवा ज्यात त्याच्या अतिसिद्धांतवादी अर्थाने 'कायदा बनविणे' येत नाही, समावेश करण्यासाठी, 'सभागृह' ऐवजी 'विधिमंडळ' हा शब्द

वापरण्यात आला आहे.

181. शेवटी विद्वान ॲटर्नी जनरल यांनी कुलदीप नायर (सुप्रा) या केस वर भरवसा ठेवला. या प्रकरणात या न्यायालयाचे घटनापीठ लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मधील दुरुस्तीच्या वैधतेवर निर्णय देत होते, ज्याद्वारे (अ) राज्यसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवार हा राज्यातील एखाद्या मतदारसंघातून मतदार असण्याची अट काढून टाकण्यात आली होती; आणि (ब) राज्यसभेच्या निवडणुकीत खुल्या मतपत्रिकेचा वापर रुजविण्यात आला.

182. राज्यसभेच्या निवडणुकीत खुल्या मतपत्रिकेचा वापर करण्यावर आव्हान देताना न्यायालयासमोर मांडण्यात आलेला एक युक्तिवाद असा होता की, कलम १९४ (२) द्वारे मतांचे संरक्षण केले जाते. कलम १९४ (१) आणि (२) अन्वये आमदारांना दिलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार हा कलम १९ (१) (अ)

अन्वये देण्यात आलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारापेक्षा वेगळा आहे, जो वाजवी निर्बंधांच्या अधीन आहे, असा युक्तिवाद करण्यात आला. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मध्ये कायद्याला दुरुस्ती करून,खुल्या मतपत्रिकेला परवानगी देऊन,राज्यघटनेच्या कलम १९४ (२) अन्वये मतदान स्वातंत्र्याचा संपूर्ण अधिकार कमी केल्या जात आहे, अशी आग्रही भूमिका मांडण्यात आली. या युक्तिवादाला उत्तर देताना, न्यायालयाने म्हटले की, राज्यसभेच्या जागा भरण्यासाठी होणारी निवडणूक ही विधिमंडळाची कार्यवाही नसून केवळ मतदानाचा वापर आहे, जो कलम १९४ च्या जाळ्याबाहेर आहे. न्यायालयाने (सरन्यायाधीश वाय. के. सभरवाल, यांच्यामार्फत बोलताना) खालीलप्रमाणे निर्णय दिला:

> "कायदेविषयक विशेषाधिकार आणि दहाव्या अनुसूचीवर आधारित युक्तिवाद

...

372. अनुच्छेद ८० (४) मधील तरतुदींनुसार राज्यपरिषदेत प्रत्येक राज्याचे प्रतिनिधी निवडण्यासाठी राज्यनिहाय निर्वाचकगण (निवडणूक महाविद्यालये) स्थापन करणाऱ्या राज्यांच्या विधानसभा सदस्यांच्या विशेषाधिकारांविषयी कलम १९४ (२) मधील तरतुदीची व्याप्ती आणि प्रयोजन काय असावे,याचा अर्थ असाच असावा, असा विद्वान वकिलांचा युक्तिवाद आहे. कलम १९४ (२) नुसार कायदेशीर परिणामांची भीती न बाळगता अभिव्यक्ती स्वातंत्र्य कलम ८० (४) अन्वये निर्वाचकगण (इलेक्टोरल कॉलेज) म्हणून काम करताना विधानसभा सदस्यांना मिळाले पाहिजे, असा युक्तिवाद वकिलांनी केला.

373. हा युक्तिवाद आकर्षक असला, तरी हाताशी

असलेल्या संदर्भात कोणत्याही विश्वासाला पात्र नाही. कलम ८० अन्वये निवडणुकीसंदर्भातील कार्यवाही ही कलम १९४ च्या अर्थांतर्गत "राज्याच्या विधिमंडळाच्या सभागृहाची" कार्यवाही नाही. राज्यपरिषदेत त्या राज्याला देण्यात आलेली जागा भरून काढण्यासाठी कलम ८० अन्वये राज्याच्या प्रतिनिधीची निवड करण्यासाठी विधानसभेचे निवडून आलेले सदस्यच निर्वाचकगणाची (इलेक्टोरल कॉलेज ची)स्थापना करतात. विशेष म्हणजे संपूर्ण विधानसभा च निर्वाचकगण (इलेक्टोरल कॉलेज) बनत नाही, तर त्यातील ठराविक प्रवर्गातील सदस्यच बनतात. जेव्हा असे सदस्य एखाद्या ठिकाणी जमतात, तेव्हा ते विधानसभेला घटनेने दिलेली कामे पार पाडण्यासाठी तसे करत नाहीत. निवडणुकीतील त्यांचा सहभाग हा केवळ निवडणुकीतील मतदारांच्या पदसिद्ध क्षमतेमुळे

आहे. त्यामुळे प्रत्येकाने मतदान करणे जे या सर्वांनी एकत्र किंवा एकाच वेळी उपस्थित राहून मतदान करण्याची गरज नसावी, ती केवळ मतदानाच्या हक्काचा वापर आहे, विधिमंडळाचे कामकाज नव्हे."

(जोर दिला आहे)

183. कलम १०५ आणि कलम १९४ अन्वयेच्या संरक्षणाची हमी आहे की संसदेच्या निवडून आलेल्या सदस्याचे किंवा राज्य विधिमंडळाचे मत, जसे असेल त्याप्रमाणे,न्यायालयात कारवाईचा विषय होऊ शकत नाही. त्यात 'गुप्त मतदाना'ची हमी नाही. वास्तविकपणे, कलम १०५ आणि १९४ च्या अनविवादात्मकपणे कक्षेत येणाऱ्या, सभागृहाच्या बैठकीदरम्यान जेव्हा संसदेचे किंवा राज्य विधिमंडळाचे निवडून आलेले सदस्य विधेयकांवर मतदान करतात, तेव्हाही त्यांना गुप्त मतदानाची खात्री नसते.जेंव्हा मतदान सामान्यत: आवाजी मतदानाने केले

जाते, विधिमंडळाचे सदस्य "विभाजन मतदान" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मतांची मागणी करू शकतात . अशा वेळी कोणत्या सदस्याने प्रस्तावाच्या बाजूने किंवा विरोधात मतदान केले, याचे मतविभाजन संपूर्ण सभागृहाला आणि सर्वसामान्यांना दिसून येते. कलम १९४ (२) अन्वये संसदीय विशेषाधिकाराचा हेतू विधिमंडळाला त्यांच्या मतांमध्ये किंवा संसदेतील भाषणांमध्ये गोपनीयता प्रदान करणे हा नसून त्यांनी टाकलेल्या मतांशी किंवा त्यांनी केलेल्या भाषणांशी संबंधित कायदेशीर कारवाईपासून त्यांचे संरक्षण करणे हा आहे, याचा अस्वीकार करता येणार नाही. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या मतांचा आणि भाषणांचा मजकूर नागरिकांना सुलभ रीतीने पोहोचणे, हा संसदीय लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे.

184. कुलदीप नायर (सुप्रा) मधील निरीक्षणे निकालाचे गुणोत्तर ठरवत नाहीत आणि ती प्रासंगिक आहेत, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याच्या वतीने ज्येष्ठ वकील श्री राजू रामचंद्रन यांनी

केला आहे. हे न्यायालय केवळ आधीच्या निर्णयाच्या गुणोत्तराने बांधील आहे, हा अगदी प्रचारातील कायदा आहे. या युक्तिवादात काही तथ्य असू शकते. तथापि, कोणत्याही परिस्थितीत, या न्यायालयाच्या सात न्यायाधीशांचे संयोजन असल्याने राज्यसभेच्या निवडणुकीसाठी मतदान करणे कलम 194 (2) च्या कक्षेत येते, असे स्पष्ट केले जाते. इतर सर्व बाबींवर कुलदीप नायर (सुप्रा) यांतील घटनापीठाचा निर्णय हा बरोबर (चांगला) कायदा आहे.

185. विशेष म्हणजे कुलदीप नायर (सुप्रा) हे आणखी एक प्रकरण आहे जिथे न्यायालयाने पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) मधील अल्पसंख्याक निकालाचा आधार घेत राज्यघटनेचा अर्थ लावताना न्यायालयाने संविधानाची मूलभूत वैशिष्ट्ये आणि मूलभूत संरचना मजबूत करणारी रचना स्वीकारली पाहिजे, या प्रस्तावाला बळकटी दिली. राज्यसभेवरील मतदान हे कलम १९४ (२) च्या कक्षेत येते का, या प्रश्नावर कायद्याचा हा प्रस्ताव लागू

केल्यास आम्हीही साररूपाच निष्कर्षावर आलो .

186. के. एस. पुट्टास्वामी (आधार-५ जे) विरुद्ध भारत सरकार (91)या खटल्यात आमच्यापैकी एकाला (न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड,) राज्यसभेचे महत्त्व आणि 'आपल्या लोकशाहीच्या पायावर' द्विसदनवाद यावर चिंतन करण्याची संधी मिळाली. असे मत मांडण्यात आले की:

> "**1106.** राज्यसभेची संस्थात्मक रचना राष्ट्राचे बहुलवाद आणि भाषा, संस्कृती, आकलन आणि अभिरुची यांच्या विविधतेचे प्रतिबिंब उमटविण्यासाठी विकसित करण्यात आली आहे. विधिमंडळ प्रस्तावांची व्यापक छाननी व्हावी, यासाठी राज्यघटना निर्मात्यांनी राज्यसभेची संकल्पना मांडली होती. संसदेचे दुसरे सभागृह म्हणून, हे घाईगडबडीत आणि चुकीच्या पद्धतीने केलेल्या कायद्याला आळा घालण्याचे काम

करते आणि कायदेविषयक कामकाजाच्या छाननीची संधी प्रदान करते. राज्यसभेची भूमिका कार्यकारी उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी आणि सत्तेचा समतोल राखण्यासाठी अंतर्भूत आहे. वरिष्ठ सदन(अप्पर चेंबर) अनेक प्रकारे कनिष्ठ सदनाच्या (खालच्या चेंबरच्या) कामकाजाला पूरक आहे. राज्यसभा लोकसभेच्या संदर्भात समतोल साधणारी संस्था म्हणून काम करते आणि भारताच्या संघराज्यात्मक रचनेचे प्रतिनिधित्व करते. राज्यसभेचे अस्तित्व आणि भूमिका या दोन्ही गोष्टी

---

91. (2018)8 एससीआर **1:2018** एससीसी ऑनलाइन सुप्रीम कोर्ट **1642**

राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा एक भाग आहेत. आपल्या राज्यघटनेच्या रचनेत राज्यसभेची कल्पना केवळ साध्या द्विसदनीय विधिमंडळाचा एक भाग म्हणून न राहता संघीय द्विसदनवादाची संस्था म्हणून केली आहे. 'सिनेट'ऐवजी 'कौन्सिल ऑफ स्टेट्स' असे त्याचे नामकरण त्याचे संघीय महत्त्व योग्य रीतीने सिद्ध करते.

...

1108. [...] एक पुनःनिरीक्षण करणारे कक्ष म्हणून, संविधान-निर्मात्यांनी कल्पना केली की ते लोकांच्या इच्छेच्या विरोधात असले तरी संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करेल. राज्यसभा हे बहुसंख्यांकवादाच्या विरोधाचे प्रतीक आहे.

...

1110. सहभागी शासन हे लोकशाहीचे सार आहे. हे

प्रत्यूत्तरदायित्व आणि पारदर्शकता सुनिश्चित करते . राज्यसभेने पुनःनिरीक्षण केलेल्या विधेयकांचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, अनेक प्रकरणांमध्ये लोकसभेने मंजूर केलेल्या विधेयकांमध्ये राज्यसभेने सुचवलेले बदल अखेरीस करण्यात आले. हुंडाप्रतिबंधक विधेयक हे अशा कायद्याचे उदाहरण आहे ज्यात राज्यसभेने केलेल्या दुरुस्तीच्या आग्रहामुळे दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक बोलावली गेली आणि त्या बैठकीत राज्यसभेने सुचविलेल्या सुधारणांपैकी एक दुरुस्ती विभाजन न करता मंजूर करण्यात आली. राष्ट्रउभारणीत राज्यसभेची महत्त्वाची जबाबदारी आहे, कारण संसदेच्या दोन्ही सभागृहांमधील संवादामुळे भिन्न दृष्टिकोनातून वाद सोडविण्यास मदत होते . भारतीय संसदेचे द्विसदनीय स्वरूप संघराज्य राज्यघटनेच्या कामकाजाचा अविभाज्य भाग आहे .

त्यातून आपल्या लोकशाहीचा पाया रचला जातो. तो राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा एक भाग आहे, त्यामुळे हे घटनात्मक तत्त्वावर आधारित आहे. एखादे विधेयक धनविधेयक आहे की नाही, याबाबत सभापतींचा निर्णय हा प्रक्रियेचा विषय नाही. याचा थेट परिणाम राज्यसभेच्या भूमिकेवर आणि त्यामुळे संघराज्य व्यवस्थेच्या कामकाजावर होतो."

(जोर दिला आहे)

187. राज्यसभा किंवा राज्यपरिषद आपल्या लोकशाहीच्या कामकाजात अविभाज्य कार्य करते आणि राज्यसभा बजावत असलेली भूमिका राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा एक भाग आहे. त्यामुळे कलम ८० अन्वये राज्यसभेचे सदस्य निवडताना राज्य विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांनी बजावलेली भूमिका महत्त्वाची असून मतदानाचा मुक्तपणे आणि कायदेशीर छळाची

भीती न बाळगता वापर व्हावा, यासाठी अत्यंत संरक्षणाची गरज आहे. राज्यसभेचे सदस्य निवडताना विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांनी मतदानाचा मुक्त आणि निर्भीड पणे वापर करणे राज्य विधानसभेच्या प्रतिष्ठेसाठी आणि कार्यक्षम कामकाजासाठी निःसंशयपणे आवश्यक आहे. इतर कोणताही अर्थ कलम १९४ (२) चा मजकूर आणि संसदीय विशेषाधिकाराचा हेतू खोटा ठरवतो. खरे तर कलम १०५ आणि १९४ अन्वये मिळणाऱ्या संरक्षणाला एका कारणास्तव 'वैधानिक विशेषाधिकार' नव्हे तर बोलण्याच्या भाषेत 'संसदीय विशेषाधिकार' म्हटले गेले आहे. हे केवळ सभागृहाच्या पटलावर कायदा बनवण्यापुरते मर्यादित राहू शकत नाही, तर सभागृहाचे अधिवेशन नसतानाही विधिमंडळ किंवा संसदेत होणारे,निवडून आलेल्या सदस्यांचे इतर अधिकार आणि जबाबदाऱ्या यांनाही लागू होते.

J. निष्कर्ष

188. या निर्णयादरम्यान, पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) या केस मधील बहुसंख्य आणि अल्पसंख्याकांच्या कारणमीमांसेचे विश्लेषण करताना, आम्ही वादाच्या सर्व पैलूंवर स्वतंत्रपणे निर्णय घेतला आहे, जसे की घटनेच्या अनुच्छेद १०५ आणि १९४ च्या आधारे संसद सदस्य किंवा विधानसभा सदस्य, जसे असेल तसे, फौजदारी न्यायालयात लाचखोरीच्या आरोपाखालील खटल्यापासून सूट मिळण्याचा दावा करू शकते कां. आम्ही या मुद्द्यावर बहुमताच्या निर्णयाशी असहमत आहोत आणि तो रद्द करतो. आमचे निष्कर्ष असे आहेत:

188.1. स्टेअर डेसिसिचा सिद्धांत (ठरलेल्या बाबींवर उभे राहणे) म्हणजे कायद्याचे न वाकणारे राज्य नाही. या न्यायालयाचे मोठे खंडपीठ, या न्यायालयाच्या मागील उदाहरणांमध्ये तयार केलेल्या चाचण्या लक्षात घेऊन

योग्य प्रकरणांमध्ये मागील निर्णयाचा पुनर्विचार करू शकते. पीव्ही नरसिंह राव (सुप्रा) या केस मध्ये बहुमताने दिलेल्या निकालामुळे विधिमंडळातील एखाद्या सदस्याला खटल्यापासून सूट देण्यात आली आहे, ज्याने मतदान करण्यासाठी किंवा बोलण्यासाठी लाच घेतल्याचा आरोप आहे, सार्वजनिक हितावर, सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणावर आणि संसदीय लोकशाहीवर व्यापक परिणाम झाला आहे. या निर्णयाचा पुनर्विचार न केल्यास,या न्यायालयाने चुक कायम राहू देण्यास मान्यता देण्याचा गंभीर धोका आहे;

188.2. ब्रिटनमधील (युके)हाऊस ऑफ कॉमन्सप्रमाणे भारताला 'प्राचीन आणि निःसंशय' विशेषाधिकार नाहीत, जे संसद आणि राजा यांच्यातील संघर्षानंतर दिलेले अधिकार आहेत. स्वातंत्र्यपूर्व भारतातील विशेषाधिकार हे अनिच्छुक वसाहतवादी सरकारसमोर, कायद्याने चालत

असत. राज्यघटनेच्या प्रारंभानंतर वैधानिक विशेषाधिकाराचे घटनात्मक विशेषाधिकारात रूपांतर झाले;

188.3. एखाद्या विशिष्ट प्रकरणात विशेषाधिकाराचा दावा राज्यघटनेच्या निकषांशी सुसंगत आहे की नाही, हे न्यायालयीन पुनरावलोकनास पात्र आहे;

188.4. विधिमंडळातील मतदान किंवा भाषणासंदर्भात लाचखोरीच्या आरोपाखाली कलम १०५ आणि १९४ अन्वये खटल्यापासून सूट मिळविण्याचा विशेषाधिकाराचा दावा विधिमंडळातील वैयक्तिक सदस्य करू शकत नाही . अशा प्रकारचा सूट मिळविण्याचा दावा दुहेरी कसोटी पूर्ण करण्यात अपयशी ठरतो की हा दावा सभागृहाच्या सामूहिक कामकाजाशी निगडित आहे आणि तो आमदाराची

आवश्यक कर्तव्ये पार पाडणेसाठी आवश्यक आहे,

188.5. राज्यघटनेच्या कलम १०५ आणि १९४ मध्ये विधिमंडळात वादविवाद आणि चर्चा होऊ शकेल असे वातावरण टिकवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एखाद्या सदस्याला लाचखोरीच्या कृत्यामुळे विशिष्ट पद्धतीने मतदान करण्यास किंवा बोलण्यास प्रवृत्त केले जाते तेव्हा हा हेतू नष्ट होतो;

188.6. कलम १०५ (२) आणि १९४ (२) मधील "काहीही" आणि "कोणतेही" हे शब्द सोबतच्या अभिव्यक्तीच्या संदर्भात वाचले पाहिजेत. "च्या संदर्भात" या शब्दाचा अर्थ 'त्यातून उद्भवणारा' किंवा ‘त्याच्याशी स्पष्ट संबंध ठेवणारा' असा आहे आणि ज्याचा दिलेल्या भाषणाशी किंवा मताशी दूरचा सुद्धा संबंध असू शकतो अशा

कोणत्याही गोष्टीचा अर्थ लावता येत नाही;

188.7. कलम १०५ (२) आणि अनुच्छेद १९४ च्या तदनुरूप तरतुदीनुसार लाचखोरीला सूट दिलेली नाही कारण लाचखोरीत गुंतलेला सदस्य असा गुन्हा करतो जो मतदानासाठी किंवा मतदान कसे करावे हे ठरविण्याच्या क्षमतेसाठी आवश्यक नसतो. हेच तत्त्व सभागृहात किंवा समितीतील भाषणासंदर्भातील लाचखोरीला लागू होते;

188.8. विधिमंडळाच्या सदस्यांकडून होणारा भ्रष्टाचार आणि लाचखोरी मुळे सार्वजनिक जीवनातील शुचिता नष्ट होते;

188.9. फौजदारी गुन्ह्याचा खटला चालविण्यासाठी सक्षम न्यायालयाद्वारे वापरले जाणारे अधिकारक्षेत्र आणि विधिमंडळाच्या सदस्याने लाच स्वीकारण्यासंदर्भातील शिस्तभंगाची कारवाई करणे याबद्दल सभागृहाचे अधिकार हे वेगवेगळ्या क्षेत्रात अस्तित्वात आहे.

फौजदारी गुन्ह्यासंदर्भात न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्याची व्याप्ती, हेतू आणि परिणाम आणि सभागृहाचे सदस्यांना शिस्त लावण्याचे अधिकार वेगवेगळे आहेत;

188.10. लाचखोरीच्या कृत्यात गुंतलेला आहे असे आरोप असलेल्या विधिमंडळाच्या सदस्यावर खटला चालविण्याचे न्यायालयाचे अधिकार क्षेत्र मान्य करून विधिमंडळाच्या वैयक्तिक सदस्यांविरुद्ध गैरवापराची शक्यता वाढविली जात नाही किंवा कमी केली जात नाही;

188.11. लाचखोरीचा गुन्हा मान्य केलेल्या कारवाईच्या कामगिरीवर अज्ञेयवादी आहे आणि बेकायदेशीर लाचेच्या देवाणघेवाणीवर स्थिरावतो . मतदान ठरलेल्या दिशेने झाले की मतदान झाले हे महत्त्वाचे नाही.

आमदार लाच स्वीकारतो त्या वेळेसच लाचखोरीचा गुन्हा पूर्ण होतो; आणि

188.12. पीव्ही नरसिंहराव (सुप्रा)या प्रकरणात बहुमताच्या निकालात या मुद्द्यावर जो अर्थ लावण्यात आला आहे , त्याचा परिणाम असा विरोधाभासी निकाल आहे की एखाद्या आमदाराने लाच स्वीकारली आणि सहमतीच्या दिशेने मतदान करून पाठपुरावा केल्यास त्याला सूट दिली जाते. दुसरीकडे, जो आमदार लाच स्वीकारण्यास तयार आहे, परंतु शेवटी स्वतंत्रपणे मतदान करण्याचा निर्णय घेतो त्याच्यावर कारवाई केली जाईल. असा अर्थ अनुच्छेद १०५ आणि १९४ च्या मजकुराच्या आणि उद्देशाच्या विरुद्ध आहे.

189. या रेफरन्स चे उत्तर वरील शब्दांत दिले आहे. या संदर्भात उच्च न्यायालयाच्या वादातील निकालाने उपस्थित केलेल्या

कायद्याच्या प्रश्नाचे उत्तर दिल्यानंतर फौजदारी अपील वरील अटींमध्ये निकाली काढले जाते.

190. प्रलंबित अर्ज असल्यास ते निकाली काढले जातात.

याद्वारे तयार केलेल्या हेडनोट्स: निधी जैन खटल्याचा निकाल : रेफरन्स चे उत्तर दिले आणि फौजदारी अपील निकाली काढले.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.